

◀◀उपमुख्यमंत्री अजित पवार आज नाशिक दौऱ्यावर


रविवार **गांवकरी** उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक




◀◀ दंगल प्रकरणातील ४० जणांना न्यायालयीन कोठडी ◀◀ शेवटचे पान


■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ३५ ■ नाशिक, रविवार, २० एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १६ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


# भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा, आता चला उठा!

## राज ठाकरे यांची साद; उद्धव ठाकरे यांचा प्रतिसाद

### मराठी माणसाच्या अस्तित्वापुढे आमचे वाद, भांडणं क्षुल्लक


आमच्यातील वाद, आमच्यातील भांडणं, आमच्यातील गोष्टी किरकोळ आहेत. त्यापेक्षा महाराष्ट्र खूप मोठा आहे. या महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणं, हे वाद, या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत, असं राज ठाकरे यांनी मराठी दिग्दर्शक महेश मांजरेकरांनी घेतलेल्या मुलाखतीत सांगितले.

महेश मांजरेकरांनी राज ठाकरेंची मुलाखती घेतली. या मुलाखतीमध्ये शिवसेनेसोबत अजूनही एकत्र येऊ शकता का? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर या महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणं, हे वाद, या गोष्टी अत्यंत क्षुल्लक आहेत. त्यामुळे एकत्र येणं आणि एकत्र राहाणं, यात काही मला कठीण गोष्ट आहे असं वाटत नाही. परंतु विषय फक्त इच्छेचा आहे. हा एकट्या माझ्या इच्छेचा विषय नाही आणि माझ्या स्वार्थाचाही विषय नाही. मला असं वाटतं, लार्जर पिक्चर बघणं गरजेचं आहे. तसेच सगळ्या महाराष्ट्रातील राजकीय पक्षातील मराठी लोकांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा. मनसेचे नेते संदीप देशपांडे म्हणाले की, मला वाटतं राजसाहेब बोलले त्यातील आणखी एक महत्त्वाचं वाक्य आहे. ते वाक्य आहे की, समोरच्याची इच्छा आहे की नाही?...हे जोपर्यंत समजत नाही, तोपर्यंत या गोष्टीला अर्थ नाही.



**मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महेश मांजरेकर यांच्या यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीमध्ये पुन्हा एकदा टाळी देण्याचे संकेत दिल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीसुद्धा थेट जाहीरपणे टाळी देत एकप्रकारे मनसे युतीचे संकेत दिले आहेत. या कार्यक्रमात राज ठाकरे यांनी दोन्ही भावांनी एकत्र येण्यासाठी साद घातली व त्याला उद्धव ठाकरे यांनीदेखील लागलीच प्रतिसाद दिला. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात उद्धव आणि राज ठाकरे यांनी महाराष्ट्र धर्मासाठी एकत्र यावे यासाठी मराठी माणसाकडून स्वप्न पाहिलं जात आहे, ते पुन्हा एकदा वास्तवात येणार का? याची उत्सुकता आहे.**

### भांडणं बाजूला ठेवायला तयार, पण एकच अट..



राज ठाकरे यांनी मनसे युतीचे संकेत दिलेले पाहता उद्धव ठाकरे यांनीदेखील त्यांना प्रतिसाद दिला आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे. सर्व मराठी माणसांना महाराष्ट्रासाठी एकत्र येण्याचं आवाहन आहे, पण एक अट आहे, जेव्हा आम्ही लोकसभेला सांगत होतो, हे सगळे उद्योग घेऊन गुजरातला जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर महाराष्ट्र हिताचं सरकार केंद्रात आणि राज्यात बसवू शकलो असतो. तेव्हा पाठिंबा द्यायचा, आता विरोध करायचा मग परत तडजोड करायची हे असं नाही चालणार. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला घरी मी बोलावणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही, त्याचं आगत स्वागत करणार नाही, हे पहिलं ठरवा, मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली भांडणं मी आज सांगतो, जी भांडणं माझ्याकडून नव्हतीच, ती मी मिटवून टाकली चला, पण पहिलं हे ठरवा.

उद्धव ठाकरे यांनी हिंदीवरूनही महायुती सरकारला जाहीर इशारा दिला. ते म्हणाले की, हिंदी सक्ती कराल तर उखडून फेकू. हिंदीची सक्ती पहिलीपासून याचं काय करायचं? अशी विचारणा त्यांनी केली. महाराष्ट्राचे आणि मराठी माणसाच्या मारेकऱ्यांची सुपारी घेऊन हे सत्ताधारी बसले आहेत का? जर महाराष्ट्रात राहायचं असेल तर जय महाराष्ट्र बोलावच लागेल. यांना हिंदीची सक्ती करायची असेलच तर फडणवीस यांना सांगतो, तुमचे जे जोशी आले होते ना माशी शिंकली तसे बोलून गेले, त्याच घाटकोपरमध्ये आधी मराठी सक्ती करून दाखवा. प्रत्येकाला मराठी बोलता येत का ते दाखवा, असे आव्हान दिले. /-.. ४

❛ मतभेद विसरून दोघे एकत्र येणार असतील तर आम्हाला आनंदच आहे. पण त्यांच्या एकत्र येण्याच्या चर्चेवर इतकी घाई करू नका, थोडी वाट पाहा. कुणीही मतभेद विसरून एकत्र येत असतील तर त्यात काही वाईट नाही. दोघे एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे. पण या चर्चा माध्यमांमध्ये आहेत. घाई करू नका, थोडी वाट पाहा. ते दोघे एकत्र आले तर आम्ही त्याचे स्वागत करतो.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

❛ आता ते म्हणतात त्यावर विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती आहे का हे पाहावं लागेल. आमची जीभ आधीच पोळली आहे. त्यामुळे आता कसा विश्वास ठेवायचा, असा प्रश्न माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला पडला आहे. बाकी युतीचा निर्णय हा राज ठाकरे हेच घेतील.

**- संदीप देशपांडे**

❛ उद्धव ठाकरे असतील किंवा राज ठाकरे असतील, हे दोघं तसे भाऊ आहेत. या विषयावर भले महाराष्ट्र चर्चा करत असेल. पण उद्धवसाहेबांना किंवा त्यांच्या संघटनेला त्रास होईल, अशाच पद्धतीने राज ठाकरे यांनी भूमिका घेतल्या आहेत. मराठी माणूस म्हणून सगळ्या शक्ती एकत्र येणं गरजेचं आहे. मला वाटतं चॅनलमध्ये बोलून प्रस्ताव देता येत नसतो. यासाठी अनेक मार्ग आहे.

**- अंबादास दानवे**

❛ दोघांची काय मतं आहेत? याची मला कल्पना नाही. अनेकांची मात्र इच्छा आहे की, दोघांनी एकत्र यावे. २०१४ मध्ये एकत्र येण्याची संधी त्यांना होती. संधी चालून आली होती. राजकारणामध्ये कधी काय होईल हे सांगता येत नाही. मागील काही दिवसांत तुम्ही आम्ही कल्पना केली नाही, असे घडले आहे. मात्र, लगेच असे काही होईल असे वाटत नाही, पण माझ्या शुभेच्छा आहेत. दोघे एकत्र आले तर ठाकरेंची मोठी ताकद निर्माण होईल.

**- आ. छगन भुजबळ**

### ही रक्ताची नाती, एकत्र यावेच लागेल : राऊत

राज ठाकरेंची भूमिका नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही. मुंबई आणि मराठी माणसांसाठी एकत्र यावंच लागेल, असं शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतांनी वक्तव्य केलं. राज ठाकरेंनी आता कुठे मन मोकळं केलं, त्याला आम्ही प्रतिसाद दिला. आता आम्ही वाट बघतोय. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोघेही भाऊ आहेत, ही रक्ताची नाती आहेत, असं सांगत संजय राऊतांनी एकप्रकारे राज ठाकरेंना युतीसाठी साद घातल्याचं दिसतंय. मराठी माणसावर कोणी घाव घालत असेल तर आम्ही साद देण्याची वाट पाहू. याहून चांगलं काही होण्याची आम्ही वाट पाहू.

## महत्त्वाचे

### कॅनडात भारतीय विद्यार्थिनीचा मृत्यू

**नवी दिल्ली :** कॅनडामधील ओंटारिया येथे शिक्षण घेत असलेल्या हरसिमरत रंधावा (वय २१) या विद्यार्थिनीचा गोळीबारात मृत्यू झाला. ही तरुणी घरातून निघाली आणि बस स्टॉपवरती बसची वाट पाहत होती. यावेळी दोन कारमधून एकमेकांवर बेछूट गोळीबार करण्यात आला. एक गोळी थेट तरुणीच्या छातीत लागली. तिला तत्काळ रूग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. हॅमिल्टन पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या हिंसक घटनेचा हरसिमरतशी काहीही संबंध नव्हता. दोन टोळीच्या गोळीबारात ती बळी ठरली.

### दिल्लीत इमारत कोसळून चार ठार

**नवी दिल्ली :** येथील शक्ती विहारमध्ये चार मजली इमारत कोसळून चार जणांचा मृत्यू झालो. ढिगाऱ्याखाली ८ ते १० जण अडकल्याची शक्यता वर्तवली जात आहे. बचाव पथकाकडून मदतकार्य सुरू आहे. शुक्रवार मध्यरात्री अडीज वाजेच्या सुमारास ही घटना घडली. माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन सेवा विभागाने तत्काळ अग्निशमन दलाच्या गाड्या आणि एनडीआरएफ पथके घटनास्थळी दाखल झाली. ४० हून अधिक जण बचावकार्य करत आहेत. बाहेर काढण्यात आलेल्या १० जणांपैकी ४ जणांचा मृत्यू झाला आहे.

### अफगाणमध्ये ५.९ तीव्रतेचा भूकंप!

**काबूल :** अफगाणिस्तान-ताजीकिस्तान सीमावर्ती भागात शनिवारी भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर या भूकंपाची तीव्रता ५.९ इतकी नोंदविण्यात आली असून, या भूकंपाचा परिणाम भारताच्या जम्मू-काश्मीरपर्यंत जाणवला. सध्या कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची अधिकृत माहिती नसली तरी स्थानिक प्रशासनाने खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत.

### कासलेंना तीन दिवसांची कोठडी

**बीड :** निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले सध्या पोलिसांच्या ताब्यात असून, त्याला आज पहाटे अटक करण्यात आली. बीड पोलिसांनी ही कारवाई करत कासले याला पुण्यातील स्वारगेट भागातून ताब्यात घेतले. दरम्यान, त्यानंतर पोलिसांनी रणजीत कासले याला कोर्टात हजर केले. पोलिसांनी त्याच्या ११ दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. कोर्टाने कासलेला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.



### मराठवाड्याची दुसरी पिढी दुष्काळ पाहणार नाही

#### फडणवीस : बीड जिल्हा पाणीदार करणार

**बीड :** बीड जिल्हा सातत्याने दुष्काळाची झळ सोसत आहे. मागच्या काळात आपल्या हक्काचे कृष्णच पाणी आष्टीपर्यंत पोहोचण्याचा निर्णय केला आणि ते पाणी आज आष्टीपर्यंत पोहोचले आहे. हे पाणी केवळ आष्टीपर्यंतच मर्यादित न ठेवता ते पुढे देखील आणून अख्ख्या जिल्ह्याला पाणीदार करण्याचा आमचा प्रण असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीड येथील फिरता नारळी सप्ताह सांगता समारंभात केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मराठवाड्यातील समुद्राकडे वाहून जाणारे ५३ टीएमसी पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणण्यासाठीच्या योजनेला आम्ही मान्यता दिली आहे. आता त्याचे आराखडे तयार व्हायला सुरुवात झाली आहे. कृष्णा वहिनीला जो पूर येतो त्या पुराचे पाणी आम्ही वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून या भागात आणण्याच्या योजनेला मान्यता दिली आहे. मे महिन्यात आम्ही त्याचे टेंडरदेखील काढणार आहोत. त्यामुळे मराठावड्यातील आजच्या पिढीने दुष्काळ बघितला, मात्र पुढील पिढीला या भागात दुष्काळ बघायला मिळणार नाही. पंकजाताईंनी आणि विठ्ठल महाराजांनी सांगितले की, मी गहिनीनाथ गड दत्तक घ्यावा. मात्र गड ताब्यात घ्यायची माजी ऐपत नाही, औकातही नाही. मी गडाला दत्तक घ्यायला तयार आहे. मात्र, तुम्ही मला दत्तक घ्या, असे वक्तव्यही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

### विलेपार्ले पूर्वमधील जैन मंदिरावर हातोडा

**मुंबई :** विलेपार्ले पूर्वमधील कांबळीवाडी येथील ३० वर्षे जुने पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरावर मुंबई महापालिकेने कारवाई करत हातोडा मारला. हायकोर्टाच्या आदेशाने मुंबई महानगरपालिका पूर्व विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. महानगरपालिकेच्या या कारवाईविरोधात जैन समाज आक्रमक झाला आहे.

मुंबई महानगरपालिकाविरोधात विश्व हिंदू परिषद आणि जैन समाजाने पालिकेच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. तसेच पालिका के/पूर्व विभागाचे वॉर्ड ऑफिसर नवनाथ घाडगे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची विनंती देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान जैन धर्मीयांच्या धार्मिक पुस्तक आणि धार्मिक वस्तू पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर फेकण्याचा आरोप करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी जैन मंदिर होते, त्या ठिकाणी ते पुन्हा बांधून देण्याची मागणी जैन धर्मीयांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, हायकोर्टाकडून जैन मंदिर तोडक कारवाईवर स्टे देण्यात आला आहे. /-.. ४



### डॉ. शिरीष वळसंगकर यांची आत्महत्या

**सोलापूर :** सोलापूरमधील प्रसिद्ध न्यूरॉलॉजिस्ट, मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या करून जीवन संपवलं. डॉ. वळसंगकर यांनी त्यांच्या राहत्या घरी आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. सोलापूरमधील स्वतःच्या निवासस्थानी डॉ. शिरीष वळसंगकर यांनी दोन गोळ्या डोक्यात झाडून घेतल्या असल्याची माहिती आता समोर येत आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर यांनी सोलापूरमध्ये मेंदूरोग रुग्णांसाठी मोठं रुग्णालय सुरू केले होते. डॉ. वळसंगकर हे सोलापुरातील पहिले न्यूरॉलॉजिस्ट होते. डॉ. वळसंगकर यांनी मेंदूवर विविध आणि अत्याधुनिक पद्धतीने उपचार करण्यासाठी अत्याधुनिक रुग्णालय सुरू केलं होतं. शहराच्या रामवाडी परिसरात असलेल्या वळसंगकर रुग्णालयाने अनेक मेंदूरोग रुग्णांना जीवनदान दिलं आहे. सोलापूरमध्ये न्यूरॉलॉजी क्षेत्रात क्रांती घडवणारे डॉ. शिरीष वळसंगकर म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, डॉ. वळसंगकर यांनी आत्महत्येसारखे टोकाचं पाऊल का उचललं, याची माहिती अद्याप समोर आली नाही. घरगुती कारणांमुळे डॉ. शिरीष वळसंगकर यांनी अनेक दिवसांपासून प्रॅक्टिस कमी केली होती. त्यांची प्रॅक्टिस कमी झाली असतानाच त्यांच्या आत्महत्येची धक्कादायक घटना समोर आली आहे. त्यामुळे आता पोलिस त्यादृष्टीने तपास करणार असल्याचे म्हटले जात आहे.

### अखेर डॉ. सुश्रूत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल

#### तनिषा भिसे मृत्यू प्रकरण

**पुणे :** दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील गर्भवती रुग्ण तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात अखेर मोठी कारवाई झाली आहे. या प्रकरणात रुग्णालयातील प्रमुख स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुश्रूत घैसास यांच्यावर १०६(१) अंतर्गत अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ससून रुग्णालयाच्या फेरचौकशी अहवालात त्यांच्या वैद्यकीय हलगर्जीपणाची स्पष्ट नोंद झाली असून, त्यावरून ही कारवाई झाली आहे.

अधिकच्या माहितीनुसार, नुकताच मंगेशकर रुग्णालय प्रकरणी ससून समितीचा दुसरा अहवाल समोर आला आहे. ससूनच्या दुसऱ्या अहवालात डॉ. घैसास दोषी असल्याची प्राथमिक माहिती समोर आले आहे. ससून समितीचा दुसरा अहवालानुसार डॉ. घैसास यांच्यावर १०६(१) नुसार अलंकार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, ससून प्रशासनाला जे चार प्रश्न पोलिसांनी उपस्थित केलेले होते. त्याचा अहवाल आज प्राप्त झाला. त्यामध्ये डॉक्टरांची मेडिकल निगलिजन्सी असल्याचे म्हटले आहे, त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर संभाजी कदम, पोलिस उपायुक्त यांनी दिलेली माहितीनुसार, ससून हॉस्पिटलकडून परत अहवाल मागितला. यानुसार डॉ. घैसास यांनी निष्काळजीपण आणि हलगर्जीपणा दाखवला, वेळ घालवला. त्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

बी. जे. मेडिकल कॉलेज याच्या अहवालानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पूर्ण चौकशी करून अहवाल दिला होता. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कायदेशीररीत्या केला जाईल. ही कारवाई शासन जीआरनुसार करण्यात आली आहे. डॉ. घैसास यांचा रोल यात दिसत आहे. त्यानुसार कारवाई केली आहे. डॉ. घैसास यांच्यावर स्टेटमेंट घेतला जाईल, जबाब घेतला जाईल. त्यानंतर त्याची माहिती दिली जाईल.

## तेच गद्दार, तेच हिंदुत्व, तीच टीका, तीच भूमिका

गांवकरी सण्डे अँकर

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवाने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना खडबडून जागी झाली आहे. या पक्षाचे लक्ष आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लागले आहे. त्यातल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. मुंबई, ठाण्यानंतर औरंगाबाद आणि नाशिकमध्ये बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची मजबूत बांधणी केली होती. नाशिकमध्ये शिवसेनेचे अधिवेशन बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत झाले तेव्हा 'आई जगदंबे दार उघड', असे आर्जव करण्यात आले होते. त्यानंतर १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना-भाजपा युतीचे सरकार आले. सन १९६६ साली स्थापन झालेल्या शिवसेनेला राज्यात ४० वर्षांनी प्रथमच सत्ता मिळाली. त्यावेळी शिवसेनेचा प्रतिस्पर्धी हा काँग्रेस पक्ष होता. याच पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये पार पडलेल्या या पक्षाच्या निर्धार शिबिराला महत्त्व प्राप्त झाले होते. पण, आता शिवसेनेचे खरे प्रतिस्पर्धी म्हणजे भाजपा आणि शिवसेना (शिंदे) हे पक्ष आहेत. शिवसेनेने महाराष्ट्रात मोठा केलेला भाजपा आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या जिवावर मोठे होऊन पक्षात फूट पाडून स्वतंत्र चूल बांधून बसलेली शिंदेंची शिवसेना यांच्याशी दोन हात करण्याची वेळ बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेवर आली असून, तिची कमान उद्धव ठाकरे यांच्या हाती आहे. बदलत्या परिस्थितीत पुन्हा एकदा आई जगदंबेला साकडे घालण्यात आले. पण, गेल्या अनेक वर्षांत गोदावरीतून बरेच पाणी वाहून गेले आहे. गेल्या तीन वर्षांत बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना होत्याची नव्हती झाली आहे. पूर्वीच्या शिवसेनेचे स्वरूप आणण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा आर्टिफिशियल इंटेलेक्चुअल-एआयद्वारे (कृत्रिम बुद्धिमत्ता) खुबीने शिबिरात वापर करण्यात आला. शिबिरात बाळासाहेब ठाकरे संवाद साधत असल्याचे हुबेहूब चित्र निर्माण करण्यात आले. शिवसैनिकांनी मरगळ झटकून पेटून उठावे, याचसाठी बाळासाहेब ठाकरे यांना शिबिरात उभे करण्यात आले. /-.. ४

### हाताशी असलेले सरदार

शिवसेना हा काही केडरबेस्ड पक्ष नाही, तर मासबेस्ड पक्ष असल्याने शिबिरात जे काही मंथन झाले, ते विद्यमान राजकीय परिस्थिती, हिंदुत्व आणि गद्दार या मुद्यांवर. यापेक्षा वेगळे खाद्य उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्याकडे दिसले नाही. शिवसेना म्हटली तर नेत्यांची एक मोठी फौज उभी राहायची. पण, आता नाव घ्यावे, असे काही नेते काही राहिलेले नाहीत. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत हे प्रमुख नेते. याशिवाय राजन विचारे (ठाणे), विनायक राऊत (कोकण), अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे (मराठवाडा), अरविंद सावंत (मुंबई) हेच काही नेते नाव घेण्यासारखे राहिले आहेत. त्यांचाच सहभाग शिबिरात होता. नाशिक शहर-जिल्ह्यातून नाव घेण्यासारखे फार कमी नेते राहिले आहेत. सुनील बागूल, विनायक पांडे, सुधाकर बडगुजर, वसंत गिते, डी. जी. सूर्यवंशी, दत्ता गायकवाड, बबनराव घोलप, खा. राजाभाऊ वाजे, भारती ताजनपुरे अशी काही नावे घेण्यासारखी आहेत. यातील काही मंडळी वयस्कर झाली आहेत. हाताशी आहे त्या सरदारांच्या बळावर आणि भरवशावर शिवसेना नव्याने उभी करण्याचा उद्धव ठाकरे यांचा प्रयत्न आहे. याच अनुषंगाने शिबिर घेण्यात आले.




## महत्त्वाचे



### दप्तरमुक्त उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी साकारले 'पेपर रोबोट'

**सिन्नर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बारागावपिंप्री येथे दप्तरमुक्त शनिवार उपक्रमांतर्गत इयत्ता ३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार घडवला. पेपर रोबोट बनवा, या नावीन्यपूर्ण उपक्रमात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या साहित्यांचा वापर करत स्वतःचे कल्पक रोबोट तयार केले. कागदाचे तुकडे, कार्डबोर्ड, रंग, बटणे, गोंद, रंगीबेरंगी तागे व क्राफ्ट साहित्यांचा वापर करत मुलांनी स्वतःचे छोटे रोबोट बनवले. शरीर, डोळे, हात-पाय, सेन्सर अशा सर्व भागांची बांधणी करत त्यावर आकर्षक रंगसंगतीत सजावट केली. हा उपक्रम मुख्याध्यापक नवनाथ हांडगे यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक गोरक्ष सोनवणे यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आला. राजेंद्र पाटील, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड, अनिता बडदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यात मदत केली. या उपक्रमाचे गटविकास अधिकारी अशोक भवारी, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्ताराधिकारी मंजुषा साळुंके, कैलास सांगळे, विजय बागुल, शाळा समिती, पालक व शिक्षक संघानेही विशेष कौतुक केले.



### आ. भुजबळांकडून तात्या टोपेंना आदरांजली

**येवला :** येवल्याचे सुपुत्र थोर क्रांतिकारक, स्वातंत्र्यसेनानी तात्या टोपे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार पंकज भुजबळ यांच्याकडून येवला शहरातील स्वातंत्र्यसेनानी तात्या टोपे यांच्या स्मारकात पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत विनम्र आदरांजली वाहिली. याप्रसंगी येवला विधानसभा अध्यक्ष वसंतराव पवार, उपाध्यक्ष दत्ता निकम, शहराध्यक्ष दीपक लोणारी, सामाजिक कार्यकर्ते सुनील सस्कर, सुमित थोरात, सौरभ जगताप, गणेश गवळी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### निफाड तालुक्यात ५६ हजार ६०० ॲग्री स्टॅकची नोंदणी

**निफाड :** केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी फार्मर आयडी घेणे आवश्यक करण्यात आले आहे. निफाड तालुक्यात जवळपास १ लाख ४६ हजार ११५ शेतकरी आहेत. त्यापैकी ५६ हजार ६०० खातेदारांनी ॲग्री स्टॅकची नोंदणी केली. दि.११ एप्रिल २०२५ च्या शासनाद्वारे काढण्यात आलेल्या परिपत्रकानुसार आता कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाकरिता ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकरी ओळखपत्र क्रमांक (फार्मर आयडी) दि. १५ एप्रिलपासून अनिवार्य करण्यात आला असून, शेतकऱ्यांनी त्यांचे फार्मर आयडी तयार करून घेण्याचे आवाहन महसूल व कृषी विभागाद्वारे करण्यात आले आहे.



### निर्मल हास्यकडून पर्यावरणप्रेमींचा सत्कार

**नाशिक :** वर्षापूर्वी नाशिकची ओळख थंड हवेचे ठिकाण म्हणून केली जात होती. परंतु, विकासाच्या नावाखाली फार मोठ्या प्रमाणात नाशिकमधील जुन्या देशी झाडांची कत्तल करण्यात आली व आज नाशिकचे तापमान ४० झाले आहे. अशा परिस्थितीतदेखील नाशिकमधील काही पर्यावरणप्रेमी निःस्वार्थ भावनेने वृक्षारोपण करून झाडे जगवत आहेत. अशा सर्वांचा इंदिरानगर येथील अजय मित्रमंडळ येथील निर्मल हास्य केंद्राने यथोचित सत्कार केला. पर्यावरणप्रेमी डॉ. संदीप भानोसे, नंदू काळे, संजय फडके, श्रीपाद कुलकर्णी, श्रद्धा जोगळेकर, निलय जोगळेकर व राहुल पांढुर्लीकर यांचा सत्कार झाला. निर्मल हास्य केंद्राचे सदस्य गीता पोळ, शैलजा कुलकर्णी, दिनकर कुलकर्णी, परशुराम सोनवणे, अरुण चुंबळे, दत्ता जोशी, रंजना जोशी, रमेश देसाई व रमेश करवीर व इतर दीडशे कार्यकर्ते उपस्थित होते.



### वक्तृत्व स्पर्धेत गीतांजली कापडी प्रथम

**नाशिकरोड :** ब्राह्मणवाडे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत गीतांजली कापडी हिने प्रथम क्रमांक पटकावला. जिल्ह्यातील ७० स्पर्धकांमधून तिने ठसा उमटवला. ही स्पर्धा पोलिसपाटील कमलाकर रामराजे यांच्या संकल्पनेतून घेण्यात आली. गीतांजलीला ७ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरवण्यात आले. इतर विजेत्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकास ६ हजार, तिसऱ्यास ५ हजार, चौथ्यास ४ हजार, पाचव्यास ३ हजार आणि सहाव्या क्रमांकास १ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह देण्यात आले. या उपक्रमांतर्गत पंचक्रोशीतील स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या ३० विद्यार्थ्यांना एमपीएससीसाठी उपयुक्त पुस्तके वितरित करण्यात आली. ही पुस्तके बापू गिते, नितीन जाधव व माणिक गिते यांच्या हस्ते वाटप करण्यात आली. नायगाव, जायगाव, वडझिरे, ब्राह्मणवाडे आदी गावांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले.

### सायखेडा महाविद्यालय प्राचार्यपदी खालकर

**दिंडोरी :** सायखेडा महाविद्यालयाचे प्राचार्यपदी डॉ. श्रीकांत



खालकर यांची नियुक्ती झाली आहे. मविप्र संस्थेत प्राध्यापक म्हणून डॉ. खालकर कार्यरत असताना त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. तसेच कादवा कारखान्याचे चीफ इंजिनिअर विजय खालकर यांनाही कार्यकारी संचालक म्हणून बढती देण्यात आली आहे.

# आधुनिक कांदाचाळ बांधणीकडे शेतकऱ्यांचा कल

## बाजारभावातील चढ-उतारामुळे साठवणुकीवर भर

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

कांद्याच्या भावात अनेकदा मोठे चढ-उतार पहावयास मिळतात. अशा परिस्थितीत कांदा दीर्घकाळ टिकवण्यासाठी आणि योग्य बाजारभाव मिळवण्यासाठी कांद्याची आधुनिक पद्धतीने साठवणूक करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. ही गरज लक्षात घेऊन कृषी विभागामार्फत कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी कांदाचाळ अनुदान योजना राबवण्यात येत आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना कांदाचाळ बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

१ एप्रिल २०२५ पासून प्रतिटन ५००० रुपये कृषी विभाग अनुदान देणार आहे. आता २५ टनाची मर्यादा वाढवून १००० टनाच्या क्षमतेपर्यंत कांदाचाळीसाठी शेतकऱ्यांना अनुदान दिले जाणार आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांनी दिली. निफाड तालुक्याच्या सर्व भागातील कांदा उत्पादक शेतकरी कांद्याच्या साठवणुकीसाठी पारंपरिक



कुडाच्या कांदाचाळींपेक्षा मोठ्या आकाराच्या अत्याधुनिक कांदाचाळीस पसंती देऊ लागले आहेत. तालुक्यात शेतकऱ्यांच्या सुबत्तेत वाढ करण्यात द्राक्षासारख्या नगदी पिकाने मोठा हातभार लावला आहे. याच जोडीला अलीकडच्या काळात तालुक्यातील लासलगाव, देवगाव, रानवड, पिंपळगाव, ओझर परिसरातील शेतकरी गेल्या पाच-सात वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर कांदापिकास पसंती देऊ लागले आहेत.

सिंचन सुविधांमुळे द्राक्षासह शेतकरी आता नगदी पीक असलेल्या कांदा उत्पादनाकडे वळाला आहे. यात खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात कांदापीक घेत असल्याने कांदा साठवणुकीसाठी पारंपरिक कांदाचाळी कमी करत अत्याधुनिक कांदाचाळी उभारत आहेत. बाजारातील चढ-उतारात कांदा साठवणुकीतून चांगला दर मिळविण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. यासाठी उन्हाळी कांद्याच्या साठवणुकीसाठी पारंपरिक कुडाच्या कांदाचाळींपेक्षा कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आकाराच्या अत्याधुनिक कांदाचाळीस पसंती देऊ लागले आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरावा लागतो. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन आहे. अर्ज सादर केल्यानंतर लॉटरी पद्धतीने लाभार्थ्यांची निवड केली जाते. अर्ज करताना जमिनीच्या मालकीचे कागदपत्र सादर करणे गरजेचे आहे.

> लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर असणे आवश्यक असते. एकच शेतकरी एकदाच अनुदानासाठी पात्र ठरू शकतो. अर्ज करताना आधार कार्ड, बँक पासबुक, जमीन कागदपत्रे, फोटो, इतर आवश्यक दस्तऐवज जोडावे लागतात. ही योजना शेतकऱ्यांसाठी उपयुक्त असल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी यात सहभाग नोंदवावा. **– ज्योती भड,** कृषी सहाय्यक, निफाड



**लासलगाव : खेडलेझुंगेचे नवनिर्वाचित उपसरपंच विश्वनाथ घोटेकर यांचा सत्कार करताना सरपंच मायाताई सदाफळ व ग्रामस्थ. (छाया : समीर पठाण)**

### खेडलेझुंगे उपसरपंचपदी विश्वनाथ घोटेकर बिनविरोध

**लासलगाव : वार्ताहर**

खेडलेझुंगे येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी विश्वनाथ घोटेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळत्या उपसरपंच संगीता माळी यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या उपसरपंचपदासाठी विश्वनाथ घोटेकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

उपसरपंच निवडीसाठी घेण्यात आलेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सरपंच मायाताई सदाफळ होत्या. ग्रामपंचायत अधिकारी बी. बी. कदम यांनी सभेचे कामकाज पाहिले. त्यांना योगेश तासकर, गोविंद आव्हाड, ओंकार साबळे आणि दत्तात्रय घोटेकर यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य जयश्री घोटेकर, विजय गिते, नारायण सदाफळ, साखराबाई बर्डे, विठोबा बर्डे आदींसह माजी जि. प. सदस्य आनंदराव घोटेकर, धर्मराज घोटेकर, नवनाथ घोटेकर, नामदेव गायकवाड, राहुल घोटेकर, धीरज शंखपाळ, दिगंबर गोरडे, सोमनाथ गिते, सूर्यभान घुमरे, केशव घोटेकर, रामदास घोटेकर, मधुकर हागोटे, ज्ञानेश्वर गिते, सुभाष घोटेकर, शिवनाथ घोटेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

### शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे आंदोलन आश्वासनानंतर स्थगित

**निफाड : प्रतिनिधी**

शेतरस्त्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र राज्य शिवपाणंद शेतरस्ता चळवळीतर्फे दि.२१ एप्रिल रोजी आझाद मैदानावर जलत्याग व धरणे आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाची दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २४ एप्रिल रोजी बैठक आयोजित केल्याने आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती शिवपाणंद शेतरस्ता चळवळीचे विजय दरेकर यांनी दिली.

नकाशावरील शेतरस्त्यांच्या तहसील व प्रांत कार्यालयात सुरू असलेले खटले प्रलंबित न ठेवता विशेष कालावधीतच निकाली काढण्यासाठी कालावधी जाहीर करावा तसेच शेतरस्त्यांसंदर्भातील हद्द निश्चिती नकाशावर लांबी, रुंदी, दगडी नंबरी क्षेत्र, रस्ता नंबरिंग क्षेत्र, रस्ता मोजणी शुल्क, संरक्षण फी या संबंधातील विशेष निर्णय शासन निर्णयात घेण्यासाठी महसूलमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, याबाबतचे पत्र महसूलचे मुख्य सचिव प्रवीण महाजन, विशेष कार्यकारी अधिकारी सचिन ढोले यांनी शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांना पत्रान्वये कळविले असल्यामुळे संबंधित आंदोलन तात्पुरते स्थगित केल्याची माहिती दरेकर यांनी दिली.

### वामनानंद महाराज बहुद्देशीय संस्थेतर्फे गोशाळा सुरू

**देवळा : प्रतिनिधी**

राज्य शासनाने गोशाळांना देशी गायींच्या पालनपोषणासाठी दररोज ५० रुपये अनुदान देण्याची योजना सुरू केली आहे. या योजनेमागचा उद्देश स्थानिक गायींच्या जातींचे संगोपन करण्यास प्रोत्साहन देणे असल्याचे प्रतिपादन आ. डॉ. राहुल आहेर यांनी येथे केले.

खर्डे (ता. देवळा) येथील वै. वामनानंद महाराज बहुद्देशीय संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या गोशाळेचे उद्घाटन आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष उदयकुमार आहेर तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी, सहाय्यक आयुक्त डॉ. सुनील धांडे, देवळा पशुविकास अधिकारी डॉ. पूजा घाडगे, खर्डे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. नचिकेत कडाळे, कीर्तन केसरी संजय धोंडगे, महंत गणेशानंद पुरुजी महाराज, महंत गणेशनाथी महाराज, पुंडलिक महाराज आदी उपस्थित होते. यावेळी आ. डॉ. राहुल आहेर म्हणाले की, परिसरातील पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी कटिबद्ध असून, रामेश्वर धरणातून लिफ्टद्वारे वार्शी धरणात पाणी टाकण्यासाठी आपला प्रयत्न आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रवीण देवरे, उपाध्यक्ष अंकुश सोनवणे, सचिव यशवंत देवरे, खजिनदार गणेश निकम, संचालक उमेश आहेर, सुनील जाधव, गणेश अलई, अरुण पवार, कृष्णा जाधव, संदीप पवार, राहुल देवरे, अशोक आहेर, शशिकांत ठाकरे, सुभाष देवरे, समाधान देवरे, बापू शिंदे, हर्षद मोरे आदी उपस्थित होते.




**देवळा : खर्डे येथे गोशाळेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना आ. डॉ. राहुल आहेर. व्यासपीठावर उदयकुमार आहेर, गणेशपुरीजी महाराज, हभप संजय धोंडगे, अरुण पवार आदी. (छाया : विनोद देवरे)**

### शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी काढून घ्यावेत

## कृषी विभागामार्फत आवाहन




**दिंडोरी : प्रतिनिधी**

सरकारी योजनांसाठी आता शेतकऱ्यांना फार्मर युनिक आयडी बनवणे आवश्यक असून, केंद्र सरकारच्या नवीन नियमाप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याने ॲग्री स्टॅक प्रोग्राम अंतर्गत आपली शेतजमीन आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे. अन्यथा, शेतकऱ्यांना पीएम किसान, पीकविमा आणि अन्य कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेता येणार नाही.

राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून राज्य सरकारच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारक लाभ शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्यात ॲग्री स्टॅक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत देण्यात येणारा शेतकरी ओळख क्रमांक पंतप्रधान किसान सन्मान योजनेसाठी बंधनकारक असेल. कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या लाभासाठी हा ओळख क्रमांक मंगळवारपासून (दि.१५) बंधनकारक करण्यात आला आहे. यातून शेतकऱ्यांची ओळख पटविणे आणि खऱ्या लाभार्थ्यांना लाभ देता येणे शक्य होणार असून, बनावटगिरीला आळा बसणार आहे.

राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच, शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच व शेतांचे भूसंदर्भ यांचा एकत्रित माहिती संच तयार करण्यात येत आहे. महसूल अधिकार अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन शेतकऱ्याचा आधार क्रमांक हा त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतांसह एकत्रितरीत्या शेतकरी ओळख क्रमांक देण्यात येत आहे.

**फार्मर आयडीचे फायदे**

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा सहज लाभ, पिकानुसार किसान क्रेडिट कर्ज, पिकांबाबत सल्ला, हवामानाबाबत माहिती व सल्ला, आपत्ती सल्ला आणि प्रतिसाद, बाजारभावाबाबत सल्ला, कीड आणि इतर रोगांबाबत सल्ला, कीटकनाशक वापरण्याबाबत सल्ला, मृदा आरोग्य माहिती जलदगतीने देण्यासाठी शेतकऱ्यांची ओळख पटविण्यासाठी पारदर्शक व सोपी.

**अर्ज कोठे करावे?**

आधार कार्ड स्वतःच्या नावावरील सर्व सातबारा आणि आठ अ उतारा, मोबाइल क्रमांक, फार्मर आयडी बनवण्यासाठी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन अर्ज करता येईल. पद्धत विकसित करणे, हा त्यामागील उद्देश आहे.

### रोजगारासाठी आदिवासी बांधवांचे स्थलांतर

**दिंडोरी/सुरगाणा : वार्ताहर**

सुरगाणा तालुक्यातील लोकांच्या समस्या व रोजगाराचा प्रश्न अजूनही सुटलेला नसून, सुरगाणा तालुक्यात रोजगार उपलब्ध नसल्याने आदिवासी बांधवांना पूर्व भागात स्थलांतरित व्हावे लागत आहे. रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.



उन्हाळ्यात सिंचनाअभावी शेती होत नाही. रोजगार उपलब्ध नसल्याने येथील तरुणांना वर्षातील चार महिने सोडले तर आठही महिने रोजगारासाठी तालुका सोडून बाहेर कामाला गेल्याशिवाय पर्याय नसतो. ग्रामीण आदिवासी युवक जीवनावश्यक साहित्य घेऊन २५ ते ३० जणांचा गट करतात. चार महिन्यांची शिदोरी एकदाच घेऊन वाटेल त्या ठिकाणी कर्नाटक, पंढरपूर, सांगली, सातारा, नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, वणी, सोनजांब, चिंचखेड, पाचोरा, शिंदवड, चामदरी, परमोरी, दह्याणे, कोशिंबे, पालखेड, ओझरखेड, अंबानेर, अंबानेर, लोखंडेवाडी, जोपूळ, दूधखेड, ओझे, करंजवण, देहेगाव, कृष्णगाव, म्हेळुस्के व पश्चिम भागातील पांडे, ठेपणपाडा, जालखेड, कोकणगाव, वनारे आदी ठिकाणी द्राक्षबागांच्या कामाला जातात.

संध्याकाळी एखाद्या मोकळ्या जागेवर संसारगाडा मांडून तीन विटांची चूल तयार करून स्वयंपाक बनवतात. स्वयंपाकात जास्तीत जास्त बागाईतदार मालकाच्या शेतातील कोबी, फ्लॉवर, सिमला मिरची, टोमॅटो याचबरोबर कधीतरी मालकाकडून पार्टी म्हणून बॉयलर कोंबडीचे चिकन खातात तर कधी खिचडी बनवून आपल्या पोटाची उपजीविका भागवतात. पहाटे चार वाजता उठून पाळीनुसार स्वयंपाक करतात. काहीजण डाळ घोटतो, तर काहीजण भाजी चिरतात, भात बनवतात, पोळ्या बनवतात. एकाला भांडी घासण्याचे काम सोपवलेले जाते. हिवाळा आणि उन्हाळा या ऋतूतील आठ महिने रोजगारासाठी घाटमाथ्यावर गेले नाही तर पावसाळ्यातील गरजा प्लास्टिक, पिकांना लागणारे खत, लाल मिरची, छत्री, रेनकोट, चप्पल, शाळेतील मुलांची स्टेशनरी, वह्या-पुस्तके विकत घेणे या गरजा पूर्ण होत नाहीत. उर्वरित पैसे पावसाळ्यातील आरोग्यासाठी वापरावयाचे असतात. तालुक्यात कोणत्याही प्रकारे लहान-मोठे पाझर तलाव व धरण नसल्यामुळे रब्बी हंगामातील शेती व्यवसाय, गायी, म्हशी, शेळी पाळणे शक्य होत नाही. त्यामुळे रोजगारासाठी घाटमाथ्यावर जावे लागते. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन तालुक्यासाठी धरण किंवा नदीला छोटे-मोठे केटी बंधारे, पाझर तलाव याची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा नागरिक व तरुण व्यक्त करीत आहेत.

# आनंदाचा शिधा बंद झाल्याने नाराजी

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारने मोठा गाजावाजा करून अडीच वर्षांपूर्वी 'आनंदाचा शिधा' योजना सुरू केली होती. दरम्यान, या योजनेच्या लाभार्थ्यांना गेल्या सात महिन्यांपासून 'आनंदाचा शिधा' मिळत नसल्याने ही योजना बंद झाल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे. गोरगरिबांची दिवाळी, दसरा, गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असे अनेक सण निवडणूक वर्षांमध्ये गोड करणाऱ्या आनंदाच्या शिधा या योजनेला सरकारने अखेर ब्रेक दिला आहे. लाभार्थ्यांना किट मिळत असल्याने शिधापत्रिकाधारक आनंदात होते.**

राज्यातील महायुती सरकारने ४ ऑक्टोबर २०२२ रोजी राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील व शेतकरी विविध जिल्ह्यांमधील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांमध्ये १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर व १ लिटर पामतेल या चार वस्तू दिवाळी, गुढीपाडवा, गणेशोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी सणांना देण्याचा निर्णय घेतला होता.

राज्यातील जवळपास १ कोटी ६० लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत होता. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागेपर्यंत या योजनेतील लाभार्थ्यांना १०० रुपयांमध्ये ४ वस्तू देण्यात आल्या. विधानसभा निवडणूक झाल्यानंतर या योजनेला दृष्ट लागली. राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याचे कारण सांगून या योजनेसाठी निधीची




तरतूद करण्यात आली नाही. तेव्हाच ही योजना राज्य सरकारने बंद केल्याचा विरोधकांनी आरोप केला होता. आता त्याची प्रचीती लाभार्थ्यांना येऊ लागली असून, नुकत्याच झालेल्या गुढीपाडव्याला व आता असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीला सुद्धा कोणत्याच लाभार्थ्यांना यात असणाऱ्या ४ वस्तूंची किट मिळाले नसल्यामुळे लाभार्थ्यांत नाराजीचा सूर आहे.

यंदाच्या गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या उत्सवाला राज्य सरकारकडून माफक दरात दिल्या जाणाऱ्या वस्तू जनतेला बाजारभावानेच खरेदी कराव्या लागल्या आहेत. राज्याच्या तिजोरीवरील आर्थिक भार वाढत असल्याने विविध योजनांना कात्री लावली जात असून, त्यामध्ये 'आनंदाच्या शिधा' या योजनेचा देखील समावेश झाला आहे.

> 'आनंदाच्या शिधा' योजनेत सणावारांच्या निमित्ताने शिधापत्रिकाधारकांसाठी शंभर रुपयांत एक किलो या प्रमाणात तेल, रवा, चणाडाळ आणि साखर दिली जाते. जवळपास १ कोटी ६० लाख पात्र लाभार्थींना या किटचे वाटप केले जात होते. त्यासाठी प्रत्येक सणाला ३५० कोटींची तरतूद करण्यात येत होती. ३०० ते ३५० रुपयांच्या किमतीच्या या सर्व वस्तू १०० रुपये इतक्या माफक किमतीमध्ये दिल्या जात होत्या.

### येवल्यात आज सलग सोळा तास अभ्यास अभिवादन उपक्रम

**येवला : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यंदाही अनुभव शिक्षण प्रशिक्षण सामाजिक संशोधन बहुद्देशीय संस्था, येवला आणि सलग अठरा तास अभ्यास अभिवादन उपक्रम समितीच्या संयुक्त विद्यमाने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त येवल्यात सलग सोळा तास अध्ययन करून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कृतिशील अभिवादन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचे उद्गाते हिरामण मेश्राम यांनी याबाबत अधिकृत माहिती दिली. येवला शहरातील मुक्तिभूमी येथील विपश्यना हॉल येथे दिनांक २० एप्रिल रविवारी रोजी सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत हा उपक्रम राबविला जाणार आहे. महाराष्ट्रातील नांदेड येथील अशोका रिसर्च सेंटरचे दीपक कदम हे असा मोठ्या स्वरूपाचा उपक्रम राबवितात. नांदेडनंतर येवला येथे हा उपक्रम गेल्या अकरा वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. नाचून, गाऊन आनंदोत्सव साजरा करून महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. त्याचप्रमाणे तेवढ्याच ताकदीने असे बौद्धिक उपक्रम राबविला जाणे आज काळाची गरज असल्याचे मेश्राम यांनी नमूद केले आहे. तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व सर्व वयोगटातील लोकांसाठी हा उपक्रम खुला व मोफत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या उपक्रमादरम्यान चहा, नाश्ता व भोजन देण्यात येते. सहभागी अध्ययन व वाचकांना सन्मानपत्र देण्यात येते, अशी माहिती संस्थेकडून देण्यात आली आहे. मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी होऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी लोकांनी सहभाग घेण्याचे आवाहन यावेळी अभ्यास अभिवादन उपक्रम समितीने केले आहे.

## महत्त्वाचे




### न्यू मराठा हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू मराठा हायस्कूल नाशिकमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर शिंदे हे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका मोनिका वडजे यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय सांगितला. अध्यक्षीय मनोगतातून ज्ञानेश्वर शिंदे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य (दलित) लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार किंवा आधुनिक भारताचे निर्माते असेही म्हणतात हे सांगितले. सूत्रसंचालन व आभार मोनिका वडजे यांनी मानले. फलक लेखन रूपाली शेडगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



### मविप्र सेवकांची सहविचार सभा

**येवला :** शिक्षकांनी स्वतः परिपूर्ण राहून विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करावे. दर्जेदार शिक्षण दिले तर विद्यार्थी घडतील. गुणवत्ता असेल तर विद्यार्थी स्पर्धेत टिकतील. त्यामुळे शिक्षकांनी स्वीकारलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पूर्ण करावी, असे प्रतिपादन मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर यांनी केले. येवला येथे होरायझन अकॅडमीमध्ये मविप्र सेवकांच्या तालुकास्तरीय सहविचार सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले, की विद्यार्थी हे आपले दैवत मानून तसेच आपली मुले आहेत, असे समजून शिक्षकांनी ज्ञानार्जन करावे. उत्तम शिक्षण दिले तर विद्यार्थी संख्या आपोआप वाढेल. शाळेचे स्टेअरिंग हे शिक्षकांच्या हाती असते. शालेय शिस्त व गुणवत्तेत तडजोड न करता शाळेचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. कला, क्रीडा व विविध स्पर्धा परीक्षांना जास्तीत जास्त विद्यार्थी बसवून गुणवत्ता यादीत मुले कसे येतील, यासाठी मेहनत घ्यावी. शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीप्रमाणे कामकाज करावे, असेही बनकर यांनी आवर्जून सांगितले. प्राचार्य आर. एस. पाखले, आर. सी. महाले, डी. जी. पानसरे, एम. ए. भगत यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध मुद्यांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले. यावेळी येवला तालुक्यातील मविप्रच्या पाटोदा, जळगाव नेऊर, मुखेड, देशमाने, गवंडगाव, अंगणगाव, निमगाव मढ, कुसमाडी, पिंपळगाव जलाल, आडगाव रेपाळ आदी सर्व शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी सेवक उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य आर. एस. पाखले, एम. ए. भगत, डी. जी. पानसरे, आर. सी. महाले, राजुळे, गायकवाड, शिंदे, ठाकरे, ढगे, सोनवणे, साबळे, खैरनार आदी शाखाप्रमुख उपस्थित होते. मुख्याध्यापिका सुनीता हिंगडे यांनी स्वागत केले. आर. एस. पाखले यांनी प्रास्ताविक केले. साबळे यांनी आभार मानले.



### 'निमा'ची स्किल सेंटरसाठी तयारी

**नाशिक :** येथे टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्सचे सल्लागार श्रीनिवास यांची निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी निमा पदाधिकाऱ्यांसोबत भेट घेतली. टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स ही संस्था भारतातील कामगारांना उद्योगाशी संबंधित कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी स्थापन केलेली एक महत्त्वाची प्रशिक्षण संस्था आहे. या भेटीमध्ये सचिव राजेंद्र अहिरे, उपाध्यक्ष मनीष रावल आणि स्किल - स्टार्टअप समितीचे अध्यक्ष श्रीकांत पाटील देखील उपस्थित होते. या चर्चेत टाटा संस्थेच्या सहकार्याने निमा मध्ये एक कौशल्य विकास केंद्र उभारण्याच्या बाबत विचारविनिमय झाला. विशेषतः प्रगत उत्पादन, इलेक्ट्रिक वाहने, आणि इलेक्ट्रिकल क्षेत्रांसारख्या क्षेत्रांमध्ये नाशिकमधील कामगारांना सक्षम बनवण्याचा, तसेच कौशल्य विकासामध्ये नाशिकला भारतात अग्रस्थानी नेण्याचा उद्देश आहे. श्रीनिवास यांनी टाटा कडून पूर्ण सहकार्य आणि मदतीची हमी दिली, तसेच मुंबईतील टाटांचे कौशल्य विकास केंद्र पाहण्यासाठी निमंत्रण दिले. यासोबत, युनिव्हर्सल ग्रुपचे एमडी प्रशांत खबासवाडकर यांच्याशी नाशिकमध्ये नवीन गुंतवणूक आणण्याच्या संदर्भात चर्चाही झाली. त्यांनी भारतातील मोठ्या उद्योग समूहांशी संवाद साधून निमा अध्यक्षांसोबत नाशिकमध्ये त्यांच्या भेटीची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले. या भेटीद्वारे नाशिकमधील कौशल्य विकासात एक नवीन पर्व सुरू होण्याचा विश्वास निमा अध्यक्ष आशिष नहार यांनी व्यक्त केला.




### किम्स मानवतामध्ये शंभर सांधेरोपण शस्त्रक्रिया

**नाशिक :** किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. प्रणीत सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली १०० पेक्षा अधिक यशस्वी गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पार पडल्या. शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसह त्यांच्या नातेवाइकांनी सहभाग घेतला. हा सोहळा रुग्णांच्या यशोगाथांचा उत्सव ठरला. याप्रसंगी डॉ. राज नागरकर (मॅनेजिंग डायरेक्टर किम्स मानवता हॉस्पिटल) यांनी सांगितले, की डॉ. प्रणीत सोनवणे यांच्या उत्तम कौशल्यामुळे आणि मेहनतीमुळे आम्हाला आज हा टप्पा गाठता आला आहे. रुग्णांचे आरोग्य, लवकर पुनर्वसन आणि आयुष्याची गुणवत्ता सुधारण्यावर आमचा भर आहे. हा कार्यक्रम म्हणजे त्याच यशाची साक्ष आहे, असे डॉ. प्रणीत सोनवणे यांनी सांगितले. कार्यक्रमात सहभागी रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांनी आपल्या अनुभवांद्वारे डॉक्टर आणि हॉस्पिटलच्या सेवांचे कौतुक केले.

# चामरलेणीवर अडकलेल्या दोघांची अग्निशमन दलामुळे सुखरूप सुटका

**पंचवटी : वार्ताहर**

**चामरलेणीवर ट्रेकिंग करण्यासाठी गेलेले महाविद्यालयीन दोन युवकांना खाली कसे उतरावे हे समजत नव्हते. त्यामुळे ते वरतीच अडकून पडले. त्यापैकी एकाने पंचवटी अग्निशमन दलास आणि पोलिसांशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानंतर काही वेळातच अग्निशमन दलाच्या जवानांसह म्हसरूळ पोलिस ठाण्याचे कर्मचारी नितीन पारधे यांनी दोन्ही युवकांना चामरलेणीवरून रेस्क्यू करून सुखरूप खाली आणले.**



साहिल जयसिंग टिळे (२४, राहणार उपनगर), ओम प्रकाश यादव (रा. उपनगर) हे दोन्ही युवक बिटको कॉलेज एम.एस्सी शिकत आहेत. हे दोन्ही युवक शनिवार दि. १९ रोजी सकाळी चामरलेणीवर ट्रेकिंग करण्यासाठी गेले होते.चामरलेणीवर ट्रेकिंग करत असताना टेकडीवर चुकून जाऊन अडकून गेले. त्यांना खाली कसे उतरावे हेही समजेनासे झाले. यातील साहिल जयसिंग टिळे या युवकाने सकाळी ९ वाजून १० मिनिटांनी मोबाइल फोनवरून पंचवटी अग्निशमन केंद्राशी संपर्क साधत मी आणि माझा मित्र ओम प्रकाश यादव हा चामरलेणीच्या माथ्यावर उतारावर अडकून पडलो आहे. आम्हाला काही सुचत नाही आणि आम्ही दोघेही खाली पडू शकतो असे सांगितले. त्यामुळे आम्हाला तत्काळ मदत करा. हा कॉल जाताच पंचवटी अग्निशमन केंद्राचे स्टाफ लीडिंग फायरमन संजय कानडे, फायरमन बाळासाहेब लहांगे, वाहनचालक प्रकाश मोहिते, ट्रेनी फायरमन प्रणय बनकर, ऋषिकेश जाधव, सिद्धांत गोतीस घटनास्थळी बंब क्रमांक १५ ३३०९ सोबत पोहचले.

घटनास्थळी पोहचल्यावर बंबावरील स्टाफने रेस्क्यूचे साहित्य, दोर घेऊन चामरलेणीच्या पायऱ्यांनी व कच्च्या रस्त्याने डोंगराची चढाई केली. डोंगरावरील तीव्र उतारावर अडकलेली दोन मुले दिसली. परंतु त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी खालून रस्ता नव्हता. दुसऱ्या रस्त्याने डोंगराच्या माथ्यावर जाऊन, मोठा दोर डोंगराच्या मोठ्या खडकाला बांधून अडकलेल्या युवकांकडे फेकला व प्रथम एकाला, नंतर दुसऱ्या युवकाला दोराच्या सहाय्याने सुखरूपपणे वर काढून रेस्क्यू केले. त्या युवकांना चामरलेणीवर असलेल्या पोलिस बिनतारी संदेश केंद्राजवळ बसवून पाणी पाजून धीर दिला. नंतर त्यांना डोंगराच्या कच्च्या रस्त्याने खाली पोलिस चौकीपर्यंत आणून पोलिस चौकीमध्ये त्यांच्या नावांची नोंद अंमलदार गणेश नागरे यांनी करून घेतली. त्यानंतर त्या युवकांना म्हसरूळ पोलिस स्टेशनचे पोलिस अंमलदार नितीन पारधे यांच्या ताब्यात दिले. सोबत मदतीला वैनतेय संस्थेचे परदेशी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे प्रथमेश लोहगावकर उपस्थित होते.

## जेईई-मेन परीक्षेत 'रेजोनन्स'च्या विद्यार्थ्यांचे यश

**नाशिक : प्रतिनिधी**

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने काल दि. १९ एप्रिल रोजी जेईई-मेन २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर केला. रेजोनन्सने या परीक्षेत २५ वर्षांपासून सर्वाधिक प्रमाणात निकाल देण्याचा वारसा या वर्षीही सातत्य राखले आहे.

२०२५ मध्ये झालेल्या जेईई-मेन परीक्षेत रेजोनन्स, नाशिक केंद्रातील वेदांत भट्ट या विद्यार्थ्याने सर्वाधिक ९९.९८९ पर्सेंटाइलने (-२२६) जिल्ह्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच ओम गायधनी ९९.९५५, फाल्गुन राठोर ९९.८५७, आर्य दुबे ९९.८५६, हर्ष म्हस्के ९९.८१६, जगन्नाथ ९९.७९९, तन्मय गुप्ता ९९.७७३, ओम लसणापुरे ९९.७०१, सौरभ शिंदे ९९.६०२, आशिष रकिबे ९९.५०८, तनुज पांगारकर ९९.४२३, तेजस सूर्यवंशी ९९.४१७, प्रसाद वाघ ९९.४०९, पार्थ अचाट ९९.३८०, अर्णव घोटेकर ९९.२४१, श्रेयस शुक्ला ९९.२३०, आयुष बोडके ९९.०७१, सतेज कोल्हे ९९.०५१, पर्सेंटाइल या अठरा विद्यार्थ्यांनी ९९ पर्सेंटाइलपेक्षाही अधिक गुण मिळून घवघवीत यश मिळाले आहे. तसेच इतर ५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ९५ पर्सेंटाइलपेक्षा अधिक गुण मिळाले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित व अनुभवी मार्गदर्शक स्वप्नील जैन सर, दिल्ली आयआयटी, मनीष शंकर सर, मुंबई आयआयटी, शिवाजी भोसले सर, धनबाद आयआयटी, साकेत राज सर एनआयटी पटणा व त्यांची टीम यांनी सर्व विषयांचे योग्यरीतीने मार्गदर्शन केले. आपले मनोगत व्यक्त करताना वेदांत भट्ट या विद्यार्थिनीने सर्व विषयांचे योग्य व समावेशक मार्गदर्शन, नियमित सूक्ष्म व मोठ्या टेस्ट्स व वेळोवेळी प्रत्येक मार्गदर्शकांनी शंकांचे निरसन केल्यामुळे अभ्यासाला गती मिळाली म्हणून माझा अभ्यास खूप चांगला झाला, असा उल्लेख केला. ओम गायधनी म्हणाला, मी क्लास लावला तेव्हा सुरुवातीपासूनच अभ्यासक्रम व मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण, अभ्यासासाठी प्लॅनर दिले होते. यामुळे मला भरपूर फायदा झाला.

### ठाणगाव शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**ठाणगाव :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड होते. वर्गशिक्षक रामदास सदगीर व समीर आरोटे यांनी मनोगत व्यक्त केले. गावातील प्रसिद्ध किराणा व्यावसायिक दीपक हनुमान बैरागी यांनी आपले वडील कै. हनुमान रघुनाथ बैरागी यांच्या स्मरणार्थ शाळेतील सर्व १ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना स्नेहभोजन दिले. चौथीची विद्यार्थिनी कु. कार्तिकी सगर हिने सूत्रसंचालन केले. यशस्वीतेसाठी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## वैद्यकीय विभागात लवकरच खांदेपालट

### पंड्या हॉस्पिटल दुर्लक्ष प्रकरण भोवले

**नाशिक : प्रतिनिधी**

वर्षभरापूर्वी महात्मानगर येथील पंड्या हॉस्पिटलमध्ये तपासणीदरम्यान गर्भपातासाठी आवश्यक गोळ्या, औषधे सापडल्याने खळबळ उडाली होती.

धक्कादायक म्हणजे या रुग्णालयाने नूतनीकरणही केले नसल्याचे समोर आले होते. या प्रकरणी पंड्या रुग्णालयावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, महापालिकेच्या आरोग्य विभागाने याबाबत हलगर्जीपणा केल्याचा आरोप मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण व डॉ. शेटे यांच्यावर करून या दोन्हींची चौकशी सुरू असून, राज्याच्या आरोग्य विभागाने बदलीचे आदेश दिले आहे. अद्याप नगरविकास खात्याकडून निर्देश येताच डॉ. चव्हाण यांना मूळ सेवेत पाठवले. मनपा मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण व डॉ. शेटे यांना पंड्या अवैध गर्भलिंगनिदान प्रकरण भोवले असून, शासनाच्या आरोग्य विभागाने त्यांच्या चौकशीचे व बदलीचे आदेश दिले. आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली जाणार आहे. पंधरा दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने पालिका प्रशासनाला दिले आहेत. यामुळे या दोघांच्या अडचणी वाढल्या आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात हा मुद्दा गाजला होता. आमदार मनीषा कायंदे यांनी लक्षवेधी मांडत नाशिक मनपाच्या आरोग्य विभागावर आरोप केले होते. त्यावर आरोग्यमंत्री आबिटकर यांनी संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले. शासनाने या प्रकरणाची सखोल चौकशीचे आदेश दिले. आरोग्य आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करून पंधरा दिवसांत अहवाल सादर करा, अशा सूचना दिल्या आहेत. तसेच आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण हे मनपात प्रतिनियुक्तीवर आहेत. ती रद्द करून त्यांना त्यांच्या मूळ सेवेत संदर्भ रुग्णालयात पाठवले आहे. तर वर्षानुवर्षे मनपा मुख्यालयात असणारे डॉ. शेटे यांच्याही बदलीचे आदेश देण्यात आले आहे. याआधी महापालिकेच्या शिक्षण विभागाचे तत्कालीन शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर त्यांना पालिकेतून हटवण्यात आले. त्यानंतर आता वैद्यकीय विभागाचा नंबर आला असून, याबाबतची चौकशी सुरू आहे.

## नांदगाव कृउबाच्या संचालकपदी तेज कवडे

**नांदगाव : प्रतिनिधी**



नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकपदी तेज कवडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शनिवार (दि. १९) रोजी तालुक्याचे लोकप्रिय आमदार सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती दर्शन आहेर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

झालेल्या या बैठकीत संचालक मंडळाच्या वतीने एकमताने तेच कवडे यांची निवड करण्यात आली. सूचक म्हणून सतीश बोरसे तर अनुमोदक म्हणून एकनाथ सद्गीर यांनी सही केली. निवडीपूर्वी नांदगाव मतदारसंघाचे आमदार सुहास कांदे यांनी तेज कवडे यांचे नाव जाहीर केले. त्यानंतर सभापती दर्शन आहेर यांच्या अध्यक्षतेखाली सदर निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी उपसभापती अनिल सोनवणे, संचालक साहेबराव पगार, बंडू पाटील, समाधान पाटील, जीवन गरुड, अनिल वाघ, दीपक मोरे, पोपट सानप, अमोल नावंदर, यज्ञश कलंत्री, नीलेश इपर, मंगलाबाई काकळीज, अलकाताई कवडे या संचालक मंडळासह शिवसेना पदाधिकारी गुलाब भाबड, सागर हिरे, किरण देवरे, प्रकाश शिंदे, सचिव अमोल खैरनार, याचप्रमाणे पुंजाराम जाधव, भाऊसाहेब काकळीज, सुधीर देशमुख, भैयासाहेब पगार आदींसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

तेज कवडे हे यापूर्वी नांदगाव बाजार समितीवर २००८ ते २०२२ असे सलग १४ वर्षे सभापती होते.

## भांडारकरमधील सहा हस्तलिखितांचा समावेश 'युनेस्कोच्या रजिस्टर'मध्ये

**पुणे :** भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरातील सहा हस्तलिखितांचा समावेश युनेस्कोच्या 'मेमरी ऑफ द वर्ल्ड रजिस्टर'मध्ये झालेला आहे. दोन हजार वर्षांपूर्वी रचलेल्या भरतमुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथाचे एक हस्तलिखित तसेच भगवद्गीतेची काश्मीरी शारदा लिपीतील पाच हस्तलिखिते यांची विशेष नोंद युनेस्कोने नुकतीच घेतलेली आहे.

युनेस्कोच्या यादीतील समावेशाकरिता कागदपत्रांची पूर्तता नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्रातील अभ्यासक डॉ. रमेशचंद्र गौर यांच्या समुहाने तसेच भांडारकर संस्थेतील डॉ. अमृता नातू आणि डॉ. श्रीनन्द बापट यांनी गेल्या वर्षी जून २०२४ मध्ये केली होती. जॉर्ज ब्यूह्लर या विद्वानाने १८७५-७६ या वर्षात भगवद्गीतेची तीन हस्तलिखिते काश्मीरमधून मिळवलेली होती. तसेच सर रा. गो. भांडारकरांनी १८८३-८४ या वर्षात दिल्लीहून दोन हस्तलिखिते विकत घेतलेली होती. या सर्व हस्तलिखितांचा संस्कृत भाषेमधला मजकूर शारदा लिपीत लिहिलेला असून भगवद्गीतेवरील निरनिराळ्या प्राचीन टीका या पाच हस्तलिखितांमध्ये आढळतात. त्यामुळे हा वारसा जागतिक महत्त्वाचा असल्याचे युनेस्कोने घोषित केलेले आहे.

## रेल्वेच्या समृद्ध वारशाचे दर्शन

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

जागतिक वारसा दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागात विविध ऐतिहासिक स्थळांना आकर्षक रोषणाईने सजवण्यात आले असून, रेल्वेच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणाऱ्या वस्तूंच्या प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाअंतर्गत जुने स्टीम इंजिन, नॅरो गेज डिझेल लोकोमोटिव्ह, व्हिंटेज कोच आणि भुसावळ येथील ऐतिहासिक विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय यांसारख्या ठिकाणांना रंगीबेरंगी प्रकाशाने उजळवण्यात आले. हे सर्व स्थळ विभागाच्या गौरवशाली इतिहासाची साक्ष देणारे असून, त्यांना विशेष सजावट करून नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र बनवण्यात आले.

या विशेष दिवशी भुसावळ येथील रेल्वे वारसा संग्रहालय आणि देवळालीतील पंचवटी रेल्वे संग्रहालयात विशेष प्रदर्शने भरवण्यात आली. यामध्ये रेल्वेच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाशी संबंधित दुर्मीळ वस्तू, छायाचित्रे आणि माहितीपत्रके ठेवण्यात आली होती. नागरिकांना भूतकाळातील रेल्वेची झलक पाहण्याची संधी मिळाली, तसेच विभागाच्या प्रगतीचा मागोवा घेता आला.



## डॉ. साहेबराव निकम यांचा सत्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

आर.एन.सी. आर्ट्स, जे.डी.बी. कॉमर्स अँड एन.एस.सी. सायन्स महाविद्यालय नाशिक रोड येथील अकाउंटन्सी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. साहेबराव निकम यांचा नाशिक जिल्हा सरकारी परिषद व कर्मचारी बँकेचे माजी संचालक शंकरराव शहाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. साहेबराव निकम लिखित टोमॅटो प्रोडक्शन अँड मार्केटिंग या इंग्रजी माध्यमातील पुस्तकाचे अमेरिकेतील प्रकाशनाच्या मार्फत प्रकाशन झाल्याबद्दल नाशिक जिल्हा सरकारी कर्मचारी व परिषद बँकेचे माजी संचालक शंकरराव शहाणे यांनी सत्कार केला. याप्रसंगी कमल शहाणे, प्रा. डॉ. कृष्णा शहाणे, प्रा. डॉ. राजेंद्र शहाणे, डॉ. जयश्री शहाणे, विद्या शहाणे, सार्थक शहाणे, पार्थ शहाणे, अपूर्वा शहाणे आदी उपस्थित होते.

# ना. भुसे यांची बोरगाव शाळेला भेट

## पोषण आहाराची चव शिक्षकांनी घेतल्यावरच विद्यार्थ्यांना द्यावा

**सुरगाणा : प्रतिनिधी**

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी काल सकाळी जिल्हा परिषद बोरगाव शाळेत अचानकपणे भेट देत प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थी गुणवत्तेची पाहणी केली. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानावर आधारित राज्यभरात सुरू असलेला निपुण भारत अंतर्गत निपुण महाराष्ट्र या उपक्रमाची पडताळणी केली. यामध्ये विद्यार्थ्यांना संख्याज्ञानावर आधारित गणित क्रिया, पाढे, कविता पाठांतर, प्रकट वाचन, लेखन, गणन आदी शैक्षणिक बाबींची पडताळणी केली. त्याचबरोबर शालेय भौतिकबाबत शालेय आवार परिसर सफाई, स्वच्छतागृह, पिण्याचे शुद्ध पाणीपुरवठा, शालेय पोषण आहार योजना, शालेय रंगरंगोटी याची पाहणी केली. पोषण आहाराची चव आधी शिक्षकांनी घेतल्यानंतरच विद्यार्थ्यांना वाटप करावा, अशी सूचना केली.



**सुरगाणा : बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत भेटीप्रसंगी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे. समवेत सरपंच अशोक गवळी.**

यावेळी शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा उंचावण्यासाठी शिक्षकांनी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत, शालेय स्वच्छता, विद्यार्थ्यांचे आरोग्य, भौतिक सुविधा, शालेय पोषण आहार, निपुण भारत कार्यक्रमाची अंमलबजावणी केवळ कागदावर न करता प्रत्यक्ष कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. शालेय कामकाजाबाबत समाधान व्यक्त करीत गुणवत्तेत वाढ करावी, अशी सूचना केली. ग्रामपंचायतीचे सरपंच अशोक गवळी यांनी शाळेकडे लक्ष देऊन शाळेत भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे सांगितले.

यावेळी सरपंच यांनी वेळोवेळी शाळेकडे पुरेसे लक्ष देऊन भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. अडचणी असल्यास लेखी निवेदन मला द्यावे, असे मंत्री यांनी सांगितले. वर्गातील एक विद्यार्थी अडखळत वाचत करीत असल्याने त्यास संपादणूक पातळीपर्यंत घेऊन यामध्ये सुधारणा घडवून आणावी, अशा सूचना केल्या.पुन्हा पंधरा दिवसांनी येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सरपंच अशोक गवळी यांनी शाळेला वेळोवेळी भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्याने सरपंचांचे काम चांगलं आहे, असे गौरवोद्गार काढले. शालेय विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आणलेल्या खाऊचे वाटप करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी अल्पा देशमुख यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करीत भौतिक सुविधा उपलब्धतेबरोबरच नियमित शालेय भेटी देऊन निपुण महाराष्ट्र उपक्रम यशस्वीपणे राबवून गुणवत्तेत वाढ करावी, अशी सूचना केली.

## सचिन पवार यांची राज्यस्तरीय आदर्श ग्रा.पं. अधिकारी पुरस्कारासाठी निवड

**नाशिकरोड : प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागातर्फे सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षांसाठी राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील दरी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सचिन चंद्रकांत पवार यांची सन २०२२-२३ साठी आदर्श अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे.

पवार हे गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामविकासाच्या क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली दरी ग्रामपंचायतीने विविध स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. यापूर्वी सन २०१४-१५ मध्ये त्यांना जिल्हास्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. दरी ग्रामपंचायतीत त्यांच्या कार्यकाळात राबविण्यात आलेले काही महत्त्वपूर्ण उपक्रम पुढीलप्रमाणे- पर्यावरण संवर्धन : माजी ग्रामरोजगार हमी योजना व सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून गावात एकूण ७८,३५० झाडांचे रोपण करण्यात आले असून, त्यापैकी सुमारे ८५ टक्के झाडे आजही जिवंत आहेत. त्यामुळे दरी गाव 'ऑक्सिजन पॉकेट' म्हणून उदयास येत आहे.

सौर ऊर्जेचा वापर : ग्रामपंचायतीतर्फे सौरऊर्जेवर चालणाऱ्या पिठाच्या गिरणीची उभारणी करण्यात आली असून, गावकऱ्यांना कमी दरात दळण सेवा पुरवण्याचा ग्रामपंचायतीचा मानस आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार २०२२-२३, हा पुरस्कार माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने प्रदान करण्यात आला. (पुरस्कार रक्कम ८ लाख रुपये)

तालुका आर. आर. आबा सुंदर गाव पुरस्कार, यामध्ये दरी ग्रामपंचायतीचा समावेश झाला. (पुरस्कार रक्कम १० लाख रुपये)

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत नाशिक विभागात प्रथम क्रमांक पटकावला.

# एकलहरेत संयुक्त कृती समितीचे क्रमबद्ध आंदोलन

## प्रश्न न सुटल्यास बेमुदत संप करण्याचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे येथे कमी मनुष्यबळात येथील तीनही संच सुरू असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, येथील संयुक्त कृती समितीने क्रमबद्ध आंदोलनाची भूमिका घेतलेली आहे.**



यातील पहिल्या टप्प्यात येथील प्रवेशद्वारावर संघटनेचे पदाधिकारी, सभासद आणि अधिकारी, कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून प्रशासनाचा निषेध केला. त्यानंतर दि. २१ व २२ द्वारसभा दि. २४ रोजी धरणे आंदोलन तर दि.२८ रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप करण्यात येणार आहे. यानंतरही प्रश्न न सुटल्यास बेमुदत संप पुकारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे येथे २१० मेगावॅटचे तीन संच स्थापित असून, सध्या तीनही संच कार्यान्वित आहे. तीनही संचाच्या संचलनाकरिता आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसतानासुद्धा ३/४ पाळीपत्रकानुसार येथील कर्मचाऱ्यांना काम करावे लागत आहे. सततच्या कामाच्या ताणामुळे व कामाच्या कार्यस्थळात होणाऱ्या बदलामुळे येथील कर्मचाऱ्यांचे मानसिक व शारीरिक स्वास्थ्य बिघडत आहे. तांत्रिक संवर्गातील पदोन्नतीदेखील रखडलेली असल्यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. प्रशासनास या अगोदरही याबद्दल कल्पना कृती समितीमार्फत पत्राद्वारे देण्यात आली होती. परंतु, कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने संयुक्त कृती समितीमार्फत पत्राद्वारे क्रमबद्ध आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी ललित अल्हाट, हेमंत महाले, संदीप पारखे, स्वागत गावंड, शरद सोनवणे, नीलेश राऊत, घनशाम साळवे, अमित बर्वे, शशिकांत पवार, नंदकुमार मोरे, नरेंद्र खैरनार, छगन थोटे, उमेश पोरजे, सुरेश चौधरी, योगेश कापडणीस, प्रदीप मोरे, सचिन जगताप, अंबादास मुसळे, गणेश जाधव, अमित साळुंके, वसंत राजोळे, प्रकाश गायकवाड, ज्ञानेश्वर मोरे, सारंग येवले, कमलाकर अहिरे उपस्थित होते.

# पिंगळेंच्या कार्यकाळात कोट्यवधींचा भ्रष्टाचार

## सभापती कल्पना चुंभळे यांच्यासह संचालक मंडळाचा आरोप

**पंचवटी : वार्ताहर**

नाशिक बाजार समितीच्या शरदचंद्र पवार मार्केट यार्ड येथे प्रशासकीय इमारत साइटवर आवश्यक रकमेचे काम झालेले नसताना माजी सभापती देवीदास पिंगळे यांनी मनमानी पद्धतीने ठेकेदाराला १.४५ कोटींचा ॲडव्हान्स दिला. पंचवटी व शरदचंद्र पवार मार्केट यार्ड येथील बाजार आवारातील गटारींवरील ढापे दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. त्यापैकी काही ढापे तुटलेले असतानासुध्दा ठेकेदाराला ५३.६० लाख दिले आहे. त्यामुळे पिंगळे यांचा सभापतीचा कार्यकाळ म्हणजे भ्रष्टाचाराचे मोठे कुरण असल्याचा आरोप नाशिक बाजार समितीच्या सभापती कल्पना चुंभळे यांच्यासह संचालक मंडळाने केला आहे.

चुंभळे म्हणाल्या की, पिंगळे यांच्या मनमानी कारभार आणि शेतकरीविरोधी निर्णयामुळे संचालकांनी त्यांची सत्ता उलथवून लावली. व्यापारी संकुल क्र. ४ चे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदाराला रक्कम रु.८७.५० लाख इतका ॲडव्हान्स देण्यात आला होता. परंतु सदर कामापोटी ठेकेदाराला रक्कम रु. २.७८ कोटी रक्कम अदा केली. ॲडव्हान्सपैकी रक्कम रु. १७.५० लाख वसूल करणे अद्यापही बाकी आहे. तसेच याच इमारतीतील जिन्यामधील कामासाठी रक्कम रु. ८.५३ लाख इतका खर्च झाल्याचे दाखविण्यात आले आहे, समितीचे पंचवटी मार्केट यार्डमध्ये रस्ते काँक्रिटीकरणामधील खड्डे बुजविणे कामासाठी रक्कम २१.४६ लाख इतके खर्च केल्याचे दाखविले परंतु प्रत्यक्षात इतक्या रकमेचे कामच झालेले नाही. बाजार समितीने बाजार आवारातील सुरक्षा व अनुषंगिक कामकाजासाठी डायनॅमिक सिक्युरीटी कन्सल्टंट या एजन्सीकडून एकूण ३५ सिक्युरिटी गार्ड नेमण्यात आल्याचे दाखविण्यात येवून त्यांना मासिक मक्त्याची रक्कम दिली जात होती. परंतु बाजार आवारात प्रत्यक्षात २० ते २२ गार्ड कामावर हजर असत पण रक्कम ३५ गार्ड हजर असल्याचे दाखवून रक्कम काढली जात होती. तसेच दोन सिक्युरिटी गार्ड सभापती यांचे निवासस्थानी काम करत होते. पंचवटी मार्केट यार्ड मध्ये सी.सी. टी.व्ही. कॅमेरे बसविणे व सर्व्हर रूमच्या कामासाठी ५५ लाख ८६ हजार इतकी मोठी रक्कम खर्च झाल्याचे दर्शविण्यात आले. परंतु प्रत्यक्षात झालेले काम व कॅमेऱ्यांचा दर्जा बघता झालेला खर्च अवास्तव व अयोग्य असल्याचे दिसून येते.

त्र्यंबकेश्वर उपबाजार आवार येथे ट्रान्स्फॉर्मर बसविणे व गाळे विद्युतीकरण करणे कामासाठी एकूण रक्कम रु. ५७.४२ लाख खर्च झाल्याचे व काम पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखविण्यात आले आहे, परंतु प्रत्यक्षात साइटवर काम अपूर्ण असून, जे काम केलेले आहे ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे.बाजार समितीचे झालेले नुकसान भरून निघण्यासाठी वरील सर्व कामांची चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करणार असल्याचे सभापती कल्पना चुंभळे आणि उपसभापती विनायक माळेकर यांनी स्पष्ट केले.

> सभापतिपदी सूत्र हातात घेतले. तेव्हापासून बाजार समितीच्या तिजोरीत खडखडाट आहे. पिंगळे यांनी विकासकामांच्या नावाखाली नको त्या ठिकाणी पैसे खर्च केल्याचे दिसून येते. त्यामुळे सखोल चौकशी करून प्रकरणाच्या मुळाशी जाणार आहे. दोषींवर कारवाई करूच, मात्र फौजदारी गुन्हा देखील दाखल करू.
>
> – **कल्पना चुंभळे,** सभापती, कृउबा, नाशिक

> विकासाच्या नावाखाली फक्त भ्रष्टाचार करण्याचे काम झाले. माजी सभापती यांच्या काळात बाजार समितीत बरीच कामे झाली, यात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येत आहे. बऱ्याच कामांमध्ये अनियमितता आहे. सदर कामांची सखोल चौकशी केली जाणार असून, कोणाचीही गय केली जाणार नाही. दोषींवर कारवाई करणार आहोत.
>
> –**विनायक माळेकर,** उपसभापती, कृउबा, नाशिक

> सभापतिपदावर विराजमान असताना शेतकरी हिताचे निर्णय घेत विकास साधला आहे. विकासकामे कायदेशीर केलेली आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्याने गुन्हेगारी नियंत्रणात आली आहे. त्यामुळे शेतकरी लूट थांबली आहे. माझ्याशी गद्दारी केलेल्या संचालकांनी चुंभळे यांना फसवून आर्थिक फायदा करून घेतला. आता बाजार समितीचे विभाजन होईल आणि भविष्यात संचालक मंडळ बरखास्त होईल. त्यामुळेच काही संचालक माझ्यावर आरोप करून कांगावा करत आहे.
>
> – **देवीदास पिंगळे,** माजी सभापती, कृउबा, नाशिक

# तेच गद्दार, तेच हिंदुत्व, तीच टीका, तीच भूमिका

**पान १ वरून**

**भाषणात नवीन काय?**

पक्षप्रमुख या नात्याने उध्दव ठाकरे आणि युवासेना प्रमुख म्हणून आदित्य ठाकरे यांची भाषणे नेहमीच्या शैलीत होती. भाजपाचे आणि संघाचे हिंदुत्व कसे फसवे आहे आणि शिवसेनेचे हिंदुत्व बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारातून आलेले राष्ट्रीय हिंदुत्व आहे, हेच ठाकरेंनी सांगितले. त्यांनी जे काही सांगितले तेच यापूर्वी अनेकदा सांगून झाले आहे. त्यात नावीन्य काही नव्हते. याशिवाय 'गद्दार' हा मुद्दा पुन्हा उपस्थित करण्यात आला. शिवसेनेच्या जिवावर भाजपा महाराष्ट्रात मोठा झाला हेही पुन्हा एकदा सांगण्यात आले. भाजपाने हिंदुत्ववादी नसलेल्या तेलुगू देसम (चंद्राबाबू नायडू), जनता दल युनायटेड (नितीश कुमार) अण्णा द्रमुक (पलानीस्वामी) पिपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (मेहबुबा मुफ्ती) यांच्याशी युती केली. हे पक्ष हिंदुत्ववादी आहेत काय? असा सवाल करुन आमच्या हिंदुत्वाविषयी शंका घेऊन नका, असे सांगितले. प्रश्न हाच की, हेच मुद्दे कितीदा भाषणात आणायचे. दुसरीकडे वक्फ विधेयकाविषयी शिवसेनेची भूमिका ठाकरे यांनी स्पष्ट करताना भाजपाने ज्या पक्षांशी युती केली ते धर्मनिरपेक्ष आहेत काय? हा सवाल उपस्थित केला. संघात राष्ट्रवादी मुस्लिमांना घेणार, असे सरसंघचालक भागवत म्हणाले. यावर पंतप्रधानाच्या नावाने देशातील ज्यांना सौगत देण्यात आली ते मुस्लिम राष्ट्रवादी असल्याचे तुम्ही कसे ठरविले? हा बिनतोड सवाल केला. काँग्रेसने मुस्लिम अध्यक्ष का केला नाही? हा सवाल पंतप्रधानांनी केला. यावर दलित व्यक्तीला तुम्ही सरसंघचालक करणार काय? असा सवाल उध्दव ठाकरे यांनी केला. याव्यतिरिक्त ठाकरेंच्या भाषणात नवीन काही नव्हते. राजभवनाच्या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक बांधा आणि शिवजयंतीला राष्ट्रीय सुटी जाहीर करा, अशा काही मागण्या त्यांनी केल्या. उध्दवजींनी आपली आणि आपल्या पक्षाची जी पूर्वी भूमिका होती ती मांडली. आदित्य ठाकरे यांनीही हेच मुद्दे वेगळ्या पध्दतीने मांडले. यातून शिवसैनिकांचे नव्याने प्रबोधन झाले, असे गृहीत धरायला हरकत नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्टिफिशियल आवाजातील भाषण जुन्या शिवसेनेची आठवण करुन देणारे होते. या भाषणातही भाजपा महाराष्ट्रात शिवसेनेमुळे मोठा झाल्याची आठवण करुन देण्यात आली. याशिवाय शिवसेना संपणार नाही, हा एक संदेश दिला जात असताना नकली शिवसेना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करण्यात आली आणि सावरकरांच्या कडव्या हिंदुत्वाची आठवण करुन देण्यात आली. बाळासाहेब ठाकरेंचा आवाज ऐकून उपस्थितांमध्ये जोश निर्माण झाला. पण, पुढे शिवसैनिक कामाला लागले पाहिजेत.

**नवीन कार्यक्रम काय?**

विधानसभा निवडणुकांच्या निकालावर ठाकरेंच्या शिवसेनेचा अजिबात विश्वास नाही. भाजपाने निवडणूक आयोगाच्या मदतीने निवडणुका जिंकल्या हेच उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि अन्य नेत्यांनी अधोरेखित केले. बाळासाहेब ठाकरे यांच्या भाषणातही हाच मुद्दा अधोरेखित करण्यात आला. निवडणूक निकालापासून हाच मुद्दा वारंवार उपस्थित केला जात आहे. भाजपाची बूथ व्यवस्थापन पध्दतीचा शिवसेनेने सूक्ष्म अभ्यास केल्याचे शिबिरात दिसून आले. तीच पध्दत आपल्याला वापरावी लागेल, असे सूचित करुन भाजपाची कॉपी करायचे ठरविण्यात आले. भाजपापेक्षा वेगळी रणनीती काय? याचा शोध आणि बोध घेण्यात आला नाही. भाजपाची यंत्रणा गुप्तपणे काम करत होती. तशी गुप्त यंत्रणा उभी करण्याचा उध्दव ठाकरे प्रयत्न करणार की नाही? हा प्रश्न आहे. पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी शिवसैनिकांना कोणता कार्यक्रम देण्यात आला? हे काही दिसत नाही. भाजपा, संघ, गद्दार, केंद्र व राज्य सरकार यांच्यावर नेहमीप्रमाणे करण्यात आलेल्या टीकेतूनच शिवसैनिकांनी लोकांसमोर जाऊन पक्षाची भूमिका मांडावी, हीच अपेक्षा शिबिरात व्यक्त करण्यात आली.

# जगन्नाथ पवार यांच्या साहित्याचा धोंगडे महाराजांकडून प्रसार

## कीर्तनकारांना मोफत पुस्तके वाटण्याचे अविरत कार्य

**नाशिक : प्रतिनिधी**



जिल्ह्यातील प्रसिद्ध कीर्तनकार तथा संत साहित्याचे गाढे अभ्यासक वैकुंठवासी आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांची ग्रंथसंपदा मोठी आहे. ही ग्रंथसंपदा वारकरी संप्रदायातील भावी पिढीला संस्मरणीय ठरावी, यासाठी आचार्य पवार यांची काही पुस्तके कीर्तनकारांना मोफत देण्याचे कार्य ह.भ.प. संपत महाराज धोंगडे करत आहेत.

आचार्य जगन्नाथ पवार हे जुन्या पिढीतील नामवंत कीर्तनकार होऊन गेले. अंजनेरी येथे जगन्नाथ महाराज पवार यांचे संतधाम हे प्रतिष्ठान आहे या प्रतिष्ठानचे उत्तर कार्य ह.भ .प .धोंगडे करत आहेत. संत तुकोबाराय व संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगवाणीवर वैकुंठवासी जगन्नाथ पवार यांची विशेष प्रभुत्व होते. आपल्या प्रासादिक वाणीने त्यांनी महाराष्ट्रभर संतांच्या साहित्यावर निरूपण केले आणि त्यातूनच त्यांना काव्य तीर्थ ही पदवी बहाल करण्यात आली. खऱ्या अर्थाने जगन्नाथ महाराज पवार हे एक चालते बोलते अध्यात्माचे विद्यापीठ होते. प्रत्येक अभंगाचा सखोल अर्थ आपल्या वाणीने ते श्रोत्यांच्या अंतःकरणात रुजवत होते. नाशिकच्या वारकरी संप्रदायात त्यामुळे त्यांची स्वतःची अशी एक वेगळी ओळख निर्माण झाली होती. संत साहित्यामध्ये देखील त्यांनी मोलाची भर घातली आहे. त्यांच्या विष्णू सहस्रनाम ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या. त्याचप्रमाणे संत निवृत्तिनाथांची सार्थ अभंग गाथा त्यांनी लिहिली आहे. त्यांचे आर्थिक ज्ञानराजा हे पुस्तक देखील प्रकाशाच्या वाटेवर आहे. त्यांचे हे संत साहित्य जनसामान्यांपर्यंत पोहोचवावे त्याचा प्रचार-प्रसार व्हावा, यासाठी संपत धोंगडे प्रयत्नशील आहेत. जगन्नाथ पवार यांनी स्थापन केलेल्या आचार्य पवार प्रतिष्ठानचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत आणि पवार यांचा आध्यात्मिक वारसा ते जपत आहेत. पुस्तकाच्या रूपाने जनसामान्यांपर्यंत हे शब्द धन पोहोचवण्याची कार्य धोंगडे करत आहेत. आषाढी पंढरपूर त्र्यंबकेश्वर येथील वारी काळात ते सक्रिय आहेतच, मात्र इतरही सामाजिक व धार्मिक कार्यामध्ये ते नेहमी पुढे असतात. नाशिक, गंगापूर, गिरणारे, देवरगाव, त्र्यंबकेश्वर तालुका हरसूल, पेठ या आदिवासी दुर्गम भागात देखील त्यांनी वारकरी संप्रदाय तसेच नवनवीन वारकऱ्यांना सोबत घेऊन आषाढी पंढरपूर दिंडी सोहळा मोठा केला आहे. अनेक वारकरी त्यांनी हिरिरीने जोडले आहेत. देवरगाव परिसरामध्ये वैकुंठवासी बापू बाबा देवरगावकर हे आचार्य जगन्नाथ महाराज पवार यांचे शिष्य आहेत. यांचे कार्य मोठे होते. अर्थातच त्याच परिसरात धोंगडे यांनी देखील अनेक वेळा जाऊन तेथील बाल वारकरी तसेच युवा वर्गाला आपल्या वारकरी संप्रदायामध्ये जोडण्याचे कार्य त्यांनी केले आहे. पवार यांची ग्रंथसंपदा आजही ते नव्याने प्रकाशित करून वारकरी बांधवांमध्ये वितरित करत आहेत.

**पान १ वरून**

## भांडणं बाजूला ठेवायला तयार, एकच अट..

उद्धव ठाकरे म्हणाले की, मराठी माणसाला न्याय हक्क मिळवून देण्यासाठी शिवसेनेचा जन्म झाला आहे. शेतकऱ्यांचे काळे कायदे आले तेव्हा शेतकरी रस्त्यावर उतरला तसा कामगार रस्त्यावर उतरला नाही त्यांचा मिशन हेच आहे की कोणी एकत्र आलं नाही पाहिजे. आपल्याला भांडणात गुंतवून ठेवून यांचे काय चाळे चालले आहेत ते पहा.

## विलेपार्ले पूर्वमधील जैन मंदिरावर हातोडा

दरम्यान, जैन धर्मगुरुंनी त्यावर प्रतिक्रिया देताना सांगितले. की, आम्ही या सर्व गोष्टीचा निषेध करत आहोत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना आम्ही एवढाच सांगतो की, यापुढे अशा मंदिरांवर कारवाई होत असेल तर आपण यामध्ये लक्ष घालावे. आमची अशी अनेक मंदिरं तोडली आहेत. एका हॉटेलवाल्याने आमच्यावर कारवाई केली. यामध्ये अनेक मोठे राजकारणी देखील शामिल आहेत. त्यामुळे आता संपूर्ण जैन समाज महाराष्ट्रभर एकवटला आहे.

**आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याची हकालपट्टी**

मंदिरावर कारवाईप्रकरणी पालिकेचे विभाग वॉर्ड ऑफिसर नवनाथ घाडगे यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. वॉर्ड ऑफिसर नवनाथ घाडगे यांच्या आदेशाने पालिका कर्मचाऱ्यांनी जेसीबीच्या सहाय्याने दिगंबर जैन मंदिरावर तोडक कारवाई केली होती. घाडगे यांची दहा दिवसांपूर्वीच बदली करण्यात आली होती. आता त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

## मुर्शिदाबादमधील पीडितांची राज्यपालांनी घेतली भेट

**पश्चिम बंगाल :**

नुकतेच संदेचे अधिवेशन पार पडले. हे अधिवेशन वादळी ठरले. कारण या अधिवेशनात वक्फ संशोधन विधेयक सादर करण्यात आले. हे विधेयक लोकसभेत आणि त्यानंतर राज्यसभेत मंजूर करण्यात आले. मात्र या कायद्याला पश्चिम बंगालमधून मोठ्या प्रमाणात विरोध होत आहेत. मुर्शिदाबाद येथे मोठ्या प्रमाणात हिंसाचार भडकला आहे. दरम्यान पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी आणि मानवाधिकार आयोगाने आज हिंसाग्रस्त भागाला भेट दिली. पश्चिम बंगालचे राज्यपाल आनंद बोस यांनी मुर्शिदाबादचा दौरा केला. मानवाधिकार आयोग आणि राज्यपालांनी पीडित कुटुंबाच्या भेटी देखील घेतल्या. पीडित कुटुंबाची भेट घेतल्यानंतर राज्यपाल काय म्हणाले ते जाणून घेऊयात. 'येथील पीडित कुटुंबांना सुरक्षेची खात्री हवी आहे.

# काँग्रेस कार्यालयावर भाजपा कार्यकर्त्यांनी केलेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**



काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मुंबई येथे बैठकीला गेलेले असताना भाजपाच्या काही कार्यकर्त्यांनी काँग्रेस भवन येऊन आंदोलनाच्या नावाखाली कार्यालयावर चाल करण्याचा प्रकार अतिशय निषेधार्थ आहे.

कुठलीही पूर्वसूचना न देता अशा प्रकारे काँग्रेस कार्यालयावर भाजपाच्या कार्यकर्त्यांना आंदोलन व मोर्चा काढून देणे हे अतिशय चुकीचे आहे. अशा प्रकाराची सखोल चौकशी व्हावी, आणि परवानगी घेतलेली नसेल तर त्वरित भाजपाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने पोलीस उपायुक्त किरण चव्हाण यांची भेट घेऊन केली.

काँग्रेस पक्ष लोकशाहीला मानणारा पक्ष आहे. जशास तसे उत्तर देण्याची हिंमत काँग्रेसमध्ये पण आहे. परंतु नाशिक शहराची परंपरा व संस्कृती बघता याआधी अशा प्रकारचे कार्यालयांवर कधीही आंदोलन कुठल्याच पक्षाने केले नव्हते. परंतु काही दिवसांपासून ही परंपरा मोडीत काढून सत्तेत असलेल्या भाजपाच्या कार्यकर्त्यांनी हे गैरप्रकार करण्यास सुरुवात केलेली आहे.

यांना त्वरित आवरून त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे. शहरातील राजकीय शांतता संभाळणे ही सर्व पक्षांची जबाबदारी आहे. परंतु यापुढे असे प्रकार वारंवार होत राहिले तो शहरामध्ये राजकीय पक्षांमध्ये विचारांची मतभेद सोडून वैयक्तिक वैर निर्माण होण्याची भीती काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

याप्रसंगी शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, ज्येष्ठ काँग्रेस नेते उल्हास सातभाई, माजी नगरसेविका वत्सलाताई खैरे, शहर काँग्रेस सेवा दलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर, ज्येष्ठ उपाध्यक्ष संदीप शर्मा, शहर महिला काँग्रेस अध्यक्ष स्वाती जाधव, शहर युवक काँग्रेस अध्यक्ष स्वप्निल पाटील, शहर ओबीसी विभागाचे अध्यक्ष गौरव सोनार, शहर अनुसूचित जमाती विभागाचे अध्यक्ष मुन्ना ठाकूर, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे सचिव जावेद, इब्राहिम शहर काँग्रेस खजिनदार फारूक मंसूरी, शहबाज मिर्झा, राजकुमार जेफ, अलथम समाधान, बागुल स्वरूप पिसे आदी पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.


**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क : ९२७२०९१४२५**

---------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट अँण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क- ९८९००१३१३६**

---------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---------------------

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर ९८३४१०९३३७**

---------------------

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**Name changed**

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

---------------------

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-८७८८०९२४१५**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क- ७२०८४९८५२३**

---------------------क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क: ९९७००३९०४६**

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**


## मनमाडला दहशत माजवणारा बिबट्या जेरबंद...



**मनमाड : प्रतिनिधी**

गेल्या तीन दिवसांपासून मनमाड शहरातील दरगुडे वस्ती गुरुद्वारा मागील परिसरात दहशत माजवणारा बिबट्या अखेर काल तिसऱ्या दिवशी जेरबंद करण्यात आला. येवला वनविभागाने मनमाड शहरातील दरगुडे वस्ती गुरुद्वारा या ठिकाणी पिंजरा लावला होता काल अखेर तो बिबट्या सायंकाळी सात वाजेच्या सुमारास जेरबंद झाला.

येवला वनविभागाचे वनक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपाल गोपाल राठोड, वनसेवक इरफान सय्यदराम, लेखाअधिकारी महाले यांच्या टीमने या बिबट्याला जेरबंद करण्यासाठी परिश्रम घेतले.

बिबट्या जेरबंद झाल्याने स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.


**टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी व तालुका सिन्नर पैकी **कसबे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील नगरपरिषद हद्दीतील स.नं. १९८/१/२०० (जुना स.नं. १९०/१९२) मधील बिनशेती प्लॉट नं. ०१ यांसी क्षेत्रफळ ५२५.०० चौ.मी., आकार रू. ३७८-०० पैसे ही संपुर्ण बिनशेती प्लॉट मिळकत** यांसी चतुःसिमा- मंजुर ले-आऊटप्रमाणे

वर नमुद मिळकत ही आमचे पक्षकार **सौ. श्रुती विकास भागवत** यांनी सदर मिळकतीचे मालक **सौ. उषा आण्णा गवारे** यांचेपासुन खरेदी घेणेबाबतचा व्यवहार झालेला आहे. व सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असलेबाबत मालक **सौ. उषा आण्णा गवारे** यांनी आमचे पक्षकार **सौ. श्रुती विकास भागवत**यांना सांगितलेले आहे.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र, वारसदार, लिज, कोर्ट हुकुमनामा, साठेखत इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रांसह आमचे कार्यालयात येऊन आमची खात्री पटवुन द्यावी अन्यथा सदरील मिळकत निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, तदनंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. सबब सदरची जाहिर नोटीस ही आमचे पक्षकार **सौ. श्रुती विकास भागवत** यांचे सांगणेवरून प्रसिध्दीस. कळावे. ही जाहीर नोटीस.

सिन्नर, दि.१६/०४/२०२५.

आमचे मार्फत प्रसिध्द

**श्री. संदिप अशोक आहेर** (ॲडव्होकेट )

ऑफीस-नवीन कोर्ट सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक. मो.नं. ९९७५८३९५९७



Exh. 18

**म. सिव्हील जज्ज सो. (सि.डी.) नंदुरबार यांचे कोर्टात**

H.M.P. No. 3/2024

**श्री. चैतन्य रोहिदास नाईक,** उव. ३० धंदा : शेती
रा. प्लॉट नं.२२५,हुडकोकॉलनी, गावीत पेट्रोलपंपमागे,
नंदुरबार ता.जि. नंदुरबार ....**अर्जदार**

**वि**

**सौ. दीपांजली भ्र. चैतन्य नाईक,** उव.२५ धंदा : नोकरी
द्वारा.नाना सोनू सोनावणे, रा. गोराणे, नामपूर,
ता. सटाणा जि. नाशिक .... **सामनेवाली**

**अर्जः- हिंदू विवाह कायदा कलम ९ प्रमाणे नांदण्यास येणेबाबत**

ज्याअर्थी अर्जदार हिने नंदुरबार येथील म. हिंदू विवाह कायदा कलम ९ प्रमाणे नांदण्यास येणेबाबत अर्ज केलेला आहे. सदर अर्जाचे कामी सामनेवाली हिचा दुसरा पत्ता माहीत नसल्याने सदर नोटीसद्वारे ता. १२/०६/२०२५ रोजी पुढील चौकशी कामी तारीख नेमण्यात आलेली आहे. सदर अर्जाचे कामी सामनेवाला याची काही हरकत असल्यास त्यांनी चौकशीचे दिवशी सकाळी १०:३० वाजता स्वतः किंवा वकिलामार्फत मे. सिव्हील जज्ज सो.(सी.डी), नंदुरवार यांचे कोर्टात हजर होवून हरकत नोंदवावी. सदर दिवशी चौकशी कामी कोणाचीही हरकत न आल्यास अर्जाचे कामी एकतर्फा होवून निकाल देण्यात येईल. कळावे.

आज दिनांक १५/४/२०२५ रोजी आमच्या सहीने मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

**सही/-**
**कामगिरी क्लार्क**
**मा. जिल्हा न्यायालय, नंदुरबार**

शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायाधीश नंदुरबार**

## महत्त्वाचे

### सोन्याच्या दागिन्यांची फसवणूक चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** उंटवाडी येथील धनवर्षा बँकेच्या ठिकाणी एका महिलेला संगनमत करून सुमारे ४५.९ ग्रॅम सोन्याचे दागिने फसवून घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी चार जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजश्री कुंडलिक खेमाडे (वय ४८, रा. संतकबीरनगर, आनंदवली, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दि. १६ जून २०२३ पासून ते आजपर्यंत आरोपींनी संगनमत करून ११.५ ग्रॅम सोन्याचे मणी मंगळसूत्र,१२.७ ग्रॅम सोन्याची चेन, ४ ग्रॅम सोन्याची अंगठी, ३.५ ग्रॅम सोन्याचे ओमपान, ८.२ ग्रॅम - चार सोन्याच्या मंगळसूत्राच्या वाट्या, ६ ग्रॅम वजनाचे झुंबर अशा एकूण ४५.९ ग्रॅम सोन्याचे दागिने फसवून घेतले आहेत. याप्रकरणी अभिजित डोळस, आरती जगताप, महेश रमेश पिंगळे व रत्ना कुमावत (रा. धनवर्षा बँक, त्रिमूर्ती चौक, उंटवाडी) यांच्याविरोधात अंबड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस फुलपगारे करीत आहेत.

### हद्दपारीचा आदेश न पाळणाऱ्या अश्विन साळवेवर गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** अंबड परिसरातील घरकुल योजनेत गुरुवारी दुपारी दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आलेला संशयित आरोपी घरकुल योजना परिसरात फिरताना पोलिसांनी त्याला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अश्विन मधुकर साळवे (२६, रा. चुंचाळे शिवार, नाशिक) याला दोन वर्षांच्या कालावधीसाठी नाशिक शहर व ग्रामीण हद्दीतून हदपार करण्यात आलेले आहे. तथापि, शुक्रवारी (दि.१८) अश्विन साळवे हा बिल्डिंग क्रमांक सीएच /२५ घरकुल योजना, अंबड येथे विनापरवानगी फिरताना आढळून आला. याप्रकरणी एमआयडीसी चुंचाळे पोलीस चौकीत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याने अश्विन साळवेविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### गंगापाडळी येथे बंद घर फोडून दागिने लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी** नाशिकरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गंगापाडळी येथे घरफोडीची घटना उघडकीस आली असून, अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सुमारे ७४,५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. घरातील सदस्य शेतीच्या कामासाठी बाहेर गेल्याची संधी साधून चोरट्यांनी मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. किचनमध्ये ठेवलेल्या स्टीलच्या डब्यातील दागिने चोरून नेले. या घरफोडीत चोरट्यांनी २३.७० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र (किंमत ५९,२५०),४.५० ग्रॅम वजनाचे दोन जोड सोन्याचे कानातले (किंमत ११,२५०),१ ग्रॅम वजनाची सोन्याची नथ (किंमत २,५००),एक चांदीचा छल्ला (किंमत १,५००) असा एकूण ७४,५०० रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला आहे. या घरफोडी प्रकरणी फिर्यादी विजय रघुनाथ वलवे (वय ४४, रा. गंगापाडळी, पो. लाखलगाव) यांच्या तक्रारीवरून नाशिकरोड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नाशिकरोड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक पवार व हवालदार टेमगर अधिक तपास करीत आहेत.

### गुरेवाडीजवळ पिकअपच्या धडकेत पादचारी ठार

**सिन्नर : प्रतिनिधी** गुरेवाडी-मुसळगाव बायपास रस्त्यावर गुरेवाडी फाट्याजवळ कारने पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात पादचारी ठार झाल्याची घटना काल (दि.१९)सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास घडली. संदिप किसन लोंढे (३९), रा. भोई गल्ली, गांवठा, सिन्नर असे मृताचे नाव आहे. संदिप लोंढे हे गुरेवाडी फाट्याहून मुसळगाव बायपास रोडने जात असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या पिअकपने (क्र.एमएच-१५, जेसी-८१४६) लोंढे यांना पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात लोंढे यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी राम किसन लोंढे यांच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिसांनी पिकअप चालकोविरोधात अपघाताचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास हवालदार गायकवाड करीत आहेत.



# पांडवलेणीच्या पायथ्याशी आलिशान कार जळून खाक

**सिडको : विशेष प्रतिनिधी** गुजरातमधील बडोद्याहून नाशिकला आलेल्या व्यावसायिकाची पांडवलेणी परिसरात मोकळ्या जागेत पार्क केलेली टाटा हॅरिअर ही आलिशान कार अचानक पेटल्याने जळून खाक झाली. शुक्रवारी रात्री १२ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. विपुलकुमार प्रफुलचंद्र शाह (वय ५३, रा. बडोदरा, गुजरात) हे कामानिमित्त नाशिकमध्ये आले होते. फावल्या वेळेत ते आपल्या ०६पीएच९१३६क्रमांकाच्या टाटा हेरियर कारने फाळके स्मारकाच्या पायथ्याशी पांडवलेणी परिसरात फिरण्यासाठी गेले होते. यावेळी कारमधून अचानक काहीतरी जळण्याचा वास आल्याने शाह व त्यांचा ड्रायव्हर तत्काळ कारच्या बाहेर पडले. तेवढ्यात कारच्या बोनेटमधून मोठ्या प्रमाणात धूर निघू लागला आणि काही क्षणांतच कारने पेट घेतला. उपस्थितांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संपूर्ण गाडीने पेट घेतला. ही या आगीच्या घटनेमध्ये कार पूर्णतः जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले व आगीवर नियंत्रण मिळवले. दरम्यान, आगीचा भडका एवढा मोठा होता की, गाडीशेजारील एक झाडही आगीत जळून गेले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे पांडवलेणी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, यासंदर्भात तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# छावा क्रांतिवीर सेनेत युवकांचा प्रवेश

## नवनियुक्त जम्बो कार्यकारिणी जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी** छावा क्रांतिवीर सेनेचा प्रवेश सोहळा आणि जिल्हा व शहर कार्यकारिणीची घोषणा पार पडली. मुंबई नाका येथील संपर्क कार्यालयात संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला.

जिल्हाध्यक्ष आशिष नाना हिरे आणि महानगरप्रमुख योगेश नाना गांगुर्डे यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते. कार्यक्रमात पंढरपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या नियोजनावर विशेष भर देण्यात आला.

महाराष्ट्रभर छावा क्रांतिवीर सेना शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक जनआंदोलन छेडणार आहे. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन आंदोलन अधिक प्रभावी करण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केले. तसेच पंढरपूर अधिवेशनात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे निर्देशही दिले.




यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना करण गायकर, जिल्हाध्यक्ष आशिष हिरे, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख आबा पाटील, जिल्हा संघटक सागर जाधव, उपजिल्हाप्रमुख कल्पेश उदावंत, डॉ. आघाडी जिल्हाप्रमुख हेमकांत चित्ते, युवक जिल्हाप्रमुख अजय कडभाने, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष राहुल काकळीज, युवक जिल्हा संपर्कप्रमुख शुभम महाले, नाशिक शहर कार्याध्यक्ष विकास घागस यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. नवनियुक्त कार्यकारिणी पुढीलप्रमाणे घोषित करण्यात आली.

सतीश आहिरे (कामगार आघाडी महानगरप्रमुख), प्रशांत लोणारी (गडकोट संवर्धन महानगरप्रमुख), योगेश आहिरे (नाशिक तालुकाप्रमुख), डॉ. राकेश देवरे (डॉ. आघाडी ग्रामीण जिल्हाध्यक्ष), रवींद्र जयस्वाल (जिल्हा कार्याध्यक्ष), प्रवीण बिलयानी (जिल्हा संघटक), भगवान घुगे (शहर संघटक), गणेश वाघ (युवक शहर संघटक), हर्षद पाटील (नवीन नाशिक अध्यक्ष), अक्षय ढमाले (शहर कार्याध्यक्ष), संदीप हिरे (नवीन नाशिक उपाध्यक्ष), मनोज वाघ (शहर उपाध्यक्ष), प्रशांत चारस्कर (पंचवटी विभाग अध्यक्ष), जगदीश नेरुरकर (युवक उपजिल्हा प्रमुख), तुषार शेवाळे (शहर उपाध्यक्ष), देवा चव्हाण (युवक जिल्हा सरचिटणीस), भागेश खडांगळे (विद्यार्थी आघाडी उपाध्यक्ष), रवींद्र राजपूत (शहर चिटणीस), अभिषेक गुंजाळ (वाहतूक आघाडी उपाध्यक्ष), शुभम महाले (युवक जिल्हा कार्याध्यक्ष), सुदर्शन हिरे (जिल्हा कार्याध्यक्ष), महानगरप्रमुख योगेश गांगुर्डे यांनी आभार मानले.

# बंद पडलेल्या उद्योगांना पुनर्जीवित करा

## पँथर क्रांतिवीरची आ. सीमा हिरेंकडे मागणी



**नाशिक : प्रतिनिधी** जिल्ह्यातील बंद पडलेले उद्योगधंदे सुरू करावेत, स्थलांतरित कंपन्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात, त्यांना दुसऱ्या राज्यात जाण्यापासून रोखण्यात यावे, बंद पडलेल्या कंपन्यांचे पुनर्वसन करण्यात यावे, यासाठी पँथर क्रांतिवीर जनरल कामगार सेना श्रमिक संघटनेने पुढाकार घेतला आहे. संघटनेने याबाबत नशिक पश्चिमच्या आमदार सीमा हिरे यांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटल्याप्रमाणे, सध्या महागडी वीज, पाण्याची टंचाई, कर्जाचा बोजा, करांचा भार आणि परवाना प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे उद्योगधंदे संकटात सापडले आहेत. याचा थेट परिणाम हजारो कुटुंबांच्या उपजीविकेवर आणि तरुणांच्या रोजगारावर झाला आहे. महाराष्ट्रातील अनेक कंपन्या इतर राज्यांमध्ये स्थलांतरित होत आहेत. वाढती बेरोजगारी ही सामाजिक अशांततेचे कारण ठरत आहे. यामुळे अनेक युवक अमली पदार्थांच्या आहारी जात आहे. गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, त्वरित मार्गदर्शन व रोजगाराच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. यासाठी राज्य सरकारने बंद पडलेल्या उद्योगधंद्यांचे विश्लेषण करून त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र आणि विशेष विभाग तातडीने स्थापन करावा. लघु व मध्यम उद्योगांना सुलभ अटींवर बँक कर्ज, कर सवलती, अनुदान योजना आणि परवाना प्रक्रियेमध्ये सुलभता देण्यात यावी. स्थलांतरित उद्योगांना पुन्हा आकर्षित करण्यासाठी प्रभावी प्रोत्साहनपर योजना तयार करून तात्काळ अंमलबजावणी करावी. पायाभूत सुविधा व सवलती उपलब्ध करून द्याव्यात. गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे अंमलात आणावी. बेरोजगार तरुणांना अंमली पदार्थ व गुन्हेगारीपासून रोखण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण, उद्योग प्रोत्साहन आणि मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. बैठकीदरम्यान पँथर क्रांतीवीर जनरल कामगार सेना श्रमिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साहेबराव वाहुळे, नाशिक जिल्हा सचिव पवन खांडरे , मनमाड शहर अध्यक्ष निमदेव हिरे, सदस्य तुषार देशमुख, महिला आघाडी नाशिक जिल्हा प्रमुख, सविता खैरनार, जिल्हा सचिव योजना भगत इतर व पदाधिकारी उपस्थित होते.



# सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाचे पेठ आगारात उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक विभागातील पेठ आगारात सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाच्या शाखेचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. गोपीचंद पडळकर, आ. सदाभाऊ खोत, सरचिटणीस सतिश मेटकरी, प्रकाश कांबळे, पद्मश्री राजे, केंद्रीय उपाध्यक्ष अनुप दादा खैरनार, मार्गदर्शक व्यंकटेश मोरे आदी उपस्थित होते.

यावेळी नाशिक विभाग महिला सचिव अनिता बागड यांच्या हस्ते संघाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. या उपक्रमासाठी नाशिक प्रदेश प्रादेशिक सचिव शरद गिते यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांनी पेठ आगारातील कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांना संघाच्या कार्यपद्धतीचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी सन २०२५ ची आगार कार्यकारिणी आगार व्यवस्थापक बेलदार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. कार्यक्रमास शरद गिते, बाळासाहेब आव्हाड, राजाभाऊ पाठक, गौतम अहिरे, मनोज चंदनशिव, विजू आव्हाड, हर्षद निकम, राकेश गरुड, मुरलीधर गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. पेठ आगारातील नवनियुक्त पदाधिकारी - अध्यक्ष नितीन दराडे, सचिव-नागेश वानखेडे, उपाध्यक्ष रामहरी केंद्रे, सहसचिव सदाशिव गिते, सुभाष पालवे, खजिनदार शिवानंद ताजे, कार्याध्यक्ष बाळासाहेब थोरवे, संघटक छत्रुग्र तांदळे, सुनील गिते उपस्थित होते.

# बस कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द

## भाजपा कामगार मोर्चाची निर्णायक भूमिका

**नाशिक : प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नाशिक येथे कार्यरत असलेले कर्मचारी राजेंद्र पाठक व वैभव कांबळे यांच्यावर एकतर्फी निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. या कारवाईविरोधात भारतीय जनता पक्षाच्या कामगार मोर्चाने ठाम भूमिका घेत वाहतूक नियंत्रक सोनवणे यांच्याशी चर्चा करून निलंबनाची कारवाई मागे घेण्यास भाग पाडले. या निर्णयामुळे निलंबित कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. भविष्यात सूडबुद्धीने होणाऱ्या कारवायांवर नियंत्रण ठेवण्याची शाश्वती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.



भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी पार पडली. यावेळी भाजपा कामगार मोर्चाचे उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस व्यंकटेश मोरे, जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे, नाशिक महानगर अध्यक्ष हेमंत नेहेते आणि इतर सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले. या निर्णयाचे सर्व कर्मचाऱ्यांनी व सेवाशक्ती कामगार युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी जल्लोषात स्वागत करत भाजपा कामगार मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.



> हा निर्णय कामगार हक्कांचे रक्षण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. इतिहासात प्रथमच अशा प्रकारचे निलंबन रद्द करण्यात आले आहे. याचा आम्हाला आनंद आहे. भविष्यात अशा अन्यायकारक कारवाया होऊ नयेत यासाठी कामगार संघटनांकडून सजग पाऊले उचलली जातील.
> **- राहुल आरोटे,**
> जिल्हाध्यक्ष, भाजपा कामगार मोर्चा

# पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करा

## विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी** वक्फ कायद्याविरोधात पश्चिम बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात हिंसाचार होत असून, हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत. बंगालमधील परिस्थिती अत्यंत चिंताजनक बनली आहे. सरकारी यंत्रणा दंगलखोरांसमोर निष्क्रिय झालेली दिसत आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी केंद्र सरकारने बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करून प्रशासनाचे नियंत्रण आणि व्यवस्थापन आपल्या हातात घ्यावे आणि देशद्रोही घटकांना त्यांच्या दुष्कृत्यांसाठी कठोर शिक्षा करावी, या मागणीचे निवेदन विश्व हिंदू परिषदेच्या नाशिक शाखेने शनिवारी (दि.१९) निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना दिले आहे.



निवेदनात म्हटल्याप्रमाणे, ११ एप्रिल रोजी वक्फ कायदा अस्तित्वात आल्यानंतर कायद्याला विरोध करण्याच्या नावाखाली पश्चिम बंगालमध्ये हिंसक निदर्शने होत आहेत. दोनशेहून अधिक घरे आणि व्यावसायिक दुकाने लुटली आणि जाळली गेली. हल्ल्यात शेकडो निरपराध जखमी झाले तर तीन नागरिक ठार झाले. डझनभर महिलांवर बलात्कारही करण्यात आले. यामुळे पाचशेहून अधिक हिंदू कुटुंबांना मुर्शिदाबाद सोडावे लागले आहे. यासाठी बंगालमध्ये तत्काळ प्रभावाने राष्ट्रपती राजवट लागू करावी व हिंसाचाराची एनआयएकडून चौकशी करुन दोषींना तत्काळ शिक्षा करावी आदी मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालयप्रमुखांमार्फत राष्ट्रपतींना देण्यात आले. यावेळी जिल्हामंत्री योगेश बहाळकर यांच्यासह विभागमंत्री अनिल चांदवडकर, बजरंग दल शहर संयोजक श्रीकांत क्षत्रिय, मातृशक्तीच्या महिला, नंदकिशोर भावसार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# नांदूरशिंगोटेजवळ मालट्रकची तीन वाहनांना धडक

**सिन्नर : प्रतिनिधी**

नाशिक-पुणे महामार्गावर नांदूरशिंगोटे शिवारात गतीरोधक पार करणाऱ्या कारसह दोन दुचाकींना भरधाव ट्रकने धडक दिल्याने कारचालकासह दुचाकीस्वार जखमी झाल्याची घटना शुक्रवारी (दि.१८) सकाळी ६.१५ वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत कारचालक गणेश पुंडलीक गडाख, रा. चांदोरी, ता. निफाड यांनी वावी पोलिस ठाण्यात ट्रकचालकाविरोधात फिर्याद दाखल केली आहे. गणेश गडाख हे त्यांच्या किया कारने (क्र.एमएच-१५, एचबी-००१४) नाशिक-पुणे महामार्गाने सिन्नरकडे येत असताना नांदूरशिंगोटे शिवारात ईश्वर लॉन्सच्या समोर गतीरोधक असल्याने कारचा वेग कमी करुन गतिरोधक ओलांडत असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मालट्रकने (केए-१४, सी-४०२७) प्रथम गडाख यांच्या कारला धडक दिली. त्यानंतर दोन मोटारसायकलींना (क्र. एमएच-१५, सीएल-५८४० व एमएच-१७, बीए-४८३८) ही धडक दिली. या अपघातात कारने तीन पलटी घेऊन खोल खड्ड्यात पडली व कारचालक गडाख यांच्यासह दोन्ही दुचाकीस्वार जखमी झाले.

याप्रकरणी गडाख यांच्या फिर्यादीवरुन वावी पोलिसांनी ट्रकचालक डालुराम रामप्रताप, रा. नहराना, ता. नोहर, जि. हनुमानगढ (राजस्थान) याच्याविरोधात अपघाताचा गुन्हा दाखल केला आहे.

# साडेसात हजार महिला-युवतींना स्वयंपूर्णतेचे धडे

## मनपाच्या समाजकल्याणकडून होतेय सक्षमीकरण

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत महिला सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेंतर्गत महिला व युवतींना व गरजेनुसार युवकांनाही स्वयंपूर्णतेचे धडे दिले जात आहे. २१ प्रकारचे विविध कोर्स उपलब्ध असून, मुलींना त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण देऊन स्वावलंबी केले जात आहे. महापालिकेच्या समाजकल्याण खात्याने नुकताच महिला व युवतींचा मेळावा घेतला.

शहरातील जास्तीत जास्त महिलांनी मनपाने उपलब्ध करून दिलेल्या कोर्सचे प्रशिक्षण घेऊन सक्षमीकरण व्हावे. हाच प्रामुख्याने महापालिकेचा उद्देश आहे. सॉफ्टझील टेक्नोलॉजी प्रा.लि. व जी. ॲण्ड जी. स्कील डेव्हलपर्स प्रा.लि. या दोन मक्तेदार संस्थेमार्फत शहरातील ७५६० गरजू महिला, मुलींना प्रशिक्षित करण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर लाभार्थ्यांना रोजगार कसा मिळेल. यासाठी महिला सक्षमीकरण व आत्मनिर्भर बनण्यासाठी रोजगार मेळावा आयोजित करून मार्गदर्शन केले. सुमारे ७ हजार महिला उपस्थित होत्या.

मेळाव्यासाठी विविध कंपन्यांना निवड प्रक्रियेसाठी निमंत्रित करण्यात आले होते. रोजगार मेळाव्यातच महिलांची निवड प्रक्रिया राबविण्यात आली. ज्या लाभार्थ्यांना स्वतःचे व्यवसाय स्थापन करावयचे आहे. त्यांना एसबीआय बँकेमार्फत मुद्रा लोन कसे मिळेल याची माहिती देण्यात आली. यावेळी बँक कर्मचाऱ्यांनी प्राथमिक नोंदणी करून घेतली. शिवाय नवीन व्यवसायांना लागणाऱ्या प्रमाणपत्राची नोंदणी देखील करण्यात आली. एक ते सहा महिन्यांचा अवधी या विविध कोर्सेससाठी लागतो.



### या कोर्सची व्यवस्था

ब्यूटी थेरेपिस्ट, हेअर डिझाइनर ॲण्ड स्टाइल, टेलरिंग, फॅशन डिझाइनर, सिक्युरिटी गार्ड, जनरल ड्युटी असिस्टंट, असोसिएट स्टोअर, ज्वेलरी रिटेल सेल्स असोसिएटस, जनरल हाऊसकिपर, ऑफिस असोसिएट, असिस्टट इलेक्ट्रिशियन, टेक्निशियन, मोबाइल रिपेअरिंग, वेब डेव्हलपर, फील्ड टेक्निशियन, फोर/टू व्हिलर सर्व्हिस असिस्टंट, सीएनजी ऑपरेटर टर्निंग, इलेक्ट्रिक व्हेईकल सर्व्हिसेस, मल्टीस्कील टेक्निशियन, रिसेप्शनिस्ट, योगा ट्रेनर.

> महापालिकेकडून शहरातील युवक-युवतींना स्वावलंबी करण्यासाठी समाजकल्याण विभागाने विविध प्रकारचे कोर्स उपलब्ध करून दिले आहेत. त्यानुसार महिला, युवतींचा प्रतिसाद मिळतो आहे. महिलांसह युवतीचे सक्षमीकरण करणे हाच मनपाचा उद्देश आहे. **-नितीन नेर,** उपायुक्त, समाजकल्याण, मनपा

## महत्त्वाचे



### नांदुर्डीकर व गुजराथी यांचे टेनिस स्पर्धेत यश

**येवला :** इंटरनॅशनल टेनिस फेडरेशन आयोजित (एम.टी. ४००) स्पर्धा जयपूर येथे पार पडल्या. स्पर्धेत नवभारत क्रीडा मंडळाचे ज्येष्ठ खेळाडू शिरीष नांदुर्डीकर यांनी ६० वर्षे वयोगटात अनुक्रमे भास्कर शर्मा ६-१,६-०, शरद टाक ६-२,६-४ अनिल कुमार ६-२,६-२ असा विजय मिळवला. उपांत्य सामन्यात टेनिस क्षेत्रात नावाजलेला खेळाडू व स्पर्धेचे नामांकन मिळालेले खेळाडू पवन जैन यांच्यावर ६-२,६-४ असा विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश करत डॉ. दीपांकर चक्रवर्ती या खेळाडूंवर १-६,६-३,१०-८ असा विजय मिळवून स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. तसेच मंडळाचे ४५ वर्षे वयोगटातील राष्ट्रीय टेनिस खेळाडू यती गुजराथी यांनी अनुक्रमे रंजू चेरीन ६-२,६-१, हरीश रामचंदानी ७-५, ६-३ व उपांत्य सामन्यात अरुण कटारिया ६-४,६-४ असा विजय विजय मिळवून अंतिम सामन्यात भरत पारमार या खेळाडूंवर ६-४,४-६,१०-५ असा दिमाखदार विजय मिळवून स्पर्धेचे विजेते पटकावले. त्यांच्या यशाबद्दल नवभारत क्रीडा मंडळाचे सदस्य, नवचैतन्य क्रीडा मंडळाचे सदस्य व येवला नगरीतील सामाजिक व राजकीय क्षेत्रातून विविध लोकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




### सातारे येथे भीमगीतांचा कार्यक्रम

**येवला :** तालुक्यातील सातारे येथे डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्ताने सामाजिक प्रबोधन भीमगीतांचा कार्यक्रम झाला. शिवसेना तालुकाप्रमुख पांडुरंग शेळके व सचिन आहेर यांनी प्रतिमापूजन केले. मान्यवरांचे स्वागत ॲड. चंद्रकांत निकम यांनी केले. शाहीर शरद शेजवळ प्रस्तुत प्रबुद्ध लोककला विद्यापीठ निर्मित आंबेडकरी शाहिरी जलशा या सामाजिक प्रबोधन गीतांचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाला सातारे ग्रामपंचायत सदस्य विजय शिंदे, पप्पू गांगुर्डे, दीपक गांगुर्डे, जागृती मखरे, सातारे वि.वि.सह. सोसायटी चेअरमन अशोक झांबरे, व्हा. चेअरमन आनंदा झांबरे, संचालक ज्ञानेश्वर झांबरे, भागवत गोसावी, वसंत झांबरे, सुदाम सौंदाणे, नंदू झांबरे, सुनील गिते, सचिन कडलक, राधाकृष्ण कुंवर, मच्छिंद्र गचाले, नामदेव खैरनार, प्रकाश पठारे, भागवत गचाले, योगेश गांगुर्डे, शरद मखरे, वाल्मीक शेळके, योगेश ठोंबरे, बाळू सौंदाणे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार ॲड. चंद्रकांत निकम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सोमनाथ गांगुर्डे, नामदेव मखरे, दीपक मखरे, सागर गोसावी, सागर गाडगे, साईनाथ गचाले आदींनी परिश्रम घेतले.

### प्रा. येवला यांची राज्य प्रभारीपदी नियुक्ती

**चांदवड :** येथील एसएनजेबी अभियांत्रिकी व वैद्यकीय



महाविद्यालयाचे योग प्रशिक्षक प्रा. राहुल (अंबादास) भिलाजी येवला यांची महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या योगक्रीडा समितीच्या राज्य प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. योगा फाउंडेशन संचालित महाराष्ट्र योगशिक्षक संघातर्फे महायोगोत्सव २०२५ अकोला येथे राज्यस्तरीय योगासन स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर प्रा. येवला यांच्याकडे ही महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. प्रा. येवला हे योग विद्या धाम, चांदवडचे केंद्रप्रमुख असून, ते राज्य व राष्ट्रीय स्तरावरील योगासन क्रीडा स्पर्धांचे परीक्षक म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी अनेक राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये परीक्षक आणि क्रीडा समितीप्रमुख म्हणून काम केले आहे. त्यांच्या या अनुभवामुळेच त्यांची राज्य प्रभारीपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र योगशिक्षक संघ नोव्हेंबर महिन्यात शेगाव येथे राज्यस्तरीय महायोगोत्सवाचे आयोजन करणार आहे. यात महिला व पुरुषांसाठी विविध योगासन स्पर्धा होणार आहेत. प्रा. राहुल येवला यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे पार पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रा. येवला यांच्या या नियुक्तीबद्दल एसएनजेबी संस्थेच्या विश्वस्त समिती आणि प्रबंध समितीच्या सदस्यांनी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### आज 'पसंद अपनी अपनी' मैफल

**नाशिक :** गायक संजय डेरे आणि अमर कुमार प्रस्तुत पसंद अपनी अपनी या सुरेल मैफलीचे आज रविवारी (दि.२०) आयोजन करण्यात आले आहे. ही विनामूल्य मैफल परशुराम साईखेडकर नाट्यगृहात सायंकाळी ६ वाजता होणार आहे. गायक अजय पाटील, मनोहर देवरे, सुभाष ईसोकर तसेच गायिका स्मिता पांडे, डॉ. रेखा सोनवणे, नीता पवार, डॉ. अनिता पाटील, नेहा आहेर, गायत्री नायक आदी कलाकार रसिकांच्या पसंतीची गाणी सादर करतील. सात्त्विक अश्विनी, राहुल निरगुडे याने गिनीज बुक ऑफ वर्ल्डमध्ये दोरीवरील उड्यांचा विक्रम नोंदवला आहे. नाशिक म्युझिकल सोशल फाउंडेशनतर्फे त्याचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. थोर समाजसेवक बाबा आमटे यांचे सहकारी मुकुंद दीक्षित यांच्या हस्ते हा सन्मान होईल.

### ओझरला इलेक्ट्रिक वायरची चोरी

**ओझर :** ओझर येथे अज्ञात चोरट्याने ६० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक वायर चोरून नेली. ओझर शिवारातील गट नं. २६३९/७ येथे काम सुरू असताना अज्ञात चोरट्याने ९५ स्कॅर मीटर वायर किंमत रु. ४५००० आणि ७० स्केवर मीटर किंमत रुपये १५००० अशी एकूण ६० हजार रुपये किमतीची पॉलिकब अल्युमिनियम इलेक्ट्रिक केबल वायर चोरून नेली असल्याची तक्रार इलेक्ट्रिक कॉन्ट्रॅक्टर भारत कांडे यांनी दिली. ओझर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## निधन वार्ता

### जयश्रीबेन माणेक

**नाशिक :** गंगापूररोड सिरीन मेडोज येथील रहिवासी जयश्रीबेन



मनहरलाल माणेक (८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महाराष्ट्र चेंबरचे शाखा उपाध्यक्ष तथा सद्‌गुरू एंटरप्रायजेसचे संचालक भावेश व निमेश माणेक यांच्या त्या मातोश्री होत.

### सुरेश गवळी



**कसबे सुकेणे :** निफाड तालुक्यातील नारायण टेंभी येथील प्रगतिशील शेतकरी सुरेश नामदेव गवळी (५९) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली असा परिवार आहे. नीलेश गवळी यांचे ते वडील होत.

# किसान सभेचा चांदवड तहसील कार्यालयावर मोर्चा

## विविध मागण्यांचे तहसीलदार यांना निवेदन

**चांदवड : वार्ताहर**

चांदवड तालुका किसान सभेतर्फे विविध प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी प्रांत आणि तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांच्या शिष्टमंडळाने तहसीलदार मंदार कुलकर्णी आणि पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना मागण्यांचे निवेदन दिले.

मोर्चामध्ये कॉम्रेड हनुमत गुंजाळ, तुकाराम गायकवाड, राजाराम ठाकरे, गणपत गुंजाळ, जयाबाई माळी, सारिका गुंजाळ, ताईबाई पवार, शब्बीर सय्यद, विकास पवार, नामदेव पवार, योगेश राऊत आदींचा सक्रिय सहभाग होता. निवेदनात जनहित सुरक्षा कायदा रद्द करावा, पात्र घरकुल लाभार्थ्यांना गावात व वनजमिनीवर राहत्या ठिकाणी घरकुल बांधण्यासाठी परवानगी द्यावी, वनजमिनीवर राहणाऱ्या लोकांना लाईट कनेक्शन देण्यासाठी संबंधित विभागातील लोकांना आदेश देण्यात यावे, वनजमीन व गायरान जमिनीवर राहणाऱ्या लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, नवीन व जुने दाखल केलेल्या वनदाव्याची तत्काळ चौकशी करून दावे चतु:सीमेसह स्वतंत्र ७/१२ उतारा व पात्र करण्यात यावे, रेशनकार्ड



देण्यात यावे व संबंधित रेशन दुकानदारांना आदेश देऊन त्यावर धान्य पुरवठा करण्यात यावा, उपजिल्हा रुग्णालयातील अनागोंदी कारभार तत्काळ बंद करण्यात यावा तसेच किसान सभेचे एक प्रतिनिधी हे वैद्यकीय सहाय्यता कक्षासाठी नियुक्त करण्यात यावे, चांदवड नगर परिषदेकडून ठेकेदार रवी न्याहारकर यांना कामाचा मोबदला देण्यात यावा, चांदवड गट नं. ६५६ मध्ये प्रस्तावित असलेला घनकचरा प्रकल्प रद्द करण्यात यावा व कोणतेही शासकीय काम त्या ठिकाणी करू नये, रस्त्यांची कामे तत्काळ पूर्ण करण्यात यावी, दाखले वेळेवर उपलब्ध करून देण्याकामी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांना समज देण्यात यावी, तहसील कार्यालयातील सेतू विभागांतर्गत ई-रेशनकार्ड काढून देण्याची व्यवस्था करण्यात यावी, भूमिहीन व बेघरधारकांना गायरान जमिनीमध्ये स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात यावी, फॉरेस्ट प्लॉटमधील शिवरस्ते खुले करण्यात यावे, शेतकऱ्यांचे पूर्ण थकीत कर्ज माफ करण्यात यावे, परसूल व भोयेगाव शिवरस्त्यावरील अतिक्रमण काढून रस्ता खुला करण्यात यावा, तसेच परसूल ग्रामपंचायतमधील उपसरपंच हिरामण जाधव यांनी केलेल्या बोअरवेलची चौकशी करावी व चांदवड नगर परिषदेकडून चांदवड शहरातील पाणीपट्टी व घरपट्टीची वसुली मोहिमेची मनमानी थांबविण्यात यावी, अशा विविध मागण्यांचा समावेश होता.

# जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचे चांदवडला उद्‌घाटन

**चांदवड : वार्ताहर**

पाण्याचा प्रत्येक थेंब अमृतासमान आहे, हे पटवून देत जलव्यवस्थापन कृती पंधरवडा उपक्रमाचा जलपूजन व जलरथ पूजनाच्या विधीने चांदवड येथे प्रारंभ झाला. चांदवड प्रांत कार्यालयाच्या नियोजन भवनात आयोजित या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी जलसंवर्धनाचा संदेश देत, पाणी ही संपत्ती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.



**चांदवड : येथील प्रांत कार्यालयात जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याच्या जलरथाचे उद्‌घाटन करताना कैलास कडलग, मंदार कुलकर्णी, शिवनाथ बोरसे, मनोज शिंदे, म. भा. ढोकचौळे, गणेश निंबाळकर.**

उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, तहसीलदार मंदार कुलकर्णी, कृषिभूषण शिवनाथ बोरसे, म. भा. ढोकचौळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्‌घाटन पार पडले. अध्यक्षस्थानी म. भा. ढोकचौळे होते. यावेळी व्यासपीठावर पालखेड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वै. शा. भागवत, भाजप तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक योगेश ढोमसे, प्रहार संघटनेचे जिल्हाप्रमुख गणेश निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवनाथ बोरसे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, दुष्काळ ही निसर्गनिर्मित परिस्थिती नसून, नियोजनाच्या अभावामुळे निर्माण झालेली समस्या आहे. योग्य नियोजन, पाण्याची अडवण व साठवण केल्यास दुष्काळाची भीती उरत नाही. कडलग व कुलकर्णी यांनी सांगितले की, पाणी ही केवळ नैसर्गिक देणगी नसून, ती पुढील पिढ्यांसाठी जबाबदारी आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या स्तरावर जलसंवर्धनाच्या प्रयत्नात सहभागी व्हावे. ढोकचौळे व भागवत यांनी जलसंपदा विभागाच्या उपक्रमांची माहिती देत, गावागावांत जलसाक्षरतेची चळवळ रुजवण्याचे आवाहन केले. गणेश निंबाळकर यांनी ओझरखेडसारख्या प्रकल्पांचे पाणी मराठवाड्याला दिले जाते, मग चांदवडसारख्या कायम दुष्काळी तालुक्याचा विचार राज्य सरकार कधी करणार? असा सवाल उपस्थित करत योग्य न्यायाची मागणी केली.

प्रास्ताविक रितेश जाधव, सूत्रसंचालन मीनाक्षी बहिरम, आभारप्रदर्शन योगिता घुगे यांनी केले. कार्यक्रमानंतर जलरथाचे पूजन करून त्याला जनजागृतीसाठी मार्गस्थ करण्यात आले. यावेळी चांदवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दिनेश सिनारे, सहाय्यक गटविकास अधिकारी थोरात, तालुक्यातील शेतकरी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

# अपहरणाच्या गुन्ह्यातील संशयितासह पीडित मुलगी पुण्यातून ताब्यात

**पंचवटी : वार्ताहर**

मखमलाबाद परिसरातील शांतीनगर येथील हॉस्पिटलजवळून अपहरण करण्यात आलेल्या पीडित मुलीसह संशयितास म्हसरूळ पोलिसांनी पुणे येथून ताब्यात घेतले असून, पीडित मुलीला सुखरूपने तिच्या पालकांच्या ताब्यात दिले.

म्हसरूळ पोलिस ठाण्यात २० मार्च २०२५ रोजी मखमलाबाद परिसरातील शांतीनगर येथील एका हॉस्पिटलमध्ये नर्सिंगसाठी गेली असता ती हॉस्पिटलजवळ व आजूबाजूला शोधले असता ती सापडली नाही. त्याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात बाललैंगिक अत्यावर कलम ३,४,८,१२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर अपहृत मुलीचा शोध घेण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक घेण्याकरिता मनोहर क्षीरसागर यांनी गुन्हा तपासाचे कौशल्य वापरून तांत्रिक बाबी व खबऱ्यांनी दिलेल्या खबरीवरून संशयिताचा पत्ता शोधून पथकातील अंमलदार यांनी संशयिताचा पुणे येथे शोध घेतला असता, मुलीला संशयित गोरक्षनाथ हनुमंत गायकवाड (२०, रा. माळवाडी, उंबरे, ता. राहुरी, जि. अहमदनगर) याने फूस लावून पळवून नेले असल्याचे निष्पन्न झाल्याने पीडित मुलीस त्याच्या ताब्यातून सुखरूप सुटका करून पालकांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कामगिरी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, पोलिस उपायुक्त परिमंडळ-१, किरणकुमार चव्हाण, सहाय्यक पोलिस आयुक्त, पंचवटी विभाग, श्रीमती पद्मजा बढे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंकुश चिंतामण, पोलिस उपनिरीक्षक मनोहर क्षीरसागर, दीपक पटारे, पोलिस हवालदार सतीश वसावे, बाळासाहेब मुर्तडक, प्रशांत वालझाडे, पोलिस अंमलदार प्रशांत देवरे, नितेंद्र शिंदे, गुणवंत गायकवाड यांनी केली.



# मनपा अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे मानधन रखडले

## प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर विरोधकांची नाराजी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिका हद्दीतील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे मार्च महिन्याचे मानधन रखडल्यामुळे शेकडो महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. मार्च महिन्याच्या मानधनाची अद्यापही अंमलबजावणी झालेली नसून, अर्धा एप्रिल महिना उलटूनही त्यांच्या खात्यावर मानधन जमा झालेले नाही. यामुळे अंगणवाडी सेविकांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे.

वित्तीय वर्ष २०२४-२५ चा समाप्ती महिना म्हणजेच मार्च महिना असल्याने यासंबंधी काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या असल्याचे प्रशासनातर्फे सांगण्यात येत आहे. पण संबंधित खात्यांकडून अद्याप बिलेच सादर न झाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे हे मानधन कधी मिळणार, याबाबत अजूनही अनिश्चितता कायम आहे. दरवर्षी मार्च ते ऑगस्ट या कालावधीत अंगणवाडी सेविकांचे मानधन वेळेवर मिळत नाही. अशा प्रकारची ही वारंवारता आता अंगवळणी पडली असून, दरवर्षीचेच नाटक असे म्हणून अनेक महिला आपल्या संतप्त भावना व्यक्त करत आहेत.

नाशिक शहरातील सुमारे ६०० अंगणवाडी सेविका आणि मदतनीस आपली सेवा प्रामाणिकपणे देत आहेत. यामध्ये विधवा, परित्यक्ता, गरीब आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील महिलांचा मोठा सहभाग आहे. शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील मुलांपर्यंत पोहोचवण्याचे काम हे त्या महिला करत असतानाच त्यांच्याच न्याय्य हक्कांकडे दुर्लक्ष होत आहे.

# बोलेरो व कारच्या अपघातात चार जण गंभीर

**मुकणे : वार्ताहर**

नाशिक-मुंबई महामार्गावरील जिंदाल पॉलिफिल्म कंपनीजवळ आज सायंकाळी ४ वाजेदरम्यान बोलेरो व कार गाडीच्या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत.

नासिकहून मुंबईकडे जात असलेल्या बोलोरो (क्र. चक०६.-थ.४३२९) ला कार (क्र. चक१७.ऊ.२३४३) ने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून चार ते सहा जण किरकोळ जखमी झाले आहेत. अपघात इतका जोरात होता की दोनही वाहने अपघाताने





उलटी झाली आहेत.

दरम्यान अपघाताची माहिती मिळताच गोंदे फाट्याजवळ असलेली जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानची मोफत रुग्णवाहिका घेऊन चालक निवृत्ती गुंड पाटील काही वेळेतच घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तात्काळ घोटी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातातील जखमींची नावे पुढीलप्रमाणे दिपाली दत्तात्रय देशमुख (वय ३४), तेजल बाळासाहेब घिघे (वय १८), ज्ञानेश्वरी बाळासाहेब घिघे (वय १९), सुरेखा बाळासाहेब घिघे (वय ३०), अनंत देवराम कांबळे (वय ४१) , बाळासाहेब घिघे यांचा आठ वर्षांचा मुलगा हे सर्व जखमी राजूर, अकोला (जिल्हा अहमदनगर) येथील रहिवासी आहेत. सद्यस्थितीत नाशिक-मुंबई महामार्गादरम्यान गोंदे ते पिंप्री सदो या महामार्गावरील सुरू असलेल्या कामात विसंगती व माहिती फलक न लावल्याने तसेच अनेक ठिकाणी रस्त्याच्या कामांसाठी खोदाई केली मात्र अपूर्ण व चुकीच्या पद्धतीने कामे होत असल्याने अपघात घडत असल्याचे वाहनधारक सांगत आहेत.

# देवळाली-दाणापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला लासलगावला थांबा

**लासलगाव : वार्ताहर**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या विशेष प्रयत्नांतून देवळाली-दाणापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेला लासलगाव येथे थांबा मंजूर करण्यात आला आहे. लासलगाव परिसरातील शेतकरी बांधवांना याचा मोठा फायदा होणार आहे.

शेतकऱ्यांच्या आग्रही मागणीनंतर सुरू झालेल्या दाणापूर - देवळाली किसान रेल्वेला लासलगाव स्थानकावर थांबा नसल्याने त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नव्हता. देशाची ओळख असलेल्या नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक कांद्याची उलाढाल आपल्या लासलगावमधून होते. म्हणूनच दाणापूर - देवळाली किसान रेल्वेला लासलगाव येथे थांबा मिळावा यासाठी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांना पत्र लिहून विनंती केली होती. येवला मतदारसंघातून नाशिक कांदा पट्ट्याला ऑफशोअर मार्केट प्रवेश देण्यासाठी लासलगाव येथील देवळाली-दाणापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वेसाठी व्यावसायिक थांबा मंजूर करण्याची तातडीची गरज असल्याकडे पत्र लिहून छगन भुजबळ यांनी लक्ष वेधले. त्यानुसार या रेल्वेला लासलगाव येथे थांबा देण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेद्वारे चालवल्या जाणाऱ्या २३६४ किसान रेल्वे सेवांपैकी १८४२ (७८%) महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातून सुरू झाल्या आहेत. त्यापैकी नगरसूल येथे जानेवारी २०२१ ते मे २०२२ पर्यंत मतदारसंघातील ४४० (१.५ एलएमटी), येवला (वायएल) येथे १००, लासलगाव येथे १०० कांदा वाहतूक केली जात आहे. या सेवांमधून चित्पूर, फतुहा, आगरतळा, नौगाचिया, छपरा, बैहाटा, धुपगुडी, संक्रेल, दानकुनी, गौर मालदा, गुवाहाटी, नवीन जलपाईगुडी आणि आदर्शनगर दिल्ली येथे कांद्याची वाहतूक केली जात आहे. मध्य रेल्वेने मे, जून ते १० जुलै २०२० या कालावधीत ५५ मालगाड्यांमधून १.२६२ लाख टन कांदा बांगलादेशला नेला आहे. यातील बहुतेक १० रेक येवला मतदारसंघातून निर्यात करण्यात आल्या आहेत. यातून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतकऱ्यांना निर्यात स्पर्धात्मकता मिळाली आहे.

देशाचे रेल्वेमंत्री अलीकडेच ४ ऑक्टोबर २०२४ रोजी आरपीएफ झोनल ट्रेनिंग सेंटरमध्ये आरपीएफच्या ४० व्या स्थापना दिनाच्या परेडला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी नाशिकला आले होते. नाशिकमधील शेतकऱ्यांशी झालेल्या त्यांच्या भेटीवेळी शेतकऱ्यांनी कृषी उत्पादनांच्या सुलभ वाहतुकीसाठी ट्रेनची मागणी केली होती. देवळाली-दाणापूर शेतकरी समृद्धी किसान रेल्वे १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सुरू करण्यात आली. तथापि, ही रेल्वे लासलगाव स्टेशनवरून जात नाही.

# येवला शहरात कविसंमेलन उत्साहात साजरे

**येवला : वार्ताहर**

डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्ताने शहरातील शासकीय विश्रामगृह येथे कविसंमेलन झाले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ज्येष्ठ नेते माणिकराव शिंदे, तसेच कार्यक्रमाचे मुख्य आकर्षक सिनेअभिनेत्री रूपाली पवार आदी उपस्थित होते.



उपस्थित कवींनी मराठी, हिंदी, खान्देशी, अहिराणी आदी भाषांत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले आदी महामानवांच्या जीवनावरील कविता, चारोळी, गझल सादर करून प्रेक्षकांची दाद मिळविली तर अवघ्या ७ वर्षांच्या ओवी काळे या मुलीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पोवाडा सादर करून सभागृहाची मनं जिंकली. छोटीशी ओवीने सदर पोवाड्यात विविध प्रसंग सादर केले तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड. माणिकराव शिंदे यांच्या आग्रहास्तव बालशाहीर ओवी हिने मी रमाई आंबेडकर बोलते ही एकांकिका सादर केली. तर माणिकराव गोडसे, निवृत्ती महाराज, सीमाराणी बागुल, अर्चना परदेशी, गोरख पालवे, प्रकाश अहिरे, नंदकिशोर ठोंबरे, अजय बिरारी, संगीता महाजन, जयश्री राठोड, शांताराम वाघ, रेश्मा आहिरे, समीक्षा लहिरे आदी कवींनी आपल्या सुंदर संदेशात्मक कविता सादर करून संमेलनात रंगत आणली होती. उपस्थित सर्व कवींना प्रमुख पाहुणे ज्येष्ठ नेते माणिक शिंदे, सिनेअभिनेत्री रूपाली पवार, उद्‌घाटक राजू लहिरे, अध्यक्ष विनोद त्रिभुवन, स्वागत अध्यक्ष महेंद्र पगारे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन कवी बाळासाहेब गिरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजय घोडेराव, अजहर शेख, विनोद त्रिभुवन, बाळासाहेब आहिरे, मयूर सोनवणे, गणेश झाल्टे, समाधान गुंजाळ, सुरेश खळे, दादासाहेब मोरे, युवराज पगारे, आशा आहेर, नयना सोनवणे, ज्योती पगारे, लक्ष्मी त्रिभुवन, सविता आहिरे, सुजाता पगारे, अनमोल आहिरे, संगीता रणधीर आदींनी परिश्रम घेतले. आभार विजय घोडेराव यांनी मानले.

### करंजीत २४ ला गुरुकुलाचे उद्‌घाटन

**दिंडोरी :** तालुक्यातील श्रीक्षेत्र करंजी येथे ज्ञानविश्व बहुद्देशीय सेवाभावी संस्था श्री संत पाटीलबाचा वारकरी शिक्षण संस्थेद्वारे शिवदास गुरुकुलाचे उद्‌घाटन २४ एप्रिलला करण्यात येणार आहे. ही माहिती युवा कीर्तनकार अभिजित महाराज देशमुख (राजापूर) यांनी दिली. आळंदी देवाची येथील सद्‌गुरू जोग महाराज संस्थेचे अध्यापक गुरुवर्य उल्हास महाराज सूर्यवंशी यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल. यावेळी वेदांताचार्य विष्णुपंत महाराज गोंडे यांचे सकाळी ९ ते १२ कीर्तन होणार आहे. भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अभिजित महाराज देशमुख (राजापूरकर) यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### देवपूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी राजेंद्र गडाख

**सिन्नर : प्रतिनिधी**



तालुक्यातील देवपूर ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी राजेंद्र शिवराम गडाख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच शरद गडाख यांनी सहकारी सदस्यांना संधी मिळावी यासाठी उपसरपंचपदाचा राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते. उपसरपंच निवडीसाठी सरपंच सुरेखा गडाख यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्यांची विशेष सभा बोलविण्यात आली होती. त्यात उपसरपंच पदासाठी राजेंद्र गडाख यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाले. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा सरपंच गडाख यांनी केली. निवडणूक कामात ग्रामसेविका सी. एस. बच्छाव यांनी सरपंचांना सहाय्य केले. गडाख यांची उपसरपंचपदी निवड होताच गुलालाची उधळण करून त्यांचा ग्रामस्थांच्यावतीने राजेश गडाख यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशांत गडाख, शरद गडाख, वनिता सोमनाथ गडाख, वनिता नवनाथ गडाख, अनुराधा गडाख, पुष्पा नरवडे, चंद्रकांत घरटे, वसंत दिवे, आशा बर्डे आदी सदस्य उपस्थित होते.



### घोटेवाडी शाळा तालुक्यात प्रथम

**सिन्नर :** मिशन मॉडेल स्कूल टप्पा क्रमांक २ मध्ये सिन्नर तालुक्यातील घोटेवाडी येथील उपक्रमशील जिल्हा परिषद शाळेने प्रथम तर निमगाव - देवपूर शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. घोटेवाडी शाळेस ११ हजारांचे प्रथम क्रमांकाचे तर निमगाव - देवपूर शाळेस ५ हजार रुपयांचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. तालुक्यातील ३२ शाळा मिशन मॉडेल स्कूल टप्पा क्रमांक २ मध्ये सहभागी झाल्या होत्या. पैकी या दोन शाळा मूल्यांकनात अग्रभागी राहिल्या. शाळांमधील गुणवत्ता वाढीस लागावी यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी असीमा मित्तल यांच्या संकल्पनेतून मिशन मॉडेल स्कूल उपक्रम राबवण्यात आला आहे. त्यात शाळेतील भौतिक सुविधा, विद्यार्थी गुणवत्ता विकास आणि लोकसहभाग या तीन बाबींचे मूल्यांकन करून शिक्षण विभागाकडून शाळांना गुणदान करण्यात आले. त्यानंतर तालुकास्तरावर शाळांमधून प्रथम दोन क्रमांक काढण्यात आले. यापूर्वी टप्पा क्रमांक १ मध्ये यशस्वी झालेल्या जिल्हास्तरावरील शाळांचा पारितोषिक वितरण समारंभ आणि मिशन मॉडेल स्कूलची कार्यशाळा नाशिक येथील महाकवी कालिदास कला मंदिरात पार पडली. यावेळी विजेत्या शाळांना जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्तार अधिकारी मंजुषा साळुंखे, विजय बागुल, केंद्रप्रमुख संदीप लेंडे आदींसह मान्यवरांच्या उपस्थित पारितोषिक वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक सुरेश दिघे, शिक्षिका ताराबाई गोरडे, सुरेखा शेळके, शालेय समितीचे अध्यक्ष वसंत ढमाले आदी यावेळी उपस्थित होते.

### रोटरी क्लबच्या डिस्ट्रिक्ट सेक्रेटरीपदी क्षत्रिय

**सिन्नर :** रोटरी क्लबच्या नाशिक ते नागपूर या ३०३० जिल्ह्याच्या डिस्ट्रीक्ट जाईंट सेक्रेटरीपदी येथील कस्तुरी पतसंस्थेचे चेअरमन कैलास क्षत्रिय यांची निवड झाली आहे. नाशिक ते नागपूरदरम्यानच्या



प्रशासकीय ९ जिल्ह्यांचा मिळून हा जिल्हा बनतो. क्षत्रिय हे सिन्नर रोटरी क्लबचे संस्थापक अध्यक्ष असून, आजपर्यंत रोटरीच्या माध्यमातून त्यांनी अनेक समजोपयोगी कामे केली आहेत. निवडीचे वृत्त आल्यानंतर पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन विजय डांगरे यांच्या हस्ते क्षत्रिय यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे संचालक संजय आनेराव, नाना भगत, रविंद्र नहार, व्यवस्थापक निमिष लाले उपस्थित होते. फोटो ओळी: रोटरी क्लबच्या डिस्ट्रीक्ट जाईंट सेक्रेटरीपदी कैलास क्षत्रिय यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

### कोनांबे शिवारात बीयर शॉपीत चोरी

**सिन्नर :** सिन्नर-घोटी महामार्गावर कोनांबे शिवारात असलेल्या हॉटेल यशराज बियरबार ॲण्ड परमिट रुम व लगतच्या आदेश बियर शॉपी या दुकानात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत १३ हजार ५०० रुपयांच्या रोख रक्कमेसह बियर व विदेशी मद्याच्या बाटल्या चोरुन नेल्याची घटना गुरुवारी (दि.१७) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. सिन्नर-घोटी महामार्गावर कोनांबे शिवारात अंबादास मुरलीधर बोडके यांचे हॉटेल यशराज बियरबार ॲण्ड परमिट रुम असून त्यालगत आदेश बियर शॉपी आहे. गुरुवारी (दि.१७) रात्री ९.३० वाजता दोन्ही दुकाने बंद केली होती. त्यानंतर अज्ञात चोरट्याने हॉटेलचे शटर वाकवुन आत प्रवेश करत ५०० रुपये किंमतीचा सी.पी. प्लस कंपनीचा डीव्हीआर, ८७६० रुपये किंमतीच्या ऑक्समिथ गोल्ड कंपनीच्या १८० मि.ली.च्या २४ बाटल्या, ५६४० रुपये किंमतीच्या सिल्वर कंपनीच्या १८० मि.ली. च्या २४ बाटल्या, ४८०० रुपये किंमतीच्या ॲन्टीक्वीटी कंपनीच्या १८० मि.ली.च्या १२ बाटल्या चोरुन नेल्या. तसेच हॉटेल शेजारी असलेल्या आदेश बियर शॉपीमधून १३ हजार ५०० रुपयांची रोकड, १४४० रुपये किंमतीच्या अल्ट्रामॅक्स कंपनीच्या ६ बियरच्या बाटल्या, ५०० रुपये किंमतीचा सी.पी. प्लस कंपनीचा डीव्हीआर चोरुन नेला. शुक्रवारी (दि.१८) सकाळी ६ वाजेच्या सुमारास चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर अंबादास बोडके यांनी सिन्नर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली. बोडके यांच्या फिर्यादीवरुन सिन्नर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास हवालदार जाधव करत आहेत.

### मोहदरी शिवारात कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**सिन्नर :** सिन्नर-नाशिक रस्त्यावर मोहदरी शिवारात कारने दुचाकीला पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकीस्वार ठार झाल्याची घटना गुरुवारी (दि.१७) रात्री ११.३० वाजेच्या सुमारास घडली. सतीष सुदाम खैरे (३७), रा. चिंचोली, ता. सिन्नर असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे. सतीष खैरे त्यांच्या टीव्हीएस रायडर मोटारसायकलने (क्र. एमएच-१५, केडी-८९३५) मोहदरीकडून चिंचोलीकडे जात असताना पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या किया क्रेन्स कारने (क्र.एमएच-१५, एचसी-१९३९) मोटारसायकलला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार सतीष खैरे यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सचिन सुदाम खैरे यांच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिसांनी कारचालक प्रदिप अशोक आहेरराव, रा. नाशिक याचेविरोधात अपघाताचा गुन्हा दाखल केला असून अधिक तपास हवालदार टेमगर करत आहेत.

# जलकुंभास दिवंगत डॉ. दौलत आहेर यांचे नाव

## महासभेवर प्रस्ताव; ४२ जलकुंभांचे काम सुरू

**नाशिक : प्रतिनिधी**

**शिवसत्य मंडळ येथील जलकुंभ बाधण्याचे काम चालू आहे. या जलकुंभाचे नामकरण दिवंगत माजी आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर असे करण्यात यावे, असा प्रस्ताव पाणीपुरवठा विभागाने महासभेवर ठेवला आहे. दरम्यान, शहरातील वेगवेगळ्या भागात ४२ जलकुंभ उभारले जात आहे.**

त्या जलकुंभांना आपल्याप्रमाणे नावे द्यावीत याकरिता माजी नगरसेवकांनी यापूर्वी महापालिकेला पत्र दिली आहे.

शहरातील बावीस लाख लोकसंख्येला गंगापूर, मुकणे व दारणा समूहातून पाणी पुरवले जाते. मुकणेचे पाणी पार्थडी, विल्होळी, इंदिरानगर, सिडकोचा काही भाग तसेच मुंबई नाकयापर्यंत जाते. दारणा धरणातून नाशिकरोड भागासाठी तर उर्वरित शहरासाठी गंगापूर धरणातून पाणी इतर परिसराला पुरवले जाते. जलकुंभाची संख्या कमी असल्याचे पाहून पालिका प्रशासनाकडून ४२ जलकुंभांचे काम हाती घेणात आले आहेत. प्रशासक राजवट नसताना माजी नगरसेवकांमध्ये जलकुंभाला नावे देण्यासाठी रस्सीखेच सुरू असल्याचे चित्र होते. एका ठिकाणी नाव देण्यावरुन वादही झाला होता. दरम्यान, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमनुसार महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नाव देऊ शकते. शिवसत्य मंडळ येथे जलकुंभाचे काम माहपालिका मक्तेदाराकडून करून घेत आहे. काम पूर्ण होताच जलकुंभाचे डॉ. दौलतराव आहेर असे नामकरण केले जाईल. याबाबतच प्रस्ताव महसभेच्या मंजुरीकरिता ठेवण्यात आला आहे. यापूर्वी या जलकुंभाच्या नामकरणासाठी भाजपच्या माजी स्थायी सभापती व विरोधी पक्षनेते अजय बोरस्ते व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी देखील पत्र दिली आहेत.



## स्टाईसमधील कारखान्यांत दिव्यांगांना पात्रतेनुसार नोकरी मिळणार

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दिव्यांग बांधवांना सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये रोजगाराच्या संधी मिळावी यासाठी प्रहार दिव्यांग संघटनेच्या पाठपुराव्याला यश आले असून स्टाईसचे चेअरमन नामकर्ण आवारे यांच्या प्रयत्नातून दिव्यांग बांधवांना पात्रतेनुसार स्टाईसमधील कारखान्यांमध्ये नोकरीची संधी मिळणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे यांनी दिली.

सिन्नर तालुका प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने मागील तीन महिन्यापूर्वी स्टाईसचे चेअरमन नामकर्ण आवारे यांची भेट घेऊन दिव्यांगांसाठी रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी विनंती केली होती. त्यानंतर चेअरमन आवारे यांनी स्टाईसमधील सर्व कारखान्यांशी पत्रव्यवहार करून चर्चा केली व दिव्यांग बांधवांना रोजगार देण्यास मान्यता मिळवली. दिव्यांगांना त्यांच्या पात्रतेनुसार जागा भरण्याचे ठरविले असून काल (दि. १८)चेअरमन आवारे यांची भेट घेऊन प्रहार संघटनेच्या कार्यालयामध्ये जमा झालेले ७० दिव्यांग बांधवांचे कागदपत्र सुपूर्द करण्यात आले. लवकरच या लाभार्थ्यांचे इंटरव्यू घेऊन त्यांना कामावर रुजू करण्यात येईल असे आवारे यांनी सांगितले. याप्रसंगी प्रहार दिव्यांग संघटना जिल्हाध्यक्ष अरुण पाचोरे, मुसळगाव शाखाध्यक्ष नवनाथ कुऱ्हाडे, उपाध्यक्ष चंद्रभान काकड, गोरख काकड, कविता खैरनार आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी सिन्नर तालुका अध्यक्ष दौलत ढोली, उपाध्यक्ष नामदेव आडके, सचिव भगवान पगर, कार्याध्यक्ष नंदू शिरसाठ, शहराध्यक्ष चंदू पवार, उपाध्यक्ष आनंद सातभाई, संपर्कप्रमुख सुदाम पावसे, रघुनाथ पावशे, मालन आव्हाड, सीमा वाकळे. भोसले यांचे सहकार्य लाभले.

## एचएएल कामगार संघटना निवडणुकीसाठी ९३.४२ टक्के मतदान

**ओझर : वार्ताहर**

येथील एचएएल कामगार संघटनेच्या ३१ जागांसाठी झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी एकूण २८१२ सभासदांपैकी २६२७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान ९३.४२ टक्के झाले असल्याची तसेच मतमोजणी आज दिनांक २० रोजी होईल अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सतीशकुमार ठाकरे व सहाय्यक निवडणूक अधिकारी जयचंद नायर यांनी दिली.

कामगार संघटनेच्या अध्यक्ष १ जागा, उपाध्यक्ष ४, सरचिटणीस १, सहचिटणीस ४, खजिनदार १ व कार्यकारिणी सदस्य २० जागा अशा ३१ जागांच्या निवडणुकीसाठी काल सकाळी ८ ते ४ वाजेपर्यंत एचएएल सायकल स्टँड येथे मतदान झाले. मतदानासाठी प्रत्येक बूथवर ४०० मतदार याप्रमाणे ७ बूथ लावण्यात आले होते. तसेच प्रत्येक पदाची मतपत्रिका वेगवेगळी व वेगवेगळ्या रंगाची होती. एकूण सहा मतपत्रिका होत्या. मतदानास सुरवात झाल्यानंतर सकाळी ८ ते दुपारी ४.३० वाजेपर्यंत कामगारांनी स्वयंस्फूर्तीने मतदानासाठी येऊन रांगा लावून मतदान केले. मतदानाची वेळ संपली तेव्हापर्यंत एकूण २८१२ मतदारापैकी २६२७ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदान ९३.४२ टक्के झाले असून, मतदान शांततेत पार पडले तसेच मतमोजणी उद्या दिनांक २० रोजी होणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सतीशकुमार टाके, सहाय्यक निवडणूक अधिकारी जयचंद नायर यांनी सांगितले.

## सिन्नरची निऱ्हाळे बस दोडी खुर्द मार्गे सुरू करा

### दत्तात्रय गोसावी यांचे आगारप्रमुखांना निवेदन

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर आगारातून दुपारी १२.३० वाजता सुटणारी निऱ्हाळे बस दोडी खुर्द मार्गे सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रेय गोसावी यांनी केली आहे. गोसावी यांनी याबाबतचे निवेदन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागाला दिले आहे. विभागीय वाहतूक अधीक्षक कल्याणी ढगे यांची भेट घेऊन गोसावी यांनी याबाबत मागणी केली आहे.

सिन्नर तालुक्यातील दोडी खुर्द येथे २ हजार लोकसंख्या असून या गावामध्ये कुठल्याही प्रकारची बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे येथील शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी व अनेक प्रवाशांना बसने प्रवास करण्यासाठी एक ते दोन किलोमीटर पायी चालून दोडी बुद्रुक व दोडी खुर्द फाटा या ठिकाणी जावे लागते. ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्तींना दिव्यांग व्यक्तींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच एसटी बसच्या विविध शासकीय योजनेचा लाभ या गावाला मिळत नाही.



त्यामुळे सिन्नर आगारातून दुपारी साडेबारा वाजता निऱ्हाळे बस जात असते, ही बस दोडी खुर्द गावातून दोडी बुद्रुक - नांदुर-शिंगोटे मार्गे निऱ्हाळे अशी सुरू करावी. तसेच नांदुर-शिंगोटे मार्गे निऱ्हाळे - दोडी खुर्द मार्गे सिन्नर येथे परतीचा प्रवास राहील. दिवसातून एक फेरी सुरू केल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होईल. त्यामुळे लवकरात लवकर ही बस सेवा सुरू करण्याची मागणी गोसावी यांनी केली आहे.

## दप्तरमुक्त शनिवारी विद्यार्थ्यांनी साकारले रोबोट

### बारागावपिंप्री जिल्हा परिषद शाळेचा उपक्रम

**सिन्नर : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बारागावपिंप्री येथे दप्तरमुक्त शनिवार उपक्रमांतर्गत इयत्ता ३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांनी सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार घडवला. पेपर रोबोट बनवा या नावीन्यपूर्ण उपक्रमात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या साहित्यांचा वापर करत स्वतःचे कल्पक रोबोट तयार केले.

कागदाचे तुकडे, कार्डबोर्ड, रंग, बटणे, गोंद, रंगीबेरंगी तागे व क्राफ्ट साहित्यांचा वापर करत मुलांनी स्वतःचे छोटे रोबोट बनवले. शरीर, डोळे, हात-पाय, सेन्सर अशा सर्व भागांची बांधणी करत त्यावर आकर्षक रंगसंगतीत सजावट केली.



हा उपक्रम मुख्याध्यापक नवनाथ हांडगे यांच्या नेतृत्वाखाली, शिक्षक गोरक्ष सोनवणे यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आला. राजेंद्र पाटील, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड, अनिता बडदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यात मदत केली. या उपक्रमाचे गटविकास अधिकारी अशोक भवारी, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्ताराधिकारी मंजुषा साळुंके, कैलास सांगळे, विजय बागुल, शाळा समिती, पालक व शिक्षक संघानेही विशेष कौतुक केले.

# सिन्नरला मंगळवारी हुतात्मा स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम

## गोळीबारात शहीद झालेल्या ५ हुतात्म्यांना वाहणार आदरांजली

**सिन्नर : प्रतिनिधी**

सन १९७२ च्या भयाण दुष्काळात सरकारने हाताला काम, प्यायला पाणी व धान्य द्यावे, या मागणीसाठी सिन्नर तहसील कचेरीवर निघालेल्या ऐतिहासिक मोर्चावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात सिन्नरच्या ५ जणांनी हौतात्म्य पत्करले होते. गोळीबारात शहीद झालेल्या या ५ हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी मंगळवारी (दि. २२) दुपारी १२ वाजता सिन्नर शहरातील रहिवाशांनी उपस्थित राहण्याचे आवाहन हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार अरविंद गुजराथी यांनी केले आहे.



तहसील कार्यालयावर २२ एप्रिलला गेलेल्या या ऐतिहासिक मोर्चाला हिंसक वळण लागल्यानंतर पोलिसांना गोळीबार करावा लागला होता. त्यात ज्ञानेश्वर विठोबा साठे, अशोक रामभाऊ पगार, चिंतामण रामचंद्र क्षत्रिय, अशोक गणपत कवाडे, गणपत गंगाधर वासुदेव हे शहीद झाले होते. या मोर्चानंतर संपूर्ण जगाचे लक्ष सिन्नरच्या भयाण दुष्काळाकडे वेधले गेले आणि त्यानंतर केंद्र व राज्य सरकारने तालुक्यातील दुष्काळ हटवण्यासाठी विविध योजना राबवल्या. स्व. राजीव गांधी पंतप्रधान असताना तालुक्यातला दुष्काळ पाहण्यासाठी स्वतः तालुक्याच्या दौऱ्यावर आले होते. त्यानंतर शासकीय योजनांनी वेग पकडला आणि सिन्नरच्या माथ्यावरील दुष्काळाचा कलंक हळूहळू कमी होत गेला. पाच सिन्नरकर हुतात्मा झाल्यानेच हे घडले. त्यामुळे या पाच हुतात्म्यांचे कायमस्वरूपी स्मारक व्हावे यासाठी जेष्ठ पत्रकार अरविंद गुजराती यांच्या नेतृत्वाखाली हुतात्मा स्मारक समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून शासनाकडे सलग वर्ष पाठपुरावा केल्यानंतर शासनाने स्मारकासाठी जागा उपलब्ध करून दिली. येत्या मंगळवारी खासदार राजाभाऊ वाजे यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात येणार आहे.

### हुतात्मा स्तंभासाठी अनेकांचे योगदान

मोर्चाचे नेतृत्व करणारे माजी आमदार स्व. सूर्यभान गडाख यांनी हुतात्मा स्मारक उभे करण्यासाठी पुढाकार घेतला. समितीलाही सर्वसामान्य सिन्नरकरांनी वर्गणी देत नगर परिषदेच्या कार्यालयासमोरील चौकात हुतात्मा स्मारक उभे राहिले. त्याचे डिझाइन वास्तुविशारद व जिल्हा परिषदेचे माजी सभापती स्व. एन. एम. आव्हाड यांनी तयार केले होते. त्यानंतरही अनेक वर्षे हे स्मारक दुर्लक्षितच होते. याच स्मारकावर ज्योत लावण्याचे काम तत्कालीन नगराध्यक्ष स्व. जगदीश चांडक यांनी केले. तत्कालीन आमदार आणि विद्यमान खासदार राजाभाऊ वाजे यांनी हायमास्टची व्यवस्था केली. नंतरच्या काळात तत्कालीन आमदार व विद्यमान कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्मारकाचे आधुनिकीकरण करत त्यावर कारंजाची व्यवस्था केली. खासदार वाजे यांनी नगर परिषदेवर भोंगा बसवण्याची व दरवर्षी २२ एप्रिलला १२ बारा वाजून दोन मिनिटांनी हुतात्म्यांची आठवण म्हणून भोंगा वाजवण्याची प्रथा सुरू केली.

### सिन्नर नागरीच्या ठेवीदारांची मंगळवारी बैठक

**सिन्नर :** अवसायनात गेलेल्या शहरातील सिन्नर नागरी सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी (दि. २२) दुपारी ४ वाजता सहाय्यक निबंधक कार्यालयात आयोजित करण्यात आली असल्याची माहीती डॉ. जी.एल. पवार व राजेंद्र घोगे यांनी दिली. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळण्यासाठी ठेवीदारांनी समिती स्थापन केली असून ठेवी मिळत नसल्याने आंदोलनाचा इशाराही दिला होता. मात्र, पतसंस्थेचे अवसायक तथा सहाय्यक निबंधक संजय गीते यांनी आंदोलन न करण्याची विनंती करत ठेवीदारांच्या ठेवी परत मिळवून देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली होती. त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले होते. डॉ. पवार, घोगे यांच्यासह काही ठेवीदारांनी गीते यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर गीते यांनी ठेवीदारांची बैठक घेण्याचे मान्य केले असून या बैठकीत ठेवी परत मिळण्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. पतसंस्थेच्या सर्व ठेवीदारांनी या बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ. जी. एल. पवार, घोगे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र शासनाच्या सलोखा योजनेविषयी जनजागृतीची गरज!

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारने सलोखा योजनेला पुढील दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार राज्यात १ जानेवारी २०२७ पर्यंत सलोखा योजना राबवण्यात येणार आहे. शेतजमिनीच्या अदलाबदल दस्तांसाठी मुद्रांक आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये आकारण्याबाबत सवलत देणारी सलोखा योजना जानेवारी २०२३ पासून राबवली जाते. या योजनेचा कालावधी २ जानेवारी २०२५ रोजी संपला होता. त्यामुळे योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार राज्य सरकारने या योजनेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेविषयी जनजागृती होण्याची गरज आहे.**

राज्यात शेतीजमिनीचे वाद टोकाला जाऊन दोन शेतकऱ्यांमध्ये कलह निर्माण होतो. जमिनीच्या वादाची प्रकरणं न्यायालयापर्यंत जातात. परंतु, ही प्रकरणं गुंतागुंतीची असल्याने न्यायालयात वर्षानुवर्षे सुरूच राहतात. यामध्ये मालकी हक्काबाबतचे वाद, शेतबांधावरून होणारे वाद, जमिनीच्या ताब्याबाबतचे वाद, रस्त्याचे वाद, शेत जमीन मोजणीवरून होणारे वाद, अधिकार अभिलेखातील चुकीच्या नोंदीमुळे होणारे वाद, शेतीवरील अतिक्रमणावरून होणारे वाद, शेती वहिवाटीचे वाद, भावा-भावांतील वाटणीचे वाद अशा एका कारणांमुळे शेतीजमिनीचे वाद समाजात आहे. शेतजमीन हा जिव्हाळ्याचा आणि संवेदनशील विषय असल्यामुळे त्यामध्ये कुटुंबातील नात्यांमध्ये एकेमकांबद्दल असंतोषाची भावना आणि दुरावा निर्माण होतो. त्यामुळे कित्येक पिढ्यांचं नुकसान तर झालं आहे.

पैसा आणि वेळही वाया गेला आहे. परंतु वाद संपले नाहीत. याच पार्श्वभूमीवर राज्याचे तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी २०२३ मध्ये सलोखा योजना राबवण्याचा निर्णय घेतला होता.

या योजनेत शेतजमिनीचा ताबा आणि वहिवाटबाबत शेतकऱ्यांमधील वाद मिटवून समाजात सलोखा वाढीस लावण्याचा उद्देश आहे. यामध्ये एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीनधारकांची अदलाबदल दस्तासाठी मुद्रांक शुल्क एक हजार आणि नोंदणी शुल्क एक हजार रुपये शुल्क आकारलं जातं. दरम्यान, मागील दोन वर्षांत या योजनेला प्रतिसाद चांगला मिळत असल्याचं बोललं जात आहे. मागील दोन वर्षांत या योजनेतून राज्यात १ हजार ११९ दस्त नोंद करण्यात आले आहेत.

त्यामुळे या दस्तांसाठी ८ कोटी ६५ लाख रुपयांची आणि नोंदणी शुल्कात १ कोटी ३९ लाख रुपयांची माफी सलोखा योजनेतून देण्यात आली आहे. एकूण १० कोटी ५ लाख रुपयांची माफी मिळाली आहे. त्यामुळे योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात होती. त्यानुसार राज्य सरकारने मान्यता दिली आहे.

> महाराष्ट्र शासनाने राज्यात सन २०२३ ला सलोखा योजना सुरू केल्यानंतर निफाड तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत दस्त नोंदणी केली आहे. राज्य सरकारने या योजनेला पुनश्च सन २०२७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या योजनेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या अतिशय फायद्याची योजना असून, योग्य मार्गदर्शन घेऊन दस्त नोंदणीस हरकत नाही.
>
> **–दीपाली जगताप**, निबंधक, निफाड



बस कर्मचाऱ्यांचे निलंबन रद्द
पान ५

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



किसान सभेचा चांदवड तहसील कार्यालयावर मोर्चा पान नं. ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, रविवार, दि. २० एप्रिल २०२५

## महत्त्वाचे

### स्वप्नपूर्ती वसुंधरा महोत्सवाचे २२ ला घाटघर येथे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**

जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून कळसूबाई - हरिश्चंद्रगड अभयारण्य व स्वप्नपूर्ती सामाजिक संस्था, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्वप्नपूर्ती वसुंधरा महोत्सव २०२५ या विशेष उपक्रमाचे आयोजन येत्या दि.२२ रोजी सकाळी ९ वाजता घाटघर येथे करण्यात आले आहे. अबाधित राखूया वनांचे अस्तित्व, वसुंधरेच्या संवर्धनासाठी होऊया कटिबद्ध...! या प्रेरणादायी घोषवाक्याच्या माध्यमातून निसर्गसंवर्धनाचा जागर घालण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपवनसंरक्षक गजेंद्र हिरे हे असणार आहेत. वन्यजीव अभ्यासक अभिजित महाले व पशुधन विकास अधिकारी डॉ. अशोक धिंदळे हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, वनपरिक्षेत्र अधिकारी, भंडारदरा रूपेश गावित व प्रतिभा सोनवणे उपस्थित राहणार आहेत. स्वप्नपूर्ती फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून, पर्यावरणपूरक उपक्रम, माहिती सत्रे आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

### छजलानी यांना गोळाफेक स्पर्धेत सुवर्ण



**नाशिक :** नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे येथे तंत्रज्ञ पदावर कार्यरत असलेले आणि खेळाडूवृत्तीने काम करणारे गणेश छजलानी यांनी ४६ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या कोल्हापूर येथे पार पडलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत गोळाफेक प्रकारात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक पटकावले आहे. गणेश छजलानी यांना लहानपणापासूनच खेळाची आवड असून, कबड्डी हा त्यांचा आवडता खेळ आहे. त्यांनी महानिर्मितीच्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन संघाचे यशस्वी नेतृत्व करत अनेक पारितोषिके मिळवली आहेत. या उल्लेखनीय यशामुळे नाशिक औष्णिक विद्युत केंद्राचे नाव राज्यपातळीवर उजळले असून, केंद्रातील सर्व संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व सभासदांनी छजलानी यांचे हार्दिक अभिनंदन व कौतुक केले आहे.



# दंगल प्रकरणातील ४० जणांना न्यायालयीन कोठडी

## आणखी १५ ते २० जणांची पोलिसांकडून धरपकड

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**द्वारका परिसरातील काठे गल्ली येथील सातपीर दर्गा प्रकरणावरून उसळलेल्या दंगलीत अटक करण्यात आलेल्या चाळीस जणांची पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर काल त्यांना न्यायालयात हजर केले असता, त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली.**

दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी सुमारे १५०० हून अधिक दंगलखोरांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. शनिवारी (दि.१९ एप्रिल) सायंकाळपर्यंत नव्याने १५ ते २० संशयितांची ओळख पटवून त्यांना ताब्यात घेण्यात आले असून, रात्री उशिरापर्यंत त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू होते.



**नाशिक : सातपीर दर्गा दंगलप्रकरणी संशयितांना पोलिस बंदोबस्तात न्यायालयात घेऊन जाताना पोलिस पथक.**

ही दंगल १६ एप्रिल रोजी उसळली होती. काठे गल्लीत असलेल्या सातपीर दर्ग्याचे अनधिकृत बांधकाम मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्या आदेशानुसार पोलिस बंदोबस्तात हटवण्यात आले. यानंतर काही समाजकंटकांनी धार्मिक तेढ निर्माण करत परिस्थिती चिघळवली व दंगल घडवून आणली. या दंगलीत ३० पेक्षा अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी जखमी झाले असून, तीन पोलीस वाहने फोडण्यात आली. अधिक धक्कादायक बाब म्हणजे, या घटनेत मालेगाव, धुळे व नाशिकबाहेरील काही व्यक्तींनी स्थानिक मुस्लिम समाजाला चिथावणी देऊन दंगल घडवून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांकडून सध्या सीसीटीव्ही फुटेज व व्हिडिओ क्लिप्सच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दंगलीस कारणीभूत असलेल्या मुख्य सूत्रधारांना शोधण्यासाठी गुप्तचर यंत्रणाही सक्रिय करण्यात आल्या आहेत. सध्या नाशिक शहरात तणावाचे वातावरण असून, पोलीस दलाकडून कडक बंदोबस्त व गस्त व्यवस्था राबवली जात आहे. नागरिकांनी शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार आज नाशिक दौऱ्यावर



**नाशिक : प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार आज रविवार दि. २० रोजी नाशिक दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात उद्घाटन व शहर राष्ट्रवादी काँग्रेसची बैठक होणार आहे. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर छगन भुजबळ यांना ज्येष्ठ असूनही डावलण्यात आल्याची भावना भुजबळ समर्थकांनी व्यक्त केली होती.

छगन भुजबळदेखील नाराज असल्याचा चर्चा अनेक वेळा रंगताना दिसल्या. त्यामुळे ना. अजित पवारांच्या नाशिक दौऱ्यात भुजबळांची नाराजी दूर होणार का? हे पाहावे लागणार आहे. सकाळी ९.४५ ला समर्थ सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन होणार आहे. आनंदवल्ली येथील हॉटेल एसएसके सॉलिटेअरचे उद्घाटन होणार आहे. दुपारी १२.३० वाजता नाशिक शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बैठक अजित पवार घेणार आहेत.

### पालकमंत्रिपदाबाबत काय बोलणार?

नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटायचे नाव घेत नाही, महायुतीचे राज्य पातळीवरील नेते नाशिक दौऱ्यावर आल्यानंतर पालकमंत्रिपदाचा तिढा लवकरच सुटणार असे सांगतात, मात्र प्रत्यक्षात तिढा सुटताना दिसत नाही. त्यामुळे जिल्ह्यात सर्वाधिक आमदार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसची पालकमंत्रिपदाबाबत काय भूमिका आहे? पालकमंत्री कधी जाहीर होणार, याबाबत अजित पवार भाष्य करण्याची शक्यता आहे.

### सिंहस्थाचा आढावा घेणार?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिंहस्थाचा आढावा घेतला होता. त्यामुळे अजित पवार यांच्या नियोजित दौऱ्यात सिंहस्थ आढावासंदर्भात माहिती नसली तरी नाशकात आल्यावर ऐनवेळी पवार सिंहस्थाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# सीएनजी पुरवठ्याबाबत उद्या शहरात बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हाभरात गेल्या काही दिवसांपासून सीएनजीचा पुरवठा सुरळीत होत नसल्याने वाहनचालकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात सोमवार दि. २१ रोजी २.३० वाजता रोजी एमएनजीएल आणि जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशनची बैठक होणार आहे. गेल्या दहा दिवसांपासून शहरात तुडवडा जाणवत असल्याने जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशनकडून एमएनजीएलला २५ एप्रिलपर्यंत रोज निदान दहा तास सुरळीत सीएनजीचा पुरवठा करा, अन्यथा २६ एप्रिलपासून सीएनजी विक्री जिल्हाभरात बंद करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर एमएनजीएलकडून जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशनला मेल पाठवत पाच सदस्यांना चर्चेसाठी आमंत्रित केले आहे. दरम्यान,तेरा सीएनजीचे पंप आहेत. या पंपांना एमएनजीएलकडून सीएनजीचा पुरवठा करण्यात येतो. यात एमएनजीएलचे तीन पंप आहेत.

> एमएनजीएलच्या सकारात्मक प्रतिसादाला साथ देण्यासाठी सर्व सीएनजी पंपचालक तयार आहे. मात्र, केवळ आश्वासनानीच समजूत काढण्याचा प्रयत्न केला तर पेट्रोल डीलर्स असोसिएशनकडून आधी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे कृती करण्यात येईल.– **विजय ठाकरे,** अध्यक्ष, नाशिक जिल्हा पेट्रोल डीलर असोसिएशन

# पाणी खेचणाऱ्या इलेक्ट्रिक मोटारींवरील कारवाई होईना

## मनपाच्या पाणीपुरवठा विभागाची उदासीनता

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात समान पाणीपुरवठा होत नसल्याने याचा नागरिकांना सतत मनस्ताप होतो आहे. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असताना सिडकोसह सातपूर, जेलरोड, पंचवटी भागात काहीजन सर्रासपणे पाणी खेचण्यासाठी इलेक्ट्रिक मोटार लावत आहेत. याचा समान पाणी वितरणावर परिणाम होत आहे. शहरात बिनदिक्कतपणे असले प्रकार होत असताना महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग उदासीन असल्याचे दिसत आहे. त्यांच्याकडून इलेक्ट्रिक मोटारी लावणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

इलेक्ट्रिक मोटारद्वारे पाणी उपसण्याचे प्रकार रोखण्यात पाणीपुरवठा विभागाला अपयश आल्याचे दिसते. त्यामुळे अन्य



नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. शहरातील बेकायदा नळजोडधारकांची संख्या हजारांहून अधिक आहे. त्यांच्यावर प्रशासनाच्या वतीने कोणतीही ठोस कारवाई होत नाही. त्यामुळे बिनदिक्कत पाणीचोरी होते. महापालिकेच्या वतीने पाणी सोडण्यासाठी आणि बंद करण्याचे काम कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून केले जाते आहे. त्याचप्रमाणे पाण्याच्या बिलांचे वाटपही ठेकेदारी पद्धतीनेच सुरू करण्यात आले आहे. मग अशावेळी थकीत बिलांची वसुली करणे, बेकायदा नळजोडांना आळा घालणे, पाण्याचा बेकायदा उपसा रोखणे यासारख्या कामांकडे महापालिकेचा पाणीपुरवठा विभाग लक्ष का देत नाही, असा सवाल केला जातो आहे. शहरातील अनेक नागरिक प्रामाणिकपणे पाणीपट्टी भरत असताना त्यांना सपुरे पाणी मिळत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. गेल्या तीन-चार महिन्यांत शहरातील पाणीप्रश्नावरून महापालिकेवर राजकीय पक्षांनी मोर्चे काढत संताप व्यक्त केला आहे. परंतु, मनपाने इलेक्ट्रिक मोटार लावणाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता असताना तसे होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये मनपाविरोधात रोष व्यक्त होत आहे.

### बुधवारी परिपत्रक काढणार

सहाही विभागांतील अधिकाऱ्यांना बुधवारी परिपत्रक काढून इलेक्ट्रिक मोटार लावणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जातील. तसेच आतापर्यंत त्यांनी काही कारवाई केली का, याची माहिती घेऊ. **–रवींद्र धारणकर,** अधीक्षक पाणीपुरवठा विभाग, मनपा

# वृक्षांना पाणी देण्यासाठी सत्तर लाखांचा खर्च

## ‘उद्यान’चा महासभेवर प्रस्ताव

**नाशिक : प्रतिनिधी**



शहरातील रस्ता दुभाजकांच्या सुशोभीकरणाचे काम उद्यान विभागामार्फत केले जाते. सोबतच दुभाजकांमधील वृक्षांना पाणी देण्याचे काम उद्यानकडूनच दिले जाते. सध्या कडाक्याचे ऊन पडत असून, सूर्य आग ओकत असल्याने झाडे करपण्याची शक्यता आहे. हे पाहून उद्यान विभागाने नवीन नाशिकमधील दुभाजकांसह इतर ठिकाणी लागवड केलेल्या रोपट्यांना पाणी देण्यासाठी ६९ लाखांचा खर्च करणार आहे. त्यासाठीचा प्रस्ताव महासभेवर ठेवण्यात आला आहे.

रोपांना पाणी देण्यासाठी उद्यानकडे पुरेसे टँकर नसल्याने भाडेतत्त्वावर घेऊन काम केले जाणार आहे. नवीन नाशिक विभागातील विविध रस्ता दुभाजकांत उद्यान विभागातर्फे लागवड केलेली शोभिवंत रोपे व वृक्षांना पाणी देण्यासाठी टँकर भाडेतत्त्वावर घेतली जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या वृक्षलागवड अंतर्गत शहरात विविध ठिकाणी वृक्षलागवड करण्यात आली आहे. उन्हाळा सुरू झाल्याने उद्यानने केलेली वृक्षलागवड व रस्ता दुभाजकांची पाण्याअभावी देखभाल करणे शक्य होत नाही. उद्यान विभागाकडे पाणी टँकरची संख्या अपुरी असल्याने शहराकरिता ती अपुरी आहे. वृक्ष व रस्ता दुभाजकातील रोपांना पाणी देण्यासाठी पाणी पालिकेकडून उपलब्ध करून देणे शक्य नसल्याने पाणी व्यवस्था करण्यासाठी दर निश्चित करण्यात आले आहे.

त्यानुसार १०१४.५० प्रतिट्रीप दर निश्चित केले आहे. नवीन नाशिक विभागाकरिता एकूण ६ हजार ९६० ट्रीपची आवश्यकता आहे. सदर कामाचे प्राकलन तयार करण्यात आले असून, जीएसटीसह एकुण ७० लाख ७६ हजार ५३९ रुपये झालेले आहे. याबाबत लेखा व लेखापरीक्षण विभागाचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे. सदर कामासाठी लागणारा खर्च वृक्ष निधीमधून केला जाणार आहे. उद्यान विभागाने याबाबतचा प्रस्ताव महासभेच्या मंजुरीसाठी ठेवला आहे.

# चैत्रोत्सवात १४ हजारांहून अधिक रुग्णांवर प्रथमोपचार

## माकडाच्या चाव्यामुळे १२ जणांनी घेतले उपचार

**नाशिक : प्रतिनिधी**

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या सप्तशृंगीदेवीचा चैत्रोत्सव नुकताच पार पडला. या चैत्रोत्सवात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून १४ हजार ७३९ जणांनी विविध आरोग्य सेवेचा लाभ घेतला. माकडाच्या चाव्यामुळे १२ जणांवर प्रथमोपचार करण्यात आले आहेत.

५ ते १२ मार्चदरम्यान या उत्सवामध्ये चाळीस अंश तापमानातही चैत्रोत्सवासाठी पायी प्रवास भाविकांनी केला. यादरम्यान भाविकांना रस्त्याने अडचण येऊ नये म्हणून ठिकठिकाणी मोफत आरोग्य सेवा देण्यात आली.

यावेळी गडाच्या मार्गावर १२ जणांना माकडाने चावा घेतला होता. त्यांना औषधोपचार करून आरोग्यसेवा देण्यात आली. थंडी-ताप, सर्दी, डोकेदुखी, ॲसिडिटी, उलटी, दमा, अंगदुखी, गुडघेदुखी, पायांना कळ येणे, फोड येणे आदींवर उपचार करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या नियोजनातून गडावर येणाऱ्या भाविकांसाठी यात्रा कालावधीत विविध ठिकाणी सेवा पुरवण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या टीमने सप्तशृंगगडावरील पाणी शुद्धीकरण केंद्र, ट्रस्ट दवाखाना, आरोग्य उपकेंद्र, फ्युनिक्युलर ट्रॉली येथे ६ पथकांद्वारे ३७ वैद्यकीय अधिकारी यांच्यासह ६८ आरोग्य कर्मचारी व ६ सप्तशृंगगड ग्रामपंचायत, सप्तशृंग निवासिनी ट्रस्ट, फ्युनिक्युलर ट्रॉली संचालक मंडळ यांच्याशी समन्वय साधून गडावर आरोग्य सुविधा पुरविल्या होत्या.

जि.प. कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल नेहते यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेवा पुरविण्यात आली.

# २१ हजार लाभार्थ्यांचा धान्यपुरवठा तात्पुरता बंद

## रेशन दुकानांकडे पाठ फिरवणे पडले महागात

**नाशिक : प्रतिनिधी**

पुरवठा विभागाने जिल्ह्यात अपात्र शिधापत्रिकाधारकांची शोधमोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत २१ हजार ६६१ शिधापत्रिकांवर मागील सहा महिन्यांपासून एकदाही धान्य उचल केली नसल्याचे जिल्हा पुरवठा विभागाकडून या शिधापत्रिकांवरील धान्य पुरवठा तात्पुरत्या स्वरूपात बंद करण्यात आला आहे.

शासनातर्फे स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेत अंत्योदय व प्राधान्य रेशनकार्डधारक लाभार्थींना महिन्याकाठी रेशन दुकानांमधून धान्य वितरित करण्यात येते. रेशन वाटपापूर्वी ई-पॉस मशीनवर लाभार्थीच्या अंगठ्यांची नोंद घेतली जाते. महिन्याकाठी कोट्यवधी लाभार्थी



या धान्याचा लाभ घेतात.

या व्यवस्थेत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी शासनामार्फत लाभार्थीची ई-केवायसी नोंदणी केली जात असून, या माध्यमातून माहिती अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच ई-केवायसीसह अपात्र रेशनकार्डची शोधमोहीम राबवावी, अशाही सूचना शासनाने राज्यभरातील जिल्हा पुरवठा विभागांना केल्या आहेत. जिल्हा पुरवठा विभागामार्फत नाशिक व मालेगाव धान्य वितरण अधिकारी. तसेच १५ तहसील कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात अपात्र रेशनकार्डची शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत जुलै ते डिसेंबर या कालावधीत एकदाही धान्य उचल न केलेल्या रेशनकार्डवरील धान्याचे वितरण पुरवठा विभागाने तूर्तास थांबविले आहे. अपात्र शिधापत्रिकांची शोधमोहीम यापुढे सुरूच राहणार असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. संबंधित लाभार्थींनी प्रशासनाशी संपर्क साधल्यास कागदपत्रांची पूर्तता करून त्यांचे धान्य नियमित सुरू केले जाईल, असे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले आहे.

> अपात्र रेशनकार्डच्या शोध मोहिमेत २१ हजार ६६१ शिधापत्रिका आढळून आल्या आहेत. त्यामध्ये अंत्योदयची संख्या २८६३ व प्राधान्य रेशनकार्डची संख्या १८७९८ इतकी आहे. तर दोन्ही शिधापत्रिकांवरील एकूण लाभार्थींची संख्या ५६ हजार ५२१ इतकी आहे.

# पश्चिम विभागात धूरफवारणी वाऱ्यावर

## कर्मचाऱ्यांची वानवा : इतर विभागांचे काम मात्र मक्तेदाराकडे

**नाशिक : प्रतिनिधी**

**धूरफवारणी ठेक्यातून पालिका प्रशासनाने पश्चिम विभागाला वगळल्याने या भागात शंभर टक्के धूरफवारणी होत नसल्याने चित्र आहे. याचा फटका नागरिकांना बसत असून, वाढत्या डासांमुळे आरोग्याचा प्रश्न उद्भवण्याची भीती आहे. पश्चिममध्ये मनपाच्या मलेरिया विभागाकडे अवघे २२ कर्मचारी असून, त्यांच्यावरच कामाची जबाबदारी आहे. कामाच्या तुलनेने कर्मचाऱ्यांची संख्या तोकडी असल्यने ताण पडत आहे. सहापैकी पाच विभागांत ठेकेदारी पद्धतीने धूरफवारणी होत असताना पश्चिम विभागालाच का वगळण्यात आले? असा सवाल केला जात आहे.**

नाशिक महापालिकेच्या मलेरिया विभागाने नाशिकरोड, नाशिक पूर्व, पंचवटी, सातपूर व सिडको या विभागासाठी पेस्ट कंट्रोल अर्थात धूरफवारणीचे काम खासगी मक्तेदाराला दिले आहे. काही दिवसांपूर्वीच सातपूर व सिडको विभागाचे काम एका वर्षासाठी देण्यात आले. यापूर्वी नाशिकरोड, पंचवटी व पूर्व विभागासाठी मक्तेदाराची नेमणूक केली आहे. तर दुसऱ्या निविदेत सातपूर व सिडको विभागासाठी काम दिले आहे. दुसऱ्या टप्प्यातील निविदेत पश्चिम विभागाचा समावेश असेल अशी शक्यता होती. परंतु महापालिका प्रशासनाने पश्चिमला साइड कॉर्नर दिला. महापालिकेचे कर्मचारी पश्चिममध्ये धूरफवारणी करतील, असे सांगण्यात आले. मात्र सद्यस्थित अवघे २२ कर्मचारी असून, त्यातील काहीजण सुट्टीवर असतात. यामुळे पश्चिम विभागात धूरफवारणी होणे अपेक्षित आहे. तशी होत नसल्याचे चित्र आहे. साडेचार कोटी रुपये खर्चून सातपूर व सिडकोमध्ये धूरफवारणीचे काम एसडीआर या खासगी संस्थेला देण्यात आले असून, इतर विभागांत दिग्विजय एंटरप्रायजेस संस्थेवर फवारणीचे काम आहे.

### ४९ पदांच्या भरतीसाठी प्रस्ताव

मलेरिया विभागातील पश्चिम विभागात ४९ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. यातील काही अनुकंपातील भरती केली तरी मनपा कर्मचाऱ्यांवरील ताण कमी होईल. कर्मचाऱ्यांची भरतीचा प्रस्ताव सामान्य प्रशासनाकडे देण्यात आला आहे.



> सातपूर व सिडको या विभागात धूरफवारणीचे काम खासगी ठेकेदाराला देण्यात आले आहे. पश्चिम विभागात मनपाच्या मलेरिया विभागाकडूनच केले जाते. **–डॉ. नितीन रावते,** मलेरिया विभागप्रमुख, मनपा

रविवार गांवकरी
# आस्वाद
रविवार, दि. २० एप्रिल २०२५

कोणत्याही देशाच्या लोकशाहीत त्या त्या देशाच्या विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वाची असते. सरकारी कारभाराविरोधात किंवा त्यांच्या चुका दाखवण्यासाठी आंदोलने केली जातात. ती यशस्वी होतात. अनेक वेळा सरकारांना आपले निर्णय बदलावे लागतात. अमेरिकेत गेल्या आठवड्यात अशाच प्रकारचे एक मोठे जनआंदोलन झाले व ट्रम्प यांनीही ते होऊ दिले. अनेक पक्ष हे विरोधी पक्षाच्या भूमिकेतही राहिलेले असल्याने एकमेकांच्या आंदोलनाचा अशा प्रकारे सन्मान ठेवण्याची भूमिका आहे.




# नॅशनल हेरॉल्ड प्रकरण



घ्या समजून राजे हो..
॥ अविनाश पाठक
९०९६०५०५८१

अखेर नॅशनल हेरॉल्ड प्रकरणात काँग्रेस पक्षाच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी आणि लोकसभेतील विद्यमान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या दोघांसह मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस, सॅम पित्रोदा, सुमन दुबे यांच्याविरोधातही आरोपपत्र दाखल झाल्याची माहिती आहे. या व्यक्तींविरोधात यापूर्वीच गुन्हे नोंदवून यांना अटकही करण्यात आली होती. सध्या हे सर्व आरोपी जामिनावर मुक्त फिरत आहेत.

गेली काही वर्षे देशात गाजत असलेले हे नॅशनल हेरॉल्ड प्रकरण नेमके काय आहे हा वाचकांना निश्चितच प्रश्न पडेल. त्यामुळे त्याबाबतची थोडी माहिती देणे गरजेचे आहे. नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड ही कंपनी चालवत असे. हे वृत्तपत्र २००८ मध्ये बंद पडले. सदर वृत्तपत्र १९३७ साली सुरू झाले होते. त्यावेळी देशभरातील स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी जवळचे पैसे टाकून असोसिएटेड जर्नल लिमिटेड ही कंपनी उभी केली आणि त्यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. ज्यांनी पैसे गुंतवले होते त्यांना त्या त्या रकमेचे शेअर्स देण्यात आले होते. स्वातंत्र्योत्तर काळात या वृत्तपत्राचा विस्तार देशभर झाला. त्यामुळे प्रत्येक शहरात शासकीय जमिनीवर या वृत्तपत्राची कार्यालये उभी राहिली. हे वृत्तपत्र बंद पडले त्यावेळी या वृत्तपत्राच्या मालकीची मालमत्ता अंदाजे दोन हजार रुपये कोटी रुपये इतक्या किमतीची होती.

वृत्तपत्र चालू असताना काँग्रेस पक्षाने या कंपनीला ९०.२५ कोटी रुपये रकमेचे बिनव्याजी कर्ज दिले होते. वृत्तपत्र बंद पडले तेव्हाही हे कर्ज कायम होते. म्हणजेच हे कर्ज फिटल्यावर उरलेल्या जवळपास १९०० कोटी रुपयांच्या मालमत्तेवर सर्व भागीदारांचा हक्क होता. याचदरम्यान २०१० च्या नोव्हेंबर महिन्यात यंग इंडियन्स ही चॅरिटेबल कंपनी दिल्लीत स्थापन झाली. कायदेशीर परिभाषेत याला नॉन प्रॉफिट मेकिंग कंपनी किंवा सेक्शन ८ कंपनी असे म्हणतात. या कंपनीचे उद्दिष्ट देशातील तरुणांमध्ये लोकशाही आणि सर्वधर्मसमभाव बिंबवणे हेच होते. या कंपनीचे भागभांडवल रुपये पाच लाख इतके होते. त्यात सोनिया गांधी यांचे ३८%, राहुल गांधी यांचे ३८% आणि उर्वरित २४% रकमेत मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस हे गुंतवणूकदार होते. ही कंपनी स्थापन झाल्याच्या दुसऱ्याच महिन्यात म्हणजेच डिसेंबर २०१० मध्ये काँग्रेसने असोसिएटेड जर्नल्सला सांगितले की, आम्हाला फक्त ५० लाख रुपये द्या आणि आमचे उरलेले ८९.७६ कोटी रुपये तुम्ही यंग इंडियन्सला ट्रान्सफर करा. काँग्रेसने हक्काच्या ८९.७५ कोटी रुपयांवर पाणी सोडले आणि ते वसूल करण्याचा हक्क यंग इंडियन्स म्हणजे च अप्रत्यक्षरीत्या गांधी कुटुंबाला बहाल केला. एका अर्थाने काँग्रेसने ८९.७५ कोटी रुपये गांधी कुटुंबाला भेट म्हणून दिले.

मात्र, ही भेट गांधी कुटुंबाला रोख स्वरूपात मिळाली नाही. असोसिएटेड जर्नल्सने आपल्या खाते पुस्तकात ८९.७५ कोटी रुपयांच्या कर्जाचे रूपांतर शेअर्समध्ये केले. असोसिएटेड जर्नल्सच्या एकूण शेअर्सच्या ९९% शेअर्स यंग इंडियन्सचे झाले. याचाच अर्थ यंग इंडियन्सच्या खाते वहीत असोसिएटेड जर्नल्समधील शेअर गुंतवणूक स्थावर मालमत्ता म्हणून नोंदली गेली. आणि असोसिएटेड जर्नल्सचा संपूर्ण ताबा तसेच कंट्रोल यंग इंडियन्सकडे गेला. थोडक्यात म्हणजे यंग इंडियन्स ही कंपनी पाच लाख रुपये देऊन दोन हजार कोटी रुपयांच्या मालमत्तेची मालक बनली. मनी लॉन्ड्रिंग म्हणतात ते हेच झाले होते. या मालमत्तेची आजची किंमत अंदाजे ५००० कोटी रुपये इतकी असल्याचे बोलले जाते. याच दरम्यान हा व्यवहार भारतीय जनता पक्षाचे नेते डॉ. सुब्रमण्यम स्वामी यांना कळला. त्यांनी या प्रकरणात न्यायालयात दावा ठोकला. मात्र, हे प्रकरण काँग्रेस पक्ष, यंग इंडियन्स आणि असोसिएटेड जर्नल्स यांच्यातील आहे आणि स्वामी हे त्रयस्थ व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांना हस्तक्षेप करता येत नाही, असा दावा या प्रतिवादींनी केला. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. आणि स्वामींची याचिका मान्य केली. डॉ. स्वामी हे भारताचे नागरिक असल्यामुळे एका राष्ट्रीय पक्षाच्या कारभाराबाबत हस्तक्षेप करण्याचा त्यांना पूर्ण हक्क आहे, असे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे या प्रकरणाची चौकशीही सुरू झाली. स्वामींनी केलेल्या दाव्यानुसार असोसिएटेड जर्नल्सकडून आलेली ८९.७५ कोटी रुपयांची गुंतवणूक त्यांनी खर्च म्हणून राइट ऑफ म्हणजेच रद्दबातल ठरवली आहे. हे जर खरे असेल तर हे प्रकरण भयंकर आहे. याचा अर्थ अप्रत्यक्षरीत्या ५००० कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता वही खात्यातून गायब करण्यात आली आहे. चौकशी सुरू झाल्यावर हे प्रकरण आर्थिक गैरव्यवहाराचे असल्यामुळे इनफोर्समेंट डायरेक्टोरेटकडे हस्तांतरित झाले आणि चौकशीअंती यंग इंडियन्सच्या सर्व भागधारकांना आरोपी बनवून त्यांना दिल्लीच्या तीस हजारी कोर्टात उभे करण्यात आले. यात सोनिया गांधी या आरोपी नंबर एक, तर राहुल गांधी हे आरोपी नंबर दोन आहेत. याशिवाय मोतीलाल व्होरा, सॅम पित्रोदा, सुमन दुबे आणि ऑस्कर फर्नांडिस हे देखील इतर आरोपी आहेत. या सर्वांची या खटल्यात जामिनावर मुक्तता झाली आहे. दरम्यान, नॅशनल हेरॉल्डच्या काही मालमत्तांवर ईडीने टाचदेखील आणल्याचे वृत्त आहे.

आता ईडीने या प्रकरणात संपूर्ण चौकशी करून सर्व आरोपींवर आरोपपत्र दाखल केले आहे. आता २५ एप्रिल रोजी या प्रकरणाची प्राथमिक सुनावणी होणार असल्याची बातमी आहे. हे आरोपपत्र दाखल झाल्याची बातमी बाहेर येताच देशभरात जे उरलेसुरले काँग्रेसजन आहेत, त्यांनी ठिकठिकाणी आंदोलने सुरू केली आहेत. काल काही शहरांमध्ये ईडीच्या कार्यालयात समोर असलेल्या फलकांवर काळे फासण्याचेही प्रकार घडल्याच्या बातम्या आल्या. काल नागपुरात काँग्रेस पक्षाचे एक ज्येष्ठ नेते चेन्निथाला यांनी राजकीय सूडबुद्धीने भारतीय जनता पक्ष ही कारवाई करत असल्याचा आरोप करत देशभर तीव्र आंदोलन उभे करण्याचा इरादा घोषित केला. २०१४ नंतर देशात हळूहळू काँग्रेस पक्षाने आचके देणे सुरू केले होते. मधल्या काळात तर हा पक्ष अक्षरशः व्हेंटिलेटरवर होता असे म्हटल्यास वावगे ठरू नये. त्यांच्या नशिबाने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत फेकण्याची फेक नॅरेटिव्ह पसरवण्यात ते यशस्वी झाले. त्यामुळे ते ५४ वरून ९९ पर्यंत लोकसभेत पोहोचू शकले. मात्र, नंतर विविध राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांचा आलेख पुन्हा खाली यायला .../-२



# विरोधी पक्षांची भूमिका



वेध
राजेश शिरभाते
९८६९५७८७२९
८८५०६७९५८६

आपल्या देशात सध्या विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. सत्तेत असलेला पक्ष व त्याचे प्रयत्न विरोध मोडून काढणे असा नसून, विरोधी पक्षच मोडून काढणे असा असल्याने ही गोष्ट होत असते. भाजपाला विरोधी पक्षात राहण्याचा प्रदीर्घ असा अनुभव आहे व काँग्रेसच्या सभ्यतेच्या मर्यादांचे त्यांना भान आहे. त्यामुळे त्यांचा मोठा भर काँग्रेसवर आहे. इतर पक्षांना हाताशी धरून व सोडून किंवा फोडून त्यांना नेस्तनाबूत केले जात आहे. गेल्या काही दिवसांमधील घटना या अशाच प्रकारच्या आहेत. त्यातही हे विरोधी पक्ष आपली भूमिका अधिकाधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहेत हे विशेष. आपले संस्कार, आपली सभ्यता, आपली माणुसकी हे सर्व गुण ते जपतात हे त्यातल्या त्यात देशाच्या लोकशाहीसाठी आश्वासक आहे. पुढच्या पिढीलाही लोकशाही समजण्यासाठी ते आवश्यकही आहे. काँग्रेसने थेट मोदींच्या राज्यात आपले अधिवेशन घेतले. त्यात मोदींना आव्हान वगैरे देण्याचा प्रकार नव्हता. आम्ही तुम्हाला घाबरत नाही, असा संदेश कदाचित काँग्रेसला द्यायचा होता. राहुल गांधी यांचे नेतृत्व अधिकाधिक प्रगल्भ होत आहे. त्यांच्या वागण्याबोलण्यात एक खानदानी आब दिसतो. माणुसकी दिसते. लोकांशी मिळून घेण्याचा त्यांचा एक स्वभाव दिसतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व व इतर ज्येष्ठ नेत्यांचे तेही निष्ठावानांचे प्रयत्न हा एकच आशेचा किरण त्यांच्याकडे आहे. काँग्रेसने गुजरातमध्ये अधिवेशन घेतले. त्यापाठोपाठ नॅशनल हेरॉल्डचे प्रकरण बाहेर काढण्यात आले. त्यामुळे काँग्रेसची जी काही प्रतिष्ठा निर्माण झाली असेल, ती पुन्हा नष्ट व्हावी व काँग्रेस हा कसा भ्रष्टाचारी लोकांचा पक्ष आहे हे लोकांना समजावे, असा प्रयत्न होत असावा. त्यातही गुजरात, बिहार व पाठोपाठ येणाऱ्या पश्चिम बंगालच्या निवडणुकांच्या प्रचाराच्या दृष्टीने ही पावले टाकली जात आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या राज्यातील प्रमुख विरोधी पक्षानेही खुद्द नाशिकमध्ये आपले अधिवेशन घेतले. त्या अधिवेशनात शिवसेनेतील निष्ठावान उपस्थित होते. पक्ष फुटीनंतर भाजपा, शिवसेना व खास करून उद्धव ठाकरे यांची प्रतिमा पूर्णपणे खराब करणे हा भाजपाचा एकमेव प्रयत्न दिसत आहे. भाजपाला ठाकरे नको आहेत. त्याला कारण आहे की, ठाकरेंना भाजपाची रणनीती, त्यांची मैत्री करण्याची भावना चांगल्या प्रकारे समजली आहे. त्याचबरोबर देशात व राज्यातही ते भाजपाला आव्हान देत आहेत. संजय राऊत यांच्या दररोजच्याअभ्यासपूर्ण अशा टिप्पणीला सत्ताधारी पक्षाकडून कधीही मुद्देसूद व प्रभावी असे उत्तर येत नाही. ते केवळ सकाळचा भोंगा वगैरे करून संजय राऊतांची खिल्ली उडवतात. आम्हाला फार मोठे मतदान झाले आहे. जनतेने आम्हाला निवडून दिल्याची आकडेवारी त्यांच्या तोंडावर फेकण्याचा प्रयत्न करतात. संजय राऊत तोच मुद्दा पुन्हा काढतात. तुमचे असे काय कर्तृत्व होते की, जेणेकरून तुम्हाला इतके मतदान झाले. त्यावर त्यांनाही उत्तर देता येत नाही. असो.

शिवसेना एका वेगळ्या पर्वातून जात आहे. हे पर्व त्यांना मोठे करून जाणार आहे. जेव्हा सगळेच जाते तेव्हा आता केवळ चांगले काही होण्याचीच शक्यता राहिलेली असते. शिवसेनेचे आगामी काळात तसेच होणार आहे. शिवसेनेत केवळ स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी आलेली नेत्यांची एक फळी सध्या संधी मिळेल तिथे घुसलेली आहे. शिवसेनेच्या निष्ठावंतांची व शिवसेनेच्या कर्तृत्वाची माहिती असलेली एक पिढी आता हळूहळू वानप्रस्थाश्रमाकडे गेलेली आहे. येणाऱ्या तरुण पिढीला काही कथा ऐकवून आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यात सध्या हिंदू धर्माचा बचाव करण्यासाठी या तरुणांची शक्ती वापरली जात आहे. एक दिवस धर्म आपल्यापेक्षा मोठा आहे. तो आपले रक्षण व आपल्यावर संस्कार करत असतो. आपले काम स्वतःची उन्नती करून घेणे हे आहे हे त्यांच्या लक्षात येईल तेव्हा ते या प्रचाराच्या बाहेर येतील. ही आशा आहे. येणाऱ्या निवडणुकाही शिवसेनेसाठी फार सोप्या नाहीत. उद्धव ठाकरे नको म्हणणाऱ्या भाजपाने सध्या राज ठाकरे यांच्याविषयी आस्थेचे धोरण स्वीकारले आहे. राज ठाकरे यांची शक्ती त्यांना वापरायची आहे. त्याचबरोबर राज ठाकरे यांच्यावर त्यांना अंकुशही ठेवायचा आहे. राज ठाकरे यांच्या पक्षाची मान्यता रद्द करण्याची याचिका दाखल करण्याची जी काही आगळीक करण्यात आली, तो काही फार मोठा नेता नाही. कोणाच्या तरी सांगण्यावरून त्याने हे केलेले आहे हे स्पष्ट आहे. त्यामुळे एका बाजूला त्यांना सोबत घ्यायचे व निवडणुकांमध्ये त्यांचा फायदा घेऊन झाले की, मग त्यांचीही अवस्था शिवसेनेसारखी करायची, अशी रणनीती आखली जात आहे.

बिहारमध्ये लालू यादव यांच्या विरोधातील कारवाईला वेग आला आहे. तिकडच्या निवडणुका भाजपासाठी महत्त्वाच्या आहेत. नितीश कुमार यांची तब्येत व त्यांची कमी होत असलेली राजकीय शक्ती वापरून बिहारमध्ये निवडणुका जिंकण्याचा भाजपाचा प्रयत्न असू शकतो. तिथे नितीश कुमारांच्या पक्षाला कमी आमदार मिळतील व आपल्या हातात तिथलेही मुख्यमंत्रिपद यावे, अशी रणनीती आखली जाऊ शकते. पश्चिम बंगालमध्ये दिल्लीचे सुरुवातीचे राजकारण सुरू करण्यात आले आहे. ममता बॅनर्जी यांना बदनाम करण्याचे, त्यांचे राज्य कसे चालले आहे, तिथे कशाप्रकारे हिंसा होत आहे, लोकांवर अन्याय होत आहे हे दाखवण्याचा प्रयत्न होत आहे. भाजपा कधी कधी हे विसरते की, जितक्या बातम्या पश्चिम बंगालच्या हिंसाचाराच्या येत नाहीत, तितक्या तर महाराष्ट्रातील एका बीड जिल्ह्यातून येत आहेत. तिथे आता कोणालाही कायद्याची भीतीच राहिली नाही की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे. सरकार दोषींवर कठोर कारवाई होईल एवढी एकच टेप लावत आहे. दक्षिणेत सध्या भाजपाची राज्ये नाहीत. त्या ठिकाणचे भाजपाचे राज्यपाल आपले काम करत आहेत. अर्थात स्टॅलिन यांच्यासारखे जनसामान्यांमधील नेते त्यांना भीक घालत नाहीत. त्यांच्या खोट्या प्रचाराला थेट भिडतात असे चित्र आहे. तेलंगणाला बदनाम करण्याचे प्रयत्न सुरू असतानाच आंध्रात भाजपाला केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी मदत करणाऱ्या पक्षाला अधिकाधिक झुकते माप देण्याचा प्रयत्न केंद्राकडून होत आहे. परिस्थिती इतकी प्रतिकूल असताना, विविध संस्थांच्या माध्यमातून थेट दबाव असतानाही लोकशाहीसाठी स्वतःच्या व्यक्तिगत जीवनातही साहस करणाऱ्या या विरोधी पक्षांचे खरोखर कौतुक वाटते. त्यांचेही प्रयत्न यशस्वी होतील. जनतेच्या हातात जर निवड करण्याचा पूर्ण अधिकार आला तर त्यांचेही चांगले दिवस येऊ शकतील असे वाटते. अर्थात भाजपा हा काही कच्च्या गुरूचा चेला नाही. अशा लोकांना प्रयत्नपूर्वक कसे दूर करायचे व सत्ता मिळवायचीच याची रणनीतीही आखली गेली असणारच.

लोकशाही प्रणालीत कायद्याचे राज्य असते, असे आपण शालेय वयात शिकतो. पण बीडसारख्या जिल्ह्यात वास्तवाशी हे वाक्य थट्टा करतेय असं वाटू लागते. कायदा आणि सुव्यवस्था हा केवळ एक शासकीय विभाग नसतो. तो त्या समाजाची शुचिता, त्या समाजाच्या रक्षणाची हमी आणि त्या समाजात असणाऱ्या कमकुवताच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास असतो. बीड जिल्हा, नाव जरी घेतलं तरी 'बिंदास्त' माणसांची, मेहनती शेतकऱ्यांची आणि पोटासाठी झगडणाऱ्या सामान्य जनतेची आठवण होते. पण आज याच बीडचा चेहरा रक्ताने माखलेला दिसतोय. कायदा-सुव्यवस्थेच्या नावाने ढोल बडवणाऱ्या राज्य सरकारच्या निष्क्रियतेचा आणि गृहखात्याच्या दुर्लक्षाचा हा परिणाम आहे.

# बीडचा बिहार आणि सरकारचा बधीरपणा!









जीवनगाणे
सीमाताई मराठे
९०२८५५७७१८

अंबेजोगाई सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या ज्ञानेश्वरी अंजान यांना पाइप, लाठ्या आणि काठ्या घेऊन आठ-दहा जणांनी बेदम मारहाण केली. ती फक्त आवाज कमी करा एवढं सांगितल्यामुळे. म्हणजे आता बीडमध्ये आवाज वाढतोय. आणि न्याय मागणाऱ्याचं डोकं फोडलं जातंय. हा केवळ एका महिला वकिलावरचा हल्ला नव्हे. हा कायद्यावरचा, स्त्रीसुरक्षेवरचा आणि नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरचाही हल्ला आहे. गल्लीत टोळ्या फिरतात, शेतात दहशत माजवली जाते आणि कायदा हातात घेणाऱ्यांना अभय देणारं राज्य सरकार मात्र अशा घटनांना 'विसंगती' म्हणून फाइलखाली ढकलतं. हल्लेखोरांनी जेसीबी पाइप वापरून केलेली मारहाण म्हणजे 'आघात' नव्हे, ती एक खुलेआम दिलेली धमकी आहे - कायदा इथे आमचा आहे!

या घटनेने बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचं भयावह वास्तव समोर आणलं आहे. संतोष देशमुख यांचं थंड डोक्यानं करण्यात आलेलं हत्याकांड अजून विसरलंही नाही. तोपर्यंत दर दिवशी नवे गुन्हे, नवे आरोप, नवी टोळकं आणि नव्या माणसांची राख होताना दिसतेय. एकेकाळी सुसंस्कृततेचं प्रतीक असलेलं बीड आज गुन्हेगारीसाठी ओळखलं जाऊ लागलंय. 'बीडचा बिहार झाला काय?' हा सवाल आता फक्त शंका नसून, वास्तव वाटायला लागलं आहे. फरक एवढाच की, बिहार आता सुधारतोय आणि बीड अधोगतीला लागलाय.

मुळात गेल्या दहा वर्षांत बीडमधील गुन्हेगारीचं चित्र पाहिलं तर पोलीस ठाण्यांमध्ये दरवर्षी सरासरी २३०० पेक्षा अधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत. त्यात खून, बलात्कार, घरफोड्या, जाळपोळ, शस्त्रबळावर वसुली, महिला अत्याचार, जमीन बळकावणे आणि टोळीयुद्धाचं प्रमाण धक्कादायक पातळीवर पोहोचलेलं आहे. २०१५ मध्ये २१९८ गुन्ह्यांपासून सुरू झालेली आकडेवारी २०२४ मध्ये ३१४२ पर्यंत गेली. गुन्ह्यांचं हे वाढतं प्रमाण म्हणजे बीडमध्ये पोलिस आणि गुन्हेगारांमध्ये असलेली कळत-नकळत युती उघड करते. फक्त आकडे मांडले तर ही 'सांख्यिकी'; पण यामागे असते शेकडो कुटुंबांची राख झालेली स्वप्नं, हजारो बायका-मुलांचं उद्ध्वस्त झालेलं आयुष्य.

गृहखात्याचं यावर उत्तर काय? 'पोलीस बंदोबस्त वाढवू', 'गुन्हेगारांना सोडणार नाही', 'चौकशी सुरू आहे' - या तीन वाक्यांचा गजर. पण ज्या भागात पोलिसांच्या उपस्थितीत टोळ्या खुलेआम हल्ले करतात तिथे या शब्दांना किंमत तरी काय? बीडमध्ये गुन्हेगारीला खतपाणी घालणाऱ्या स्थानिक राजकीय संलग्नतेचंही सत्य लोकांना माहीत आहे. गुन्हेगारांना संरक्षण, राजकीय आशीर्वाद आणि न्यायसंस्थेच्या प्रक्रियेत होत असलेला वेळ या त्रिसूत्रीने बीडमधील गुन्हेगारी अधिकच भयंकर झाली आहे.

ज्ञानेश्वरी अंजान यांच्यावर हल्ला करणारे आठ-दहा जण एका महिलेला जमावात घेरून मारतात. म्हणजे काय? हे केवळ एका घटनेचं वर्णन नाही, हे एका जिल्ह्याच्या लाजिरवाण्या अवस्थेचं निदर्शक आहे. जेव्हा न्यायालयात वकिली करणाऱ्या महिला सुरक्षित नाहीत. तेव्हा सामान्य महिलांचं काय? आज बीडमध्ये जर एखाद्या महिलेने आवाज वाढतोय म्हणून तक्रार केली तर तिच्यावर हल्ला होतो. उद्या कदाचित तिचं शील भंग केलं जाईल आणि सरकार म्हणेल गंभीर दखल घेतली आहे. एवढीही .../-२



# कुणी सूनबाई देता का?

ललित

सविता एरंडे



संध्याकाळचे पाच वाजले होते. मी उकाड्याने हैराण झाले म्हणून टेरेसमध्ये खुर्ची टाकून थोडंसं तरी थंड वाटेल म्हणून बसले होते. एखादी थंड वाऱ्याची झुळूक मधूनच येऊन माझ्या कानाशी कानगोष्टी करत होती. तेवढ्यातच दारावरची बेल वाजली. मी दार उघडलं. तर दारात माझी खूप जुनी मैत्रीण जानकी उभी. जानकी तू? अगं ये ना आत. किती दिवसांनी भेटते आहेस? जानकी आत येताच आम्ही दोघी जिवाभावाच्या सख्यांनी एकमेकींना घट्ट मिठी मारली. खूप वेळ त्या अबोल स्पर्शांनी आम्ही एकमेकींशी बोलत होतो. ये. बैस. मी पाणी आणते तुझ्यासाठी.मी पाण्याचा ग्लास तिच्या हातात देत म्हटलं, कशी आहेस जानू? तुझा लाडका राजकुमार कबीर काय म्हणतो आहे? सुनबाई कधी आणते आहेस ?

अगं बाई, दररोज कानी कपाळी ओरडून आत्ता कुठे आमचे लाडोबा बोहोल्यावर चढायला तयार झाले.अगं वयाची पस्तीशी ओलांडली तरी महाशय लग्नाचा विषयच काढून देत नाही.आता मात्र वधू संशोधन मोहीम जोरात चालू केली आहे मी.पण अजून मोहीम फत्ते होण्याची चिन्हं दिसत नाहीत. तू वधू-वर संशोधन मंडळात नाव नोंदवलं आहेस का? अगं, पाच, सहा मंडळात नाव नोंदवलं आहे. मनासारखं स्थळ मिळत नाही.... मी तर आता अगदी हैराण झाले बाई! त्याचं लग्न जमेपर्यंत मोठी काळजीच आहे गं! तुझ्या माहितीतलं एखादं स्थळ असेल तर सुचव मला.

जानकीनं तिच्या मुलाचं सविस्तर माहितीपत्रक मला दिलं. थोडा वेळ मित्र-मैत्रिणींच्या आठवणींना उजाळा देत बसलो. वेळ कसा गेला समजलेच नाही. खूपच उशीर झाला गं ! असं म्हणत तिनं माझा निरोप घेतला. आज सकाळपासून पेपर वाचायला वेळ मिळाला नव्हता पेपर वाचायला हातात घेतला तर पहिल्याच पानावर बातमी..... स्वयंवर मंगल कार्यालयात काल वधू- वर मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात पालकांचीच उपस्थिती अधिक होती. लग्नाळू मुलगे अगदी मोजकेच म्हणजे दहा, बारा व लग्नाळू मुली फक्त तीन-चारच उपस्थित होत्या. बातमी वाचून जानकीचं बोलणं आठवलं आणि लग्न जमणं ही गोष्ट खरोखरच सध्या चिंताजनक आहे असं वाटलं. लग्नाच्या बाबतीत या तरुण तरुणींच्या मनात एवढी उदासीनता ? काय आहे या नव्या तरुण-तरुणींच्या मनात? करिअर?, पैसा?, ऐषआराम?, जबाबदारी नको?, स्वातंत्र्य? पूर्वग्रह दूषित दृष्टी? इ. खरंच नेमकं कारण काय आहे?

घरोघरी त्याच परी याप्रमाणे वय वाढलेल्या मुला मुलींचे पालक मात्र या मुलांच्या विवाह चिंतेनं त्रस्त झाले आहेत. काहींना 'जावई ' मिळत नाही तर काहींना ' सुनबाई 'मिळत नाही. अवंती...माझी आतेबहीण.. त्र्यंबकेश्वरला राहते. ती तर सांगत होती, इथं तर पौरोहित्य करणाऱ्या प्रत्येक कुटुंबात लग्नाचं वय उलटून गेलेले तरुण दिसतात.एक वेळ मुलींची संख्या तशी कमी आहे. म्हणजे,या पालकांना जावई मिळतात पण, या पौरोहित्य करणाऱ्या घरातील मुलांना वधू मिळत नाही. सध्या मुलींना व मुलींच्या पालकांना देखील पौरोहित्य करणारे 'नवरे' शेती काम करणारा 'नवरा' असे जोडीदार नको असतात.पालक मुलींच्या भविष्याचा विचार करतात.... माझ्या मुलीला आयुष्यभर कष्ट करायला नकोत...या पौरोहित्य करणाऱ्या मुलांचे पिढी जात व्यवसाय तेच असल्याने मुलं देखील वडिलांचा व्यवसाय पुढे करताना दिसतात. शेतकऱ्यांच्या कुटुंबात देखील काही अंशी तीच परिस्थिती आहे.या वय वाढलेल्या मुलांना जोडीदार मिळाला नाही तर या कुटुंबात 'वंशसातत्य' कसं राहील? ती पुढं सांगत होती, अगं माझीच दोन्ही मुलं पौरोहित्य करतात.त्या दोघांचंही वय तीस, पस्तीस च्या पुढे आहे. मी देखील या मुलांच्या लग्नाच्या काळजीतच आहे.

सध्या प्रत्येक कुटुंबात एक किंवा दोन मुलं! पालक मुला, मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशी पाठवतात. ही मुलं तेथील पदवी, स्कॉलरशिप प्राप्त करतात. त्यांना मोठमोठ्या कंपन्यांमध्ये मोठ्या पदांवर नोकऱ्या मिळतात.

ईशा संशोधनासाठी, स्कॉलरशिप मिळविण्यासाठी परदेशी रवाना झाली. पदवी प्राप्त केल्यानंतर संशोधनात गुंतत गेली... जबाबदारी वाढत गेली ... परिणामी लग्नाचा विचार मागे पडत गेला... विचार करायला देखील वेळ मिळाला नाही.... वय वाढत चाललं... लग्न करावं अशी मानसिक भावना करिअर पुढे मागे पडत गेली...तशी गरज नाही असं पुढं पुढं वाटायला लागलं...मग एखादा मित्र भेटतो... त्याच्याशी छान गप्पा होतात.. भावनांचं शेअरिंग होतं...विकएन्डला फिरणं एखादी गळाभेट... असं होत राहतं. त्यामुळं लग्न हवंच अशी अंतरिक ओढ लागत नाही. म्हणजे लग्नाशिवाय काही अडत नाही.पण त्यांच्या पालकांना मात्र अशा वय वाढीव मुला, मुलींच्या लग्नाची काळजी जन्मभर लागून राहते.

गिरीजाला आपल्या लहानपणी आईची कामासाठी होणारी फरफट.... कधी कधी बाबा, आजी, यांचं घालून पाडून बोलणं,... अपमान.. मानसिक कुचंबणा....या सर्व पूर्वानुभवांची साठवण तिच्या मनात असल्यानं तिच्या मनाची लग्न नकोच ही धारणा होते. पूर्वीच्या स्त्रियांमध्ये खूप क्षमता असून देखील त्यांना अज्ञान, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यामुळं त्यांच्या बौद्धिक प्रगतीला संधी मिळाली नाही....घर, संसार, मुलं, बाळं या वर्तुळातच त्या फिरत राहिल्या....या घराघरांतील जुन्या पिढीतील स्त्रीयांच्या कहाण्या.....ऐकत,पाहात अनेक गिरीजा सारख्या मुली लग्न, मुलं, बाळं, संसार या गोष्टींच्या विरोधात असलेल्या दिसतात. त्यांना 'एकला चलो रे' हा मार्ग छान आहे असं वाटायला लागतं. बऱ्याच वेळा आपण ही कौटुंबिक जबाबदारी व्यवस्थित सांभाळू की नाही? पूर्वीच्या स्त्रियांप्रमाणे आपण 'अष्टावधानी' या पात्रतेस योग्य ठरू की नाही? अशीही साशंकता मनात असते.

सोनल, एकुलती एक मुलगी.लाडाकोडात वाढलेली. म्हणेल ती वस्तू हातात.... साहजिकच लग्नानंतरची सांसारिक जबाबदारी नकोच ही तिची मनोभूमिका ... पर्यायाने विवाह बंधनात अडकायला नकोच असं वाटायला लागतं. अशा अनेक सोनल सध्या समाजात आपल्याला दिसून येतात. अशा प्रत्येकीच्या वैयक्तिक विविध अनुभवानुसार सध्याच्या कार्पोरेट कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या उच्च विद्याविभूषित तरुणी लग्नाचा विचार मागे टाकतात. अगदीच गरज असेल तर, कॉन्ट्रॅक्ट मॅरेज लिव्ह इन रिलेशनशिप यांसारखे पर्याय निवडताना दिसतात.

विवाह वय वर्षे ओलांडलेले अनेक लग्नाळू तरुण देखील परदेश गमन केल्यानंतर तेथील ऐषारामी वातावरण, अति स्वातंत्र्य, फक्त पैसा मिळवणं व चैन, मौजमजेत तो हवा तसा खर्च करणे अशाच मनोभूमिकेत दिसतात. पैसा टाकला की हवं ते सुख सध्या दोन मिनिटांत हजर होतंय.मग कशाला हवंय लग्न? अशा या परिस्थितीत पालकांची मानसिक कुचंबणा होते आहे. वृद्धापकाळात नातवंडांच्या सुखाला ही मंडळी वंचित होताना दिसतात. अशा अनेक विध कारणांमुळे पालकांना जावई मिळणे, सूनबाई मिळणे अतिशय अवघड होऊन बसले आहे. अगदी विनवण्या करूनही लग्नाळू मुलं, मुली बोहोल्यावर चढायला तयार होतात. परंतु वाढलेलं वय, भलभलत्या अपेक्षा यामुळं यांचे दोनाचे चार हात व्हायला विलंब लागतोय.

अशा अनेकविध कारणांमुळे लग्न संस्था, कुटुंब व्यवस्था, वंश सातत्य या कल्पना सत्यात कशा उतरणार? खरोखर हे सामाजिक वास्तव आहे. नटसम्राट नाटकातील नटसम्राट, अप्पासाहेब बेलगावकर कुणी घर देता का घर? या स्वगताप्रमाणे आता प्रत्येक पालकांवर कुणी सूनबाई देता का सूनबाई? किंवा कुणी जावई देता का जावई ? असं म्हणायची वेळ आली आहे. खरं ना? तुम्हाला काय वाटतं?



# प्रदक्षिणा

मनातलं

विशाखा बल्लाळ



अहो, अशी गंमत यायची ना आम्ही सख्ख्या आणि पक्क्या मैत्रिणी एकत्र जमलो की... तशी एकत्र सगळे जण जमले की मज्जाच येते म्हणा... एक मैत्रीण गारखेडा तर एक पार कांचनवाडी... आम्ही क्रांती चौक रहिवासी.... डीगजॅमच्या मोठ्या दुकानाच्या मागच्या साईडलाआमचं घर... आमच्या घरी येण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला राऊंड मारून यावं लागे. रश्मीच्या, माझ्या एका पक्क्या मैत्रिणीच्या, मुलीने अ‍ॅक्टिवा घेतली. गावामध्ये सर्व जणी असल्यामुळे अगदी कुणाच्याही घरांत खट्ट जरी झालं तरी पटकन दुसऱ्या घरी समजत असे... आणि ही तर वाहन खरेदी म्हणजे मोठीच घटना की.. पेढे वाटणं झालं...पेढे म्हणजे आप्पा हलवाई स्पेशलच बरं कां.... कोणत्याही घरी कोणताही कार्यक्रम असो... पेढे आप्पा हलवायाचेच... हा जणू अलिखित नियम. त्या नियमाप्रमाणे सर्वांचे वर्तन..छोट्या दोन चाकी वाहनाची. पूजा झाली आणि दुसऱ्या दिवशी ए, विशू मावशी, येतीये मी तुझ्या घरी गाडी दाखवायला... आर्याचा सकाळीच फोन...बाईसाहेब आमच्या राहत्या घरी यायला निघाल्या... ये बेटा.. पण सावकाश ये.. नवीन गाडी आहे... हो मावशी.. आहे मला सवय... चालवली आहे मी ह्या आधी ॲक्टिवा मैत्रिणीची... ॲक्टिवा थोडी जड गाडी....त्यामुळे मला थोडीशी काळजी वाटत होती...पण आता मी बिनघोर.. अर्धा तास, पाऊण तास... म्हणता म्हणता एक तास व्हायला आला... आता मात्र मी काळजीत. जावं कां तिला पाहायला... असा विचार करत असतांनाच... खाली पार्किंगमध्ये नवीन ॲक्टिवाचा कर्ररर असा आवाज... नक्की ही आर्याच.... मावशी, आधी पाणी दे... घामाघूम झालेली ती. १०/१५ मिनिटांनी शांत झाल्यावर... तिचे कथा कथन तिच्याच शब्दात.. अग मावशी, मी क्रांती चौकापर्यंत व्यवस्थित आले. तिथून आता तुझ्या घराकडे म्हणजे त्या मिठाईवाल्याच्या दुकानाकडून टर्न करणार इतक्यांत माझ्या समोरची ट्रक वळलीच नाही बघ... ती कन्टीनु राऊंड मारून अदालत रोडकडे जाणार होती. मग मला कंपलसरी तिच्या मागून जावं लागलं.. बरं आता ती ट्रक गेली... तिच्या रस्त्याला.. आता पुन्हा टर्न घेऊ तर समोर अशोका लेलँड ... तिला देखील वळायचं नव्हतंच आणि तिला पण अदालत रोड म्हणजे पूर्ण राऊंड मारायचा होता... बरं... आता तिसरी फेरी तरी सक्सेस फुलं व्हावी ना... पण नाही.. बरोब्बर टर्नच्या वेळेस समोर श्रीनाथ ट्रेवेल्स.. तिला ऑफकोर्स... श्री नाथ ऑफिस जे की पुन्हा अदालत रोड... पुन्हा माझी प्रदक्षिणा.. छत्रपती शिवाजी महाराजांना चौथ्या वेळी मात्र टर्नवर होती एक बैलगाडी..... पण आता माझ्यातले पेशंन्स खत्तम...त्या बैलांच्या साईडने... शब्दशः.... त्यांना कल्टी मारून माझी ऍक्टिवा दमटली आणि तो अवघड टर्न घेतलाच घेतला मी... आणि शेवटी गड जिंकून.. तुझ्या घरी सुखरूप... अग पण एवढ्या मोठया गाड्या एकदम थोडीच तुझ्या गाडीच्या समोर आल्या... की जाऊ नको तू मावशीकडे... आणि घेऊ नको तो टर्न... त्या तुझ्या समोर बऱ्याच आधीपासून असणार... कारण मला हे समजेनाच... लॉजिक...

अग हो मावशी... तेच तर सांगते ना मी....त्या एकदम नव्हत्याच माझ्या पुढे... मीच मला टर्न घेता येत नव्हता म्हणून आधीच्या दोन तिन राऊंड मध्ये प्रॅक्टिस म्हणून छ. शि. म. ह्यांना प्रदक्षिणा घालत होते.... त्यामुळे सगळ्या छोट्या गाड्या जाऊन ह्याच नेमक्या माझ्या समोर आल्या... मग माझा नाइलाज... अजून एक प्रदक्षिणा...हळूच आर्या बोलली. म्हणजे... तू एकूण किती राऊंड मारले. आता माझे डोके... राऊंड अँड राऊंड... हसत..... थोडीशी लाजत.. बाईसाहेब वदल्या...फक्त १२ मावशी... मी कपाळाला हात मारला... अशा रीतीने कमीत कमी ३ ते ४ ऑफिशियल आणि ८ ते ९ अन ऑफिशियल अश्या परम पूज्य छत्रपती शिवाजी महाराजांना प्रदक्षिणा मारून आर्या बाई आमच्या घरी.. बरं, चल आता.....आधी नाश्ता पाणी करून घेऊ.. आणि मग छान पैकी जेऊयात . थांबणार आहेस नां निवांत... ह ह.... ह्या प्रदक्षिणा प्रकाराबाबत अगदीच अनभिज्ञ असलेल्या पोळ्यावाल्या मावशी आर्याला पाहून.....स्वयंपाक घरातून म्हणाल्या... बरं झालं ताई तू आलीस. ताई, मला पैठणगेटला सोडते कां... आज पाय फार दुखू राहिले.. तू बरी आली माझ्या वेळेवर... आता पैठणगेटला त्या मावशिंना सोडताना टिळक पथ येथे लोकमान्य टिळकांना किती प्रदक्षिणा मारणार.. आमची नवी ॲक्टिवा ड्राइवर....११ की २१.. ते एक लोकमान्य टिळकच जाणोत.... प्रदक्षिणाची संख्या उद्या मला कळाली... की... देतेच तुम्हाला अपडेट्स... पहा...पण... मी आता उद्यापर्यंत याच महान चिंतेत..हो...

पान १ वरून

## बीडचा बिहार आणि सरकारचा बधीरपणा!

संवेदनशून्यता? एवढं हे राजकीय कमकुवतपणं? 'गुन्हेगारांना मोकाट सोडणार नाही' हे वाक्य म्हणणाऱ्यांनी सर्वप्रथम स्वतःच्या कारभाराकडे नजर टाकावी. बीडमधील पोलीस प्रशासन वर्षानुवर्षे केवळ गुन्हे दाखल करण्यात आणि त्यावर 'चार्जशीट' तयार करण्यातच अडकलेले आहेत. तपासकामात असलेली मंदगती आणि राजकीय दबावामुळे होणारी गुन्हेगारांची सुटका ही आजची खरी समस्या आहे. पोलीस ठाण्याच्या उंबरठ्यावर बसून 'मोकाट' फिरणाऱ्या गुंडांवर सरकार डोळे झाकते आहे. आणि सामान्य माणूस या गुन्हेगारीच्या विळख्यात भरडून जातोय. या घटनेनंतर जर सरकार जागं होणार नसेल तर कुठल्या घटनेनं होणार? शासकीय महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींवर हल्ले होत असताना जर गृहखाते गप्प असेल तर त्यांचं अस्तित्व काय कामाचं? एखाद्या दिवसापुरता 'कडक कारवाईचे आदेश' देऊन मुद्दा विसरला जाणार असेल तर लोकांनी आता रस्त्यावर उतरावं लागेल. कारण जेव्हा पोलीस आणि गुंड यांच्यात फरक उरत नाही तेव्हा लोकशाहीचा आत्मा कापून टाकला जातो.

राज्य सरकार आणि गृहखात्यानं जर खरंच या परिस्थितीवर तोडगा काढायचा असेल तर 'पोस्टिंग'च्या फेऱ्यांपेक्षा 'परफॉर्मन्स'वर भर द्यायला हवा. बीडसारख्या जिल्ह्यांमध्ये पोलिसांची संख्या, प्रशिक्षण, स्वतंत्र गुन्हेगारी नियंत्रण शाखा, स्थानिक राजकीय हस्तक्षेपाला आवर, आणि न्यायालयीन प्रक्रियेतील सुसूत्रता यावर ठोस उपाययोजना हवी. अन्यथा एक दिवस येईल ज्या दिवशी लोकच न्याय मिळवण्यासाठी कायदा हातात घेतील. आणि मग त्या 'अन्यायाच्या' आगीत सरकार जळून खाक होईल. बीडला लागलेला गुन्हेगारीचा डाग आज नाहीसा झाला तर उद्या तो राज्याच्या प्रतिष्ठेवर आणि लोकशाहीच्या आधारस्तंभावर उमटलेला कायमचा व्रण ठरेल. बीडचा बिहार व्हावा असं कोणालाही वाटणार नाही. पण सरकारचं मौन हेच सिद्ध करतंय की 'वाटत नाही' आणि 'होऊ नये' यातील अंतर आता फारसं उरलेलं नाही. बीडला सुरक्षित ठेवायचं की त्याला 'महाराष्ट्राचा मोस्ट वॉन्टेड जिल्हा' बनवायचं, हे आता केवळ जनतेच्या रागावर आणि सत्ताधाऱ्यांच्या जागृतीवर ठरणार आहे. गुन्हेगारांचा बंदोबस्त करा. नाहीतर जनतेचा संतापच तुमचा बंदोबस्त करेल. हे सरकारने लक्षात घ्यावं.

## नॅशनल हेरॉल्ड प्रकरण

सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात बोलायचे झाल्यास ज्या काँग्रेस पक्षाला १९७२ साली विधानसभेत २२२ जागा होत्या, त्या काँग्रेसला २०२४ मध्ये फक्त १६ जागा मिळाल्या आहेत. ही दुर्दशा लक्षात घेता त्यांना पुन्हा लोकांसमोर जायला एखादा ठोस मुद्दा हवा आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्ष या प्रकरणाचा उपयोग करून घेण्याच्या प्रयत्नात आहे. आज आरोपपत्र दाखल होताच त्यांनी ही राजकीय सूडबुद्धीची कारवाई असल्याचा कांगावा करत देशभर निदर्शने केली. मात्र आज त्यांना हवा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. मात्र उद्या मिळणारच नाही असेही म्हणता येत नाही.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा दारुण पराभव झाला होता. इतकेच काय तर पंतप्रधान पदावर असलेल्या इंदिरा गांधी आणि त्यांचे सुपुत्र संजय गांधी यांनाही पराभवाचे तोंड पाहावे लागले होते. त्यावेळी काँग्रेस पक्षाची अवस्था अक्षरशः दयनीय झाली होती. मात्र सप्टेंबर १९७७ मध्ये तत्कालीन गृहमंत्री चौधरी चरण सिंह यांनी इंदिरा गांधींना एक दिवसाची अटक केली आणि संपूर्ण देशभरात काँग्रेसने रान पेटवले. त्याचा परिणाम काँग्रेसला पुन्हा नवी उभारी मिळण्यात झाला. त्यानंतर लगेचच काँग्रेस पक्षात दोन गट तयार झाले. त्याचे पुढे दोन पक्षही तयार झाले त्यातील इंदिरा काँग्रेसला जोरदार जनसमर्थन मिळाले. लगेचच वर्षभराने १९७८ मध्ये पुन्हा एकदा इंदिराजींना अटक करण्यात आली होती. त्याचाही व्हायचा तो परिणाम झालाच. त्यातच १९७९ मध्ये तत्कालीन सत्ताधारी जनता पक्षाची वाताहात झाली. परिणामी १९८० च्या मध्यावधी निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला दणदणीत यश मिळाले, आणि पुन्हा एकदा काँग्रेस सत्तेत आली होती. अर्थात त्या वेळच्या तुलनेत आजची परिस्थिती बरीच वेगळी आहे. त्यावेळी काँग्रेसच्या विरोधात असलेला जनता पक्ष हा सुरुवातीपासूनच काहीसा विस्कळीत होता. अखेरपर्यंत हा पक्ष एकसंघ होऊ शकला नव्हता. शेवटी त्याची शकलेच झाली होती. आज भारतीय जनता पक्षाची तशी अवस्था नाही. आज हा पक्ष खंबीर पायावर उभा आहे. त्यांच्या मागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे छुपे पाठबळही भक्कम आहे. लोकसभेत पक्षाचे बहुमत तर आहेच पण देशातील जवळजवळ अर्ध्या राज्यांमध्ये भाजपचीच सत्ता आहे. त्यामुळे आज काँग्रेसच्या आव्हानांना हा पक्ष सक्षमतेने तोंड देऊ शकतो. १९७७ आणि ७८ मध्ये तत्कालीन सरकारने अत्यंत घिसाडघाईने इंदिरा गांधींविरोधात कारवाई केली होती. त्यामुळे ती न्यायालयात टिकली नव्हती. यावेळी मात्र मोदी सरकार पहिल्या टप्प्यापासून प्रकरण न्यायालयात येऊनच पुढील कारवाई करत आहे. त्यामुळे आज या सर्व आरोपींना न्यायालयासमोर उभे करून लगेच जामीनावर सोडले गेले. आता भविष्यातही आरोपपत्र दाखल झाल्यावर त्यांना जामीन मिळेलच. त्यानंतर खटला चालेल. साक्षीपुरावे युक्तिवाद सर्व काही होईल, आणि मगच निकाल लागेल. त्यानंतरच आरोपींना शिक्षा ठोठावली जाईल. त्यामुळे या प्रकरणात नेमके वास्तव काय हे न्यायालयाच्या मार्फत जनसामान्यांसमोर आलेले असेल, आणि खरे गुन्हेगार कोण आहेत हे चित्रही स्पष्ट झालेले असेल. तरीही सर्वसामान्यांच्या मनात कुठेतरी भीती आहेच. उद्या या प्रकरणाचे भांडवल करून राजकीय सूडबुद्धीने ही कारवाई झाली आहे असा कांगावा करत पुन्हा एकदा काँग्रेस पक्ष नव्याने उभारणी करण्याचा प्रयत्न तर करणार नाही ना, अशी शंका देशातील बहुसंख्या भाजप समर्थकांच्या मनात डोकावते आहे. ती शंका, भीती चुकीचीही मानता येणार नाही.

त्यामुळेच आता भारतीय जनता पक्ष आणि त्यांची मातृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांची जबाबदारी वाढणार आहे. नॅशनल हेरॉल्ड चे हे प्रकरण वर काढण्यामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला काहीही देणे घेणे नाही, हे उघड आहे. तरीही प्रत्येक टप्प्यावर भाजपसोबत संघाला बदनाम करण्याची काँग्रेसची रणनीती राहिलेली आहे. मला आठवते १९७७ मध्ये इंदिराजींना जेव्हा अटक झाली तेव्हा नागपूरच्या चिटणीस पार्क स्टेडियमवर विरोधकांची निषेध सभा झाली होती. या सभेत संघाच्या हाफ पॅन्ट जाळण्यात आल्या होत्या. नंतरच्या काही दिवसात प्रत्येक निषेध सभेत या हाफ पॅन्ट जाळल्या जात होत्या. कारण नसताना संघाला ओढले जात होते. तसेच आजही काँग्रेस पक्ष भारतीय जनता पक्षासोबत संघालाही ओढणार यात कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही. त्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष या दोघांनीही या मुद्द्यावर सावध राहण्याची गरज आहे. आज हे कथित पुरोगामी विचारवंत नॅशनल हेरॉल्डच्या मुद्द्यावर बुद्धीभ्रम करणार हे निश्चित आहे त्यावेळी संघ आणि भाजप यांनी त्यांना उत्तर देणारी सक्षम यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. किंबहुना त्यांनी असा प्रयत्न सुरू करण्यापूर्वीच एक पाऊल पुढे जाऊन आजच त्यांनी हे प्रकरण नेमके काय आहे आणि यात गांधी परिवाराने कसा फ्रॉड केलेला आहे हे दैनंदिन स्तरावर जनतेसमोर आणणे आवश्यक आहे. त्यासाठी भाजप आणि संघाने समांतर बुद्धिवंत, लेखक, पत्रकार, वक्ते, विचारवंत यांची सक्षम अशी चमू देशभरात सक्रिय करणे, आणि त्यांना पुरेशा सोयी सवलती देऊन पुढे नेणे हे गरजेचे आहे. तसे केले तरच काँग्रेसने केलेले हे प्रकरण आणि त्यांची इतरही कृष्ण कृत्ये जनसामान्यांसमोर येतील आणि मग या प्रकरणात आरोपींना कितीही मोठी शिक्षा झाली तरी त्याची विपरीत प्रतिक्रिया येणार नाही आणि राजकीय सूडबुद्धीने हे प्रकरण हाताळल्याचा कांगावा व्यर्थ ठरेल हे निश्चित.

# साप्ताहिक राशिभविष्य

पुरुषोत्तम नाईक

दि. २० ते २६ एप्रिल २०२५

### मेष : यशप्राप्ती होईल

या सप्ताहात रवी, गुरू अनुकूल आहेत. मंगळ, बुध, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. शनिची साडेसाती सुरू आहे. नोकरदारांना हा सप्ताह त्रासदायक ठरेल. व्यापारी, व्यावसायिकांचे नुकसान होईल. खर्च वाढतील. शासकीय कोर्ट कचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल.

### वृषभ : आर्थिक सुधारणा

या सप्ताहात बुध, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. मानसिक अस्वस्थता राहील. नोकरदांच्या अडचणी दूर होतील. व्यापारी, व्यावसायिकांची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

### मिथुन : पगारवाढ होईल

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदारांना पगारवाढ होईल. व्यापारी, व्यावसायिकांचा नफा वाढेल. शासकीय, कोर्ट कचेररीच्या कामात अडचणी येतील. बांधकाम व्यावसायिकांना आर्थिक अडचणी सतावतील.

### कर्क : भाग्योदय होईल

या सप्ताहात गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू, बुध अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदारांचा त्रास वाढेल. व्यापारी, व्यावसायिकांचा भाग्योदय होईल. शेअरमध्ये लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनावर नियंत्रण ठेवा. वाद टाळा.

### सिंह : धनचिंता सतावतील

या सप्ताहात रवी अनुकूल आहे. गुरू संमिश्र आहे. मंगळ, बुध, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे प्रतिकुल आहेत. या सप्ताहात धनचिंता सतावतील. खर्च वाढतील. प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. नोकरदारांची कामासाठी धावपळ होईल. व्यापारी, व्यावसायिकांची समिकरणे बिघडतील. शासकीय कोर्ट कचेरीच्या कामांना विलंब होईल.

### कन्या : जोरदार आगेकूच

या सप्ताहात गुरू अनुकूल आहे. बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. मंगळ, रवी, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिन राहील. खर्च वाढतील. नोकरदारांची प्रगती होईल. व्यापारी, व्यावसायिकांची जोरदार आगेकूच होईल. शासकीय, कोर्ट कचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल. आरोग्याची काळजी

### तूळ : दिलासा मिळेल

या सप्ताहात रवी, मंगळ, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकूल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. या सप्ताहात बुध अनुकूल आहे. नोकरदारांना अडथळ्यांची शर्यत पार करावी लागेल. व्यापारी, व्यावसायिकांना दिलासादायक स्थिती राहील. शारीरिक पीडा देईल.

### वृश्चिक : विवाह जमतील

या सप्ताहात मंगळ, बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. नोकरदारांना अडचणींना तोंड द्यावे लागेल. व्यापारी, व्यावसायिकांची व्यवसायवृध्दी होईल. प्रेमीजनांना अनुकूलता प्राप्त होईल. विवाह जमतील. अनुरूप वधू वर मिळतील.

### धनु : धनचिंतांना उतार

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. मंगळ, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. गुरू संमिश्र आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात धनचिंतांना उतार पडेल. खर्च वाढेल. नोकरदार व व्यापारी, व्यावसायिकांच्या अडचणी वाढतील. प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. बांधकाम व्यावसायिकांनी अकारण धाडस टाळावे.

### मकर : समीकरणे जुळतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. पैशांची आवक वाढेल. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदारांचे कर्तृत्व उजाळून निघेल. व्यापारी, व्यावसायिकांची समिकरणे जुळतील. कौटुंबिक वादविवाद सामंजस्याने मिटवा.

### कुंभ : सतर्क रहा

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. शनिची साडेसाती सुरू आहे. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. या सप्ताहात नोकरदारांविरुध्द विरोधकांच्या कारवायांना उधाण येईल. तेव्हा सतर्क राहणे आवश्यक ठरेल. व्यापारी, व्यावसायिकांचे जुणे येणे वसूल होईल.

### मीन : वाद टाळा

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती गुरू संमिश्र आहे. मंगळ, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. मानसिक अस्वस्थता राहील. कौटुंबिक वादविवाद टाळा. नोकरदारांची धावपळ होईल. व्यापारी, व्यावसायिकांच्या नवीन योजनांचे आराखडे तयार होतील.

# गांवकरी रविवार विशेष

शब्द तुमचे-आमचे



लोकसभेतील पराभवाची परतफेड करत हवेत गेलेल्या महाविकास आघाडीला भाजपने विधानसभेला जमिनीवर जोरदार आपटवले. विधानसभेवेळी शिवसेनेने हिंदुत्वाशी गद्दारी केली. हा अजेंडाच भाजपने प्रचाराच्या मुख्य केंद्री व अखेरपर्यंत लावून धरला. यात त्यांना यशही आल्याचे दिसून येते. सध्या देशभरात ज्या विधेयकावरुन वादंग उठलेय. त्या वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाला शिवसेना ठाकरे गटाने विरोध केला. हाच धागा धरून भाजपने पुन्हा ठाकरे सेनेला कोंडीत पकडले. आम्हाला हिंदुत्व शिकवू नये. भाजप फेक नॅरेटिव्हचा वापर करत असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी नाशिकमधून करून हिंदुत्वाचे खरे पाईक आम्हीच असल्याचे ठणकावून सांगितले. दरम्यान, फेक नॅरेटिव्ह हा शब्द वर्षभरापासून राज्याच्या राजकारणात चर्चेत आलाय. विशेष म्हणजे, नाशिकच त्याचे केंद्रस्थान बनले आहे. यापूर्वी लोकसभा निवडणूक होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नशिकमध्ये कार्यकर्ता मेळाव्यात तेव्हाच्या झालेल्या पराभवाचे खापर फेक नॅरेटिव्हवर फोडले होते. त्यानंतर आता उद्धव ठाकरे यांनीही भाजपवर फेक नॅरेटिव्हवरून आरोप केले आहेत. या सर्व घडामोडींमुळे मात्र फेक नॅरेटिव्ह कुणाचे? असा प्रश्न सर्वांना पडला आहे.

## फेक नॅरेटिव्ह कुणाचे ?



लक्ष्यवेध

|| गोरख काळे
९५४५६१५३५५

लोकसभेला चारशे पारचा नारा देणाऱ्या भाजपला राज्यासह उत्तर महाराष्ट्रात जोरदार धक्का बसला. भाजपसाठी एकप्रकारे हा मानहानिकारक पराभव होता. आठपैकी रावेर व जळगाव या दोनच जागांवर भाजप उमेदवार निवडून गेले. तर नाशिक, दिंडोरी, शिर्डी, नगर, धुळे, नंदुरबार या बालेकिल्ल्यात भाजप व मित्रपक्षाला पराभवाचे तोंड पहावे लागले. या पराभवानंतर भाजपचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशकात भाजप पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेत महायुतीचा पराभव फेक नॅरेटिव्हने केल्याचे आरोप केले होते. भाजप संविधान बदलणार असे सांगून विरोधकांनी जनतेची दिशाभूल केली. यात त्यांना यश आले असले तरी विधानसभेला त्याची परतफेड करू, असा इशाराही त्यांनी त्यावेळी दिला होता. त्यांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना विधानसभेच्या तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर काही महिन्यांतच विधानसभेची निवडणूक झाली. यात महायुतीने एकतर्फी विजय मिळवत मविआचा सुपडा साफ केला. नाशिक शहर आणि जिल्ह्यात ठाकरे गटासह मविआला एकही जागा जिंकता न आल्याने मोठ्या पराभवाची नामुष्की त्यांच्यावर ओढवली. भाजपने सर्वाधिक जागा जिंकत पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपद आपल्याकडे घेतले. भाजपसोबत निवडणुकीत शिवसेना शिंदे गट सोबत असल्याने बाळासाहेबांची हीच खरी शिवसेना आणि हेच खरे वारसदार असल्याचे प्रचारसभा, रॅलीतून सांगितले गेले. आगामी महापालिका व जिल्हा परिषदेची निवडणूक ठाकरे गटाची अस्तित्वाची असणार आहे. विधानसभेत नाशिक शहरासह जिल्ह्यात ठाकरे गटाचे पानिपत झाले असून, मधल्या काळात माजी नगरसेवकांसह पदाधिकारी यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. अजूनही काहीजण कुंपणावर असल्याचे चर्चा आहे. दरम्यान, निवडणुकीच्या तोंडावर पक्षातील गळती परवडणारी नसल्याचे बाब किंबहुना पक्षाच्या लक्षात आली असेल. त्याकरिताच ईशान्य मुंबईनंतर नाशिकमध्ये एकदिवसीय निर्धार शिबिर घेतले. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदींसह पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. संकटाची ही वेळही निघून जाईल. कोणी कुठेही जाऊ नका, हा संदेश या शिबिरातून सेना पदाधिकाऱ्यांना देण्यात आला. नाशिकमध्ये अनेक नेते वय वर्ष सोळा ते सतरापासून पक्षाशी जोडले गेले. यात माजी मंत्री बबन घोलप, उपनेते सुनील बागुल, माजी आ. वसंत गिते, दत्ता गायकवाड, माजी महापौर विनायक पांडे आदींसह इतर जण आहेत. यांनी पक्षाचा संघर्ष असो की यश पाहिले. ही सर्व मंडळी ठाकरेंच्या सेनेसोबत आहेत. परंतु आता पक्षाची आक्रमकता पूर्वीसारखी राहिली नाही. विधानसभा निवडणुकीपूर्वी जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी एमडी ड्रग्ज, शेतकरी आत्महत्या या मुद्यावरून शहरातील वातावरण तापवले होते. मात्र, नंतर त्यांचे सलीम कुत्तासोबतचे व्हिडिओ असो की, मुलावर मकोकाची कारवाई तसेच इतर काही प्रकरणे असो. यामध्ये नाव आल्याने बडगुजर काहीसे शांत झाले. बडगुजरांना गोवण्याचा प्रयत्न केल्याचे आरोप त्यांच्या समर्थकांकडून केला जातो. त्यांनाच का टार्गेट केले गेले, यावरून आजही चर्चा होत असते. बडगुजर यांनी याबाबतची खदखद निर्धार मेळाव्यातून बोलून दाखवली. लोकसभेच्या तिकिटावेळी उमेदवारी कोणाला द्यावी. त्या अर्जावर सर्व नेत्यांच्या स्वाक्षऱ्या असतानाही आपल्यालाच लक्ष्य केले गेले. पक्षातील काही हितशत्रू असल्याची खदखद त्यांनी बोलून दाखवली. ते आणखी काही बोलणार, तोच खा. राऊत यांनी थांबवले. बडगुजर असे का बोलले? याची चर्चा मात्र शिबिरात झालीच. आगामी महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकीच्या दृष्टीने ठाकरे गटाने नाशिकमध्ये एकदिवसीय शिबिर घेतले. मात्र, त्यांच्यासमोर भाजप, शिंदे गटाचे आव्हान कायम असणार आहे. हिंदू विरोधी असल्याची प्रतिमा जनसामान्यात तयार करत आहे. ती थांबवली नाहीतर याचा फटका निवडणुकीत बसण्याची भीती ठाकरे गटातील काही नेत्यांना आहे. काँग्रेस सोबत राहून नाशिकमध्ये काहीही फायदा नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावरच घेण्याची मागणी शहरातील ठाकरे गटातील नेत्यांची आहे. पक्षासमोरील आणखी एक आव्हान म्हणजे, पक्षात वरवर पदाधिकारी एकत्र दिसत असले तरी, पालिका निवडणुकीत गटबाजी उफाळून येणार नाही ना? याची काळजी घ्यावी लागणार आहे. ठाकरे गटाला गटबाजी नवीन नाही. फेक नॅरेटिव्हबरोबरच पक्ष संघटनेकडेही पक्षाला लक्ष द्यावे लागेल. तरच आगामी निवडणुकीत सकारत्मक चित्र दिसू शकेल.

महाराष्ट्राच्या राजकारणात काल मोठी घडामोड घडली. दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे संकेत दिले. महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप होऊन पुन्हा राजकीय समीकरणे बदलणार का? अशा चर्चेने जोर धरला आहे. गेल्या अनेक वर्षांत ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या अनेक वेळा चर्चा रंगल्या. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी उद्धव ठाकरे यांनी टाळी दिली तर राज ठाकरे यांनी टाळी नाकारली. २०१७ च्या मनपा निवडणुकीआधी राज ठाकरे यांनी साद घातली, मात्र उद्धव ठाकरे यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मनोमिलन होऊन शकले नाही. मात्र, गेल्या पाच वर्षांत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. राजकीय समीकरणे बदलली. राजकारणात ठाकरे नावाचे गारुड कायम असले तरी दोन्ही ठाकरे बंधूंच्या पक्षाची स्थिती अगदीच तोळामासा झाली आहे. अशा परिस्थितीत एकत्र येत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीसमोर हे दोन्ही बंधू तगडे आव्हान उभे करू शकतात, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. त्यामुळे ठाकरे बंधूंचे मनोमिलन होऊन महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी मिळणार का? याचे उत्तर आगामी काही दिवसांत मिळेल.



## राज-उद्धव मनोमिलन?



करंट इश्यू

अश्विनी पांडे

राज्यात काही दिवसांपूर्वी नवीन शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला दोन्ही ठाकरे बंधूंनी कडाडून विरोध केला. याच मराठीच्या मुद्यावर ठाकरे बंधू एकमेकांना टाळी देण्याची आता भाषा करू लागले आहेत. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत उद्धव ठाकरेंसोबतचे वाद, भांडण छोटी आहेत. महाराष्ट्र मोठा आहे. त्यामुळे एकत्र येणे, राहणे कठीण नाही असे वक्तव्य केले. राज ठाकरे यांनी अशी साद घातल्यानंतर लागलीच उद्धव ठाकरे यांनीही प्रतिसाद देत राज्याच्या हितासाठी किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला तयार असल्याचे सांगितले. आपल्याकडून भांडणे नव्हती, ती मिटवून टाकली असे देखील ठाकरे म्हणाले. दोन्ही ठाकरे बंधूंच्या परस्परपूरक विधानानंतर ठाकरे बंधूंचे मनोमिलन होणार का? या चर्चेने जोर धरला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या पाच वर्षांत अनेक घडामोडी घडल्या. राजकारणात काहीही होऊ शकते हे गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रातील जनतेने पाहिले. मात्र, विचारधारा वेगळी असणारे, वैचारिक मतभेद असणारे पक्ष एकत्र येऊ शकत असतील तर दोन्ही ठाकरे बंधू का एकत्र येत नाही? असा प्रश्न प्रत्येक मराठी माणसाच्या मनात होता. मराठी अस्मिता, महाराष्ट्र आणि हिंदुत्व हे दोन्ही पक्षाच्या अजेंड्यावरचे प्रमुख मुद्दे. त्यामुळे दोन्ही पक्षांची युती होण्यात खरे तर अडचण काहीच नाही. मात्र, ठाकरे बंधूंनी मनावर घेतल्याशिवाय युती होणार नाही. किंवा दोन्ही ठाकरे एकमेकांसोबत आधीचे वितुष्ट विसरून काम करणार का, याबाबत प्रत्येकाच्या मनात साशंकता होती. मात्र, आता दोन्ही बाजूंनी सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याने युती होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधीही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना टाळीसाठी हात पुढे केला होता. मात्र, त्यावेळी राज ठाकरे यांनी टाटा करत स्वबळावरच निवडणुका लढवणार असल्याचे जाहीर केले. त्यानंतर २०१७ च्या मनपा निवडणुकीच्या वेळी राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना युतीसाठी साद घातली होती. परंतु त्यावेळी उद्धव ठाकरे यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे युतीच्या चर्चा तिथेच संपल्या. त्यानंतर ठाकरे बंधूंकडून २०१९ व २०२४ च्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीत एकमेकांवर टीकेचे बाण सोडण्यात आले. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांना अपेक्षित यश मिळाले नाही. मनसेला तर भोपळाही फोडता आला नाही. तर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या जागाही अगदीच बोटावर मोजण्याइतक्या आल्या. अपयशाचे चटके बसल्याने आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जाताना प्राबल्य असणाऱ्या महायुतीचा सामना करण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र आले तर चित्र वेगळे राहील. पण त्यासाठी एकत्र येतील का? हे देखील पाहावे लागणार आहे. दोन्ही बंधू जर एकत्र आले तर येऊ घातलेल्या निवडणुकांत निश्चित फायदा होईल, असा अंदाज राजकीय जाणकारांचा आहे. भाजपाचे पुढचे लक्ष्य मुंबई महापालिका आहे. मागील वेळी भाजपाने एकट्याच्या बळावर महापालिकेत ८२ जागा मिळविल्या होत्या. आता तर भाजपाला अजित पवार गट, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची साथ आहे. त्यामुळे महायुतीला रोखणे वाटते तितके सोपे नक्कीच नाही.

मनसे आणि महायुतीतील नेत्यांची अनेकवेळा जवळीक दिसत असली तरी मनसेला प्रत्यक्ष महायुतीत सामावून घेण्यास महायुतीला स्वारस्य नाही. राज ठाकरेंसोबत युती केल्यास उत्तर भारतीय मतदार दुरावला जाऊ शकतो याचीही भाजपाला भीती असल्याने मनसे-भाजपा युती होऊ शकली नाही. महाविकास आघाडीत असलेल्या शिवसेना ठाकरे गटाला काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या विचारधारेमुळे प्रखर हिंदुत्वाची भूमिका घेण्यास अडसर निर्माण होत असल्याने शिवसेनेचा मूळ हिंदू मतदार दुरावला जाण्याची उद्धव ठाकरे यांना भीती आहे. याच पार्श्वभूमीवर समविचारी असलेल्या मनसे आणि शिवसेनेची युती झाली तर दोन्ही पक्षांना फायदा होऊ शकतो. इतकेच नाही तर दोन्ही पक्षांची युती महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरू शकते, असा राजकीय तज्ज्ञांचा अंदाज आहे.

राज ठाकरे यांच्याकडे वक्तृत्व शैली व करिष्माई नेतृत्व आहे. तर ग्रामीण महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांची चांगली पकड आहे. त्यामुळे दोन्ही बंधूंनी एकत्र यावे असे मराठी माणसाला वाटत आहे. प्रेमात, युद्धात आणि राजकारणात सर्व काही माफ असते असे मानण्यात येते. राजकारणात कोणीही सदासर्वकाळ मित्र अथवा शत्रू नसतो. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे राजकारणी असल्यासोबतच मावसभाऊ आणि चुलतभाऊ देखील आहेत. सद्य राजकीय परिस्थिती पाहता पक्षाला पुढील काळात भरारी देण्यासाठी दोन्ही राजकीय पक्ष एकत्र येऊ शकतात, अशी शक्यता गेल्या काही दिवसांपासून रंगली होती.

ठाकरे बंधूंकडून कायमच राजकारण आणि कौटुंबिक संबंध वेगळे ठेवण्यात आले. राजकीय पटलावर एकमेकांसमोर उभे ठाकलेले दोघेही कौटुंबिक अडचणींच्या काळात एकमेकांना साथ देताना उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. त्यामुळे दोन्ही बंधूंचे मनोमिलन होणार की नेहमीप्रमाणे चर्चाच ठरणार हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

## वृद्धापकाळच्या वेदना!





प्रतिबिंब

देवयानी सोनार

एकाकीपणा.. सोबतीला, बोलायला कुणी नसणे..ही वृद्धत्वाची खरी परीक्षा आहे. आयुष्याची शेवटची पण सर्वाधिक नाजूक वेळ म्हणजे वार्धक्य. जेव्हा शरीर थकते आणि मन अपमानाचे ओझे उचलते तेव्हा माणूस जिवंत नसतो, तो तग धरून आयुष्य कुंठीत असतो. संध्याछाया भिववती हृदया... असे जे म्हटले जाते ते उगीच नाही. मरण येत नाही म्हणून केवळ जगणे, श्वास घेणे हाती असते. ज्या आयुष्यात मानाने, सन्मानाने जगलो ते उतारवयात लाचार, अपमानास्पद जिणं मनाला वेदनादायी ठरते.

आईवडिलांना सर्व काही दिले आहे. त्यांचे आयुष्य त्यांना सुंदर जगण्यासाठी वेळोवेळी काय हवं नको ते विचारतो आम्ही. पर्यटन, हॉटेलिंग, वाढदिवस सर्व काही मनाप्रमाणे करतो आहोत तरी आई-वडील असे चिडचिड का करता सर्व त्यांना देऊनही त्यांना एकटे पडल्याची भावना वाटते आहे. शेवटी आम्हालाही आमची लाइफ आहे. मुले आहेत. आमच्या काळात असं नव्हतं वगैरे गोष्टी बोलून आई-बाबा बोअर करतात, असे संवाद घराघरातून कानावर पडत असतात. या गोष्टींवरून ज्येष्ठांच्या भावनांपर्यंत आपण पोहोचत नसल्याचे दिसून येते. केवळ त्यांना हवे ते दिले म्हणजे आपण आपले इतिकर्तव्य बजावले असा अर्थ होत नाही. तर त्यांच्याशी संवाद, आपुलकीची, सुरक्षिततेची भावना द्यायला कमी पडत तर नाही ना याचा विचार करायला हवा. जेलरोड येथील मागील आठवड्यात घडलेल्या घटनेने वार्धक्याच्या वेदना किती भयावह असतात, याचा प्रत्यय आणून दिला. मुख्याध्यापक असलेला पती, शिक्षिका असलेली पत्नी, मुलेही सुशिक्षित.. पैशांचीही चिंता नाही.. अशा साऱ्या सुखवस्तू कुटुंबात पत्नीच्या आजारपणाच्या वेदना सहन न झालेल्या जोशी गुरुजींनी पत्नीला वेदनांपासून मुक्त करत स्वत:ही अनंताच्या प्रवासाला जाणे पसंत केले. मुले मोठ्या पदावर असल्यामुळे दोघे घरी एकटेच राहत. केअर टेकर तिचे काम करत. पण तरीही वार्धक्याच्या वेदनांनी गुरुजींनी टोकाचा निर्णय घेतला.

प्रत्येक घराची कहाणी ही वेगवेगळी असते. पालक जेव्हा मुलांच्या जबाबदारीच्या भूमिकेत जातात तेव्हा ते आपला विचार कमी, मुलांचा विचार जास्त करून मुलांना घडवितात. मुलांच्या पंखात बळ भरण्याबरोबरच त्यांना त्यांच्या पायावर उभे राहण्यापर्यंत आपले आयुष्य पणाला लावतात. लग्नानंतर मात्र, सर्व गणिते बिघडतात. गाडी, बंगला, सर्व मिळते पण आई-वडील पुन्हा मिळत नाहीत. केवळ राहतात त्यांच्या आठवणी. आणि एक दिवस त्यांच्या अस्ताव्यस्त पसाऱ्यात अशा बातम्या ऐकायला येतात.

सहवास आणि संवाद साधला तर अनेक चांगल्या सवयीमुळे ज्येष्ठांचे वागणे सुखी होईल. जेवताना त्यांचे मत विचारणे त्यांना काही शिकवत ठेवणे. त्यांना प्रत्येक गोष्टी सामील करून घेणे अशा छोट्या -मोठ्या गोष्टींतून त्यांचे वृद्धापकाळ सुखाचा होऊ शकतो.

अनेकदा पैसा असूनही उपयोग नाही. तर काहींना पैशांची भ्रांत त्यामुळे स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी मुलांकडे सुनांकडे हात पसरण्याची वेळ येते. तेव्हा ती कमजोरी नाही तर अपयशाची जाणीव असते. त्यांची तुटलेली अपेक्षा आणि आशा असते. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात जोडीदाराने साथ सोडली तर ती किंवा तो एकाकी पडतात. निदान शेवटच्या क्षणी दोघांच्या सोबतीने मन मोकळे करता येते.परंतु दोघांपैकी एकजण अगोदर जगातून गेला तर एकाकी जगणे वाट्याला येते. हे एकाकीपणच वृद्धापकाळाच्या वेदना जगणे कठीण करते.

आईवडिलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी ही मुलाची असते. मुली मात्र त्यांचा घर संसाराचे कारण देत अधूनमधून आईवडिलांची ख्याली खुशाली घेत आपले कर्तव्य निभावतात. गोकुळासारख्या असणाऱ्या घराची जागा चौकोनी कुटुंब घेते. यातूनच ज्येष्ठांची अडचण होऊ लागते.

कायद्याने हक्क दिले आहेत परंतु माणुसकीचा आधार द्यायला हवा. २००७च्या ज्येष्ठ नागरिक कल्याण कायद्यात म्हटले आहे की, वृद्धांची जबाबदारी मुलांनी घ्यावी पण कायदा मनाने चालत नाही. केवळ व्यवस्था काय आहे हे सांगतो. म्हणून समाज म्हणून आपल्याला केवळ कायद्याचे पालन न करता माणूस, माणुसकी म्हणून एक ठोस पाऊल उचलावे लागणार आहे. निसर्गाचे चक्र जे पेरले तेच उगवणार असते. त्यामुळे मुले आपले अनुकरण करतात ते पाहतील. आज आपले आई-वडील आजी-बाबांशी कसे वागत आहे. तशीच वागणूक मुले देतील. आयुष्यात हवे ते भौतिक सुख, नवा मोबाइल, नवे कपडे, करिअर, यश, घर, शाळांमध्ये संवेदनशीलता शिकवण. लहान वयातच ज्येष्ठ, वृद्धांबद्दल आदर रुजविणे, मनोरंजन क्षेत्रातही ज्येष्ठांबद्दल आदर, सन्मानयुक्त आदर्श चित्र उभे करायला हवे. राहत असलेल्या ठिकाणी ज्येष्ठांसाठी मित्र मंडळ असावे जे त्यांच्या गरजा समजून घेतील. शेवटी घरातील ज्येष्ठ ओझे नाही तर आपली मूळ आहेत हे लक्षात घ्यायला हवं. आज आपण जे काही आहोत ते त्यांच्या कष्टातून उभे राहिलेले आहोत. त्यांच्या आयुष्याच्या संध्याकाळी जर आपण त्यांना आधार, विश्वास, सुरक्षितता देऊ शकत नसेल तर माणूस म्हणून आपण कमी पडत आहोत. वृद्धापकाळ म्हणजे जणू दुसरे बालपण असते. आज घरोघरी असलेले वृद्ध हे घरातील अडगळ नव्हे तर घराचा आधार आहे. पण स्वत:पुरते बघण्याच्या वृत्तीमुळे अनेक वृद्ध आयुष्याची संध्याकाळ एकाकीपणे जगताना दिसतात. त्यांच्या वेदना समजून घेण्यासाठी त्यांच्या भूमिकेत जावे लागेल. तरच त्यांचा वृद्धापकाळ वेदनादायी नव्हे तर सुखावह होऊ शकेल.




## पक्ष बदलून स्वत:ला सिद्ध करता येईल का?



मालेगावनामा

शफिक शेख
९९२०५८८३६६

सध्या कपडे बदलावे तसे पक्ष बदलाचे वारे वेगाने वाहू लागले आहेत. त्यात आपल्या महत्त्वाकांक्षा एखाद्या विशिष्ट पक्षात राहून पूर्ण होत नसल्याची त्यांची खंतही असू शकेल, मात्र आपण आहे त्या पक्षात आपली पात्रता सिद्ध करू शकलो नाही अथवा जनमानसात आपला ठसा उपटवू शकलो नाही याचा त्यांनी विचार केला की नाही याचीच शंका येते.

घराचे वासे फिरले किंवा जहाज बुडू लागल्यावर जशा पाण्यात उड्या मारून किनारा गाठायचा प्रयत्न केला जातो, परंतु त्यात किती जण किनारा गाठतात आणि किती जण पाण्यात बुडतात हा जरी संशोधनाचा विषय असला तरी या पक्षातून त्या पक्षात उडी घेत आपलं राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्याचा खटाटोप काही राजकीय वारसा घेतलेल्या आणि काही स्वतःला सिद्ध करताना मोठी पदे मिळवूनही अपेक्षित इच्छित साध्य न झाल्याने दुसऱ्या गाडीला स्वतःला जुंपून घेतले आहे. गाडीवान मोठे हुशार आहेत ते वापर झाल्यानंतर फेकून देतात. त्यावेळी न घरका न घाटका अशी अवस्था होते. हेच काही राजकीय व्यक्तींना समजत नसावे.

मालेगाव तालुक्यात सातत्याने काँग्रेसकडून मंत्रिपदे मिळविणाऱ्या दिवंगत माजी मंत्री बळीराम हिरे यांचे सुपुत्र प्रसाद हिरे यांनी पुन्हा भाजपात प्रवेश घेतला आहे. वास्तविक यापूर्वी ही त्यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश घेतला होता. पुन्हा काँग्रेसमध्ये आल्यानंतर भाजपात जाण्यात त्यांची कोणती दूरदृष्टी असावी. आपापल्या शिक्षण संस्था वाचविताना काही राजकीय नेते कसरत करीत आहेत.


जिल्ह्याचे माजी काँग्रेस अध्यक्ष तुषार शेवाळे यांनी देखील भाजपात प्रवेश केला. त्यांनी विद्यमान शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या विरोधात विधानसभेसाठी निवडणूक लढवून काट्याची लढत दिली होती. असे असताना त्यांना काय साक्षात्कार झाला आणि त्यांनीही भाजपात प्रवेश घेऊन मंत्री दादा भुसे यांचा प्रचार केला होता. अर्थात नेते त्यांची सोय पाहत बदल घडवून आणू पाहत असले तरी त्यामुळे का होईना भाजप अथवा त्यांनी प्रवेश केलेल्या पक्षांची ताकद वाढत आहे हे निश्चित.

२००४ पासून अनेकदा काँग्रेसकडून आमदार झालेल्या दिवंगत शेख रशीद यांचे सुपुत्र आसिफ शेख यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला, मात्र विधानसभा निवडणुका येताच तेथेही त्यांचे मन रमले नाही. त्यांनी सरळ स्वतःचा मुस्लिम पक्ष काढला. विधानसभा निवडणुकीत उमेदवारी करून पराभूत झाले ही गोष्ट अलहिदा. राहता राहिला पक्ष बदल करून आमदार झालेल्या मौलाना मुफ्ती मोहंमद इस्माईल यांचा. प्रथम अपक्ष आणि जनसुराज्य पक्षाकडून आमदार झालेल्या मौलानांनी कोलांटउडी घेत एमआयएम पक्षात प्रवेश घेतला आणि आसिफ शेख यांचा पराभव करून आमदार झाले. तिकडे वर्षानुवर्षे जनता दलात राहिलेल्या समाजवादी विचारसरणीच्या दिवंगत नेते निहाल अहमद यांच्या कन्येनेही पक्षत्याग करून समाजवादी पक्षाकडून विधानसभा लढवली. त्यात त्या पराभूत झाल्या. मूलतः काँग्रेसी विचारांच्या पुष्पाताई हिरे यांचे चिरंजीव माजी मंत्री प्रशांत हिरे यांनी ही शिवसेना, राष्ट्रवादी असे पक्ष बदल केले. त्याच वाटेवर त्यांच्या मुलांनीही पक्ष बदल केले. कधी राष्ट्रवादी, भाजप आणि आता ठाकरे सेना असा त्यांचा प्रवास आहे. एकंदरीत या पक्ष बदलाचा या राजकीय नेत्यांना स्वतःची पत सांभाळताना राजकीय अस्तित्वासाठी पक्ष बदल करून झगडावे लागत आहे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. त्याऐवजी आपला जनाधार वाढविण्यासाठी किती प्रयत्न केला जातो हा संशोधनाचा विषय आहे.



मनमोकळे

अंजली रहाणे-थेटे



# संकोच...

**संकोच हा वैरी सत्याचा**
**संकोच हा घात नात्याचा**

संकोच अर्थात संशय ही अशी ठिणगी आहे ज्यामुळे अनेक वणवे पेटले अन् क्षणात सारं उद्ध्वस्त झालं. संकोच हे असे ग्रहण आहे जे एकदा माणसांमध्ये किंवा नात्यांमध्ये लागले की कितीही वेध पाळले तरीही त्या नात्याची हानी झाल्याशिवाय ग्रहण ही संपत नाही. सर्पदंश झाल्यानंतर ही इतकी कठीण विषबाधा होणार नाही इतके विष हया संशयाने पसरते. जरा बारकाईने निरीक्षण केले तरी हा संशयाचा विषाणू अगदी घराघरामध्ये सऱ्हास पसरतो आणि याचे मूळ कारण बदलणारी उतरते. वैचारिक पातळी आणि हीच वैचारिक पातळी अमानुष आणि माजवी कृत्यात जलद गतीने वाढ करते.

भग्न मनात संकोचाला कवटाळून ठेवलं की विचारांचे नागडेपण कृत्यात जिथं सुपीकता वाढते तिथं नापीक आणि शापित बीज रुजवले की, तिथून फक्त उद्ध्वंस विचारच जीवनात परावर्तित होतात. नात्याप्रती कठोर असणं ही काळजी परंतू नात्याप्रती साशंक असणं हा अविश्वास त्याचबरोबर अनेक ऐतहासिक आणि आध्यात्मिक प्रमाण आपल्यासमोर आधीच मांडले आहे यासाठी की,आपण सात्विक वृत्तीची जोपासना करावी परंतु दरवेळी मनाच्या विकृतीला साखळदंडांनी करकचून बांधून अजुन अनिष्ट गोष्टींना जीवनात भक्कम करत जाणारा समाज दिवसेंदिवस वाढत चालला आहे. विशेषतः कौटुंबिक पातळीवर संशय हा विंचवासारखा आहे की एकदा नात्यांना चावला की त्याचा ठणक आयुष्याच्या अखेरपर्यंत लागतो. वेळप्रसंगी ठणक कमी व्हावा यासाठीच वैचारिक औषधोपचार करतो ही परंतू त्याचा असर औषध असेपर्यंतच राहतो. कित्येकदा त्यात गतप्राण होताना ही दिसतात. यासाठीच घटकाभर संकोचाचं जाळं बाजुला करून आपल्यात असलेल्या रुपेरी पंखांनी स्वच्छ नितळ मनात विहार करावा तेव्हाच कळेल की आपल्या मनाच्या राऊळात प्रेमरूपी परमेश्वर वास करतो.

बुद्धीवर होणारा संशयाचा विपरीत परिणाम विनाशकारी असतो. तत्पूर्वी संकोचाची शहानिशा करावी जेणेकरून स्वतः पासून ते सर्वोतोपरी शांतता पसरेल आणि आपोआप गैरसमजुतीवर होणाऱ्या गैरव्यवहाराना वेळीच आळा बसेल . कालांतरानं दुरावत चाललेले नाते अथवा विचार आपसूकपने आपले माणसं आणि आपले विचार हे प्रेम आपुलकी आदरभाव यावर केंद्रित होतील.

**संकोचाने केली सारी माती**
**भ्रष्ट होऊनी भंगली मती...**
**वेचतील जेव्हा वैचारिक मोती..**
**टिकतील सारी नाती गोती..**

# विचारधारा : संघटनेपासून जनसेवेपर्यंत

**भारतीय जनता पक्षाची आजची राजकीय उंची हा शाश्वत विचारधारेवर आधारित प्रदीर्घ वाटचालीचा परिणाम आहे. या प्रवासात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचा 'एकात्म मानव दर्शन' हा विचार आणि जनसंघाच्या प्रवासाचा अनुभव या दोन्हींचा सखोल प्रभाव आहे.**





प्रासंगिक

मंगल प्रभात लोढा

कौशल्य विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय राजकारणात एक अद्वितीय वैचारिक प्रवाह आणला. त्यांनी 'राजकारण हे समाजसेवेचं माध्यम असावं' असा आग्रह धरला. त्यांच्या मते, भारताची उन्नती ही केवळ पाश्चिमात्य भौतिक प्रगतीच्या मापदंडावर नव्हे, तर भारतीय संस्कृतीच्या आत्म्याशी सुसंगत अशा सर्वांगीण विकासावर आधारित असावी. त्यामुळेच त्यांनी 'एकात्म मानव दर्शन' ही संकल्पना साकारली, जी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर आणि समाजातील सर्व घटकांना एकसंध बांधण्यावर आधारलेली आहे.

१९६५ साली २२ ते २५ एप्रिल दरम्यान पंडित दीनदयाळ उपाध्यायजींनी मुंबईतील रुईया महाविद्यालय परिसरात 'एकात्म मानव दर्शन' आणि 'अंत्योदय' हे विचार प्रथम मांडले. या ऐतिहासिक घटनेला आता ६० वर्ष पूर्ण होत आहेत. सदर घटनेच्या स्मृती जपण्यासाठी, हा विचार साजरा करण्यासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव' २२ ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान, त्याच परिसरात म्हणजेच रुईया महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात पंडितजींच्या विचारांवर आणि राष्ट्रहिताच्या विविध पैलूंवर नामवंत वक्ते आपले विचार मांडतील. हे तीन दिवस म्हणजे राष्ट्रभक्तीचा जागर आणि प्रेरणादायी चिंतनाचा उत्सव ठरणार आहेत. या माध्यमातून पंडितजींनी त्याकाळी जे साकार केलं, त्यासाठी लागणाऱ्या कर्तृत्वाचे काही पैलू जरी आपल्यात मुरले तरी सोन्याहून पिवळे!


त्या काळात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय जनसंघामधून राष्ट्रनिष्ठा, कर्तव्य भावना आणि 'अंत्योदय' यांसारखी मूल्यं रुजवली. त्यांच्या नेतृत्वाखाली जनसंघ एक वैचारिकदृष्ट्या परिपक्व पर्याय बनला. त्यांनी 'स्वदेशी', 'ग्राम स्वराज्य' आणि भारतीय गरजांनुसार विकासाची नीती मांडली. आणीबाणीनंतर जनसंघाच्या वैचारिक वारसदारांनी भारतीय जनता पक्षाची स्थापना केली. भाजपाचे नेते आणि पंतप्रधान म्हणून कित्येक वर्षानंतर आदरणीय अटल बिहारी वाजपेयी यांना पंडितजींची मूल्ये राज्यकारभारात रुजवण्याची प्रथम संधी मिळाली. अटलजींच्या नेतृत्वातून 'प्रामाणिक प्रशासन', 'सर्वसमावेशक विकास' आणि 'अंत्योदय' यांवर आधारित धोरणांचा प्रत्यय भारताला आला. त्यानंतर पुढे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कार्यात सुद्धा तसाच राहिला. उज्वला योजना, जनधन, आयुष्मान भारत, आवास योजना यांतून 'एकात्म मानव दर्शन' आणि समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा प्रयत्न जनतेने अनुभवला आणि पुन्हा तिसऱ्यांदा आदरणीय मोदीजींना पंतप्रधान म्हणून निवडून दिले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस जी यांच्या नेतृत्वाखाली सुद्धा आपल्या राज्यात सर्वांगीण शाश्वत विकासासाठी विविध योजना राबवल्या गेल्या. मेट्रो प्रकल्पामुळे सर्वसामान्यांना जलद व स्वस्त प्रवास शक्य झाला, राज्यात वाहतुकीचे नवे मार्ग आले, युवकांना रोजगार मिळाला, माता भगिनींच्या संरक्षणासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलली गेली, शेकतऱ्यांसाठी जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे यासारख्या योजना राबवल्या गेल्या. आज महाराष्ट्रात देवेंद्रजींच्या नेतृत्वाखाली अंत्योदयाच्या विचाराचा दिवा अविरत तेवत राहिल हा विश्वास आहे.

पंडितजींनी अनेकदा म्हटलं की, राजकारण हे केवळ सत्तेसाठी नाही, तर समाज रचनेला योग्य दिशेने नेण्यासाठी असावं! आज मी सुद्धा माझ्या कामात हाच विचार अमलात आणायचा नेहमी प्रयत्न करतो. त्यामुळे माझ्या अध्यक्षतेखाली पंडित दीनदयाळ उपाध्याय एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीचे कार्य हे फक्त कार्यक्रम आयोजनापुरते मर्यादित राहणार नाही याची काळजी घेतली. समितीच्या माध्यमातून पंडितजींच्या विचारांवर आधारित एक लाख पुस्तिकांचे वितरण, या महोत्सवात ग्रामीण भागात बचतगट, अंगणवाड्या आणि शाळांमध्ये कौशल्य विकासावर भर, गावातील स्वच्छता विषयक उपक्रम, घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबत योजना, यांसारखे अनेक उपक्रम सुरु करण्यात आले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या विचारांच्या मार्गदर्शनाखाली, एकात्म मानव दर्शनाच्या सिद्धांताचा प्रसार आणि समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास हेच आपल्या महोत्सवाचे मुख्य ध्येय आहे. त्यांच्या शिकवणीचे पालन करून, राष्ट्रहितासाठी कार्य करत, आपल्याला समाजाचे सशक्तीकरण आणि समृद्धी साधता येईल. या महोत्सवाच्या माध्यमातून, पंडितजींच्या विचारांचे पुनरावलोकन करत, आपण एकत्र येऊन आपल्या देशाच्या प्रगतीत योगदान देऊया.

# महत्त्व अभ्यासाचे



परीक्षा

प्रा. प्रशांत शिरुडे

९९६७८१७८७६

**असाध्य ते साध्य करिता सायास,**
**कारण अभ्यास तुका म्हणे**


अशक्यप्राय गोष्टी सुद्धा अभ्यासाने सहज साध्य होतात, हेच संत तुकाराम महाराजांनी सर्वांना सांगितले. आपल्याला आपल्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सतत अभ्यासाची गरज असते. कारण जग फार वेगात बदलत आहे. बदलत्या जगा नुसार आपण बदल नाही स्वीकारला तर निश्चितच आपण मागे राहू.

विद्यार्थी दशेत असताना विविध पद्धतीने अभ्यास केला तर तो मनोरंजनात्मक व आनंददायी होतो. नुसता होमवर्क, पाठांतर, वाचन नकोच. त्याऐवजी स्वतः प्रश्न तयार करणे, नोट्स काढणे, पीपीटी बनविणे, वादविवाद, प्रश्नमंजुषा, चर्चासत्र, गप्पाष्टक, संभाषण, मुलाखत, प्रत्यक्ष कृती करून, खेळ, प्रकल्प बनविणे, उजळणी यामुळे अधिक सखोल अभ्यास होतो. खरं तर विद्यार्थ्यांसमोर अभ्यास कसा करावा हा खूप मोठा प्रश्न असतो. अभ्यास करण्यामध्ये आपल्या शरीरातील सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे आपला मेंदू. अभ्यास चांगला होण्यासाठी व लक्षात राहण्यासाठी अभ्यास केल्यानंतर मेंदूला विश्रांती मिळणे आवश्यक असते. त्यामुळे शक्यतो वैयक्तिक अभ्यास करताना रात्री झोपण्यापूर्वी अभ्यास करावा म्हणजेच रात्री झोपताना मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप यासारख्या तत्सम वस्तूंपासून लांब राहावे. अभ्यास केल्यानंतर आपण झोपतो म्हणजे आपल्या मेंदूला विश्रांती देतो. त्यामुळे जो काही अभ्यास केलेला आहे तो लक्षात राहतो. सकाळी उठल्यावर आपण रात्री काय अभ्यास केला ते आठवून लिहून बघितलं तर नक्कीच लक्षात येतं की आपल्याला चांगल्यापैकी लक्षात राहत आहे.

याशिवाय दिवसभरात ज्यावेळी माणसाचे मन फ्रेश असते आनंदी असते अशा वेळेस अवघड किंवा कठीण विषयांचा अभ्यास करावा आणि जेव्हा कंटाळा किंवा बदल हवा असतो तेव्हा आपल्या आवडत्या किंवा सोप्या विषयांचा अभ्यास करावा.

अभ्यास लक्षात राहण्यासाठी आपण वेगवेगळ्या ट्रिक्स, फंडे वापरू शकतो. म्हणजे अनेक मुद्दे एका शब्दात गुंफता येऊ शकतात. उदाहरणार्थ 'तानापिहिनिपाजा' या एका शब्दात इंद्रधनुष्याचे सात रंग दिसतात तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा. पूर्वीपासून आपल्याकडे उद्या जो भाग शिकवणार आहेत त्याचे आधी वाचन करणे अपेक्षित होते. त्यामुळे अध्ययन करतानाच लक्षात राहणे सुलभ आणि सोपे होऊन जाते एकाच वेळी सर्व अभ्यास न करता रोज थोडा थोडा अभ्यास करत राहणे, केलेल्या अभ्यासाची उजळणी करणे, सुट्टीच्या दिवशी झालेल्या घटकांची उजळणी करणे यामुळे सुद्धा चांगला अभ्यास होतो. बऱ्याच वेळेला अशी एखादी गोष्ट आपल्याला करावी लागते की जी आपल्याला जमत नसते किंवा आपल्याला करायला आवडत नसते. अशावेळी ती गोष्ट किमान गरजेपुरती किंवा आपलं नुकसान होणार नाही इतपत शिकून घ्यावी. अभ्यास करताना इतरांकडे असलेल्या ज्ञानाचा, कौशल्यांचा उपयोग समजून घेणे हे फार महत्त्वाचे असते. म्हणजेच जगात सध्या काय चालू आहे याची सखोल माहिती घेणे नाहीतर मग आपण आपल्याच विश्वात रममाण राहतो. इतिहासात भारतावर आक्रमण करणारे आक्रमक हे आपल्यापेक्षा अधिक प्रगत असल्याचे दिसून येते. आपण त्यांच्याकडे आपल्यापेक्षा वेगळं काय आहे व त्यावर कशी मात करता येईल याचा विचार फारसा केलेला दिसून येत नाही. परिणामी अनेक युद्धांमध्ये परकीय आक्रमकां समोर पराभव झालेला दिसून येतो. त्यामुळेच आपल्याला गुलामी स्वीकारावी लागली. हे कदापि विसरू नये.

# समाजाचे सूक्ष्म निरीक्षण करणारी कलाकृती - सीसीटीव्हीच्या गर्द छायेत




**कलाकृती - सीसीटीव्हीच्या गर्द छायेत**
**साहित्य प्रकार - कवितासंग्रह**
**कवी- गीतेश गजानन शिंदे - ठाणे**
**कवीचा संपर्क क्रमांक - ९८२०२७२६४६**
**प्रकाशक : शब्दालय प्रकाशन - श्रीरामपूर**
**मुखपृष्ठचित्रकार - अन्वर हुसैन**



परिचय

प्रशांत वाघ

७७७३९२५०००

जगाने तंत्रज्ञानाची कास धरून प्रत्येक क्षेत्रात क्रांती केली. मानवी जीवनावर या तंत्रज्ञानाचे चांगले वाईट परिणामही झालेले आपल्या पाहण्यात, वाचनात आलेले आहेत. मानवाने कितीही तंत्रज्ञान विकसित केले तरीही काही बाबतीत मानव स्वतःला सिद्ध करू शकला नाही हे त्रिकालाबाधित सत्य आहे. मनातील काही भाव बदलणे, मनातले दुःख, चिडचिडपणा आणि अडचणी यावर अजून तरी तंत्रज्ञान विकसित झालेले नाही. अशाच तंत्रज्ञानातून मानवी जीवनाचे तत्वज्ञान उकलणारी कवी गीतेश गजानन शिंदे यांची 'सीसीटीव्हीच्या गर्द छायेत' ही काव्य कलाकृती वाचनात आली.

सीसीटीव्हीच्या गर्द छायेत या कलाकृतीच्या मुखपृष्ठाचे बारकाईने निरीक्षण केले असता त्यातून मानवी जीवनाचे खूप काही संदर्भ लक्षात आले. या कलाकृतीच्या मुखपृष्ठावर सहा मानवी प्रतिकृतीचे सीसीटीव्ही कॅमेरे असून प्रत्येकाला एकच डोळा दाखवला आहे. तसेच प्रत्येकाचे चेहरे वेगवेगळ्या दिशेला दाखवले आहेत. यातून कवीने सुक्ष्मातिसुक्ष्म निरीक्षण करून सामाजातील ताणतणाव, पेच आपल्या कवितेतून मांडले आहेत असे दिसून येते..

मुखपृष्ठावर सहा मानवी प्रतिकृतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले दिसत आहेत याचा अर्थ असा आहे की- मानवी जीवनात जे सहा षडरिपूंचे स्थान आहे त्यावर मानव कोणतेही तंत्रज्ञान विकसित करू शकत नाही.

प्रत्येकजण देशाला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पहात आहे, मात्र माणसाला माणूस म्हणून जगण्याचे स्वप्न कधी पडेल असे तंत्रज्ञान विकसित झाले पाहिजे. आज जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आपणास पहावयास मिळतात, मात्र या सीसीटीव्ही कॅमे-यात मादक द्रव्य, ड्रग्ज, प्राणघातक विषाणूंची मोठ्या प्रमाणात होणारी तस्करी का येत नाही.? केवळ दूरदर्शनवर आणि वृत्तपत्रातून बातम्याचे वृथा रकाने भरून उपयोग नाही. व्यवस्थेचा भ्रष्ट कारभार या सीसीटीव्ही कॅमे-याच्या कक्षेत का येत नाही? यावर ठोस निर्बंध का येत नाही? हा प्रश्न कवीला भेडसावत आहे.

आज समाजात राजरोसपणे एखाद्या व्यक्तीचा खून केला जातो, हजारो लोकांच्या समोर एखादी घटना घडते, मात्र तेथे उपस्थित असणाऱ्या एकाही माणसाच्या मनात कळवळा, हळहळ निर्माण होत नाही की स्वतः पुढे जाऊन होणारी घटना थांबवावी .. इतकी हृदयशून्यता माणसाच्या मनात कशी काय आली? या प्रश्नाने कवी मन हतबल होत आहे.

सीसीटीव्हीच्या गर्द छायेत या कलाकृतीच्या मुखपृष्ठावरील सहा सीसीटीव्ही कॅमेरे हे समाजातील विश्वास, गोपनीयता, जातीयता, सुडाचे राजकारण, भीती, संशय अशा सहा घटनांना अधोरेखित करीत आहे असे कवीला वाटते. पूर्वीच्या काळी गावाच्या पारावर जुने जाणते माणसे बसत होती, एकमेकांच्या मायेने विश्वासाने एकमेकांना मनातलं सांगत होती, आज हे विश्वासाचं होकायंत्र मायेच्या चुंबकत्वाअभावी नादुरुस्त झालं आहे. एखाद्याने मनातली बात सांगितली की ती गावभर कशी फैलावता येईल हे आधी पाहिले जाते, त्यातील गोपनीयता राहिली नाही. प्रत्येकजण स्वतः ला एका विशिष्ट जातीच्या रंगाच्या कपड्याने झाकू पहात आहे, हा देश केवळ मानवतेच्या अर्थाने विकसित झाला पाहिजे असे असतांना विविध रंगाने जातीयता वाढवताना दिसत आहे. एकमेकांबद्दल मनात राग ठेवून सुडाचे राजकारण होत आहे. हल्ली माणसेच माणसाला झेड सुरक्षा देत आहेत, जिथे मुक्त फिरण्याचे स्वातंत्र्य असताना सुरक्षाकवचात फिरावे लागते इतकी माणसाला माणसाबद्दल भीती निर्माण झाली आहे. एकमेकांबद्दल मनात संशय निर्माण होत आहे त्यामुळे खून, दरोडे, बलात्कार यांसारख्या घटना वाढीस लागल्या आहेत, वरील सहा घटना कवीच्या मनाला भेदून गेल्या आणि म्हणूनच अशा सहा घटनांसाठी सीसीटीव्ही कॅमेरे समाजात बसवून अशा घटनांना वेळीच आवर घातला पाहिजे या अर्थाने हे सहा सीसीटीव्ही कॅमेरे मुखपृष्ठावर घेतले असावेत असे मला वाटते. या सहाही सीसीटीव्ही कॅमे-यांचे चेहरे विविध दिशेला आहेत, समाजात माणसाने चौकसबुद्धी ठेवून राहिले पाहिजे, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे आपले बारीक लक्ष असायला हवे, सूक्ष्मातिसूक्ष्म घटनांचे निरीक्षण करण्याची क्षमता आपल्या नजरेत असायला हवी. कवी गीतेश गजानन शिंदे यांनी अशाच घटनांच्या नोंदी ठेवत आपल्या कवितेत त्या घटना मांडल्या आहेत.

कवी गीतेश शिंदे यांनी ही कलाकृती नजरेस पडूनही कुठलीच दखल न घेतल्या गेलेल्या कष्टक-यांना, वंचितांना अर्पण केली आहे आणि म्हणूनच त्यांच्या कवितांमधून कष्टकरी, वंचित, समाजाचे निरीक्षण दिसून येते. या संग्रहात एकूण सत्त्याहत्तर कवितांचा समावेश असून या कलाकृतीला कवितांच्या संदर्भाने साजेसे मुखपृष्ठ देवून प्रसिद्ध मुखपृष्ठचित्रकार अन्वर हुसैन यांनी अर्थपूर्ण वेगळी ओळख करून दिली आहे. श्रीरामपूरच्या श्रीमती सुमतीताई लांडे यांनी शब्दालय प्रकाशन मार्फत या कलाकृतीचे प्रकाशन करून समाजाची चिकित्सा करायला ही कलाकृती वाचकांच्या हवाली केली आहे.



# दुपारची झोप आणि मी

जाणीव

अनिल देशपांडे

एक सांगू का? माझे आणि वामकुक्षीचे जरा जास्तच प्रेम आहे? हो, लहानपणीचं फारसं आठवत नाही, पण इकडून तिकडून आल्यावर वा शाळेतून दमून भागून (?) झाल्यावर, कोपऱ्यातील डुगडुगत्या पलंगावर केंव्हा अंग झोकून देईल याची मी आतुरतेने वाट पहात असायचो!

अजुन एक सांगावस वाटतं वय वाढत गेलं, नोकरीला लागलो पण दुपारच्या झोपेचं व्यसन( !) ही तसंच वाढत गेलं!

दुपारच्या त्या स्वर्गसुखी डुलकी साठी ( फार नाही अर्धा तासाचीच) मी ३-४ किमी सायकलींग करून घरी गरमागरम जेवण करायला व अंधार कोठडी करून दुपारची डुलकी घ्यायला न विसरता, उन्हात, पावसात घरी येवून डुलकी विसरत नसे.

त्याच माझ्या दृष्टीने कसंय :
दुःख राहे शून्य, जाहलो अनन्य,
घेता झालो धन्य,
झोप दुपारची!!
कोणी म्हटलंय माहीत नाही.
आणि कोणी का म्हणेना ?
माझ्यासाठी फार ऊपयुक्त!

हां, तर दुपारची झोप हा माझा अतिशय जिव्हाळ्याचा आणि नाजुक विषय .

खरं पाहतां, दुपारची झोप अथवा वामकुक्षी हा प्रकार जाणून घेण्यासाठी एक ऊच्च प्रकारची रसिकता लागते!( काही लोक या रसिकतेलाच आळस असे संबोधतात! खरंच दुर्दैव ..अशा लोकांचे)

ही रसिकता -आवड फार कमी जणांकडे असते . म्हणजे छे! हो! दुपारी काय झोपायचं! असं म्हणणारे एक तर अरसिक तर असतोच किंवा तुमच्यावर आतुन जळत तरी असतो!

बरं नुसती रसिकता असून चालत नाही तर सोबतीला जिद्द आणि चिकाटी पण हवी .कामात (?) कितीही व्यस्त असलो ( आजकाल काम आणि व्यस्तता जरा दुर्मिळच झालंय असं जाणवतं )तरी दुपारी मी झोपणारच अशी भीष्मप्रतिज्ञा ( मनातल्या मनात )करण्याचे आणि ती पाळण्याचे सामर्थ्य मात्र हवे असते!

मला सहजच एक शंका आहे? भीष्मदादा समस्त कौरव -पांडवांना सकाळी युद्धाचे लेसन्स देऊन दुपारी वामकुक्षी काढत नसतील कशावरून?

पण माझं एक नक्की असतं भले मी मित्राकडे, नातेवाइकाकडे दुपारचा काही कारणासाठी गेलो! ( शक्यतो टाळतोच कारण आमची दुपारची झोप! ) तर आमची वेळ झाली की आम्ही गरगरायला लागतो! इकडे तिकडे लाजत लाजत काने कोपरे, शोधत रहातो आणि समोरच्यालाच शेवटी कीव (!) येवून, काका थोडी विश्रांती आतील खोलीत घेतां कां? असे नाइलास्तव म्हणावे लागते! आणि अस्मादिक, पडत्या फळाची आज्ञा शिरसावंद्य मानून चिडीचुप स्वर्गसुखात जातो!

काय करणार! असतं असं काहींना दुर्मिळ व्यसन! अजून एक, या दुपारच्या झोपेचे माझ्या कडून जरा निरीक्षण ही झालंय. तुम्हाला किती पटतय बघा ?( जवळची मंडळी तर रिकामे उद्योग म्हणून प्रेमाने संबोधतात!)

माझा असा (गोड) समज आहे की,दुपारच्या झोपेचे वेगवेगळे प्रकार असावेत!

काहींचा वामकुक्षी आणि दुपारची झोप यामध्ये गफलत करतात!

खरंतर वामकुक्षी म्हणजे अगदीच सामान्य अशी भरपेट जेवण झाल्यावरची अथवा नित्याचीच सामान्य अशी डुलकी जी फार तर अर्धा तास टिकू शकणारी!

पण आमच्या दुपारची झोप हा प्रचंड आणि राजे शाही प्रकार आहे बरं का ?

त्याचं कसं आहे, मस्त सुट्टीचा दिवस आहे, त्यात एक -दिडच्या सुमारास भरपेट झालेलं जेवण म्हणजे सणासुदीच समजू या! (आमरस पुरी, श्रीखंड पुरी, पुरण पोळी वा तत्सम असेल तर अहाहा) पेलाभर मठ्ठा आणि वाऱ्याची झुळुक असं सगळ जमून आल्यावर जी दोन तीन तास समाधी लागते न् तिला दुपारची झोप असं म्हणतात!

आम्ही पुणेकर व त्यातही पुण्यातले दुकानदार म्हणजे दुपारच्या झोपेचे Brand Ambassador आहोतच!

का ? ते सांगायची गरज नसावी .

आमच्या शाळेत जळगावी दुपारी एक विद्यार्थी, तोंडाला हातांचा टेकू देवून आणि पुस्तकात तोंड खुपसल्याचे नाटक करून झोप तर काढायचाच व सायन्समधील एक ते तीन लिव्हर पण शिकत असे!

कधी कधी शिक्षक अशा अवस्थेत पकडायचे! आणि आपली साधना कमी पडली आणि निद्रादेवीचा कोप झाला असे खुशाल समजावे!

ऊन्हाळ्यातील फॅन खालची ऊघड्या फरशीवरची झोप जरा वेगळीच!तर पावसाळ्यातील बाहेर पडणाऱ्या त्या टिप टिप च्या नाद सुरातील झोप अजुनच वेगळी!तर थंडीतील गरम चहा पिवून रजईत शिरून घ्यायची झोप ही न्यारी!

जरी ही निद्रादेवीचीच विविध रुपं असले तरी पट्टीचे गाणारे, खाणारे असतात तसे पट्टीचे दुपारचे झोपणारे ही माझ्यासारखे असतात! बऱ्याचदां या तिघांची पट्टी जुळते कारण तिन्ही लोकांची रसिकता!

एक मी सांगु शकतो, दुपारच्या झोपेमुळे माझातरी ऊत्साह वाढतो आणि कशातही आनंद घेण्याची वृत्ती वाढते असा मीच माझा (गोड) समज करून घेतला आहे! नाहीतर आळशी प्राणी म्हणून मिरवतो आहेच की!!

आता दुपारचे दोन वाजताय आणि माझी दुपारची झोप वाट पहात आहे...

**मातीची सुपीकता आणि जलधारणक्षमता मातीमध्ये असणाऱ्या विविध सेंद्रिय घटक आणि उपयुक्त जिवाणू आणि बुरशींवर अवलंबून असते. दिवसेंदिवस चुकीच्या मशागत पद्धतीमुळे मातीचा भुसभुशीत पणा कमी होऊन उत्पादनक्षमता देखील खालावत आहे. यासाठी शेतीची वारंवार मशागत करताना देखील काळजी घेणं अत्यंत गरजेचे आहे.**






# वारंवार नांगरणी - धोकादायकच!

सध्या शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर वाढल्यापासून शेती करणं सुलभ आणि कमी कष्टाचं झालं. पण उपलब्ध साधनसामग्री अयोग्य पद्धतीने किंवा वारंवार वापरल्यामुळे मातीची उत्पादकता देखील खालावली हे देखील तितकेच खरे आहे. अनेक शेतकरी कमीत कमी कालावधीत शेती तयार करायची म्हणून गरज नसताना खोल नांगरट आणि इतर मशागत वारंवार करतात. तात्पुरती जमीन तात्काळ तयार होते देखील पण अशा प्रकारे वारंवार शेतीची मशागत केल्याचे दुरगामी परिणाम शेतीमध्ये दिसायला लागतात आणि मग शेती फायद्याची कमी आणि आतबट्ट्याचीच जास्त वाटते. हे सगळे दुरगामी परिणाम टाळण्यासाठी जमिनीची वारंवार मशागत केल्यामुळे होणारे तोटे जाणून घेणं नक्कीच फायदेशीर ठरेल.

**जमिनीची वारंवार खोल नांगरट/अति मशागत केल्यामुळे होणारे नुकसान**

१. मातीची रचना खराब होते

अतिनांगरणीमुळे माती सैलसर होऊन तिचा नैसर्गिक कणरचना नष्ट होते, जे सुपीकतेसाठी घातक आहे.

२. मातीची धूप वाढते-

सैल झालेली माती पावसाने किंवा वाऱ्याने सहज वाहून जाते, त्यामुळे वरचा सुपीक थर कमी होतो.

३. ओलावा खालावतो - वारंवार मशागत केल्यामुळे मातीतील आर्द्रता (ओलावा) कमी होतो, ज्यामुळे पाण्याची गरज वाढते.

४. सेंद्रिय घटक कमी होतात- मशागतमुळे सेंद्रिय पदार्थांचे विघटन झपाट्याने होते, परिणामी मातीतील जैविक घटकांची संख्या कमी होते.

५. सूक्ष्मजीव आणि गांडूळ नष्ट होतात- नांगरणीमुळे मातीतील नैसर्गिक सजीव जसे गांडूळ, बुरशी, जिवाणू यांचे संवर्धन होत नाही; ते मरतात.

६. जास्त खर्च व श्रम लागतात-

वारंवार नांगरणीसाठी डिझेल, मजूर, ट्रॅक्टर यांचा वापर वाढतो, ज्यामुळे उत्पादन खर्च वाढतो.

७. माती कडक होते (क्रीव झरप तयार होतो)-खालील थरावर दबाव पडून 'हार्ड पॅन' तयार होतो, ज्यामुळे पाण्याचा झरा खाली जाऊ शकत नाही आणि मुळे व्यवस्थित वाढत नाहीत.

**कमीत कमी मशागतीचे फायदे**

✻ वारंवार नांगरणी केल्याने मातीचा सूक्ष्मदर्शी रचना ढासळते. कमीत कमी मशागत केल्यास मातीतील कणांची नैसर्गिक रचना टिकून राहते.

✻ मातीतील जिवाणू, बुरशी, गांडूळ यासारख्या फायदेशीर सूक्ष्मजीवांचं संवर्धन होतं. ही सूक्ष्मजीव मातीची सुपीकता वाढवतात.

✻ मशागत कमी केल्यास माती घट्ट राहते आणि वाऱ्याने वा पाण्याने वाहून जाण्याचा धोका कमी होतो.

✻ मशागत कमी असल्यामुळे मातीतील ओलावा अधिक काळ टिकतो, ज्यामुळे पाणी बचत होते.

✻ यंत्रसामग्रीचा वापर कमी होतो, त्यामुळे डिझेल, वेळ व मजुरी यांची बचत होते.

✻ माती फारशी हलवली न गेल्यामुळे काही रोग व किडींचा साखळी तुटते, त्यामुळे त्यांचं नियंत्रण सहज होतं.

अशा प्रकारे कमीत कमी मशागत करून माती समृद्ध करण्यासाठी आणि पीक उत्पादन वाढीसाठी हातभार लावला जाऊ शकतो. खर्चात बचत होतेच, पण सोबतच श्रमात देखील बचत होते त्यामुळे प्रत्येक वर्षीच जमीनीची खोल नांगरट न करता एक-दोन वर्षांनंतर जर नांगरणी केली तर निश्चितपणे फायदेशीर ठरेल.



कृषिसाधन
सोनाली कदम
कृषी सहाय्यक

नांगरणी करायचीच असेल तर ती हंगाम कोरडा असताना पावसाळ्यापूर्वी मे महिन्यात जमिनीतील ओलावा कमी असताना करावी. यामुळे हार्ड पॅन तयार होण्याचे प्रमाण कमी होते. मातीखाली खोलवर तयार होणारा कडकपणा टाळणे शक्य होते.



# अशी कशी भेट...

**भेट झाली अशी की.. .**
**भेटणे झालेच नाही**
**बोललो इतुकेच दोघे.. .**
**बोलणे झालेच नाही**
**घ्यायचे होते भरूनी.. .**
**डोळे हे डोळ्यात पूर्ण**
**डोळेही भरले असे की.. .**
**पाहणे झालेच नाही**

तू म्हणालास दोन मनांची स्पंदनं अशी दुरून थोडीच ऐकता येतात? सखे, त्यासाठी गुंतावं लागतं.. आतली हाक ऐकावी लागते.. हाक दिली की धावत यावं लागतं.. भेटावं लागतं. पण भेट म्हटलं सोबत दुरावा आलाच!म्हणून ती टाळली तर? बघ ना पांडुरंगाच्या भेटीसाठी जनाई, रामाच्या भेटीसाठी शबरी, कृष्णाच्या भेटीसाठी राधा.. सतत झुरत राहिल्या! किती हे दु:ख! याच दु:खापासून दूर पळणारी मी..



तरंग
मनीषा कुलकर्णी-आष्टीकर
९५११८७५३५३

तू सुखाच्या शोधात! खरं तर ही ओढ मला असायला हवी. भेटीसाठी मी झुरायला हवं.. पण ही ओढ तुझ्यात रूजलेली.या डोळ्यात तुला गुंतायचं होतं. मी मनातल्या मनात भेटत होते.. हेच क्षण जपत होते! तू वाढवत गेलास तृष्णा! शेवटी दोन पाखरांचं व्याकूळ होणं, अधीर होणं, तळमळ, तगमग, तडफड, झुरणं आलंच!

असं वाटायचं, ही भेट म्हणजे भुलवा.. सतत भुलवणारा.. भूल पाडणारा! स्वत:ला विसरून जायला लावणारा! एकदा भेटलं की पुन्हा पुन्हा त्या चक्रव्युहात ओढणारा.. जी पाखरं क्षणासाठी भेटतात त्यांनी का बरं गुंतावं या भुलव्यात?.. .. तरीही ही ओढ कसली होती?

कपाळावरचं झाकलेलं गोंदण.. .उगीच त्याला गिरवत बसलास.पुन्हा त्याच वाटेची भूल तुला पडली. काही स्वप्न फक्त पाहायची असतात.. त्यांना साकारण्याची वाट सोपी वाटली का तुला? तरीही त्या वाटेवर दोघंही चालत गेलो.. बहरत गेलो.. हरवत गेलो.हातातला हात सोडायचा नव्हता. दूरदूरवर जायचं होतं.. नवं विश्व सजवायचं होतं! हा कुठल्यातरी नीरेतला भोवरा का.. खोल खोल जाणारा?.. आणि काळ जसा सरकत गेला तसतसं ही ओढ वाढत गेली.. प्रीत जडत गेली! असं सहजासहजी थोडंच सुटता येतं? सुख म्हणजे काय हेच ना? प्रेमाची ही भाषाच अशी मधाळ.. जगण्यात गोडवा आणणारी.. वेदनेचा अंत करणारी.. सहज, सुंदर आणि सोपी!पण मग साजण भेटीसाठी कायम व्याकुळता.. अधीरताच!

तुझ्या डोळ्यातल्या स्वप्नांना तू पेरत गेलास माझ्या काळजात! असं म्हणतात, काळजातलं सारं जपावंच लागतं! जपत गेले जिवापाड सारं.. फुलवत गेले रान.. उडत राहिली पाखरं हरपून देहभान. रूजवणं असतं सोपं अवघड असतं फुलवणं. करावं लागतं काळजाचं पाणी.. गावी लागतात आर्त गाणी. मी तेच करत गेले.. भेटीसाठी झुरत गेले! हरवले ते सारे क्षण.. करपलं मन! कशा तेजाळतील डोळ्यातील ज्योती.. आयुष्याची राख.. माती! पेरलेल्या स्वप्नबिया गेल्या करपून.. ज्यानं उजळल्या या वाती तो दिवाच गेला विझून!

## जशी संगत, तशी जीवनधारा

आपलं जीवन हे अगदी पाण्यासारखं आहे. पाणी जसं कोणत्याही आकाराच्या भांड्यात तेवढ्याच रूपात सामावून जातं, तसंच आपलं मनही - जिथे लावाल, जसं लावाल, तसंच वळतं. म्हणूनच सांगितलं जातं, संगतीचा प्रभाव खोलवर असतो!

सत्संगात बसलात तर मन शांत होतं, विचार शुद्ध होतात, भक्तिभाव जागतो, जीवनात सकारात्मकतेचं झरण सुरू होतं. पण जर मन लालसेत, क्रोधात, चुगल्यात किंवा अय्याशीत गुंतवलं, तर त्याच मार्गाने आपली जीवननदी वाहू लागते. जसं तुम्ही सतत विचार करत राहता - त्याने एवढं कमावलं, मी कसा कमी?, तसंच लोभ, द्वेष, असंतोष वाढतो. जर मन सतत चिंता करत असेल, तर चिंता आयुष्य व्यापून टाकते. दुःखात गुंतलं तर नकळत आपणच दुःख शोधू लागतो. क्रोध मनात साठवून ठेवलात, तर अगदी क्षुल्लक गोष्टीतूनही आग भडकते. आणि जर अय्याशी, नशा, भोगविलास यांतच मन अडकवलं, तर संपूर्ण जीवन व्यर्थपणे खर्च होतं - आत्मिक समाधानापासून दूर जातं. म्हणूनच आपली संगत, आपले विचार, आपला वेळ - हे सगळं आपण कुठे गुंतवतो हे फार महत्त्वाचं आहे. जेव्हा मन सत्संगात, सकारात्मक लोकांमध्ये, ज्ञानात आणि साधनेत गुंततं - तेव्हाच खरं समाधान, शांती आणि प्रगती मिळते.

तात्पर्य : जसं तुम्ही मन कुठे लावता, तसंच ते घडतं. म्हणून मनाला चांगल्या संगतीत, चांगल्या विचारांत लावणं हेच खरं जीवनसत्त्व आहे. चला, आजपासून आपण ठरवूया - आपली संगत उत्तम असो, मन सत्संगी आणि जीवन उन्नत!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
**जत, जि. सांगली**


# भाविकांचे श्रद्धास्थान पाच बंगला म्हसोबा महाराज देवस्थान

नाशिक-पुणे महामार्गावरून जाताना -येताना इंडिया सिक्युरिटी प्रेसच्या हॉस्पिटलसमोर एका सभामंडपात द्राक्षांच्या घडाप्रमाणे अडकविलेल्या हजारो घंट्या पथिकांचे लक्ष वेधतात. 'अबब! किती या घंट्या?' असे म्हणत हा प्रवासी येथे नतमस्तक होतो. हे आहे पाच बंगला म्हसोबा महाराज देवस्थान. या घंट्या भाविकांच्या श्रद्धेचे, मनोकामना पूर्तीचे प्रतीक होय. मोजता न येणाऱ्या या घंट्या ५० बाय ५० च्या भव्य सभामंडपात अडकविलेल्या बघून प्रवासीही थक्क होतात क्षणभर उभे राहून हात जोडत दर्शन घेतात. सभामंडप पेलू शकणार नाही अशा काही घंट्या पोत्यात भरून ठेवल्याचे मंदिराचे मुख्य विश्वस्त पुजारी दशरथ कदम सांगतात. नाशिकपासून पाच तर नाशिकरोड पासून दोन किलोमीटर अंतरावर हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे. आपली इच्छा, आकांक्षा, मागणे, साकडे, गाऱ्हाणे भाविक येथे मांडतात आणि ते पुर्ण झाले की घंटा अर्पण करतात. ही गत ७५ वर्षांची परंपरा आहे. भाविकांच्या श्रद्धेचे हे प्रतीक आहे. सर्वच वाहनचालक येथे श्रद्धेने नतमस्तक होतात. आपला प्रवास सुखाचा जावो अशी प्रार्थना करतात. मुंबईहून शिर्डीला पायी जाणाऱ्या पालख्यातील साईभक्त दरवर्षी येथे विसावा घेतात. क्षणभरच्या विसाव्याने त्यांचा थकवा दूर होतो. घंटी अर्पण करून अगदी ताजेतवाने झाल्यासारखे होऊन प्रसाद घेऊन पुढे मार्गस्थ होतात.

मुंबईतील दादर, जोगेश्वरी, घाटकोपर, अंधेरी, लालबाग, मुलुंड, भांडुप, मालाड, कांजूरमार्ग, विक्रोळी, डोंबिवली, ठाकुर्ली, ठाणे, भिवंडी या मुंबईकडून शिर्डीला येणाऱ्या पालख्यांचे हे हक्काचे विसाव्याचे ठिकाण बनले आहे. परप्रांतातून येणारे पर्यटक, प्रवासी या घंट्या पाहून आश्चर्यचकित होतात आणि त्याची महती समजून घेतात. येथे माथा टेकवत मार्गस्थ होतात. वारकरी मंडळी त्र्यंबकेश्वर, पंढरपूर येथे जातांना येतांना क्षणभर विसावा घेऊन पुढे जातात. याशिवाय सर्व धर्माचे भाविकही येथे



कुटुंबाचे आरोग्य, लग्न, गृहकलह, नोकरी, धंदा आदीमध्ये बरकत, शांतता, भरभराट व्हावी म्हणून श्रद्धेने नतमस्तक होतात. एवढेच नव्हे तर सिनेसृष्टीतील कलाकारांचेही हे श्रद्धास्थान बनले आहे. अजय देवगन, काजोल, सुषमा शिरोमणी, आलोकनाथ, आदित्य पांचोली, महेंद्र कपूर, गोगा कपूर, रवींद्र मोरे, वीरू देवगन असे अनेक कलाकारही येथे येऊन



प्रासंगिक
‖ एस. आर. सुकेणकर
९८५०१४३०९७

गेले आहेत. प्रीमियर शोपूर्वी फिल्म पेटीचे येथे काही जणांनी पुजनही केलेले आहे. प्रत्येकाच्या श्रद्धेचा हा भाग असतो. त्यामुळेच या सभा मंडपात ५ ग्रॅम पासून १११ किलो वजनाच्या घंट्या बघायला मिळतात. त्यात काही राजकीय मंडळींचाही समावेश असल्याचे त्यावरील नावावरून समजते.

१९५० चा तो काळ. नाशिकरोड ते द्वारका पर्यंतच्या रस्त्याच्या दुतर्फा महाकाय वटवृक्ष छाया देत उभी होती.

या मंदिराच्या जवळ शेताच्या बांधावर महाकाय वटवृक्ष होता. त्याच्या पानांच्या ढिगाऱ्यात असलेली म्हसोबा महाराजांची मूर्ती कदम मळ्यातील प्रेस कामगार लक्ष्मणराव कदम यांच्या स्वप्नात आली आणि त्यांनी हा पालापाचोळा दूर करून या मूर्तीची मातीच्या चौथऱ्यावर स्थापना केली. या स्वयंभू नंदीच्या दृष्टांताने लक्ष्मणराव भारावून गेले होते. त्यांनी मातीच्या चौथऱ्यावर म्हसोबा महाराजांची स्थापना केली. पुढे छोटेसे मंदिरही उभारले. श्रद्धेने सकाळ, संध्याकाळ पूजाअर्चा करत गेले. तेथे कमानीला एका भाविकाने घंटी बांधली आणि त्यानंतर अनेक भाविक श्रद्धेने घंट्या अर्पण करू लागले. तेव्हापासून आतापर्यंत घंटी वाहण्याची परंपरा येथे रुढ झाली. पुढे लक्ष्मणराव स्वतः येथे यात्राही भरवू लागले. त्यांना जय भवानी रोडवरील चव्हाण, लवटे, पाटोळे, गायकवाड, जाचक, थोरात, सहाणे, सरोदे, औटे, घाडगे आदी मळेकरी सहकार्य करत. यात्रेच्या दिवशी प्रातःकाळी बैलगाड्यातून, ट्रॅक्टर मधून मांडव डहाळे आणत. करमणुकीसाठी भजन, किर्तन, प्रवचन, वाघ्या मुरळीचे जागरण, तमाशा, कलगीतुरा असे कार्यक्रमही होऊ लागले. महाराष्ट्राची लोककला येथे जोपासली जाऊ लागली. एवढेच नव्हे तर टांग्यांच्या शर्यतीसुध्दा पुर्वी होत. कुस्त्यांचा फडही येथे अजूनही रंगतो. पन्नास रुपयापासून ते हजार रुपयांपर्यंत रोख रक्कम व भव्य चषक अशी बिदागीही मल्लांना दिली जाते. जयाबाई कॉलनी रोडवर ही यात्रा मोठ्या प्रमाणात भरत गेली आणि मळे विभागात वस्ती वाढली तशी यातील भाविकही येथे येऊ लागले. संस्थापक लक्ष्मणराव कदम यांच्या पश्चात त्यांचे चिरंजीव दशरथ कदम, नातू संदीप, मनोज हेही यात्रा भरविण्यात पुढाकार घेत आहे.

भाविकांची श्रद्धा जागृत देवस्थान म्हणून वाढत गेली आणि नारळ, पुष्प, अगरबत्ती, तेल, कणकेचे दिवे लावून गोड नैवेद्य भाविक देवाला दाखवितात. देवस्थानच्या वतीनेही साई भक्तांना राजगिरा लाडू, मोतीचुर लाडू वाटप करण्यात येतात. चैत्र महिन्यात भरणाऱ्या या यात्रेत दरवर्षी महाप्रसादही वाटप केला जातो. काळाच्या ओघात रस्त्याचे विस्तारीकरणात महाकाय वटवृक्षांनी माना टाकल्या. नाशिकरोड ते द्वारका वटवृक्षांची गर्द छाया लोप पावून डांबरीकरणामुळे उष्णता वाढीने कहर केला. विकासाबरोबर धकाधकीच्या जीवनात भौतिक सुखे वाढली पण मनुष्य मन:शांती गमावून बसला. ती शोधण्यासाठी ही श्रद्धास्थाने दिलासा देणारी ठरतात. त्यामुळे ती जोपासायलाच हवी.

# सिग्नल, ट्रॅफिक सिग्नल





प्रतिबिंब
‖ सुजाता येवले

(पूर्वार्ध)

मार्च महिन्यातील टळटळीत उन्ह, दुपारची बारा-साडेबाराची वेळ, नाशिकरोड दत्तमंदिरचा सिग्नल, वाहने भरधाव वेगाने धावतात. रस्त्याच्या अलीकडे पलीकडे प्रत्येकी चार-पाच ट्रॅफिक पोलीस बंधू उभे. इतक्या उन्हात कोणी सिग्नल तोडून धावतायेत, कोणी हेल्मेट घातलेले नाही, कोणी सीटबेल्ट बांधलेला नाही, कोणा वयस्कर वृद्धाला रस्ता ओलांडून पलीकडे जायचे आहे, तर हात पसरवुन याचना करणाऱ्यांना दूर पाठवायचे आहे, कधी तृतीयपंथीयांना तंबी द्यायची आहे. एका बाजूला नियम तोडणाऱ्यांना कधी समज तर कधी वॉर्निंग, तर कधी चालन, टू व्हीलर वाल्या बायकांना समजावून सांगणे, तर फोर व्हीलर वाले मग ते स्त्री असो अथवा पुरुष त्यांचे लायसन्स तपासणे आणि मध्येच वृद्धांना मदत करणे, तर ट्रिप्सी गाडी चालवणाऱ्या झिपऱ्या हिप्पींना काठीचा तडाखा देणे, अंगी असलेले सर्वच कौशल्य, सौजन्य स्त्रीदाक्षिण्य, समजूतदारपणा, पणाला लावून आपली ड्युटी निभावणे.

इतक्या उन्हाची साधारणपणे घरात बसणाऱ्यांच्या ( बऱ्याच वेळा ऑफिसात ड्युटी करणाऱ्यांच्याही ) डोळ्यावर जेव्हा झोपेची झापड येते तेव्हा हे पोलीस दादा अनेक दूरवर ब्रह्मसंमंध मागे लागल्यासारखे अतिवेगात गाडी चालवणाऱ्यांचे नंबर अचूक टिपतात, कधी फोटो घेतात, तर कधी वॉकीटॉकी वरून पुढच्या पोलिसांना माहिती देतात. हेतु हाच पुढे जाऊन काही अपघात घडायला नको. बऱ्याच वेळेला अगदी आपल्या महानगरातही बरीच पत्ते (ड्रेस) माहीत नसतात. वडिलांनी लहानपणापासून शिस्त लावली आहे, 'पत्ता विचारण्यासाठी किंवा त्या एरियाची माहिती घेण्यासाठी कधीही कोणाचेही दार ठोठावायचे नाही किंवा रस्त्यावर चालणाऱ्या किंवा रिक्षावाल्यालाही विचारायचे नाही. सगळेच सज्जन नसतात. सुहृदपणा किंवा सज्जनपणा हा चेहऱ्यावर लिहिलेला नसतो. अशा वेळेला मदत फक्त पोलीस दादांचीच घ्यायची. ते तुम्हाला कधीही फसवणार नाहीत. आपल्या बोलण्यात अदब, आदर, सुशीलता, सौजन्य असेल तर समोरचा माणूसही सहसा आपल्याला फसवू शकत नाही. पण तरीही नेहमीच सतर्क असलेले बरे. त्यात पोलीस तर जनतेचे सेवक.

अगदी लहानपणी आई वडील दोघेही पोलिसांना दादा म्हणायचे आणि आम्ही मामा. गावात आमचे मोठे कापड दुकान आहे. गाव तसे उत्सवप्रिय, विविध प्रसंगी विविध देवदेवतांच्या मिरवणुका तर कधी निवडणुकांनंतर विजयी पक्षाच्या मिरवणुका गावातून निघत असत. ढोल ताशांच्या तालावर आम्ही बाल मुले मुली मिरवणुकीत नाचणाऱ्यांकडे बघत अंगणात नाचण्याचा प्रयत्न केला की वडील येऊन पकडून घरात नेत. आई पोलीस मामांचा धाक दाखवत असे. पोलीस मामा पकडतात आणि आपले नाक कान कापून टाकतात. दुकानात शर्टींग कापडाचे रूळ घेण्यासाठी आलेले पोलीस हळूच ओरडून म्हणायचे, 'ताई त्यांना बाहेर पाठवा, आहे माझ्याकडे चाकू' कधीही पोलिसांनी आत डोकावून बघितले नाही, की आईने उंबऱ्याबाहेर पाऊल ठेवले नाही पोलिसांनी गावातल्या मुलांवरही संस्काराचे बीज असे पेरले जे महानगरातल्या वास्तव्यातही कामात आले. वयामानाने आम्हीही पोलिसांना दादा आणि आमच्या मुलांना त्यांना मामा म्हणायला शिकवले. आमच्या बालपणाइतकाच आदर आज माझेही लेकरू पोलिसांना देत असतो.

शाळेत नोकरी करत असताना एकदा एका दुसऱ्या शाळेतली मीटिंग संपवून क्टिवाच्या फुटवर बरेच सामान, हँडलला दोन प्लास्टिकच्या बॅग लटकवून, फुटवर कसेबसे पायाचा अंगठा टेकवत मी आमच्या शाळेत परतत होते. समोर उपनगरचा लाल सिग्नल दिसत होता. मनात 'मी पोहोचेपर्यंत सिग्नल हिरवा होऊ दे' म्हणत होते. तोच सिग्नल सुटला आणि मी भरधाव वेगात गाडी शाळेकडे दामटली. दुपारी ऊन भयंकर होते. शाळेत केव्हा एकदा पोहोचते असे झाले होते. एकदाचे पोहोचले पण गाडी लावल्यानंतर सामान बाहेर काढत असताना लक्षात आले की माझी स्वतःची पर्स गाडीवरून कुठेतरी पडली. फुटवरच्या सामानात प्लॅस्टिकच्या सामानाच्या सगळ्यात वर ती ठेवली होती. आणि त्या पर्समध्ये शाळा देत असलेला तुटपुंजा का असेना पगार आणि विद्यार्थ्यांकडून स्काऊट गाइडच्या नावाखाली शाळेने गोळा करायला लावलेल्या जवळजवळ पंधराशे रुपये आणि काही इतर पैसे बँकेचे एटीएम कार्ड (कार्डच्या कव्हरवर एटीएम नंबर लिहिण्याची वाईट खोड त्या निमित्ताने मोडली), मोबाईल इतर चिल्लर आणि बऱ्याच सटरफटर अशा असंख्य वस्तू होत्या. जीवाची घालमेल सुरू झाली. तसेच घरी आले. आधी एटीएम कार्ड ब्लॉक केले. मोबाइलवर रिंग द्यावी का नाही विचार करू लागले. रिंग ऐकून कोणाच्या नजरेस न पडलेली पर्सही कोणीतरी शोधून महिन्याची कमाई आणि इतर वस्तू घेऊन पोबारा करेल ही भीती वाटू लागली. शाळेत एव्हाना बातमी पसरली होती. सगळे सहानुभूतीच्या नावाखाली जणू काही बावळट ध्यान बघावे तसा काहीसा भास झाला. रडू कोसळू लागले होते. सकाळच्या एक कप चहावर कशीबशी तग धरून होते. डबा खाण्याचीही इच्छा होईना. परत गाडी काढली जाण्याचा येण्याचा रस्ता परत धुंडाळून आले पण गर्दीत काही सुचेना, गाडी चालवावी की रस्त्यात इकडे तिकडे बघावे. मीटिंग वाल्या शाळेकडे आले पण तेपण बावळट समजतील की काय! या धाकाने मध्ये जाण्याचे धाडस केले नाही. परत जाताना इच्छामणी विघ्नहर्त्याला अकरा रुपये चढवण्याचा नवसही केला. शाळेत आले आणि लेक्चरसाठी गेले. लेक्चर चालू असतानाच घरून मैत्रिणीचा म्हणजे अक्षताचा फोन आला घरी पोलिस आले होते. म्हाताऱ्या सासूबाई आणि लहान लेकरू घाबरले होते. त्यांना याच्यातले काही माहितीच नव्हते. पोलिसांच्या हातात पर्स बघून आणि माझ्या गाडीच्या चावी सारखी चावी त्यांच्या हातात बघून सासूबाईंनी पोलिसांना काहीही न विचारताच हंबरडा फोडला. माझ्या मुलाला पोटाशी धरून त्या रडू लागल्या. मूलही कावरे बावरे झाले होते.

(पुढील अंकात)

**राजकारण हे किती बेभरवशाचे आणि अळवावरचे पाणी आहे, याचा प्रत्यय हा वेळोवेळी येतच असतो. निवडणुकीच्या तोंडावर तर पक्षात येणाऱ्यांचे आणि दुसऱ्या पक्षात उड्या मारणाऱ्यांचे प्रमाण लक्षणीय वाढते. तिकीट मिळाले नाही की, पक्षनिष्ठा, पक्षांचे विचार, कार्यप्रणाली हे सारे गुंडाळून ठेवत दुसऱ्या पक्षात उड्या मारणारे काही कमी नाही. विधानसभेच्या निवडणुकीअगोदर अशा सोयीस्करपणे उड्या मारल्यानंतर पुन्हा घरवापसी करणारेही राजकारणात पदोपदी पाहावयास मिळतात. निवडणुकीत मुशाफिरी करून येणाऱ्यांना मूळ पक्षातील नेतेमंडळीही पुन्हा पावन करून घेत आहेत.**





# येणाऱ्याने येत जावे.. जाणाऱ्याने जावे!

**परामर्श**
**भागवत उदावंत**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने अचानक मारलेल्या मुसंडीमुळे विधानसभेला महाविकास आघाडीमध्ये जाणाऱ्यांची रांगच लागली होती. काही जण तर हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे लागले होते. परंतु, लोकसभेला हवेत गेलेल्या महाविकास आघाडीचे विमान विधानसभेला दणकण आदळले. लोकसभेच्या यशाने हुरळून महाविकास आघाडीत गेलेल्या मंडळींचा नंतर मात्र कपाळमोक्ष झाला. आता पाच वर्षे विरोधात राहून करणार काय? याचा विचार करुन काही मंडळींनी झाले गेले विसरुन आम्हाला पदरात घ्या म्हणून पुन्हा घरवापसी केली. तर काहींनी महायुतीच्याच इतर घटक पक्षामध्ये स्वत:ला सेफ करण्यासाठी प्रवेश करून घेतला. नाशिकमध्ये अशा मंडळींची संख्या काही कमी नाही. विशेष म्हणजे राजकारणात कुणी कुणाचा सदा सर्वकाळ मित्र वा शत्रू नसतो. याची प्रचिती यानिमित्ताने सद्या येत आहे. काही मंडळी अजूनही कुंपणावर असून, ते कधीही घरवापसी करु शकतात. सांगण्याचे तात्पर्य एकच की राजकारण हे पूर्वी निष्ठेने केले जात असत. निवडणुकीत जय पराजय झाला तरी पक्षाची असलेली बांधिलकी जोपासण्याचे काम करणारी मंडळी होती. नीतिमत्ता या शब्दालाही धार होती. आज ते दिवस राहिलेले नाही. राजकारण हे सोयीनुसार त्याहीपेक्षा फायदा कुठून होईल, हे पाहून केले जात आहे. निवडणुकीच्या काळात पक्षात कोलांटउड्या मारणे किंवा दुसऱ्या पक्षाशी घरोबा करणे हे काही नवीन नाही. परंतु सध्या कोणत्याच निवडणुका नाही. जिल्हा परिषद पंचायत समिती वा महापालिका निवडणुकांचे भवितव्य न्यायालयाच्या कचाट्यात अडकून पडले आहे. असे असताना मालेगावच्या प्रसाद हिरे आणि त्यांच्या पत्नी गीतांजली यांनी केलेला भाजपा प्रवेश आणि तीन महिन्यांतच शिवसेनेतून बाहेर पडलेल्या हेमलता पाटील हे गेल्या आठवड्यात चर्चेचे विषय झाले.

महाराष्ट्राच्या राजकारणात दबदबा निर्माण केलेल्या व कधी काळी थेट मुख्यमंत्रिपदासाठी ज्यांचे नाव घेतले गेलेल्या कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या पुढच्या पिढीने राजकारणात परिस्थितीनुसार वेगवेगळ्या पक्षांची मुशाफिरी केली. प्रशांत दादा हिरे यांनी नारपारचा प्रश्न मार्गी लागावा म्हणून तेव्हा शिवसेनेत प्रवेश केला. त्यांचे एक सुपुत्र अद्वय हे भाजपा नंतर ठाकरे गटात गेले. दुसरे अपूर्व हिरे यांनीही अजित पवार यांची राष्ट्रवादी सोडून निवडणुकीपूर्वी ठाकरे गटात प्रवेश केला मात्र, विधानसभेला वारे फिरले आणि पुन्हा आता अजित पवार गटात दाखल झाले. अशीच परिस्थिती भाजपाच्या विक्रम नागरे यांची झाली. निवडणुकीपूर्वी ठाकरे गटात ते गेले. परंतु विधानसभेला महाविकास आघाडीची जादू चालली नाही. त्यामुळे आता शिंदे गटात जाणे त्यांनी पसंत केले. मालेगावच्या राजकारणातील हिरे घराण्यातीलच माजी मंत्री डॉ. बळीराम हिरे यांचे सुपुत्र प्रसाद हिरे यांनीही काळाची पाऊले ओळखत आता भाजपात प्रवेश केला. तसे पाहू गेल्यास प्रसाद हिरे यांच्यासाठी भाजपा हा काही नवीन नाही. यापूर्वीही ते भाजपात होतेच. मालेगाव बाह्य हा आताचा आणि तेव्हाचा दाभाडी मतदारसंघात दोन हिऱ्यांच्या भांडणात दादाजी भुसे यांना आमदारकी मिळाली होती. त्यानंतर प्रसाद हिरे यांना राजकारणात काही सूर सापडला नाही.

मधल्या काळात आपली संस्था भली आणि आपण भले. असे त्यांचे राजकारण चालले. परंतु संस्था चालविताना सरकारची साथ लाभली तर कदाचित संस्थेची भरभराट होते. हा विचार डोळ्यासमोर ठेवून त्यांनी सरकारच्या सावलीत जाणे पसंत केले आहे. यापूर्वी काँग्रेसचे तुषार शेवाळे यांनीही भुसेंना विरोध करुन पाहिला. परंतु भुसेंनी त्यांनाही धुळ चारली. त्यानंतरच्या काळात शेवाळे हेच भाजपात गेले. आणि कधीकाळी भुसेंचे विरोधक असलेले शेवाळे मग भुसेंच्या प्रचारात दिसले. मालेगाव म्हणजे सद्या सबकुछ दादा भुसे असे वातावरण आहे. इतर पक्षांचा येथे काहीच मागमूस लागत नाही. काँग्रेस, जनता दल, समाजवादी, एमआयएम यांचे वर्चस्व मालेगाव शहरापुरते मर्यादित आहे. त्यातही मालेगाव शहराचे आमदार असलेले मौलाना मुफ्ती यांनीही अनेक पक्षांची मुशाफिरी करत आमदारकी मिळविलेली आहे. आता ते देखील सरकारच्या सावलीत विसावले आहेत. मालेगावच्या ग्रामीण भागात भाजपाला पक्षाची पाळेमुळे रुजवण्यासाठी प्रसाद हिरे यांची बऱ्यापैकी मदत होऊ शकते. मालेगाव भागात भाजपाला प्रभावी कुणी नेतेमंडळी नव्हती. ही कमी प्रसाद हिरे हे भरून काढू शकतील. हिरे यांची शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेचे सभासद, शिक्षक यांचा उपयोग होऊ शकतो. त्यातून भविष्यात जर स्वतंत्र निवडणुका लढविण्याची वेळ आलीच तर प्रसाद हिरे हे भाजपाकडून पुन्हा एकदा नशिब अजमावू शकतात. असा जरी विचार असला तरी अजून चार साडेचार वर्षांचा कालावधी आहे. तोपर्यंत मोसम नदीतून बरेच पाणी वाहून जाईल. आज असलेली परिस्थिती २०२९ ला राहिलच याचीही काही शाश्वती नाही. पण यानिमित्ताने मालेगावचे हिरे घराणे राजकारणात संधी मिळण्यासाठी धडपडत आहे.

नाशिक मध्य मतदारसंघात काँग्रेसची उमेदवारी मिळाली नाही म्हणून नाराज झालेल्या काँग्रेसच्या माजी प्रवक्त्या डॉ. हेमलता पाटील यांनी शिवसेनेचे धनुष्यबाण हाती घेतले. पक्ष प्रवेशासाठी थेट दिल्लीत धडक दिलेल्या हेमलता पाटील यांनी अवघ्या तीनच महिन्यात शिवसेनेचा राजीनामा दिला. काँग्रेसमध्ये अनेक वर्षे स्थिरस्थावर झालेल्या हेमलता पाटील यांचे मन शिवसेनेत काही रमले नाही. आता भविष्यात त्या कुठे जातील, याबाबत काही अजून त्यांच्याकडून भूमिका स्पष्ट झालेली नाही. शिंदे यांच्या शिवसेनेत सद्या मोठी भाऊगर्दी झाली आहे. मूळच्या शिवसेनेतील मंडळी शिंदे गटात गेली खरी परंतु मूळ स्वभाव आणि कार्यपद्धती तशीच असल्याने येथेही गटबाजीचे पहिले पाढे पंचावन्न दिसून येतात. प्रवीण तिदमे, अजय बोरस्ते यांचे दोन स्वतंत्र गट दिसून येतात. त्यामुळे पक्षात प्रवेश करणाऱ्यांनाही या गटातटाचा सामना करावा लागतो. आगामी महापालिका निवडणुकांमध्ये तर हे गटतट आणखी उफाळून येऊ शकतात. पक्ष प्रवेशाच्या वेळीही गटबाजीचे प्रदर्शन घडते. शिंदे गटाच्या महिला आघाडीने खरे तर कार्याचा विस्तार करायला हवा. संघटनात्मक बांधणी करणे गरजेचे आहे. त्यासाठी अधिक मेहनत घेण्याची गरज आहे. हेमलता पाटील या शिवसेनेत गेल्या परंतु तेथे न थांबण्यास काही कारणेही असू शकतात. त्यासंदर्भात त्यांनी भूमिका जाहीर केलेली नाही. आता त्या पुन्हा काँग्रेसमध्ये परततात की आणखी दुसऱ्या पक्षात जातात. हे आगामी काळात समजेलच. पण वर्षानुवर्षे एकाच पक्षात राहिलेल्या मंडळींना दुसऱ्या पक्षाची ध्येय धोरणे, कार्यपद्धती ही सहजासहजी पचनी पडत नाही.


शिवसेनेतील यापूर्वी सुनील बागूल, वसंत गिते, विनायक पांडे या मंडळींनीही इतर पक्षाची मुशाफिरी करुन पुन्हा शिवसेनेतच आपला जम बसविलेला दिसून येतो. लेखाच्या सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे राजकारणात निश्चित असे काहीच नसते. ते सोयीचे असते त्यानुसार केले जाते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भविष्यात आणखी काही मंडळी कोलांटउड्या मारण्याची शक्यता नाकारता येत नाही. पक्ष नेतृत्वही येणाऱ्याने यावे, जाणाऱ्याने जावे.. अशा भूमिकेत वावरत असते. यानिमित्ताने एवढेच.

**जिल्हा बँक संकटात टाकणारे हजारो हात आहेत. फक्त संचालकांनी चुकीचे कर्ज वाटप केले हा आरोप अशत: बरोबर असला तरी शंभर टक्के बरोबर नाही. चुकीच्या कामासाठी शेतीवर व्यवसायावर कर्ज घेणाऱ्यांना शिफारस करणाऱ्या संचालकांवर दबाव टाकणारे सोसायटीचे संचालक मंडळाचे नेते पण जबाबदारीतून पळ काढू शकत नाहीत.**



# जिल्हा बँक बुडवणारे हजारो हात

**मनातलं**
**अशोक थोरात**
लखमापूर (बागलाण)
७५८८०४०३६३



कारण सोसायटीच्या संचालक मंडळाचा नेताच बँक संचालकाचा मतदार होता व त्याने समजा दोन पाच लाख रुपये घेऊन मतदान केले व म्हणून आपण संचालक झालो ही जाणीव ठेवून त्याने सांगताच कर्ज प्रकरण मंजूर केले जात होते. हे कर्ज देताना सर्व तपासून देण्याची जबाबदारी बँक कर्मचाऱ्यांची पण होती पण संचालकच अन्नदाता मग काय आदेश पाळताना चूक का बरोबर बघावेसे वाटत नव्हते. म्हणजे बँक बुडवणारे अनेक घटक आहेत.

स्थानिक पातळीवर सोसायटी सभासद संचालक मंडळाच्या नेत्याला भेटला व मुलीचा साखरपुडा विवाह वगैरे कारण सांगून सोसायटीकडून म्हणजे बँकेकडून कर्ज द्या, विनंतीनंतर हाच काल मतदार होता व उद्याचा मतदार हाच मग काय करा शिफारस व दिले कर्ज. लग्नात पैसे खर्च केल्यावर कसले शेतीचे उत्पन्न कसले काय झाला गडी थकबाकीदार. सत्तेवर यायचेच तर पहिला शब्द सत्तेवर बसवा. सातबारा करतो कोरा ही फॅशनच झाली व तेच बरोबर महायुतीच्या अंगलट आले. शब्द पाळता येत नसल्याची हेच थकबाकी वसुली करीत आहेत.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंनी असेच विधान केले. काय तुटून पडले त्यांच्यावर सर्व बाजूने पण ते विधान अनेकांना बरोबरच होते. पण स्वत: माणिकरावच बँकेचे देणेकरी असल्याने त्याचा फायदा उठवत त्यांना टार्गेट करणे सोपे झाले. नाशिकला बँकेत सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांनी ठरावीक शेतकऱ्यांना बोलवले व बँक वाचवण्यासाठी चर्चा केली. पण बँकेने बोलावले फक्त कर्जमाफी द्या थकबाकी दारावर कारवाई करू नका. यासाठी आंदोलन करणारे भांडणारे प्रतिनिधी. मला पण आमंत्रण होते. मी गेलो व लक्षात आले. बँकेचे उद्याचे मरण आजच व्हावे, अशा भूमिकेतील मंडळीचा मीटिंगवर ताबा होता. कर्जमाफी करा, नॅशनलाइज बँकेप्रमाणे ओ. टी.एस. राबवा म्हणजे दहा-बारा पंधरा वर्षांचे व्याज माफ करून मुद्दलात सवलत द्या. अजबच अपेक्षा होती. नंतरची सूचना व्याज माफ करून मुद्दलाला दहा वर्षांचे हप्ते करा.

या अपेक्षा बघून बँक कशी वाचणार हा प्रश्न उपस्थित होतो, मी एकमेव जे सुरू होते मान्य नव्हते असा होतो. शेवटी चार शब्द बोलून निघून आलो. थकबाकीदारांच्या विषयात मीटिंग सुरू आहे. नियमित कर्ज फेडणाऱ्यांचे काय. खरे बोललो दहा टक्के शेतकरी वेगवेगळ्या अडचणीमुळे थकबाकी दार आहेत. आपण थकबाकीदारांच्या आर्थिक कुंडल्या काढा मग ठरवा.

माजी संचालकांवर १८२ कोटी वसूल करा. पण अधिकाऱ्यांना या मागण्या मान्य करायचा कोणताच अधिकार नव्हता फक्त जिल्हाधिकारी व लोकप्रतीनिधींना होणाऱ्या मीटिंगमध्ये तुमच्या भावना कळवतो व मीटिंग संपली.

ना. माणिकराव कोकाटेंनी वसुलीला तीन महिने स्थगिती दिली म्हणून चौथ्या महिन्यात कुणीच कर्ज भरणार नाही. आता बँक वाचत नाही हे नक्की. बँकेचे प्रशासक प्रतापसिह चव्हाण खमके व अभ्यासू अधिकारी आहेत. त्यांना सर्व अधिकार दिले तरच बँक वाचणार आहे हे नक्की. खरे तर जिल्ह्यातील मोजून तीनशे कुटुंबांनी सर्व सहकार संपवला ही वस्तुस्थिती आहे.

मोठ्या अपेक्षेने कष्टाने साखर कारखाने, सूत गिरणी, शेतकी संघ, दूध संघ, अनेक पतसंस्था अनेक खऱ्या खोट्या कागदावरील सहकारी संस्थांत व गावागावातील सहकारी सोसायटीत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे हजारो कोटी रुपये बुडाले आहेत. सहकारी सोसायट्यांचे अद्याप बुडीत झाले नसले तरी बँकेची अशी स्थिती राहिली तर ते पण बुडाल्यात जमा आहेत. एकंदरीत गिसाका वसाका गिरणा बँकेसारख्या बऱ्याच बँका नासाका, रासाका, नासाकाप्रमाणे अनेक संस्था संपल्या पण जनतेच्या कष्टाचे पैसे गिळंकृत करून संस्था संपवल्या. आताच्या भूमिकेवरून बँक बुडाल्यात जमा आहे. शासनाने ६०० कोटी दिले व त्याचा नीट वापर केला तर थोडे जीवदान मिळेल.


जनतेच्या प्रचंड ठेवी अडकून पडल्या. जगायला मरायला लग्नाला कशालाच पैसे मिळत नाहीत व कृषिमंत्री म्हणतात ठेवी ठेवा. कुणीच फसणार नाही. बँक वाचवायची असेल तर ऐपत असून थकबाकी न भरणाऱ्यावर कडक कारवाई करून वसुली केली तरच बँक वाचण्याची संधी आहे. नाही तर लवकरच बँकेसह सहकारी सोसायट्या बंद पडतील. संचालक मंडळ बरखास्त, कुणीतरी लक्ष न देणारा नामधारी प्रशासक येईल व विषय संपला बस हेच होणार आहे.

**राज्यात सर्व जिल्ह्यांत बोगस शिक्षक भरती झाली असून, बॅक डेटेडच्या नावाखाली हजारो शिक्षकांना मान्यता देऊन जवळपास ५०० कोटी रुपयांचा घोटाळा झाला असल्याची माहिती माजी शिक्षक आमदार ना. गो. गाणार यांनी एका मुलाखतीत दिली आहे. हा घोळ शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची माहिती त्यांनी या मुलाखतीत दिली आहे.**



# शिक्षण विभागात चाललंय काय?

**कटाक्ष**
**के. के. अहिरे**
९९६०६०३१८२



दि. २ मे २०१२ पासून प्राथमिक ते १२ वीपर्यंत शिक्षक भरती बंदी होती. शासन निर्णयान्वये राज्यातील शिक्षक पदाच्या नियुक्तीला बंदी टाकण्यात आली होती. या बंदीला न जुमानता, या बंदीला फेकून देऊन संस्थाचालकांनी हजारो नियुक्त्या केल्या. प्रत्येक नियुक्तीमागे २० ते २५ लाख रु बेरोजगार युवकांकडून उकळण्यात आले. आणि त्यांना नियुक्त्या देण्यात आल्या. मान्यता देताना शिक्षणाधिकारी यांनी ५ ते १० लाख रु. घेऊन त्यांना मान्यता देण्यात आल्या. आणि शिक्षण उपसंचालकांनी या मान्यतांना शालार्थ आयडी प्रदान केली. शासनाची बंदी असताना शासनाच्या तिजोरीवर करोडो रुपयांचा अपहार करून शिक्षक पदाच्या नियुक्त्या करून पैसे उकळण्यात आले. संस्थाचालकांनी पैसे उकळले, शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक आणि त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी शासनाची तिजोरी लुटून पैसे खाल्ल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सुद्धा या व्यवहारात आपले हात धुऊन घेतले आणि या सर्वांना संरक्षण दिले. नागपूर विभागात एक शिक्षणाधिकारी वारले तरी त्यांच्या हस्ताक्षरातील मान्यता दिल्या गेल्या इतका मोठा भ्रष्टाचार शिक्षण विभागात सुरु आहे. आदेश बॅक डेटेड असतात, नियुक्ती बॅक डेटेड असतात आणि थकबाकी लाखो रुपयाच्या वेतनाची वेतन पथकाकडून अदा केली जाते. हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा भ्रष्टाचार शिक्षण व्यवस्थेत सुरू आहे आणि हा व्यवहार राज्यातील सर्व जिल्ह्यात मोकाटपणे सुरू आहे. याबद्दल शिक्षक संघटनांनी वारंवार तक्रारी केल्या, प्रश्न विचारले पण तात्पुरते एखाद्यावर चौकशीचे नाटक करून हा व्यवहार सर्व जिल्ह्यात सुरू आहे. शिक्षण विभागातील अनेक अधिकाऱ्यांबाबत अनेक तक्रारी,लक्षवेधी,एसीबी कार्यवाही झाल्यात पण तेच अधिकारी आजही सेवेत आहेत. लक्षवेधी विचारणाऱ्या आमदाराच्या जिल्ह्यातच हे अधिकारी आजही सेवेत आहेत, मग लक्षवेधीचे नेमके काय होते असा प्रश्नही शिक्षक संघटना विचारत आहेत. ते म्हणाले की मी अनेकदा तक्रारी केल्या, चौकशी प्रशासकीय स्तरावर झाली, ५९ शिक्षणाधिकारी दोषी ठरलेत, त्यावर शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी चौकशीचे आदेशही दिले, पण नंतर त्यावर काय कार्यवाही झाली हे अद्याप समजले नाही याचा अर्थ कुठेतरी गौडबंगाल आहे हे नक्की? मंत्रालयात पैसा पुरवला गेल्यामुळे नसत्या पेंडिंग ठेवण्यात आल्या. निम्म्यापेक्षा जास्त शिक्षणाधिकारी सेवानिवृत्त झाले, तर काही वाटेवर आहेत. सर्वांना सेवानिवृत्त होण्याची वाट मंत्रालय पाहतंय की काय असे म्हणावे लागेल. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर चौकशीचे नाटक शासन करेल आणि हा भ्रष्टाचार तसाच थांबून जाईल. या प्रकरणात संपूर्ण राज्यातल्या नियुक्ती, मान्यता,बोगस शिक्षक भरती, शालार्थ आयडी यांची जर एसआयटी मार्फत चौकशी केली तर खऱ्या अर्थाने शिक्षण विभागातील भ्रष्टाचार समाजापुढे येईल त्यासाठी समाजाने पुढे आले पाहिजे अशी मागणी ना. गो. गाणार आणि शिक्षक संघटनानी केली आहे. आजही नियुक्ती मधला भ्रष्टाचार सुरूच आहे. अल्पसंख्याक शाळांमध्ये जास्त मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. चौकशीसाठी जेव्हा अधिकारी येतात तेव्हा शेकडो नस्ती उपलब्ध नसतात, जाळून टाकलेल्या असतात, असाही आरोप त्यांनी केला आहे. या भ्रष्टाचाराला तडा लावल्याशिवाय शिक्षणाचे पावित्र्य टिकणार नाही,यासाठी समाजात जागृती होणे खूप गरजेचे आहे.त्यासाठी शिक्षक संघटनांनी एकत्र येऊन मोठा उठाव केला पाहिजे.

सध्याच्या शिक्षणमंत्र्यांनी या गंभीर बाबींकडे खऱ्या अर्थाने लक्ष दिले पाहिजे, अशी मागणी शिक्षक, शिक्षकेतर समन्वय समितीनेही केली आहे. तसे निवेदने पण दिली आहेत. राज्यातील शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक, शिक्षण खात्याचे एजंट व त्यांचे सहकारी यांनी संगनमत करून त्रयस्थ व्यक्तीच्या तक्रारीकडे लक्ष विचलित करून व दिशाभूल करून गुपचूप शासनाची कोट्यवधी रुपयांची दिशाभूल केली आहे. त्यासाठी एसआयटीमार्फत चौकशी केल्यास सर्व गौडबंगाल बाहेर येईल पण अशी चौकशी न करण्यामागचे कारणही समजत नाही. विशेष म्हणजे, विरोधकांनी तक्रारी केल्या असत्या तर समजू शकले असते, पण सत्ताधारी पक्षाचे माजी शिक्षक आमदार जर तक्रारी करत असतील तर ते नक्कीच सत्य म्हणावे लागेल. शासनाचे बनावट कागदपत्र तयार करणारे अधिकारी मंत्रालयात बसलेले आहेत. बनावट कागदपत्र परस्पर तयार करून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारत आहेत, करोडो रुपयांची झोळी मात्र स्वत: भरत आहेत. मागे अशाच प्रकारच्या एका संघटनेने मंत्रालयात वेतन अधीक्षकांना उपशिक्षणाधिकारी पदावार नियुक्ती मिळावी म्हणून असे आदेश काढून त्या नियुक्त्या मिळवल्या असल्याचे बोलले जाते. त्यात उपशिक्षणाधिकारी दर्जावार नियुक्ती होताना शिक्षक म्हणून त्या व्यक्तीचे काम असले पाहिजे पण अनेकांना तो अनुभव नसताना या नियुक्त्या झाल्याचे लोक बोलत आहेत. त्याही प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. अनेक वर्षापासून पडताळणी,सुनावणीचे ढोंग करून, शासन आदेशाचे गैर अर्थ काढून न्यायालयाचाही अवमान अनेकदा झाला आहे. एका शिक्षणाधिकाऱ्याने न्यायालयाचा अवमान केला म्हणून त्यांच्या सेवापुस्तिकेत न्यायालयाचा अवमान केला असे लिहिण्याण्याचे आदेश केले आहेत अशी माहिती मिळाली आहे.न्यायालयाचा अवमान करणारे अधिकारी सेवेत कसे राहतात हेही आश्चर्यकारक आहे.

बनावट प्रकरणाबाबत शासनाकडे व शिक्षण विभागाकडे पाठवलेल्या पत्राचे, प्रकरणाचे उत्तर, आदेशाची वाट न पाहता अनेक तक्रारी निकाली काढून शासन आणि आम जनतेची दिशाभूल, आर्थिक फसवणूक अधिकारी करत आहेत. खरे तर सर्व सुनावण्या, पडताळणी मीडिया समोर केल्या पाहिजेत जर त्यात कागदपत्र बनावट असतील तर तक्रारदाराविरोधात शासनाने कार्यवाही केली पाहिजे पण तसे का घडतं नाही तर त्यामागे आर्थिक उलाढाल हेच मुख्य कारण आहे. अनेकदा शिक्षक संघटनांनी काही प्रकरणे शिक्षण विभागात दाखल केली जातात तेव्हा अधिकारी काहीतरी कारणे दाखवून ती प्रकरणे करत नाहीत मात्र त्याच कर्मचार्याकडून आर्थिक उलाढाल झाली तर प्रकरण लगेच मंजूर केल्याची अनेक उदाहरण आहेत. शासनाचा बनावट शासन निर्णय दि. ५ जानेवारी २०१२ आणि शाळा स्थलांतर / हस्तातरचे बनावट शासन आदेशाबाबत शासनाचे आदेश नसताना सुद्धा त्यांच्यावर नेमण्यात आलेले कर्मचाऱ्यांचा देखील शालार्थ आय.डी अनियमित मार्गांचा अवलंब करून देण्यात आल्याचे समजते. उच्च न्यायालयाने ज्या शाळेच्या याचिकेला अंतरिम आदेश दिले नाहीत आणि सदर शाळांमध्ये एक कर्मचारी दुसऱ्या शाळेत सन २०१९ अखेरपर्यंत सेवेत असताना त्या कर्मचाऱ्यांची वैक्तिक मान्यता सन २०१२ ची दाखवून वैक्तिक मान्यता घेतलेल्या अनेक बॅक डेटेड केसेस आहेत. असे कर्मचारी शालार्थ आयडी करण्यात आलेले आहेत. यात शिक्षण विभागातील वेतन अधीक्षकाच्या पत्नीचाही समावेश असल्याचे कळते. कधीच शाळेत न गेलेल्या या कर्मचाऱ्यांचे फरक बिलेही निघालेली आहेत या मुळे शासनाच्या तिजोरीवार मोठा फटका बसला आहे त्याचीही चौकशी झाली पाहिजे, विशेष म्हणजे हे कर्मचारी ज्या शाळेत आहेत त्यांनीच नाव न देण्याच्या बोलीवर तक्रारी केल्या आहेत. एसआयटीमार्फत याची चौकशी केल्यास शिक्षण विभागात फार मोठा घोटाळा उघडकीस येईल त्यासाठी शिक्षणमंत्री महोदयांनी गप्प न बसता ही प्रकरणे उजेडात आणली तर शिक्षक त्यांना डोक्यावर घेऊन नाचतील ही सत्यता आहे.

# अध्यात्माच्या वाटेवरचे काटे वेचायला हवेत!

## समाजभान




अनिल उदावंत
ज्येष्ठ प्रशिक्षक,
समुपदेशक व साहित्यिक
९७६६६६८२९५

सध्या म्हणजे फेब्रुवारीपासून मे महिन्यापर्यंतच्या चार महिन्यांत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतल्या लहान-मोठ्या गावा-गावांत यात्रा, जत्रा, उत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताह यांसारख्या कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. गावोगावची ग्रामदैवते आणि त्यांच्या यात्रा, जत्रा हा वर्षातल्या एका दिवसाचा विषय म्हणून आपण नक्कीच समजू शकतो; पण अध्यात्माच्या नावाने सुरू असलेले गावोगावचे अखंड हरिनाम सप्ताह आणि त्यासाठी लोकवर्गणीतून केला जाणारा लाखोंचा अनाठायी खर्च पाहता हे प्रकरण आता तितकंसं साधं, सोपं राहिलेलं नाही हे लक्षात घ्यावं लागेल. या सप्ताहांमध्ये येणारे एकेक किर्तनकार महाराज चाळीस-पन्नास हजार रुपयांची बिदागी घेऊन जातात! त्याच्या मोबदल्यात गावकऱ्यांना ते नेमकं काय देतात? लोकांना ते असं काय सांगतात? हा विषय कुणीतरी गंभीरपणे अभ्यासायला हवा. किर्तनकेसरी, वेदांतशास्त्री, रामायणाचार्य, भागवताचार्य, प्रबोधनकार किंवा गेला बाजार विनोदाचार्य यासारखी एखादी स्वयंघोषित उपाधी आपल्या नावापुढे लावून चमकोगिरी करणाऱ्यांचे हे सुगीचे दिवस आहेत असं वाटावं अशी सगळी परिस्थिती आहे. काही सन्माननीय अपवाद वगळले तर या कीर्तनांनी केवळ करमणुकीच्या कार्यक्रमाची जागा घेतलेली दिसते. कीर्तनानं समाज सुधारत नाही आणि तमाशानं तो बिघडत नाही! असं म्हणत किर्तनाचा तमाशा होऊ घातलाय की काय असा प्रश्न कुणाला पडत असेल तर ते दुर्लक्षिता येईल काय?

अनेक गावांतल्या शाळेला चांगली व पुरेशी इमारत नाही. गावात ग्रंथालये नाहीत. अभ्यासिका नाहीत. व्यायाम शाळा नाहीत. मुलांना खेळायला मैदानं नाहीत. अशा परिस्थितीत गावातल्या मुलांच्या शिक्षणाचं मातेरं आणि आरोग्याचं पोतेरंच होणार! हे त्या गावात राहून हे सगळं याचि देही याचि डोळा अनुभवणाऱ्या गावकऱ्यांपैकी कुणाच्याच कसं लक्षात येत नाही?

वास्तविक अध्यात्म याचा अर्थ आधी आत्मा. म्हणजे माणसानं सर्वात आधी आपल्या आत्म्याचा ध्यास घेतला पाहिजे. मी म्हणजे माझा आत्मा. तो कोण आहे? हा प्रश्न आपल्याला पडायला हवा. हा प्रश्न तुमच्या-आमच्या मनात निर्माण व्हावा यासाठी उपयुक्त ठरणारं चिंतन या कीर्तनांमधून व्हायला हवं. ते होतंय का? या प्रश्नाचं उत्तर सपशेल नाही असंच द्यावं लागतंय. आमची कथा, आमची प्रथा, आमची संस्था, आमचं मंदिर, आमचा आश्रम आणि तुमचे श्रम! असा जप करणाऱ्यांसाठी आम्ही आमच्या कष्टाची कमाई दान करायची. तुमच्या लेखी हेच खरं अध्यात्म असेल तर मग मात्र बेसिकमध्येच मोठा फॉल्ट आहे! अध्यात्म



विषय बारकाईने समजून घ्यायचा प्रयत्न केला तर हे सांप्रतकाळचे व्यापारी कीर्तनकार हेच सामान्य माणसाच्या अध्यात्माच्या वाटेवरचे काटे आहेत! असंच आपण म्हणायला हवं.

अध्यात्म म्हणजे जीवनाचा अर्थ, उद्देश आणि योग्य दिशा शोधणे. अध्यात्म ही फक्त विशिष्ट साधना किंवा सराव नाही, तर तो एक व्यापक दृष्टिकोन आहे जो आपल्या अंतःकरण आणि आत्म्याशी संबंधित आहे. अध्यात्म आपल्याला जीवनातील अंतिम सत्य शोधायला प्रवृत्त करते. अध्यात्म आपल्या अस्तित्वाचा अर्थ आणि आपल्या जीवनाचा उद्देश शोधायला मदत करते. अध्यात्म आपल्या वैयक्तिक विकासाला प्रोत्साहन देते. ते आपल्याला व्यक्तीगत विकासाची योग्य वाट दाखवते. आपल्या ठायी आत्मजागृती निर्माण करते. आपल्या भावना, विचार आणि वर्तनामध्ये असे काही बदल घडवून आणते, की ज्यामुळे आपण अधिक आनंदी आणि समाधानी होऊ शकतो.

कुठल्याही परिस्थितीला तोंड देण्यास या देहाला संपूर्ण तयार करते ते ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. आत्मज्ञान समस्यांना नष्ट करते. हे आत्मज्ञान शिकवणारे शास्त्र म्हणजेच अध्यात्म होय. आपले मन शांत आणि स्थिर करण्याचा मार्ग म्हणजे अध्यात्म होय. आता आपल्या मनाला शांत आणि स्थिर का करायचे? हे का आवश्यक आहे? हे समजण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊया -

गावोगावी सुरु असलेल्या जत्रांमध्ये पाच-दहा रुपयांना एक भिंग मिळते. अनेक लहान मुलं ते विकत घेतात. प्रखर सूर्यप्रकाशात या भिंगाच्या खाली धरलेला कागद फक्त २-३ मिनिटात पेट घेतो. त्यामुळे मुलांना हा खेळ खूप आवडतो. यातलं भिंग एका जागी २-३ मिनिटे स्थिर धरलं तरच कागद पेट घेईल. तुम्ही भिंग अस्थिर ठेवलंत तर काही तासानंतरही कागद पेट घेऊ शकणार नाही! आपल्या उदाहरणातलं हे भिंग हे जसं काही आपलं मन आहे. ते स्थिर असेल तर तुम्हाला अपेक्षित परिणाम मिळवता येतील. तुमचं मन अस्थिर असेल तर तुम्हाला तुमचे अपेक्षित परिणाम मिळवता येणार नाहीत.

तुम्ही म्हणाल, हे तर विज्ञान आहे. याचा अध्यात्माशी काय संबंध? अध्यात्म आणि विज्ञान असा फरक करण्यात आपला कोणताच फायदा नाही. कारण अध्यात्म हे ज्ञान असून, विज्ञान ही ज्ञान सत्यापित करण्याची एक पद्धत आहे. म्हणजे समजा 'शून्य' एकापेक्षा लहान आहे. हे ज्ञान झाले, परंतु हे ज्ञान खरे आहे की खोटे? हे समजावून सांगण्यासाठी किंवा ते सिद्ध करण्यासाठी आपण गणितीय प्रमेयाचा आधार घेतो. त्यालाच 'विज्ञान' असं म्हणतात.

दैनंदिन जीवनात आम्हाला काही प्रश्न नेहमी सतावत असतात. दुसऱ्यांना जे जमतं ते मला का जमत नाही? त्याला जे करता येतं, ते मी का नाही करू शकत? त्याच्याकडे जे आहे ते माझ्याकडेही आहे. निदान डोळ्यांना तरी तसंच दिसतंय. मग जे डोळ्यांना दिसत नाही असं दुसऱ्याकडे माझ्यापेक्षा वेगळं नेमकं आहे तरी काय? हे आणि असे बरेच प्रश्न आहेत ज्यांची उत्तरं विज्ञानाच्या आवाक्याबाहेर आहेत. ती जाणून घ्यायची असतील तर बुद्धीच्या पलीकडे जे आहे ते पाहावं लागेल, ज्याला संतमंडळी 'प्रकृतीच्या पलिकडचं' असे म्हणतात. त्यासाठी अध्यात्म उपयुक्त ठरतं.

माणसाला भय घालणाऱ्या देवाची कल्पना काहीजणांच्या उदरभरणासाठी सोईची आणि उपयुक्त असली तरी ती बहुसंख्य सामान्यजनांचं प्रचंड शोषण करणारी ठरली आहे. सामान्य जनांच्या हिताचं अध्यात्म सांप्रतकाळच्या किर्तनांमधून जणू नाहीसं झालं आहे. वारकरी किर्तन परंपरा हळूहळू बुजत चालली असून, व्यापारी कीर्तन परंपरा रुजत चालली आहे! कीर्तनातून भक्तीचा जागर होण्याऐवजी भयाचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो आहे. आश्रम आणि संस्थांसाठी माड्यांवर माड्या बांधणारे आणि गाड्यांवर गाड्या उडवणारे किर्तनकार पाहिले, की त्यांच्यापेक्षा बाजारातले व्यापारी अधिक बरे वाटू लागतात. ते व्यापारात किमान स्वहिस्सा तरी वापरतात. या कीर्तनकारांचा स्वहिस्सा तर निव्वळ शून्य असतो. अत्यंत मर्यादित अभ्यासानं मिळवलेलं संतसाहित्याचं उसणं भांडवल वापरून आपली बेगमी करण्याचं बाजारकौशल्य मात्र यांनी चांगलंच कमावलं आहे. टीआरपीच्या मागे धावणाऱ्या टीव्ही चॅनल्सने यांचं गेल्या काही वर्षांत बरंच मार्केटिंग केलं आहे.

महाराष्ट्रदेशी असे अनेक सन्माननीय किर्तनकार होऊन गेले आहेत आणि आजही आहेत, जे भक्तीचा व्यापार करीत नव्हते, आजही करीत नाहीत. भक्तीच्या व्यापाराला नकार देणाऱ्यांची घोर उपेक्षा केली जाते. असे लोक समाजाकडून दुर्लक्षिले जातात. जेवढी बिदागी जास्त तेवढे महाराज मोठे समजले जातात. तो प्रतिष्ठेचा मुद्दा झाला आहे. गावोगावी असे मोठे महाराज बोलावण्याची जेव्हा चढाओढ लागलेली पहायला मिळते, तेव्हा हसावं की रडावं ते कळेनासं होतं. महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाचा उदात्त वारसा लाभलेला आहे; पण हा वारसा आपल्याला जीवापाड जपता यायला हवा. त्यासाठी, हा वारसा मोडीत काढणाऱ्यांना एकदा तरी अध्यात्माचा स्वच्छ आरसा दाखवायला हवा. तुका म्हणे ऐशा नरा... या संतांच्या सांगाव्यानुसार अध्यात्माच्या वाटेवरचे हे काटे वेचायला हवेत!

## जोडणं –जपणं

नात्यांना जोडता जोडता
जपणे ही शिकातोच आपण
पण जपताना धाप लागते मात्र
काही नाती असताच खास
एकदा आयुष्याशी जोडून आली की आयुष्य ही करतात सुंदर...फुलावतात काही
तत्वांना जपणारी व्यक्ती ही
अशा नात्यासाठी करतेच तडजोड
पण काही नाती नुसतीच जोडली जातात..वर्षानुवर्षे
जपतानाही कुठेच ओलावा नसतोच मुळी...
अशा नात्यांचे जोडून राहणे ही एक औपचारिकताच..
यापलीकडे नसतेच काही खास
अशा नात्याचा का वाहत जावे भार??..
नात्यांना जोडून जपावे की
जपून जोडावे हे जमले की नसतोच मुळी अवाजवी ताण..
ही एक कला प्रत्येकालाच जमेल असे नसते...
अनुभवाच्या कोशातून त्यासाठी यावं फिरून..
आणि करावं हे जोडणं आणि जपणं समृध्द...
या समृद्ध कलेतून जन्मलेले नातेच फुलतात ,बहरतात...
साथ ही देतात अगदी शेवटपर्यंत...



मायमराठी समूह
शीतल कुयटे



## शब्दकोडे

**मित्रांनो,**

समाजात वावरताना कोणतेही काम एकट्याने होत नाही, त्यासाठी एकजूट असावी लागते, संघटितपणा असावा लागतो. आणि हीच एकजूट मोठेमोठ्या कामात उपयोगी पडतो, जर कोणी एकटा व्यक्ती म्हणत असेल की, मी हे करतो, मी ते करतो तर ते शक्य नाही. मात्र एकटा माणूस काहीच करू शकत नाही आणि एकट्याने व्यर्थ बढाया देखील मारू नयेत. जे काम गाव करून शकते ते काम एकटा माणूस काय करील. गावाच्या एकीत जी ताकद असते ती ताकद एकटा व्यक्ती नाही दाखवू शकत या अर्थाची म्हण - गाव करील ते राव काय करील - हे मागील कोडे क्र. ५० चे उत्तर होते.

### आजचे कोडे क्र. ५१

१ ते १३ - अक्षरात लपली आहे एक म्हण
१,२,३ - या अक्षरात अडचणीत आलेला
४ ,५ - या अक्षरात आहे एका मुलाचे नाव
६, ७, ८, ९ - एका प्राण्याचे नाव आहे
१०,११ - या अक्षरात पद, चरण आहे
१२, १३ - या अक्षरात पकडण्याचे क्रियापद आहे
६, ७ - या अक्षरात बिनघोर , शांत आहे
८, १३ - या अक्षरात आहे फेरी, चक्कर, पायी देवस्थानाला जाणे
८, १० - इंग्रजी वर्णमालेतील एक अक्षर
१०, ८ - या अक्षरात आहे बासरी, वेणू
१२, २ - या अक्षरात आहे शरीर , काया
९, ३, - या अक्षरात आहे शिष्य
९, ५ - या अक्षरात एक फळ आहे
१०,११, १३ - या अक्षरात आंब्याची एक जात आहे

- प्रशांत वाघ

(उत्तर पुढील अंकात)

## वनदेवतेचा आशीर्वाद

एका खेडेगावात नागाप्पा नावाचा शेतकरी राहात होता. त्याला जंगलात भटकायला, तिथे रंगीबेरंगी, डौलदार पक्ष्यांना पाहायला फार आवडायचं. पण हळूहळू त्याची ही आवड धंद्यात रूपांतरित झाली. तो दररोज जंगलात जाऊन पक्ष्यांना जाळ्यात पकडायचा आणि शहरात नेऊन त्यांना गुपचूप विकून टाकायचा. या पक्ष्यांच्या सौंदर्यामुळे त्यांना चांगला दर मिळायचा.

एक दिवस त्याला जंगलात एक विलक्षण सुंदर चिमणी दिसली. तिच्या पिसांचा रंग, डोळ्यांतले तेज, तिचा गोडगोड स्वर... हे सगळं पाहून नागाप्पाला तिला विकण्याचा विचारच सुचला नाही. त्याने तो पक्षी घरच्या पिंजर्यात बंद केला. पण ती चिमणी खूपच उदास झाली. तिच्या पिलांची, त्यांच्या गोंगाटाची तिला फार आठवण यायची. दिवसन्दिवस ती शांत, निस्तेज होत गेली. रोज ती पिंजर्यात बसून वनदेवतेला साद घालायची - हे वनदेवते, मला मुक्त कर. मला माझ्या पिलांजवळ जाऊ दे.

एके दिवशी नागाप्पाची लहान मुलगी शाळेतून घरी परतलीच नाही. घरच्यांची धांदल उडाली. नागाप्पा आणि त्याची बायको संध्याकाळपासून गावभर शोध घेत राहिले. पण कुठेही काही थांगपत्ता लागला नाही. रात्रीच्या अंधारात निराश होऊन ते दोघं घरी परतले. नागाप्पाच्या पत्नीचे रडून रडून हाल झाले. तिच्या हुंदक्यांनी घर भरून गेलं. पहाटेच्या वेळेस, थकून झोप लागलेल्या तिच्या स्वप्नात एक वृद्ध व्यक्ती दिसली. त्याच्या चेहऱ्यावर शांत तेज होतं. तो वृद्ध म्हणाला, बाळ, मी वनदेवता आहे. मला माहीत आहे, तुझी मुलगी हरवली आहे. पण तू कधी विचार केलास का, की तुझा नवरा रोज जंगलातून निरपराध पक्ष्यांना पकडतो? त्या पक्ष्यांनाही पिल्लं असतात, घर असतं. तुमच्याच पिंजर्यात सध्या एक चिमणी आहे, जिची दोन पिलं आईच्या शोधात थकून गेली आहेत. त्यांनी काय अपराध केला? जंगल आणि प्राणी हे निसर्गाचं संतुलन राखतात. त्यांचं रक्षण करायला हवं, शोषण नाही. हे ऐकून ती स्त्री हात जोडते आणि म्हणते, हे वनदेवता, आम्हाला क्षमा कर. आम्ही मोठा अपराध केला आहे. मी तात्काळ त्या चिमणीला मुक्त करीन. फक्त माझी मुलगी सुखरूप परत येऊ दे.

वनदेवता फक्त एकच शब्द उच्चारतो - तथास्तु! आणि अंतर्धान पावतो. ती घाबरत घाबरत जागी झाली आणि नागाप्पाला जागं करून हे सगळं स्वप्न सांगते. नागाप्पाचं मनही गलबलून गेलं. त्याने काहीही न बोलता पिंजरा उघडला. ती चिमणी एक क्षण थांबली आणि नंतर झपाट्याने आकाशात उडून गेली. पहाटेच्या कोवळ्या सूर्यकिरणांसह त्यांच्या दारावर टकटक झाली. दोघंही धावत गेले आणि... दारात त्यांची हरवलेली मुलगी उभी होती! आईने तिला जीवापाड मिठी मारली. तिच्या डोळ्यांतून अश्रू थांबेनात.

मुलगी हसत हसत म्हणाली, आई, एक म्हातारे आजोबा मला घेऊन गेले होते. त्यांनी मला छान जेवायला दिलं, खेळायला खेळणी दिली. आणि मग ते स्वतः मला परत सोडायला आले! त्या दिवसापासून नागाप्पाने पक्ष्यांची शिकार कायमची थांबवली. त्याचं जीवनच बदलून गेलं. निसर्गाला दुखवणं म्हणजे स्वतःच्या नशिबावर आघात करणं... आणि निसर्गाची क्षमा मिळाली, तर आयुष्य परत सावरू शकतं.

-एम.ए. जतकर

## आठवणीतील थोर साहित्यिक



वेगळे काही
योगिनी पैठणकर



मला नाही वाटत, मी आता जे थोर साहित्यिकांचे नाव सांगणार आहे, ते आपणापैकी कोणाला अपरिचित असतील... होय बरोबर, पु.लं.च.! अर्थात आपले लाडके भाई, पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे. लहानपणापासून त्यांच्या लेखनाने मनात घर केलेय, त्यांच्या विचाराने, विनोदाने, वात्रटिकांनी, शैलीने, व्यक्ती आणि वल्लीने मनावर भुरळ घातली ते आपल्या सगळ्यांचे लाडके पूलं. सगळ्यांच्या आवडीचे साहित्यिक. उत्तम लेखक दिग्दर्शक कवी कलाकार आणि माणूस ही! किती साऱ्या चित्रपटांना त्यांच्या गाण्याच्या चाली आहेत,. आजही चार पिढ्यांना नाच रे मोरा, आपल्याला आवडतं ते त्याच्या चालीमूळे व सोप्या शब्दांमुळे.

प्रत्येक लेखक कवी दिग्दर्शक आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या प्रसंगातून लेखन करतच असतो. आपले विचार समाजासमोर मांडत असतो. तो जणू समाजाचे प्रतिबिंब असतो. आजूबाजूला जी माणसे असतात, त्यांच्या प्रसंगातून, कृतीमधून, शब्दांमधून, व्यक्तिमत्त्वातून पुलंनी अखंड विनोद निर्मिती केली. आणि अखंड आपल्याला हसवले. व हसता हसता कितीदा पापण्या ओलावून रडवलेही. या जगाला जगायला व जगण्यात हसायला, हसवायला ही शिकवले हे मात्र खरंच.

लोकांचे वागणे, चेहरा, भाषा देहबोली, सवयी, कृती यांचे सुक्ष्म निरीक्षण करून पुलंनी पुस्तकं लिहिलीत. नारायण, अंतूशेट अधिक जवळचे वाटतात कारण ते आपल्या प्रत्येकाच्या घरात असतातच. त्यांचे लेख, भाषणं अतिशय उत्कृष्ट असत. बटाट्याची चाळ मधील माणसे तर विशेषच. अतिशय खुमासदार वर्णन करू या चाळीला खूलवलं, जिवंत केलं ते पु लं देशपांड्यांनी. त्यांच्या लेखनात हास्य असते शाब्दिक कोटी असते. पण विनोदाचा भाषेचा स्तर कुठेही खाली गेला नाही,. अश्लील वाटला नाही. उलट तो अधिकच जवळचा आपला वाटतो. ते मार्मिक विनोद करत, व्यंगात्मक किंवा टिकात्मक नाही.आणी हाच त्यांचा मोठेपणा आहे. स्वतःच्या शरीरावर खाण्यावर प्रसंगांवर प्रासंगिक विनोद स्वतःच घडवत. यातच त्यांचा मीश्कील स्वभाव व खिलाडूपणा दिसतो.

म्हणूनच तर आजही इतक्या वर्षानंतर ती फुलराणी गाजतेय.. असं ख्य व्यक्तिरेखा त्यांनी आपल्या लेखणीने खुलवल्या. व. गाजवल्यातही. आजही वाचतांना डोळ्यासमोर ती व्यक्ती येतेच. व्यक्ती आणि वल्ली चितळे मास्तर तर सगळ्यांच्या आवडीचे. तसाच सखाराम गटणेही. आजही समाजात अशी माणस आहेत त्यांना जिवंत रूप दिले ते भाईंनीच,. पूर्व रंग, अपूर्वाई, श्रोते हो, मिएक शून्य, . खोगिरभरती, असा मी असामी, जावे त्यांच्या देशा. एक ना अनेक. पुलं व त्यांच्या पत्नी सुनीताबाई उत्तम कवी होते. आरती प्रभू, बोरकर, मर्ढेकर या कवींना त्यांनीच अजरामर केले. आनंद वाटत जाणं., दुसऱ्याला टेंशन फ्री करणं, मुक्त हसवणं हा त्यांचा खाक्या,. कदाचित कदाचित लहखनपणापासून वाचत असल्यानेमाझ्यातील विनोदबुद्धी किंवा शब्दच्छल,. थोडीफार तरी आली असावी, . मी अखंड पारायणं केलीत या पुस्तकांची. कोणे एके काळी.

मला स्वतःला मराठी साहित्यात शेक्सपिअर म्हणून पुलं अग्रेसरच वाटतात.

पुलं चा स्पर्श होताच दु:ख पळाली
नवा सुर, नवी ऊमेद जगण्यास मिळाली
मुक्तपणे मराठी माणसंही हसू लागली
साहित्य क्षेत्रात तीही विहरू लागली
पु लं असे अष्टपैलू कलाकार.

**जीवनपट....**

१९१९ मध्ये जन्म, एम एल बी झालेले,. बंगाली साहित्याची प्रचंड आवड,. मराठी संस्कृत बंगाली तिन्ही भाषांवर प्रभुत्व, साध्या लिपी का पासून शिक्षक, प्राध्यापक, वक्ता, आकाशवाणी, दूरदर्शनवर कार्यक्रम अशी त्यांची प्रगती. त्याने कविता आले एक नाटके चित्रपट सर्व लिहिलं.. गुळाचा गणपती हा त्यांचा सर्वांग सुंदर चित्रपट! शाब्दिक विनोद ही त्यांची खासियत! कुणालाही न दुखावता, व्यंगावर, वर्मावर बोट ठेऊन सहज हसवणं यात त्यांचा हातखंडा.

वर्तमानपत्र, दूरचित्रवाणी व आकाशवाणी वर त्यांचे अतिशय सुंदर कार्यक्रम होत. प्रत्येक व्यक्तीच्यख वैशिष्ट्याचे भाषेसह, लहेजासह वर्णन करत. नाटककार, संगीतकार, लेखक कवि, अभिनेते काय काय म्हणू? पद्मश्री, श्री महाराष्ट्र भूषण, साहित्य आकादमीसर्व पुरस्कारांचे ते विजेते. महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे. रोगातून जाताना त्यांनी प्रश्नांना उत्तर दिले प्रश्नचिन्हातला टिंब म्हणजे आपण! असे त्यांचे विचार, माझ्या छोट्या जीवनातील छोट्याशा माहीतीतून व लेखणीतून त्यांचा एवढा मोठेपणा कसा आणि किती मिळणार? पण त्यांचे वाक्य आणि विचार मनात खोलवर रूजलेले आहे ... कदाचित माझ्या माहेरच्या आडनाव साम्यामूळेही ते जवळचे वाटत असावेत. खरंच भाई रोजच्या जीवनातील विनोद चुटकीसरशी मांडत. अआणी गंभीर, त्रस्त वाचताना हसवून सोडत.

काल परवाच मुक्ता बवचं भाई एक कविता हवीये. सादरीकरणाला गेले होते. त्या शब्दाशब्दातून भाई आपल्याशी बोलतायेत असं अनेकदा वाटायचं. यात सूनीताबाईंनी किती मोलाची साथ दीलीये हे सांगणे नकोच. त्याच भाईंना सांभाळू जाणे. चाफ्याच्या फुला ऐकतांना अक्षरशः मी रडले, खूप आतून गलबलून आलय.

असा हा थोर साहित्यिक आपल्यात नाही याचे वाईटही वाटतंय, पण त्यांचे लेखन व विनोद आजही अजरामर आहेत व पुढील पिढीलाही हसवतील यात शंकाच नाही....

## गांवकरी काव्यांगण

### विचारात आठवण



दिवस माझा तुझ्या विचारात,
अन् रात्र तुझ्या आठवणीत!!!

विचारात असते तुझी आठवण,
आठवणीत असतो तुझाच विचार!!!

विचार अन् आठवणीत
मी रमुन जाते...
प्रत्येक श्वासात विचारांसमवेत
तुझी आठवण येते...

रोज दिवस मावळतो,
रोजच आठवण येते...

तुझा विचार अन् आठवण
मनात निरंतर राहते!!!

-श्रद्धा जाधव बोरसे

### पांडुरंग



ज्ञानोबा तुकोबा
झाले एकरंग
इंद्रायणी काठी
आले विठु श्रीरंग

ओवी अभंगात
टाळ चिपळी दंग
भक्तीच्या तालावर
नाचतो मृदंग

तालावर धरे ताल
मृदंगाच्या संग
भक्तीरंगात रंगून
नाचे पांडुरंग

जयघोष झाला
इंद्रायणी तीरी
गजर ऐकून धावला
श्री विठ्ठल हरी

तुका म्हणे दिसे
ठायी ठायी विठ्ठाई
ज्ञानदेव म्हणे आता
जय विठोबा रखुमाई


- श्रेयस लहामगे


### हरवलेली तू...

कुठे हरवलीस तु
तुच तुला सापडतेस का बघ बरं......
लहान पण किती निरागस
निष्पाप होत गं तुझ आयुष्य
ना कुणाचा हेवा ना कोणता देखावा
ना कुणाची ईर्षा ना कुठलीही हाव
कुठे हरवलीस तु तुच
तुला सापडतेस का बघ बरं.....
तरूणपणी तुझ वागण किती बेधडक होत गं
ना कुणाविषयी वेगवेगळ्या भावना
ना कुणाच्या विनाकारण विणवण्या
ना कुणाशी घेणेदेणं फक्त
आपल्या आपल्या तच रमण निडरपणे
घरीदारी बिनधास्त वागणं
ना कुणाची भिती ना कुणा घाबरणे
सगळीकडे फुलपाखरासम
बिनधास्त विहरणे
ना कुणासाठी जगंण ना कुणासाठी मरंण
कुठे हरवलीस तु तुच
तुला सापडतेस का बघ बरं....
संसाराच्या गाडयाला जुपलीस जेंव्हा
घर संसार मुलंबाळं हेच सर्वस्व मानलसं
समाज नाती गोती ह्या रहाटगाडग्यात
इतकी पिस-पिस पिसलीस की
जसे गव्हाचे दळून पिठ होते
तसे पिसलीस गं
कुठे हरवलीस तु
तुच तुला सापडतेस का बघ बरं....
आयुष्याच्या एका वळणावर
भावनांची गुलाम बनलीस
जसे भिंतीवर कोळीनीच्या जाळ्यात
एखादा किटक अडकावा तशी
नात्यांमध्ये अडकलीस आणि
स्वतःलाच स्वतः संपवलेस
कुठे हरवलीस तु
तुच तुला सापडतेस का बघ बरं.....

- प्रा. कावेरी पगारे
८२०८४३११५९

# गवाक्ष







सापेक्ष
वासवदत्ता अग्निहोत्री

'ये खिडकी जो बंद रहती है....' एका हिंदी चित्रपटातील एक गीत खूप प्रसिद्ध झाले होते. खिडकीसारख्या वस्तूवरदेखील गाणे होईल कुणाला माहीत होते. घराघरात भिंतीवर दारांसोबत खिडक्या असतात. कधी आपण विचार केलाय की ही वस्तू, ज्याचा जास्त उपयोग नाही, ही घराला कशास बांधतात.

फार फार पूर्वी जेव्हा नव्याने माणूस घरं बनवायला शिकला असेल तेव्हा त्याला फक्त निवाऱ्याची गरज होती तेव्हा कदाचित खिडक्यांचे असणे त्याला आवश्यक वाटले नसेल कारण बंद घर त्याची पहिली गरज होती. उजेडासाठी त्याला मोकळे आकाश होतेच. आजही ग्रामीण भागात उजेडातच संध्याकाळ चा सैपाक करून ठेवण्यात येतो. असो..

सर्वप्रथम चीन, कोरिया आणि जपान च्या लोकांनी, घरांच्या भिंतीना चौकोनी, मोठे छिद्र केले. दाराचा वापर फक्त येण्या जाण्या साठी करावा आणि ह्या मोठ्या चौकोनी छिद्रातून वारा आणि प्रकाश यावा म्हणून. पण त्याला काही सुरक्षा नसल्याने त्यातून पशू, चोर वगैरे सुद्धा येवू लागले मग त्यांनी त्याला चौकट बसवली आणि १०० च्या दशकात तिला काचेचे किंवा तत्सम दार बसवले. प्राचीन इजिप्शियन लोकांनी सर्वात आधी काच बसवली आणि खिडकी बंद केली. १४ व्या शतकात, प्राण्यांच्या शिंगापासून तयार केलेली चपटी पारभासी पट्टीचे आवरण, खिडकीला दार म्हणून लावत होते. १९ व्या शतकात पश्चिमेकडील देशात, ग्रीस लावून ,पारदर्शी कागदाच्या, मोठ्या खिडक्या, उच्चवर्गीय लोक लावू लागले. औद्योगिक क्रांति नंतर सुबक चौकटीत बंदिस्त, काचेच्या खिडक्या, सपाटून प्रचलित झाल्या.

खिडकी म्हणजेच, बाहेरील वातावरण चा आढावा घेता यावा, त्यातून वारा प्रकाश यांना आवागमन करण्याची परवानगी मिळावी तसेच बाहेरील देखावा ही बघण्यास मिळवा, ह्याला खिडकी किंवा गवाक्ष असे म्हणतात. खराब मोसमात किंवा पावसात आपण जिला आपल्या मर्जीने उघड बंद करू शकतो तिला खिडकी असे म्हणतात. तिला दार आणि सुरेख पडदे लावून सजवतात.

भारतात खिडक्या फार पूर्वीपासून प्रचलित होत्या. प्राचीन काळात राजे आपल्या महालात, खूप मोठ्या आणि कलात्मक खिडक्या बसवून घेत होते. त्यात आतून बसायचा एक ओटा किंवा पायरी वजा जागा असायची ज्यावर राजकुमारी, राण्या इत्यादी बसून बाहेरील देखावा बघत असत. त्याला 'गवाक्ष' असे म्हणत होते. हा संस्कृत शब्द आहे. हिंदीत याला 'झरोका' असा शब्दप्रयोग आहे. झरोका हा साहित्यात खूप प्रयोग होतो. हिंदी साहित्यात झरोका आणि सुंदरी वर अनेक काव्य झाले आहेत. 'खिडकी आणि ती'अशा कथानकात अनेक रोमॅन्टिक कथा ही वाचायला मिळतात. पूर्वी खिडकी चा निर्माण, हेतुपुरस्सर होत असे.

जसे मुगल सम्राट शहांजहांने आग्रा येथे आपल्या दिवंगत पत्नी मुमताज बेगम च्या स्मृतिप्रीत्यर्थ 'ताजमहाल' म्हणून एका अत्यंत सुंदर अशा इमारतीचा निर्माण केला आणि आपल्या महालातून, त्या ताजमहालचे नित्य दर्शन घडावे म्हणून, एक खिडकी आपल्या महालात निर्मित केली. त्यातून तो दररोज, तासंतास ताजमहालाकडे टक लावून बघत बसायचा. अनेक वेळेस खिडकीतून, शत्रूंच्या हालचालींवर नजर ठेवल्या जाते. काही जागी बाहेरून मुळीच न दिसणाऱ्या खिडक्या सुद्धा असतात.त्यातून आतल्या लोकांना बाहेरील देखावा दिसतो पण बाहेरून कुणालाच थांगपत्ता लागत नाही कि इथे कुठे खिडकी असू शकेल. अशा खिडक्या राणी महालात लावण्यात येत असत. जासूद ही अशाच प्रकारच्या खिडक्यांचा उपयोग करत असत. पाणबुडी ला, पूर्वी पाण्यातून पाण्याच्या वर काय चाललंय हे बघण्यास एक विशिष्ट खिडकी वापरावी लागत होती. त्याने पाण्याच्या आत राहून, पाण्याच्या सपाटीवर शत्रूंच्या हालचालींवर लक्ष ठेवत होते. आता खिडकी म्हणजे एक पूर्ण भिंतच काचेची असते. नव्याने आकारलेल्या फ्लॅट्समध्ये ही नव्या पद्धतीची खिडकी बघण्यास मिळाली. दोन दारं पण स्लायडिंग असतात. एकावेळेस एकच दार उघडते. अशा खिडकीतून बाहेर चे विहंगम दृष्य दिसते. ऋतूंची हालचाल ही टिपता येते.

माणसाच्या देहात, डोळे म्हणजे, देहाची खिडकी असे म्हणतात. बाहेरचे जग बघण्यास आणि अंतरीचे भाव प्रदर्शित करण्यात डोळे कितीक काम करतात. आपण जर आपले व्यक्तिमत्त्व, उदार आणि आरस्पानी, ठेवले तर अनेक लोक ही आपल्याला जवळचे भासतात. भावनिक गुंफणीत डोळे हे खूप काम करतात. ज्या प्रमाणे खिडकीतून आतले माफक दिसते पण बाहेरचा पूर्ण देखावा बघू शकतो ,त्याच धर्तीवर डोळ्यातून माणसाच्या आंतरिक संवेदना, भाव इत्यादी दिसते पण डोळ्यांना मात्र अवघे जगच दिसते.

खिडकी प्रमाणे डोळे सुद्धा बंद उघड करता येतात. आजकाल अनेक पद्धतीत खिडक्या बसवून घेतात पण पूर्वी जास्त दुर्लभ खिडक्या किंवा गवाक्ष असायचे, कदाचित त्यांना बघूनच आजकाल बाल्कनी तयार झाली असावी. पश्चिमेकडील देशात आपल्या घराच्या खिडक्यांना खूप फुलझाडं लावून सजवण्याची पद्धत आहे.ह्या खिडक्या दिसण्यास अतिशय सुरेख दिसतात. खिडकीच्या पूर्ण चौकटीला, नाजूक रंगबेरंगी फुलांच्या वेलींनी वेढलेले असते आणि अशा एक नव्हे तर रांगेतील प्रत्येक घरात अशीच सुंदर सजावट आढळते.

आपल्या देशात ही ग्रामीण भागात, खिडक्यांच्या चौकटी भोवती, आकर्षक चटकदार रंगाने, पारंपरिक चित्र रेखाटलेले दिसतात. या पद्धतीच्या, रंगीत खिडक्या, दुरून ही खूप आकर्षक दिसतात. आजकाल भव्य काचेच्या खिडक्यांचे खूप प्रचलन आहे. महानगरात खूप भव्य खिडक्या आढळतात. वाहतुकीच्या साधनांना सुद्धा खिडक्या असतात. रेल्वे, बस, कार इत्यादीच्या खिडक्या, यांत्रिक असतात, त्या एका बटणाने उघड बंद होतात. अशाच हॉटेल किंवा मोठ्या ऑफिसात यांत्रिक रित्या संचालित खिडक्या असतात. नुसत्या टाळी च्या आवाजाने किंवा मानवी हुकुमावरून ही उघड बंद होणाऱ्या, कॉम्प्युटराइज खिडक्या सुद्धा आता नव्याने परिष्कृत झाल्या आहेत.

काहीही म्हणा खिडकी ही उघडल्यावर, मन दुसऱ्या अवस्थेत जाते, काहीसे प्रसन्न होते हे मात्र निश्चित. खिडकीतून येणाऱ्या, सकारात्मक तरंगा आपल्याही नकळत वेढून घेतात. कशीही खिडकी असो घराची, वाहनाची, ऑफिस ची किंवा देहाची..... उघडल्यावर नक्कीच फरक जाणवतो. आता चांगला वा वाईट हे प्रत्येकाने आपापले ठरवावे!



# नशिबाचे भोग

**नशिबाचे भोग सरता सरेना,**
**अश्रू डोळ्यातले थिजले असे की!**
**कोरडे पडलेय माळरान सारे**
**पावसात न भिजले गाव जसे की!**

शिरपा एशिरपा

मोठ्याने हाक कानी पडली, तसा शिरपा भानावर आला. आईविना लेकरू वाढलेलं, गतकाळात गढून गेलेलं!



शब्द फुलोरा
वैशाली जाधव-शिंदे
९३७११८५७९१

चार आठ वर्षाचा असतानाच त्याची आई त्याला सोडून गेली. त्याच्याबरोबर, त्याचा लहान भाऊही होता. चुलत्या -काकांनी कसंतरी आपलं कर्तव्य पार पाडलं. कसातरी सांभाळ करत हे दोघं भावंड लहानाची मोठी झाली.

गावगाडा चालू होता, गावातली चार-दोन शहाणी मंडळी त्यांना आधार देत होती. भाकरीपुरते काम मिळत होतं. कोणी काहीही काम सांगितलं की,त्यांनी ते निमूटपणे करावं,नाही म्हणण्याची हिंमत नव्हती त्यांच्यात!

गाईगुरे वळणे, झाडलोट करणे. हाताजोगती कामं करून पोट भरत होती.

चुलतभाऊही कोणी मदतीला धावत नसत, म्हाताऱ्या चुलत्याचा जीव होता त्यांच्यात. ते थोडीफार मदत करीत असत.

लग्नाच वय झालं,... आता कसंतरी शुभमंगल उरकून घ्यायचं, म्हणजे स्थिरता मिळेल त्या दोन जीवांना. वडील मंडळी कोणी लक्ष देईना. मग यांनीच वधुसंशोधन सुरू करून देऊ.

देऊ लग्नाचा बार उडवून एकदाचा.

असेच एका लहानशा खेडेगावात दोन बहीणी होत्या, त्याही आपल्या गरीब आईबापासोबत राहत होत्या. यांनी त्या दोघींना मागणी घातली.

एका शुभ मुहूर्तावर दोघांची लग्नं झाली. भरल्या घरात लक्ष्मीने पाऊल टाकावे तसे दोघीही आल्या. शिरपानेच पटकन धान्याचं माप भरून आणलं पटकन!

एवढ्याशा खोलीत दोघांचा संसार सुरू झाला.

काही हवं नको, ते सर्व काही विचारपूस करीत होता. देता येईल तेवढं सुख देण्याचा प्रयत्न करीत होता. दोन्ही जावा, बहीणी-बहीणी सुखात नांदत होत्या.

लवकरच मोठीला दिवस गेले, हे पाहून शिरपा आनंदून गेला, मी बाप होणार... केवढं सुख त्या कष्टी आत्म्याला!

थोड्याच दिवसात लहान बहीणीनेही आनंदाची बातमी दिली. सर्वांना आनंद झाला. यथावकाश दोघीही सुखरूप बाळंत झाल्या. मोठीला मुलगा व लहान बहीणीला मुलगी झाली. बाळाचे बोबडे बोल कानी पडू लागले. शिरपा आनंदून जायचा या बाळलिला पाहून. सर्व व्यवस्थित चालू होते. पण काय, हे सुख नियतीला मान्य नव्हते.

थोड्याच दिवसात शिरपाची बायकोही लहानग्याला व नवऱ्याला सोडून निघून गेली.

पुन्हा पहीले पाढे पंचावन्न सुरू!

शिरपा मनातून पुरा निराश झालेला होता. पण बाळाच्या रडण्यानं तंद्रीतून जागा झाला. बाळाला भूक लागली होती. म्हणून त्याने शेजारणी कडून दुध मागून आणले. बाळाला पाजले. भावाने दुसरीकडे आपला संसार थाटला.

शिरपाने चारपाच शेळ्या पाळल्या त्यांचे संगोपन व बाळाचं संगोपन केलं.

थोड्याच दिवसात बाळाने बाळसं धरलं, पण शिरपाचे नशिबाचे भोग काही सरत नव्हते!....

मुक्या जनावरांशी बोलणे हेच त्याच्या नशिबी होते! एक एक दिवस काढायचे काम करतोय बिचारा आजतागायत!...

# सावध ऐका, पुढल्या हाका !



सहजच
मनीषा चौधरी

वेगवेगळी कामे अगदी मनापासून, आनंदाने करण्याची आवड असणारे आजूबाजूला दिसतात. अगदी पुढाकार घेऊन प्रत्येक कामाचा डोंगर ते शिरावर घेतात. अंगावर पडलेले प्रत्येक काम ते अगदी मनापासून करत पूर्णत्वास नेतात. जबाबदारी घेणे, व ती लिलाया पार पाडणे यात त्यांना समाधान मिळते. अनेक चित्रपटातील नायक किंवा नायिका देखील असेच उदारमनाचे दाखवतात. जे अडल्या नडलेल्या प्रत्येकाच्या मदतीसाठी धावाधाव करताना दिसतात. पण अनेकदा अशा सुस्वभावी लोकांचा नाहक गैरफायदा घेतला जातो. निव्वळ त्यांचा वापर केला जातो. आंधळा विश्वास हा घातक ठरू शकतो. असे करणारे हे त्यांच्या आसपास किंवा अगदी जवळची व विश्वासातील व्यक्ती देखील असू शकते. काम झाले की नामानिराळे होण्याची कसब जपणारे असे अनेक समाजात वावरत असतात. त्यांना ओळखणे कठीण असले तरी दुरापास्त नसतेच.

स्नेहा आनंदाने जबाबदारी घेणारी व पारही पाडणारी. नात्यात, मैत्रीत, कामाच्या ठिकाणी तिचा उत्साहा दांडगा असे. कुणाच्याही हाकेला ओ देणे, मदतीसाठी धावून जाणे यात तिचा नकार कधीच नसे. आपण चांगले तर जग चांगले अशा विचाराने ती धडपडत असायची. तिच्या आसपास असलेल्या धूर्त लोकांना तिच्या स्वभावाची जाणीव होऊन ते प्रत्येक वेळी तिची मदत घेत. आणी काम संपले किंवा कधीतरी स्नेहाला मदतीची गरज भासली की या कावेबाज लोकांकडे असंख्य कारणे असत टाळाटाळ करण्याची. हळूहळू सगळीकडे हा अनुभव आल्याने ती निराश होऊ लागली. पण



वेळीच सावध होऊन त्या धूर्त लोकांपासून ती दूर झाली. कामापुरता तिचा वापर करणारांना योग्य वेळी नकार देणे तिला जमले. स्पष्टपणे दिलेला नकार हा पुढील अनेक संकट, मनस्ताप टाळू शकतो.

प्रत्यक्ष काम करणारांपेक्षा कामाचा दिखावा करणारेही असतात. जे फक्त काम पूर्ण झाल्याशिवाय आपल्याला निवांत वाटत नसल्याचा निव्वळ देखावा करातात. कृती मात्र शून्य असते. गोड गोड बोलून कामं करुन घेता येते हा त्यांचा गैरसमज असतो. आणी नाही झाले काम तर रडीचा डाव खेळण्यात अगदि तरबेज असतात. अशा व्यक्ती फार धोकादायक असतात. कामाची टाळाटाळ करणारा त्यांचा स्वभाव लपत नाही.आणी फक्त कामासाठी गोड बोलण्याच्या त्यांच्या स्वभावाचीही किव येते. आणी अशा लोकांपासून अनेक हात लांब रहाण्याची कलाही आपण आत्मसात करु शकतो.

आपणहून काम करणारे, आढेवेढे न घेता जबाबदारी घेत कर्तव्य पूर्ण करणारे सरळ मार्गी लोकांची अनेकदा फसवणूक च होते. नेकी कर और दर्या में डाल असे आपण म्हणत असलो तरी, अतिरेक हा वाईटच असतो तसा विनाकारण कुणासाठी धावाधाव करणेही चुकीचेच असते. कर्म करताना फळाची अपेक्षा करु नये हे योग्य असले तरी चुकीच्या लोकांसाठी केलेले चांगले कर्म हे देखील चुकचं असते. त्याचा परतावा हा फक्त पश्चात्ताप,मनस्ताप स्वरुपात मिळतो. त्यामुळे आपल्या आसपास केवळ गरजेनुसार आपला वापर करणारांना ओळखता यायलाच हवे. आपणहून केलेल्या मदतीची किंमत कायम शून्य ठरवली जात असेन तर स्वतः चे महत्त्व स्वतःला वेळीच ओळखताही यायला हवे. भावनेच्या भरात वहावत जाऊन केलेली मदत ही घातक ठरु शकते , जिवावर बेतू शकते.

नेहमीच सावध राहून विचार करायलाच हवा. तुमचा कुणी वापर तर करत नाही ना! हे निट पारखून मगच विश्वास ठेवावा. भोळेपणाच्या आड किंवा वरवर शांत दिसणाऱ्या चेहऱ्यापलिकडे कावेबाज चेहरा व वृत्ती असू शकते. नेहमीच सावध रहायला शिकाव. स्वतःला आधी प्राधान्य द्यावे. मगच पुढे धावावे. गरज सरो वैद्य मरो ही वृत्ती नष्ट करण्यासाठी मदत करण्याचा स्वभाव असणारांनी कायम सावध रहावे. तरच निभाव लागेल.

# ।। नर्मदे हर ।।



**नर्मदा परिक्रमा पूर्ण करण्याचे स्वप्न गेल्या २ वर्षांपासून मनात घोळत होते. पण कदाचित माईचं बोलावणं मला आलं नव्हतं. या वर्षी मात्र मनाने पूर्ण निश्चय केला होता. उन्हाचा तडाखा बघता २१ कि. मी. अंतर पायी चालू शकेल का? याविषयी थोडी धाकधूक होती. पण मनाचा निश्चय पक्का होता. चैत्र शुद्ध अष्टमीला नर्मदे हर चा गजर करत आमच्या प्रवासाला सुरुवात झाली एक एक करत आम्ही ३३ सखी जमलो. जणू काही ३३ सखींच्या भेटीचं नर्मदेला वाण लावायला निघालो होतो.**

दुपारी २.०० वाजता सुरू झालेला आमचा प्रवास सखींसोबत भजने, गाणी, गप्पा करत महाराष्ट्रातून गुजरात राज्यात केव्हा येऊन पोहचलो ते कळलेच नाही. रात्री १०वाजता आम्ही आमच्या मुक्कामाच्या ठिकाणी वासन ग्रामातील वासुदेव आश्रमात पोहचलो. तेथे पोहचल्यावर थोडे फ्रेश होऊन तेथील गुरूंनी आमच्याकडून परिक्रमेचा संकल्प सोडून घेतला. माझं त्या मंत्रांकडे कमी पण नर्मदा माईच्या मूर्तीकडे जास्त लक्ष होतं. भगवती इथपर्यंत बोलावलंच आहे तर परिक्रमा सुखरूप पूर्ण करून घे इतकंच मागणं आहे तुझ्याकडे. संकल्पानंतर आश्रमातच आमच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. इतक्या लांबच्या प्रवासाचा खूप थकवा आला होता. पण आश्रमातील आदरातिथ्य बघून मन भारावून गेलं होत. जणू आम्हा माहेरवाशिणीचं स्वागत त्यांच्या रूपाने नर्मदा मैया करत होती. आमच्या मुक्कामाची व्यवस्था जवळच पंडालमध्ये केलेली होती. धरतीचे अंथरूण अन् आकाशाचे पांघरूण घेऊन आम्ही निद्रादेवीची आराधना करत होतो. जेमतेम १तासाची झोप घेऊन आम्ही सकाळचे आन्हिक उरकले. नर्मदेला श्वेत रंग प्रिय आहे म्हणून आम्ही सगळ्या सखी पांढऱ्या रंगाचे ड्रेस घालून सज्ज झालो. भगवतीच्या गजर करत रात्री २.००वा आमच्या परिक्रमेला सुरुवात केली.

त्या रात्रीची गर्दी बघून, दुतर्फा उजळणारे लाईट्स बघून ती रात्रीची २ वाजेची वेळ आहे असे सांगूनही खरे वाटले नसते. सुरवातीचा थोडा प्रवास दगडांतून आहे. त्या वरून चालताना थोडी कसरत होते. पण व्हिडिओ बघितलेले होते त्यामुळे रस्त्याची थोडी कल्पना होती. नर्मदे हरचा गजर करत आमची परिक्रमा सुरु झाली. थोडस ह्या परिक्रमेविषयी सर्वप्रथम उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा म्हणजे काय? कोणत्याही नदीने उत्तर दिशेने वाहणे अत्यंत पुण्यदायी मानले जाते. जसे कि काशी येथे गंगा नदी वरुण घाटापासून अस्सी घाटापर्यंत उत्तर वाहिनी होते. म्हणून काशी अत्यंत पुण्यदायी आहे. तसेच नर्मदा माई हि रामपुरा ते तिलकवाडा ह्या दरम्यान आपला पूर्व ते पश्चिम मार्ग सोडून उत्तर दिशेने या भागात वाहते.

रामपुरा येथे नर्मदा नदी उत्तरवाहिनी होते आणि पुढे तिलकवाडा पर्यंत ती उत्तरवाहिनी राहते. आणि नंतर तिचा प्रवाह पूर्ववत्र होतो. रामपुरा ते तिलकवाडा आणि परत तिलकवाडा ते रामपुरा ह्या साधारण २१कि. मी. मार्गावर नर्मदेच्या तीरावरून केलेल्या प्रवासाला 'नर्मदा परिक्रमा' म्हणतात. ह्याचा उल्लेख 'नर्मदा पुराण' व 'स्कंध पुराण' ह्यांमध्ये आढळतो. नर्मदा माईची पूर्ण परिक्रमा करणे प्रत्येकालाच शक्य होईल असे नाही. त्यांच्यासाठी ही उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमेचा पर्याय योग्य ठरतो.

तर अशा ह्या पवित्र पावन परिक्रमेचा वासन येथून सुरु झालेल्या प्रवासात काही मंदिर लागतात. ब्रम्हमुहूर्तावर श्रीकृष्ण मंदिरात दर्शन घेतले. पुढे वाटेत महादेव मंदिरात दर्शन घेतले. पैलतीरी जाण्यासाठी नावेच्या रांगेत उभे राहिलो. १तासाच्या वेटिंगनंतर आमचा नावेसाठी नंबर लागला. मध्ये नव्याने तयार केलेला नंदी घाट आहे इथे १०८ शिवलिंग स्थापन केलेले आहेत. तेथे थोडे फोटो काढले. पुढे रामजानकी आश्रम लागतो तेथे राम भजन पहाटेच्या वातावरणात मंजुळ भर घालत होते. संपूर्ण परिक्रमेत जागोजागी भाविकांना सेवा देणारे लोक असतात. नर्मदा मातेच्या मंदिरात मातेसाठी आणलेली ओटी भरून आम्ही मनोभावे तिची आरती केली. आता पर्यंतच्या मार्गात अंधाराने आमची सोबत केली होती. मगरींचे साम्राज्य ह्या नदीत जास्त प्रमाणात असल्यामुळे जागोजागी पात्राला जाळ्या लावल्या आहेत. परंतु पायऱ्या उतरून नदीच्या पात्राकडे जातांना समोरचं सूर्योदयाचे मनोहर दृश्य बघून क्षणभर पावलं तिथंच थबकली. खूप दिवसांनंतर संपूर्ण सूर्योदयाचे दर्शन घेतले. नदीपात्रात माईंचं पूजन केलं. रविराजाला अर्घ्य अर्पण करून नर्मदा अष्टकाच पठण केलं. जणू काही नर्मदा मैय्या तिच्या लेकींना स्वतःच्या हाताने स्नान घालत होती. सोबत थोडे तीर्थ घेऊन आम्ही परिक्रमा पुढे सुरु झालीव. उजाडल्यावर आमच्या पावलांचा वेग मंदावला. शेवटचा २कि. मी. च्या प्रवासात माझ्या पायांनी आपला रंग दाखवायला सुरुवात केली होती. सोबत आणलेले तीर्थ घाटातील तिर्थेश्वर महादेव मंदिरात अर्पण केले. रस्त्यात अनेक छोटी मंदिर लागतात. तेथील दर्शन घेऊन आम्ही ९वाजता आश्रमात पोहचलो.

त्यावेळचा आनंद शब्दात व्यक्त करणे शक्य नाही. ज्या व्यक्तीला पाच पावलं चालतांना त्रास होतो तिची २३कि. मी. ची परिक्रमा नर्मदा माईंनी अगदी हसत पूर्ण करून घेतली. आश्रमात आल्यावर थोडे िशश्रर होऊन आम्ही राम जन्माची तयारी सुरु केली. आश्रमात मोठ्या उत्साहाने आम्ही सर्व सखींनी रामरक्षा, रामस्तुती, रामाचे भजन म्हणत रामजन्म साजरा केला. त्या नंतर कन्यापूजन साठी अनेक कन्या आश्रमात आलेल्या होत्या. घरून आणलेल्या साहित्याने आम्ही कन्यापूजन केले. आम्ही सर्व सखींनी आमच्या अल्पमती प्रमाणे यथाशक्ती कन्या पूजन केले. काही मोठ्या भगिनींना सोबत आणलेल्या साड्यांचे वाटप केले.



भटकंती
रूपाली जाधव
९१५८८१६६२०

त्यानंतर भोजनाची व्यवस्था आश्रमात होती. भोजन करून आश्रमाची नाममात्र देणगीची (१००/-रु. ) पावती दिली. आम्ही माईचा निरोप घेऊन परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. वाटेत गरुडेश्वर, शबरीधाम, कुबेरधामाचे दर्शन घेऊन आम्ही रात्री ११.३०वाजता सटाण्यात पोहचलो. ह्या प्रत्येक ठिकाणाची महती वेगवेगळी आहे. रामनवमीच्या पावन मुहूर्तावर आमची परिक्रमा नर्मदा माई ने पूर्ण करून घेतली. असं म्हणतात ह्या परिक्रमेत नर्मदा माता आपल्याला कोणत्याही स्वरूपात दर्शन देते. आपल्याला ओळखता यायला हवं. मग काय माझं मन विचार करायला लागलं. तर ह्या परिक्रमेत मला भेटलेल्या नर्मदा सर्वप्रथम वर्षाताई ज्यांच्या मुळे हि परिक्रमा करण्याचं धाडस, सहकार्य, मार्गदर्शन मिळालं. त्या नंतर माझ्या सर्व सहकारी सखी ज्या एका िाि वर ह्या परिक्रमेसाठी तयार झाल्या. साधना ताई, रेखा ताई, स्मिता, मीनाक्षी ह्यांच्या रूपात मला नर्मदा मैय्या भेटली. आमच्या सहप्रवासी असणाऱ्या उषाताई ह्या तर साक्षात खळखळ वाहणाऱ्या नर्मदाच आपल्या वयाला लाजवतील असा उत्साह आम्हा सर्वांना देऊन गेला. त्यांच्या कडून आम्ही नवनविन रेसिपी शिकायला मिळाल्या. आमची सखी पल्लवी ताई तिच्या पावलांची तर खरचं कमाल गिरनार वारी, पंढरपूर वारी कोणतीही वारी त्यांनी सोडली नाही. ही परिक्रमा पूर्ण करून दोन दिवसांत सप्तशृंगगडाच्या पायी वारीला निघणार होत्या. तर अशा या सर्व सखींमध्ये मला नर्मदा मातेचं दर्शन झालं. माझी पूर्ण झालेली नर्मदा परिक्रमा गुरुचरणी.